म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3249



# साहित्य संमेलनांचे महाभारत

भीमराव कुलकर्णी

REFBK-0025561

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, असे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 JUN 1988
3 JUL 1988
17 JUL 1988
7 DEC 1989
25 MAY 199

(क्र. मा. पद्य)
५०००–११–८६

संदर्भ निबंध

३२५१
२५५६१
२८।१।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२५१
अ. क्र. २५५६१
नोंद २८।१।८८

# साहित्य संमेलनांचे महाभारत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

डॉ. भीमराव कुलकर्णी

REFBK-0025561

सुपर्ण प्रकाशन, पुणे

प्रथमावृत्ती :
डिसेंबर १९८७

प्रकाशक :
सौ. सुनीता मिरासदार
सुपर्ण प्रकाशन
१५६२, सदाशिव पेठ,
चिमणबाग, पुणे - ४११०३०

मुद्रक :
ज. ता. गायकवाड
मायबोली प्रिंटर्स
४०५/९ नारायण पेठ,
पुणे - ४११०३०

© श्रीमती कुंदा कुलकर्णी
५/५६, लोकमान्यनगर,
पुणे - ४११०३०

मुखपृष्ठ :
चंद्रमोहन कुलकर्णी

किंमत :
३५ रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२९९
ना. क्र. २५५६९
शाखा

# आगळ्या महाभारताचे भाष्यकार भीमराव कुलकर्णी

" आमच्या घरात सगळ्या खोल्यांतून पुस्तकं राहातात; नि उरलेल्या जागेत आम्ही राहातो ! "—असं क. भीमराव बळवंत कुलकर्णी यांच्या सौभाग्यवती कुंदाताई गमतीनं सांगत असत. आपल्या यजमानांचं पुस्तकांचं वेड लोकविलक्षण आहे, हे कुंदाताईंना पुरतं माहीत होतं. वाणसामान आणायला निघालेले भीमराव फुटपाथवरच्या जुन्या पुस्तकांच्या पसाऱ्यात गुंतून पडत असत. खिशातले पैसे दुर्मिळ पुस्तकांच्या खरेदीत खर्च होऊन जात; आणि हातातल्या पिशवीत रवा-साखरेऐवजी जुनीपानी पुस्तकंच अनेकदा ते घेऊन येत असत. त्यामुळंच पुण्यातल्या लोकमान्यनगरमधील अडीच खोल्यांच्या त्यांच्या ब्लॉकमध्ये सर्वव्यापी परमेश्वराप्रमाणं पुस्तकंच पुस्तकं भरून राहिलेली दिसत.

रॉबर्ट सदे या कवीचा ' स्कॉलर ' म्हणतो –

" My days among the dead are past
Around me I behold;
Wherever these casual eyes are cast.
The mighty minds of old ! "

— सदे कवीनं केलेलं हे वर्णन भीमरावांना तंतोतंत लागू पडतं. इतिहास, बखर, व्याकरण, भाषाविज्ञान, धर्म, तत्त्वज्ञान अशा वैचारिक विषयांवरील पुस्तका बरोबरच चरित्र, कथा, कादंबरी, नाटक, काव्य, प्रवासवर्णन अशा ललित वाङ्मय-प्रकारांतील पुस्तकांतही त्यांना रस होता; गती होती. या विविध साहित्य प्रकारांतील त्यांची स्वतःची ग्रंथरचनाही लक्षणीय होती. अनेक बखरी त्यांनी साक्षेपानं संपादिल्या आहेत. अस्मिता महाराष्ट्राची, गद्य–प्रासाद, ऐतिहासिक पत्रबोध, साहित्य संमेलनांची अध्यक्षीय भाषणं, दामल्यांचं व्याकरण हे त्यांचे संपादित ग्रंथ तोलामोलाचे आहेत. चरित्र ( स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ), व्यक्तिचित्र ( देवाची माणसं, मराठी साहित्यिक, हिरोजी फर्जंद ), कादंबरी ( ओंकार, हरी नारायण, मस्तानीचा मुलगा ), ललित गद्य ( साहित्यिकी, खेकडे आणि खेंकटी, साहित्य संमेलनांचं महाभारत ), कथा ( मुर्दाड, दहावीस पोरं ) हे त्यांचं ललित-लेखन मान्यता पावलेलं आहे. याशिवाय स्फुट लेखांची शंभरी त्यांनी गाठलेली होती. केसरीतील साहित्यविचार, कवितेचा जन्म, स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य, न्या. रानडे यांचा सामाजिक विचार, नवे भाषाविज्ञान असे अभ्यासपूर्ण समीक्षालेख त्यांनी वेळोवेळी सादर केले आहेत.

[library stamp]



भीमरावांच्या कर्तृत्वामागे पूर्वतपस्या उभी होती. अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी जिद्दीनं आपलं नशीब काढलं होतं. वडाची मुळं फत्तर फोडून जमिनीत खोलवर जावीत, पाताळीतला जीवनरस त्यांनी शोषून घ्यावा; आणि मग त्या वटवृक्षाचा माथा गगनाला भिडावा, तसा काहीसा प्रकार भीमरावांच्या बाबतीत घडला. सांगलीच्या पलीकडं, जुन्या जत संस्थानातल्या 'मुचंडी' या खेडयातल्या ग्रामकुलकर्ण्याच्या घरी ते जन्मले. ( ४ नोव्हेंबर १९३२ ही त्यांची जन्मतारीख. ) जतच्या प्रशालेतून मॅट्रिकची परीक्षा पहिल्या वर्गात ते उत्तीर्ण झाले. तिथल्या शेटके गुरुजींनी त्यांना मुंबईला आणलं. केनेडी पुलाखालच्या ज्योती फिल्म स्टुडियोमध्ये हरकाम्याची नोकरी भीमरावांनी केली. तिथून वा. वि. भटांनी त्यांना ठाकुरद्वारच्या मराठी ग्रंथसंग्रहालयात चिकटवलं. ते काम सांभाळून भीमरावांनी शिकवणीही केली. पुन्हा त्यांना थोडी बरी नोकरी मिळाली. 'बेस्ट' कंपनीत ते लेखनिक झाले. या नोकऱ्या करत करत सिद्धार्थ महाविद्यालयातून त्यांनी उच्च शिक्षण घेतलं. १९५८ मध्ये एम्. ए. ला मुंबई विद्यापीठात त्यांना पहिला वर्ग मिळाला. ( १९७१ मध्ये पुणे विद्यापीठाची पीएच्.डी ही पदवी त्यांनी मिळवली. )

यानंतर भीमरावांच्या जीवनाला सुखाचा सुवर्णस्पर्श होऊ लागला. १९५९ ते १९८७ अशी अठ्ठावीस वर्षं त्यांनी अखंडपणे महाविद्यालयीन क्षेत्रात मराठीचं अध्यापन केलं. एम. ए. पर्यंतच्या वर्गांना शिकवलं. त्यांच्या वीस विद्यार्थ्यांनी एम्. फिल्. पदवी आणि पंधरा विद्यार्थ्यांनी पीएच् डी. पदवी मिळवली. १९८३ ते १९८७ अशी अखेरची चार वर्षं भीमराव मुंबईस श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठात मराठीचे विभागप्रमुख होते. त्यांच्या या साऱ्या प्रगतीच्या प्रवासात डॉ. स. गं. मालशे यांचं लाख मोलाचं साहाय्य त्यांना लाभलं. डॉ. मालशे भीमरावांचे केवळ गुरुवर्य नव्हते, ते त्यांना पितृस्थानीच होते.

अध्ययन, अध्यापन, लेखन, संपादन आणि संशोधन या शैक्षणिक आत्मविकासाच्या क्षेत्रात भीमरावांनी भरीव कामगिरी बजावली. पण तिथंच ते थांबले नाहीत. विविध वाङ्मयीन चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिलं. ते करताना सत्तेपेक्षा समाजाशी त्यांनी आपलं नातं जोडलं. त्यांची प्रकृती मुळातच लोकाभिमुख होती. माणसांची अनावर ओढ हेच त्याचं कारण. एखाद्या प्रासंगिक समितीच्या सभासद-पदापासून साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदापर्यंत ते कामं करीत गेले. व्यावहारिक संकेतांना आणि पात्रापात्रतेच्या नियमांना सौजन्याचं कोंदण दिलं तर कलहाची ठिणगी विझून जाते; आणि प्रसन्नतेचे मळे बहरून येतात, याची त्यांना खात्री होती. वास्तवापासून दूर जाऊन आणि काचेच्या घरात बसून तकलुपी युक्तिवाद किंवा फसवी समर्थनं करण्याच्या फंदात भीमराव कधी पडले नाहीत. हातात तांबडी पेन्सिल घेऊन समोरच्या माणसाचे दोष दाखवायच्या खटाटोपात ते शिरले नाहीत. परिपूर्ण असा माणूस कोण आहे ? आपण सगळेच अपूर्ण असतो, याची त्यांना जाणीव होती.

तंत्रासाठी ते झटले-झगडले, पण तपशीलाच्या तडजोडी ते सतत करीत गले. त्यांचं कोणाशी कायमचं भांडण झालं नाही. ' मत खोडावं, पण आतला माणूस खोडू नये ' हा विनोबांचा विचार त्यांनी आचरणात आणला. दोषासकट माणसाचा स्वीकार भीमरावांनी केला; कारण आतला माणूस त्यांना आवडलेला असे. अलीकडं प्रकाशित झालेलं ' खेकडे आणि खेंकटी ' हे आपलं पुस्तक ( मला न विचारताच- ) त्यांनी मला अर्पण केलं होतं. मी त्यांना म्हटलं, ' अहो भीमराव, मी बापडा ज्ञानदेव-नामदेवांचा एक अभ्यासक. खेंकटयांशी माझा दुरूनदेखील कधी संबंध आला नाही ! ' त्यावर ते म्हणाले, ' पण भाऊराव, या पुस्तकातली अर्पण-पत्रिका नामदेवांच्या पसायदानातली आहे. स्वतःला अहंकाराचा वारा लागू न देता सदैव मित्रांचं कल्याण चिंतिणाऱ्या भाऊराव इनामदारांना हे पुस्तक अर्पण केलेलं आहे. '

वाणी आणि लेखणी या दोन्ही माध्यमांतून भीमरावांनी साहित्यसेवा बजावली. नागपूरचा विदर्भ साहित्य संघ, औरंगाबादचं एकनाथ संशोधन मंदिर, हैदराबादचं मराठी महाविद्यालय, मुंबई मराठी साहित्य संघ, केसरीची केळकर व्याख्यानमाला, कोल्हापुरचं करवीर वाचन मंदिर, अनेक विद्यापीठांचे मराठी विभाग, ठिकठिकाणच्या वसंत व्याख्यानमाला अशा व्यासपीठांवरून व्याख्यानं, परिसंवाद आणि चर्चासत्रं या माध्यमांतून ते बोलले. वाणीइतकीच त्यांची लेखणीही सर्वस्पर्शी होती. लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, केसरी, तरुण भारत अशा मातब्बर दैनिकांतून त्यांनी वेळोवेळी लिहिलं. सोबत, माणूस, साहित्य-पत्रिका, प्रतिष्ठान, युगवाणी अशा नामवंत नियतकालिकांतून वाङ्मयीन सदरं त्यांनी चालविली. ताजेपणा, मिस्किलपणा, निरोगीपणा, प्रसन्नता, साहित्यप्रीती आणि समाजमनस्कता हे दुर्मिळ गुणविशेष त्यांच्या वाणीत व लेखणीत एकवटलेले होते.

साहित्य-क्षेत्रातला एक तळमळीचा कार्यकर्ता म्हणून भीमरावांचा लौकिक मोठा आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई मराठी साहित्य संघ, साहित्यसंस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय चळवळ, मॅजेस्टिक साहित्यिक गप्पा या सर्वांचे ते खरेखुरे आधारस्तंभ होते. संभाषणकला आणि सभा-संचालन यांचे वस्तुपाठ त्यांनी पक्के गिरवले होते. ' येथे चातुर्य शहाणे जाले ! ' हे वचन त्यांनी सार्थ करून दाखवलं.

आपल्या कष्टाळूपणानं व कर्तृत्वानं भीमरावांनी थोरामोठयांच्या सदिच्छा मिळविल्या होत्या. प्रा. न. र. फाटक एका ठिकाणी लिहितात, " भीमरावांच्या व्यासंगाला विविधता आणि प्रसन्नता यांची जोड आहे. एवढं विपुल लेखन आणि संपादन ते करू शकले ही त्यांच्या उत्साहाची बिनतोड साक्ष आहे. पण भीमराव केवळ पुस्तकी व्यासंगात रमणारे नाहीत. साहित्यासंबंधीच्या सार्वजनिक कामात ते विशेष रस घेतात. आपली बहुमुखी बुद्धिमत्ता पुस्तकाबाहेरच्या जगातल्या व्यवहारात त्यांनी मुरवली आहे. " दि. ११ जून १९७६ रोजी महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी वाईहून भीम-

रावांना एक प्रशस्तिपत्रक पाठवलं होतं. त्यात पोतदार लिहितात, ' बत्तीस साली सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून मी निवृत्त झालो तेव्हा आजचे भीमराव कुलकर्णी अवघ्या दोन वर्षांचे होते. पुढं प्रौढपणी कार्यप्रसंगानं त्यांच्या आणि माझ्या गाठीभेटी होत गेल्या. त्यांचं पूर्ववृत्त समजलं. त्यांचा विद्याभ्यास ' फूटपाथी ' मंडळात झाला असल्याची हृदयद्रावक कहाणी कळली. त्यामुळे त्यांच्याविषयी मला वाटणारा जिव्हाळा निराळाच आहे. भीमराव हळूहळू मोठे होत गेले. ग्रंथलेखनात ते चौफेर टोलेबाजी करू लागले. मराठी साहित्यक्षेत्रात ते प्रतिष्ठित झाले. त्यांचा स्वभावच आहे 'Excelsior' होण्याचा म्हणजे सतत वरवर चढत जाण्याचा; त्यांचा नित्य चढता अभ्युदय व्हावा, त्यांनी नवे ज्ञान मिळवावे, नवे ग्रंथ लिहावे, शिष्यांना शिकवावे याहून निराळा आशीर्वाद मी काय देणार ? असे आता आयुष्याच्या चरम-पादात आमच्या हातात तरी काय आहे ? '

कृतांताची अमलध्वजा समोर दिसत असताना पोतदारांनी काढलेले हे उद्‌गार काळजाला जाऊन भिडणारे आहेत. पोतदार ज्या वाटेनं जगदीश्वराच्या भेटीला निघून गेले, त्याच परमपदी दि. २७ सप्टेंबर १९८७ रोजी भीमरावांनी महाप्रयाण केलं.

परवाच्या उन्हाळी सुट्टीत एप्रिल–मे १९८७ असे दोन महिने भीमरावांचा मुक्काम पुण्यात होता. तेवढ्या अवधीत त्यांचे चार ग्रंथ हातावेगळे झाले. ' खेकडें आणि खेंकटी ', ' साहित्यिकी ', ' काही साहित्यिक आणि साहित्यकृती ' व ' साहित्य संमेलनांचे महाभारत ' हे त्यांचे चारही ग्रंथ याच दोन महिन्यांत सिद्ध झाले. भीमरावांचा कामाचा झपाटा असा असाधारण होता. ' धबाबा लोटल्या धारा, धबाबा तोय आदळे ! ' हे रामदासांनी केलेलं वर्णन भीमरावांच्या कार्यशक्तीला लागू पडतं. ' वज्र हनुमान मारुती ' असाच हा भीमपुरुष होता.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांचा इतिहास, त्यातील अध्यक्षीय भाषणांची मीमांसा आणि संमेलनातील वाङ्मयीन घडामोडींचं मूल्यमापन आजवर अभ्यासकांनी केलेलं आहे. स्वतः भीमरावांनीसुद्धा साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणांच्या संहिता सुसूत्रपणे खंडशः संपादित केल्या आहेत. पण साहित्य संमेलनांचं महाभारत या त्यांच्या प्रस्तुत ग्रंथाची खुमारी काही वेगळीच आहे. ललित गद्य या वाङ्मय प्रकारातलं हे रससिद्ध लेखन आहे. किंबहुना भीमरावांच्या व्यक्तित्वाची ही खरीखुरी वाङ्मयीन मूर्ती आहे. संमेलनांच्या संस्मरणात ते स्वतः रमले आहेत व वाचकांनीही त्यात रंगून जावं, असं अद्‌भुत रसायन या ग्रंथात आहे.

— डॉ. हेमन्त वि. इनामदार

पुणे
डिसेंबर १९८७

# साहित्य संमेलनांची परंपरा

इंग्रजांनी संस्थात्मक आणि सामूहिक जीवनपद्धतीची जी मुहूर्तमेढ या देशात रोविली, त्याने एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक आणि सांस्कृतिक प्रबोधनाची एक फार मोठी लाट महाराष्ट्रात निर्माण झाली.

या संस्थांनी निर्माण केलेल्या अनेक परंपरा काळाच्या ओघात निस्तेज होऊन नाहीशा झाल्या. आता त्यांची कलेवरेच काय ती उभी आहेत.

त्याला अपवाद साहित्य संमेलनाचा !

नित्यनूतन आणि उत्सवप्रिय असे त्याचे स्वरूप सदैव वर्धिष्णू राहिले आहे.

महाराष्ट्रात सनदशीर अशा संस्थात्मक जीवनाची दीक्षा ज्या महापुरुषाने दिली, त्या महापुरुषाचेच – न्या. रानडे यांचे नाव या संमेलनाच्या निर्मितीशी निगडित आहे.

इ. स. १८७८ मध्ये मराठीत ग्रंथकारांचे संमेलन भरविले पाहिजे, असे न्या. रानडे यांच्या मनाने घेतले व दिनांक ७ फेब्रुवारी १८७८ च्या ‘ ज्ञानप्रकाश ’ मध्ये न्या. रानडे व लोकहितवादी यांच्या सहीने खालील निवेदन प्रसिद्ध झाले...

“ या देशात उपयोगी ग्रंथ फार थोडे आहेत व त्यांचे वाचणारेही फार थोडे आहेत. त्यामुळे विद्येचा लाभ फार थोडया मनुष्यांस होतो. विलायतेत ट्राक्ट व बुक सोसायटी या नावाच्या मंडळया बहुत असून या ग्रथकारांस उत्तेजन देऊन, ग्रंथ प्रसिद्ध करून स्वल्प दराने विकतात. यामुळे फार परोपकार होतो व लोकांचे ज्ञान वाढते. यास्तव या देशात ग्रंथकारास उत्तेजन द्यावे व स्वस्त दराने ग्रंथ प्रसिद्ध व्हावे हा हेतू आहे. यास्तव अशी योजना केली आहे की, दरसाल पाच रुपयांचे ग्रंथ घेण्याची इच्छा असेल त्यानी यादीवर सही करावी, परंतु दरसाल पाच रुपयांपर्यंत मराठी ग्रंथ आम्ही घेण्यास कबूल आहो, अशा सहया हजारापर्यंत मिळाल्यास ग्रंथकारांकडून चांगले ग्रंथ करण्याची योजना आम्ही करू. या मंडळीचे नाव मराठी उत्तेजक मंडळी असे ठेऊ. हजार सहया मिळाल्यावर या मंडळींचे मुख्य ऑफिस मुंबई येथे किंवा पुणे येथे ठेवण्याची व ग्रंथकार व परीक्षक कमेटी व इतर कामदार यांची योजना करण्याची तजवीज होईल. ”

त्यांच्या या निवेदनाची दखल घेऊन पुण्यातील सुमारे ५० साहित्यिक एकत्र आले व त्यांच्यासमोर न्यायमूर्तींनी ग्रंथकारांच्या संमेलनाचा प्रस्ताव मांडला. जमलेल्यांनी तो मान्य करून संमेलनास सुरुवात केली. अध्यक्षीय निवडीचा प्रश्न आला तेव्हा लोकांनी त्यांनाच अध्यक्ष होण्यास सांगितले. वास्तविक वयाने ज्येष्ठ असलेल्या व पाचपंचवीस ग्रंथ ज्यांच्या नावावर आहेत, त्या लोकहितवादींनी हे अध्यक्षस्थान स्वीकारावे, अशी न्यायमूर्तींची इच्छा असणार ! कारण यावेळी त्यांचे वय केवळ ३८ वर्षांचे होते व त्यांच्या नावावर एकही मराठीत ग्रंथ नव्हता ! परंतु लोकांच्या आग्रहापुढे त्यांना मान तुकवावी लागली व ते या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले.
( दि. ११ मे १८७८ )

या पहिल्या संमेलनात दरसाल पाच रुपये देऊ असे आश्वासन देण्याऱ्या हजार सह्या काही जमल्या नाहीत !

संमेलनाचा मुख्य हेतू त्यामुळे काही सफल झाला नाही ! आता महाराष्ट्र म्हणजे कलाप्रिय लोकांचा देश ! या पहिल्याच संमेलनामध्ये – ' कशाला पाहिजेत ही संमेलने ? त्याने कुणाचा फायदा होणार आहे ? ' असे तुसडेपणाचे प्रश्न अनेकांनी विचारले.

' चारदोन वर्षे यांची टिमकी वाजेल आणि सारे विसरून जातील, ' असे एका वक्त्याने जाहीरपणे सांगितले. ' पुणे वैभव ' कर्त्यांनी आपल्या नेहमीच्या खाक्याला अनुसरून ' या रानडे नावाच्या माणसाला मराठी ग्रंथकारांच्या संमेलनाचे अध्यक्ष होण्याचा अधिकारच काय ? ' असा प्रश्न विचारला होता.

न्या. रानडयांच्या समारोपाच्या भाषणात या प्रकारच्या सर्व प्रश्नांना समर्पक उत्तरे देण्यात आली. त्याचा सभेवर मोठा परिणाम झाला.

ग्रंथकारांचे दुसरे संमेलन २४ मे १८८५ रोजी सार्वजनिक सभेच्या कचेरीत ' जोशी हाला 'त भरले. ही सभा वेदशास्त्रसंपन्न कृष्णशास्त्री राजवाडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या सभेसाठी ग्रंथकारांकडून सूचना मागविण्यात आल्या होत्या. अशा सूचना करणारी ४३ पत्रे आली होती. त्यावरून हे दुसरे संमेलन चांगले यशस्वी झालेले दिसते. त्यावेळी संमेलनास सुमारे ३०० पुस्तकेही जमली होती. संमेलनास सूचना करणाऱ्यांमध्ये महात्मा फुले, जावजी दादाजी, बापूसाहेब कुरुंदवाडकर, बाळकृष्ण मल्हार हंस, जंगली महाराज, डॉ. कीर्तिकर, महादेव चिमणाजी आपटे इत्यादी व्यक्ती प्रमुख होत्या. या सभेसंबंधाने केसरीत ( २ मे १८८५ ) झालेली हकीकत लक्षात घेण्यासारखी आहे.

गेले रविवारी जोशीबाबांचे दिवाणखान्यात ग्रंथकर्त्यांची सभा भरली होती. शे-सव्वाशे ग्रंथकार आले होते. संप्रदायाप्रमाणे अध्यक्षांची नेमणूक झाल्यावर गेल्या वीस वर्षांत मराठी भाषेचे पाऊल कितपत पुढे पडले हे समजण्याकरिता प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांच्या संबंधाने रा. ब. रानडे यांनी जमलेल्या मंडळीस माहिती दिली.

सन १८६५ साली रा. ब. यांनी सरकारच्या सांगीवरून याच विषयावर एक रिपोर्ट केला होता. यामुळे या खेपेस मराठी ग्रंथकारांवर नजर फेकण्याचे काम त्यांनी केल्याने मराठी भाषेचा ओघ अनियमितपणे पुढे धाव घेत आहे, हे त्यांस फारच सुबोध रीतीने दाखविता आले. रपोट वाचल्यावर दोनचार गृहस्थांनी मराठी भाषेत ग्रंथाभिवृद्धी होण्या साठी दोनचार स्तवनांची योजना करण्याविषयी सुचविले व सरकारी मदत मिळविणे, मराठी ही भाषा सर्वांस अवगत करण्याची खटपट करणे, लोकांस उपयोगी पडतील असेच विषय हाती घेणे वगैरे झालेल्या व पुढे होतील त्या सूचनांचा विचार करून पुढे काय करावे हे ठरविण्याचे पुढील वर्षावर ठेऊन सभा विसर्जित झाली.

हे तिसरे संमेलन सातारा येथील काही पुढारी मंडळींच्या खटपटीने भरले. अध्यक्षस्थानी रघुनाथ पांडुरंग तथा दादासाहेब करंदीकर होते. त्यांसंबंधी केसरीने लिहिले :

" सातारा येथील कित्येक पुढारी मंडळींच्या खटपटीने मराठी ग्रंथकारांचे संमेलन गेल्या आठवड्यात साताऱ्यास होऊन त्यात चार विद्वान एकत्र जमले असता काव्यशास्त्रविनोदाच्या ज्याप्रमाणे गप्पा होतात तशाप्रमाणे सुखाने व आनंदाने बऱ्याच विषयांवर चर्चा होऊन मोठी मौज झाली असे सदर संमेलनाच्या प्रसिद्ध झालेल्या हकिगतीवरून दिसते. चार मंडळींनी एकत्र जमून आपला काल आनंदात, प्रेमात व मौजेत घालवू नये, असा कोणी निर्बंध केलेला नाही. मनुष्य जात्याच उत्सवप्रिय आहे. मग तो विद्वान असो की अविद्वान असो. भेद इतकाच की विद्वान एकत्र झाले असता आपला काल काव्यशास्त्रविनोदात घालवितात आणि मूर्ख त्याच्या उलट व्यसनात, निद्रेत किंवा कलहात घालवितात. साताऱ्याच्या सभेत जमलेले लोक विद्वान असल्यामुळे त्यांनी पहिल्या मार्गाचे अवलंबन केले. त्यातून जेथे दादासाहेब करंदीकर, तात्यासाहेब मुतालिक किंवा दत्तोपंत पारसनीस यांच्यासारखी मंडळी व्यवस्था ठेवण्यास होती, तेथे जवणखाण्याचा वगैरे, बेत उत्तम पाहून मंडळींचा काळ पुष्कळ मौजेत गेला असेल याबद्दल कोणासही शंका येण्यास जागा नाही. इतकी विद्वान मंडळी एकत्र जमून व व्याख्यानाच्या चक्रा होऊन पुन्हा जॉन्सनच्या रासेलसप्रमाणे या संमेलनाचा शेवट झाला, एवढेच काय ते जरा विलक्षण आहे ! विद्याविषयक चर्चा राजकीय दृष्टीने निरुपद्रवी आहे, म्हणून तिला राजकीय उत्सवापेक्षा अधिक सहानुभूती मिळेल हे खरे आहे. पण कोणतीही चर्चा किंवा उत्सव निरुपद्रवी आहे एवढ्यानेच त्याचे कार्य सिद्धीस जात नाही. असो, संमेलनाची ही पहिलीच बैठक आहे. करिता काव्य-शास्त्र विनोदापेक्षा यातून पुढे काही जास्त निघते की काय हे पाहून मग त्या संबंधान जास्त लिहिण्या-सारखे असल्यास लिहू. मराठी भाषेतील ग्रंथकार किंवा विद्वान मौजेकरिता का होईना, पण एके ठिकाणी जमले ही आनंदाची गोष्ट आहे व त्यांच्या करमणुकीची नीट व्यवस्था ठेवल्याबद्दल सातारकरांचे आम्ही अभिनंदन करतो. "

१८८५ नंतर ग्रंथकारांचे तिसरे संमेलन भरण्यासाठी १९०५ साल उजाडावे

लागले. म. म. पोतदारांच्या भाषेत सांगायचे म्हणज, 'ग्रंथकारांच्या संमेलनाने वीस वर्षे एकसारखी झोप काढून कुंभकर्णावर ताण केली आहे.'

केसरीच्या हकिकतीतील खोच लक्षात ठेवण्यासारखी आहे. मौजेकरिता का होईना, मराठी साहित्यिकांनी एकत्र जमणे ही गोष्ट अभिनंदनीय मानली जाते आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे चांगली व्यवस्था. परंतु पुढे लगेच एका वर्षाने पुढचे ( चौथे ) संमेलन पुण्यास मळेकरांच्या वाड्यात रा. सा. गोविंद वासुदेव कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. गेल्या साली सातारा मुक्कामी भरलेल्या प्रथम संमेलनाप्रमाणे या दुसऱ्या संमेलनानेही 'काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम' या न्यायाने शब्दसृष्टीतील आदरणीय व मनोरम प्रदेशात यथास्थित संचार करण्यात वेळ घालविला. साताऱ्यास रा. पारसनीस, रा. करंदीकर व रा. मुतालिक यांच्या पाहुणचाराने ग्रंथकर्त्यांस विद्यादेवीच्या प्रसादापेक्षा इतर निरुपद्रवी करमणुकीत काही काळ व्यर्थ दवडावा लागला; पण पुणे शहर विद्यादेवीचे माहेरघर असल्यामुळे विद्यादेवीचे विषयक आनंदातच मंडळी एकसारखी तल्लीन होती. विशिष्ट कामाकरिता जमलेल्या पाहुण्यांवर त्या कामापेक्षा फाजील पाहुणचार लादण्याची राष्ट्रीय सभेने घालून दिलेली प्रथा या विद्वान लोकांच्या संमेलनात उचलण्यात आली नाही, ही समाधानाची गोष्ट होय. साताऱ्याचे संमेलन रासेलसप्रमाणे काव्यशास्त्रपरिपूर्ण पण कोणत्याच बाबीसंबंधाने व्यवस्थित कार्यक्रमास विशिष्ट स्वरूप न देणारे असे झाले. ग्रंथकार एका जागी जुळले असता त्यांनी एकदोन दिवस साहित्यविषयक चर्चा करून मौजेत वेळ घालवल्यास त्यात कोणाचे काही नुकसान नाही; पण तेवढ्या मौजेवरच ग्रंथकारांच्या संमेलनाने संतुष्ट रहाणे सांप्रतच्या राष्ट्रजागृतीच्या वेळी श्रेयस्कर नसल्यामुळे द्वितीय संमेलनात मौजेशिवाय काही विशिष्ट गोष्टी घडून आल्या पाहिजेत, असे म्हणण्याकडे मंडळींचा विशेष कल होता. गेल्या साली मौज झाली. यंदा नुसत्या काव्यशास्त्रविनोदावर मंडळी संतुष्ट नव्हती. "

ही मंडळी केवळ काव्यशास्त्रविनोदावर संतुष्ट नव्हती, काही विशिष्ट गोष्टी घडून आल्या पाहिजेत असे त्यांना वाटत होते आणि त्यातून साहित्य परिषदेचा जन्म झाला. साहित्य परिषद नेमकी कोणत्या दिवशी स्थापन झा ली हे सांगणे कठीण आहे. पण या संमेलनाचे संयोजन करणारी संस्था महाराष्ट्र साहित्य परिषदच होती असे पोतदारांनी अधिवेशनाच्या शकावलीत लिहिले आहे. ज्या मंडळींनी चौथे संमेलन भरवले त्यांनीच ग्रंथकारांच्या संमेलनानंतर रीतसर परिषदेची स्थापना केलेली दिसते. ही तारीख २७ मे १९०६ होती हे लक्षात येते.

हे चौथे संमेलन पुण्याला भरले होते. त्यात पुढाकार नेमस्तांचा नसून टिळक-पक्षीयांचा होता. या संमेलनास लो. टिळक उपस्थित होते. खरे पाहिले तर तेच या संमेलनाचे अध्यक्ष व्हावयास हवे होते. परंतु असल्या नेमस्त चळवळीत त्यांना रस नव्हता ! त्यांचे सहकारी केळकर-खाडिलकर यांच्या आग्रहामुळे ते या संमेलनाला

आले होते.

संमेलनामध्ये मराठी हा विषय मुंबई विद्यापीठाने जरुरीचा ठेवला म्हणून त्याचे अभिनंदन करावा असा ठराव आला.

त्याला प्रो. विजापूरकर, महादेव राजाराम बोडस व इतिहासाचार्य राजवाडे यांनी कडाडून विरोध केला.

'आभार मानायचे तर न्या. रानडे यांचे माना, पं. मदनमोहन मालवीय यांचे माना. युनिव्हर्सिटीचे कसले मानता ?' असा आरडाओरडा झाला.

'युनिव्हर्सिटी ही आमची विद्यामाता असली तरी तिला कर्झनने भ्रष्ट केले असल्यामुळे तिचे आभार मानणे हे ग्रंथकारास कमीपणा आणणारे आहे,' असाही प्रतिवाद झाला.

शेवटी न. चि. केळकरांनी केळकरी मध्यममार्ग काढला. ते म्हणाले, 'युनिव्हर्सिटीला दोष देऊ नका व आभारही मानू नका' आणि सभा शांत झाली. लो. टिळक आपल्या चेल्याच्या युक्तिवादाने हसले व म्हणाले, 'ही गोष्ट बाहेर जाऊ देऊ नका!'

'का ?' कुणीतरी विचारले.

'कारण मराठी वाङ्मयाच्या रुढीसाठी सरकारी मदतीचे प्रयत्न करावेत असा ठराव झालाय ना ?'

अशा रीतीने ग्रंथकार परिषदेतून 'साहित्य परिषदेचा' जन्म झाला आणि स्वाभाविकच; त्यामुळे पुढची संमेलने भरविण्याची जबाबदारी परिषदेवर पडली.

त्यानंतर साहित्य संमेलने हे एक महाराष्ट्राचे खास वैशिष्टय बनले. अखिल भारतीय, प्रादेशिक, प्रांतिक, उपनगरीय, शारदीय, वासंतिक, महिलांची, बालकुमारांची, नवोदितांची, होतकरूंची, ग्रामीण दलित इ. नाना प्रकारची मराठी भाषिकांची साहित्यसंमेलने मोठया संख्येने व उत्साहाने होतात. या सर्व संमेलनांमध्ये 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या व सर्व मराठी भाषिकांचे प्रतिनिधिक ठरलेल्या संमेलनाला विशेष महत्त्व दिले जाते.

परिषदेची अधिकृत घटना १९१२ च्या अकोल्याच्या संमेलनामध्ये मंजूर होऊन परिषदेचे कार्यालय मुंबई येथे सुरू झाले. परंतु निखळ साहित्यविषयक चळवळीला मुंबई शहर अनुकूल नव्हते हे कालांतराने लक्षात आले. संमेलने भरविण्यामध्ये पुणेकरांचा विशेष पुढाकार होता. १९२१ पर्यंत परिषदेने तीन संमेलने भरविली होती. (१९१५, १९१७ व १९२१) पुढे संमेलनाचा अध्यक्ष परिषदेने निवडायचा की स्थानिक संस्थेने असा वाद सुरू झाला. त्या वादात बडोद्याच्या 'सहविचारिणी सभा' या स्थानिक संस्थेने संमेलनाध्यक्ष निवडण्यात यश मिळविले. तथापि १९३२ मध्ये परिषद पुण्यास आणण्याचा ठराव होऊन १९३३ पासून तिचे कार्यालय पुण्यास सुरू झाले. नंतर संमेलने मोठया प्रमाणात परिषदेमार्फतच भरविण्यात येऊ लागली.

साहित्य-परिषदेच्या अनुकरणाने विदर्भ, मुंबई व मराठवाडा येथे विभागीय साहित्यसंस्था उदयास आल्या. बडोदे, ग्वाल्हेर, इंदूर व हैद्राबाद इ. ठिकाणी संमेलने भरविण्याच्या निमित्ताने मराठी भाषिकांच्या साहित्यसंस्था कार्यरत झाल्या होत्याच. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर या सर्व साहित्यसंस्थांचे संघीकरण करावे व या संस्थांनीच स्वतंत्र अशी एक मध्यवर्ती संघसंस्था स्थापन करावी, असे मिरजेच्या संमेलनात ( १९५९ ) ठरले. १९६१ च्या ग्वाल्हेरच्या संमेलनात त्यावर शिक्कामोर्तब होऊन 'अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ' नावाची संस्था उदयाला आली. पुण्याची महाराष्ट्र साहित्य परिषद, विदर्भाची विदर्भ साहित्य संघ, मुंबईची मुंबई मराठी साहित्य संघ, मराठवाड्याची मराठवाडा साहित्य परिषद या सांप्रत तिच्या घटक संस्था असून आंध्रप्रदेश मराठी साहित्य परिषद ( हैद्राबाद ), मध्यप्रदेश मराठी साहित्य परिषद ( जबलपूर ) व कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद ( गुलबर्गा ), या तिच्या समाविष्ट संस्था आहेत. १९६५ च्या हैद्राबाद साहित्यसंमेलनापासून साहित्य संमेलने भरविण्याचे कार्य महामंडळाने स्वीकारले. १९८५ पर्यंत महामंडळाने १४ संमेलने भरविली. त्यापूर्वीची ४५ धरून ही संख्या ५९ होते. पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक म्हणजे २७, विदर्भात ६, मुंबईत ४, मराठवाड्यात ३, गोव्यात २, कर्नाटकात ३ व दिल्लीत १ अशी त्यांची विभागणी आहे.

१९४२ च्या नाशिक संमेलनात प्रचलित संमेलने कायम ठेवून आणखी विशिष्ट संमेलने भरविण्यास परिषदेने व अन्य संस्थांनी प्रयत्न करावेत असे एका ठरावाद्वारे आवाहन करण्यात आले. महाराष्ट्रातील विभागीय साहित्यसंस्थांनी व बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य संस्थानी अशी संमेलने नियमितपणे भरविण्याचा प्रयत्न सातत्याने केला आहे. विदर्भ व मराठवाडा साहित्य संमेलन, बडोदा, इंदूर, ग्वाल्हेर येथील साहित्यसंस्थांची वार्षिक अधिवेशने या बाबतीत अधिक कार्यरत आहेत. मुंबईच्या साहित्य संघाने उपनगरीय साहित्य संमेलने भरविली आहेत. पुण्याच्या साहित्य परिषदेने १९७० पासून अशी तीन अधिवेशने घेतली. १९७९ पासून परिषदेने विभागीय संमेलनाऐवजी ग्रंथव्यवहार परिषदा भरविण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत तीन ठिकाणी परिषदा भरल्या आहेत. याखेरीज गोव्यातील गोमंतक मराठी साहित्य संमेलने, औदुंबर येथील सदानंद वाङ्मय मंडळातर्फे दर वर्षी भरविली जाणारी संमेलने, बालकुमार साहित्य संमेलने. १९७५ पासून सुरू झालेली महिला कथाकार संमेलने, जळगाव जिल्हा साहित्य संमेलने, ख्रिस्ती साहित्य संमेलने, ग्रामीण व दलित साहित्य संमेलने इ. अनेक प्रकारची संमेलने नित्य होत आहेत. या सर्व संमेलनांचे स्वरूप मात्र मर्यादित राहिले आहे.

संमेलनाच्या अध्यक्षाची निवड आरंभीच्या काळात काही ज्येष्ठ साहित्यिकांच्या व कार्यकर्त्यांच्या आपापसातील चर्चेतून एकमताने होत असे. १९१२ मध्ये अधिकृतपणे तयार झालेल्या परिषदेच्या घटनेतही संमेलनाबाबतीत स्पष्ट नियम करण्यात आले

नव्हते. संमेलन भरविण्यासाठी खटपट करणाऱ्या मंडळींची निमंत्रणे मिळवून परिषदे-मार्फत वेगळ्या बैठका घेऊन अध्यक्षांची निवड करण्याची प्रथा सुरू झाली. परिषद आणि संमेलन यांच्या सदस्यांच्या बैठका वेगवेगळ्या भरत. त्यातूनच वादंगाला तोंड फुटले. १९३२ पर्यंत हा वाद धुमसत राहिला. संमेलन समिती व संमेलन ज्या ठिकाणी भरवायचे तेथील कार्यकर्ते यांच्या विचार-विनिमयातून अध्यक्ष ठरे. त्यामुळे परिषदेला डावलले जात आहे असे वाटू लागले. १९३३ साली नागपूर संमेलनात संमेलनविषयक अधिकृत नियम करण्याचा ठराव झाला व समिती नेमण्यात आली. इंदूरच्या संमेलनात १९३५ मध्ये संमेलन घटना समिती नेमण्यात आली. या दोन्ही समित्यांचे एकीकरण करून संमेलन भरविण्याचा अधिकार शेवटी परिषदेकडे आला. परिषदेचे कार्यालय पुण्यास आल्यामुळे हे सुलभ होऊ शकले. परिषदेच्या सदस्यांनी अध्यक्षपदासाठी निवड-लेल्या तीन नावांतून स्थानिक स्वागत समितीने अध्यक्षाची निवड करावयाची अशी पद्धत रुढ झाली होती. पण काही काळाने स्वागत-समितीचे सदस्य नोंदविण्यात या पद्धती-मुळे चुरस निर्माण होऊन त्याचे अनिष्ट परिणाम दिसून येऊ लागले. १९६० साली ही पद्धत बंद करून परिषदेच्या साऱ्या सदस्यांच्या मतदानातून अध्यक्षीय निवड करण्यात येऊ लागली. पुढे महामंडळाची स्थापना झाल्यानंतर महामंडळाच्या घटक व समाविष्ट संस्थांच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी अध्यक्षाची निवड करावी असे ठरविण्यात आले. १९६५ ते १९६९ या काळातील संमेलनाध्यक्षांची निवड या पद्धतीने करण्यात आली. १९६९ ते १९७२ या काळात खूप प्रयत्न करूनही संमेलत भरविण्यात महामंडळाला अपयश आले. त्यातूनच स्थानिक स्वागत समितीला अध्यक्षीय निवडणुकीत महत्त्व द्यावे या विचाराने घटनेत दुरुस्ती करून महामंडळाच्या सदस्यांनी स्वागत मंडळाकडे तीन नावे पाठवावयाची व स्थानिक स्वागत मंडळाने निवडणुकीने त्यांतून एकाची निवड करावयाची असे ठरविण्यात आले. १९७७ साली पुणे येथे या समितीच्या निवडीत चुरस दिसून आली. ती पाहून घटनेत १९७८ मध्ये पुन्हा दुरुस्ती करण्यात आली. त्यानुसार, महामंडळाच्या चार घटक संस्थांचे प्रत्येकी ३५, समाविष्ट संस्थांचे प्रत्येकी २०, माजी संमेलनाध्यक्ष आणि स्वागत मंडळाचे ५० अशा सदस्यांच्या मतदानाने महामंडळाने सुचविलेल्या तीन व्यक्तींतून अध्यक्षांची अंतिम निवड करावी असे ठरले. बार्शी संमेलनापासून संमेलनाध्यक्षाची निवड या पद्धतीनेच आजवर चालू आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद लाभणे हा त्या त्या व्यक्तीच्या साहित्यसेवेचा सर्वोच्च गौरव समजला जातो.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षास प्रत्यक्षात विशेष असे काहीच अधिकार नसतात. संमेलनातील ठरावांची कार्यवाही महामंडळ करते. ही मराठी साहित्य संमेलने साधारणपणे तीन दिवस भरतात. स्वागत, उद्‌घाटन, अध्यक्षीय भाषण यांमध्ये पहिला दिवस व्यतीत होतो. नंतरच्या दोन दिवसांत वाङ्मयचर्चा, परिसंवाद, कथाकथन,

काव्यगायन, विषयनियामक समितीत मंजूर झालेल्या ठरावांच्या आधारे खुले अधिवेशन, अध्यक्षीय समारोप व शेवटी आभारप्रदर्शन असे त्यांचे स्वरूप असते. स्वागतसमितीतर्फे रात्री करमणुकीच्या कार्यक्रमाचेही आयोजन केले जाते. काही संमेलनांतून स्वागत समितीने वाङ्मयीन लेख मागवून त्यांचे संग्रह प्रसिद्ध केले आहेत. १९५० च्या मुंबई संमेलनाने वाङ्मयीन संमेलनाला, शास्त्रसंमेलनांची जोड देण्याचा उपक्रम सुरू केला. तो फार थोडा काळ चालला. निबंध मागवून त्यांच्या चर्चेचेही उपक्रम काही ठिकाणी झाले एकाच वेळी अनेक विषयांवर चर्चा करण्याचे प्रयत्नही झाले संमेलनाचे स्वरूप एकंदरीने उत्साही राहिले आहे. मराठी साहित्यिक आणि साहित्यप्रेमी जनतेचा वार्षिक उत्सव म्हणजेच संमेलन असे थोडक्यात म्हणता येईल.

खुल्या अधिवेशनात मांडले जाणारे ठराव व त्यांची चर्चा यांना महामंडळपूर्व संमेलनांतून महत्त्वाचे स्थान असे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा ठराव १९४६ च्या बेळगाव संमेलनामध्ये प्रथम आला व पुढील संमेलनांनी त्याचा हिरीरीने पाठपुरावा केला. अश्लीलताविरोधी ठरावास संमेलनामध्ये फार महत्त्व सातत्याने आले होते असे दिसते. शुद्धलेखन, लिपीसुधारणा, प्रादेशिक विद्यापीठे, सीमाप्रश्न, विचारस्वातंत्र्य यांसारख्या विषयांच्या चर्चेने अनेक संमेलने गाजली आहेत. कराडचे संमेलन आणीबाणीच्या प्रश्नाने गाजले, तर अकोल्याचे वाङ्मय पुरस्कार योजनेच्या संदर्भात शासनाच्या हस्तक्षेपाच्या प्रश्नामुळे गाजले. १९७७ चे पुण्याचे व १९७९ चे चंद्रपूरचे ही दोन अधिवेशने मराठवाडा विद्यापीठाच्या नामकरण प्रश्नाच्या निमित्ताने दलितांनी निदर्शने करून शेवटच्या दिवशी उधळून लावली. बार्शी संमेलनात या प्रकाराची पुनरावृत्ती अध्यक्षांच्या कुशल हस्तक्षेपामुळे टळली. संमेलनात मंत्र्यांना अवाजवी महत्त्व दिले जाते असा आक्षेप घेऊन १९८१ मध्ये मुंबईस काही साहित्यिकांनी एकत्र येऊन मालतीबाई बेडेकरांच्या अध्यक्षतेखाली एक समांतर संमेलन भरविले.

साहित्यिकांच्या तीव्र भावनांना संमेलनाने वेळोवेळी वाट करून दिली आहे.

साहित्य संमेलने ही मराठी भाषिकांच्या वाङ्मयप्रेमातून मोठ्या प्रमाणात भरविण्यात आली. स्वातंत्र्यपूर्व काळात राजकीय दडपणांना न जुमानता या संमेलनातून साहित्यिकांनी स्वातंत्र्याचा आवाज उठविला. हैदराबाद व मडगाव येथील अधिवेशनांना त्या दृष्टीने फार महत्त्व आले. औरंगाबाद येथे संयुक्त महाराष्ट्राचा ठराव प्रचंड मताने संमत करण्यात आला ( १९५७ ). मडगाव ( १९६४ ), इचलकरंजी ( १९७४ ), कराड ( १९७५ ), अकोला ( १९८१ ) व जळगाव ( १९८४ ), या संमेलनांनी गर्दीचा उच्चांक गाठला.

ग्रंथकार संमेलने या आरंभीच्या नावाने भरणाऱ्या अधिवेशनांचे वेळोवेळी नामांतर होत गेले. १९०८ मध्ये लेखक-संमेलन, १९०९ मध्ये महाराष्ट्र साहित्य संमेलन, मध्यंतरी काही काळ मराठी साहित्य-संमेलन, १९३५ पासून १९५३ पर्यंत पुनश्च महाराष्ट्र साहित्य संमेलन, १९५४ पासून पुन्हा ‘ मराठी साहित्य संमेलन ’

या व्यापक नावाच्या धोरणाचा केलेला स्वीकार व महामंडळाकडे संमेलने गेल्यानंतर त्याच्या मागे ' अखिल भारतीय ' या उपाधीची वाढ, अशी ही नामांतराची हकीकत.

मुंबई मराठी साहित्य संघाच्यावतीने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे हीरक महोत्सवी अधिवेशन मुंबापुरीस भरले. मुंबईस भरणारे हे पाचवे संमेलन होय. १९१५, २६, ३८, ५० या सालांत यापूर्वी अनुक्रमे गंगाधरराव पटवर्धन, सरदार मा. वि. किबे, स्वातंत्र्यवीर सावरकर व महाराष्ट्रकवी यशवंत यांच्या अध्यक्षतेखाली ही संमेलने भरली होती. डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी, बॅ. मुकुंदराव जयकर व डॉ. भा. ग. वाड हे अनुक्रमे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. ३६ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर आणि महाराष्ट्र राज्यस्थापनेनंतर पाव शतक उलटून गेल्यानंतर हे संमेलन मुंबईस भरले. विश्राम बेडेकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. संमेलनाचे पहिले अध्यक्ष न्या. रानडे हे होते आणि सर्वांत तरुण ( वय ३८ ) अध्यक्षही तेच होते. संमेलनाध्यक्ष म्हणून वयाने ज्येष्ठत्वाचा मान अध्यक्ष बेडेकरांचेकडे ( वय ८० ) जातो. मोजकी परंतु लक्षणीय स्वरूपाची त्यांची वाङ्मयनिर्मिती आहे. त्यांनी निर्मिलेल्या प्रत्येक वाङ्मयप्रकारात स्वतःचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा त्यांनी उमटविला आहे.

**संमेलनांची आतापर्यंतची अधिवेशने खालीलप्रमाणे**

| क्रम | वर्ष | स्थळ | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १ | १८७८ | पुणे | न्या. मू. म. गो. रानडे |
| २ | १८८५ | पुणे | कृष्णशास्त्री राजवाडे |
| ३ | १९०५ | सातारा | र. पां. करंदीकर |
| ४ | १९०६ | पुणे | गो. वा. कानिटकर |
| ५ | १९०७ | पुणे | वि. मो. महाजनी |
| ६ | १९०८ | पुणे | चिं. वि. वैद्य |
| ७ | १९०९ | बडोदे | का. र. कीर्तिकर |
| ८ | १९१२ | अकोला | ह. ना. आपटे |
| ९ | १९१५ | मुंबई | गंगाधरराव पटवर्धन |
| १० | १९१७ | इंदूर | ग. ज. आगाशे |
| ११ | १९२१ | बडोदे | न. चिं. केळकर |
| १२ | १९२६ | मुंबई | मा. वि. किबे |
| १३ | १९२७ | पुणे | श्री. कृ. कोल्हटकर |
| १४ | १९२८ | ग्वाल्हेर | मा. श्री. अणे |
| १५ | १९२९ | बेळगाव | शि. म. परांजपे |
| १६ | १९३० | मडगाव | वा. म. जोशी |
| १७ | १९३१ | हैदराबाद | श्री. व्यं. केतकर |
| १८ | १९३२ | कोल्हापूर | सयाजीराव गायकवाड |
| १९ | १९३३ | नागपूर | कृ. प्र. खाडिलकर |
| २० | १९३४ | बडोदे | ना. गो. चापेकर |
| २१ | १९३५ | इंदूर | बाळासाहेब पंतप्रतिनिधी |
| २२ | १९३६ | जळगाव | मा. त्रि. पटवर्धन |
| २३ | १९३८ | मुंबई | वि. दा. सावरकर |
| २४ | १९३९ | अहमदनगर | द. वा. पोतदार |
| २५ | १९४० | रत्नागिरी | ना. सी. फडके |
| २६ | १९४१ | सोलापूर | वि. स. खांडेकर |
| २७ | १९४२ | नासिक | प्र. के. अत्रे |
| २८ | १९४३ | सांगली | श्री. म. माटे |

| क्रम | वर्ष | स्थळ | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| २९ | १९४४ | धुळे | भा. वि. वरेरकर |
| ३० | १९४६ | बेळगाव | ग. त्र्यं. माडखोलकर |
| ३१ | १९४७ | हैदराबाद | न. र. फाटक |
| ३२ | १९४९ | पुणे | शं. द. जावडेकर |
| ३३ | १९५० | मुंबई | य. दि. पेंढारकर |
| ३४ | १९५१ | कारवार | अ. का. प्रियोळकर |
| ३५ | १९५२ | अमळनेर | कृ. पां. कुलकर्णी |
| ३६ | १९५३ | अहमदाबाद | वि. द. घाटे |
| ३७ | १९५४ | दिल्ली | लक्ष्मणशास्त्री जोशी |
| ३८ | १९५५ | पंढरपूर | शं. दा. पेंडसे |
| ३९ | १९५७ | औरंगाबाद | अनंत काणेकर |
| ४० | १९५८ | मालवण | आ. रा. देशपांडे |
| ४१ | १९५९ | मिरज | श्री. के. क्षीरसागर |
| ४२ | १९६० | ठाणे | रा. श्री. जोग |
| ४३ | १९६१ | ग्वाल्हेर | कुसुमावती देशपांडे |
| ४४ | १९६२ | सातारा | न. वि. गाडगीळ |
| ४५ | १९६४ | मडगाव | वि. वा. शिरवाडकर |
| ४६ | १९६५ | हैदराबाद | वा. ल. कुळकर्णी |
| ४७ | १९६७ | भोपाळ | वि. भि. कोलते |
| ४८ | १९६९ | वर्धा | पु. शि. रेगे |
| ४९ | १९७३ | यवतमाळ | ग. दि. माडगूळकर |
| ५० | १९७४ | इचलकरंजी | पु. ल. देशपांडे |
| ५१ | १९७५ | कराड | दुर्गा भागवत |
| ५२ | १९७७ | पुणे | पु. भा. भावे |
| ५३ | १९७९ | चंद्रपूर | वामन चोरघडे |
| ५४ | १९८० | बार्शी | गं. बा. सरदार |
| ५५ | १९८० (फेब्रु) | अकोला | गो. नि. दांडेकर |
| ५६ | १९८१ (डिसें.) | रायपूर | गंगाधर गाडगीळ |
| ५७ | १९८३ | अंबेजोगाई | व्यंकटेश माडगूळकर |
| ५८ | १९८४ | जळगाव | शंकरराव खरात |
| ५९ | १९८५ | नांदेड | शंकर पाटील |
| ६० | १९८६ | मुंबई | विश्राम बेडेकर |

# साहित्य संमेलनांचे महाभारत

'अजि म्यां ब्रह्म पाहिले' या थाटात पहिल्यांदा साहित्य संमेलनाचा सोहळा मी अनुभविला तो १९५७ साली. प्रा. अनंत काणेकर यांच्या अध्यक्षतेखाली त्या वर्षी औरंगाबाद येथे संमेलन भरणार होते आणि काणेकरांचा विद्यार्थी म्हणून 'घोडा घोडा म्हणजे काय असतो?' या धर्तीवर मोठी साहित्यसंमेलने कशी असतात हे पाहण्याच्या इच्छेने भर उन्हाळ्यात औरंगाबादेस जावयाचे ठरविले होते. तशी मुंबईची उपनगरी संमेलने त्यापूर्वी पाहतच होतो, परंतु माझ्या आयुष्यातले मोठे साहित्य संमेलन हे औरंगाबादचेच पहिले! त्यावेळी पुढे होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या गदारोळाशी माझा नित्य संबंध येणार आहे असे कोणी भविष्य वर्तविले असते तर मी स्वतः त्याला वेड्यातच काढले असते! मुंबईचे प्रसिद्ध हस्तरेखातज्ज्ञ करंदीकर यांचा मुलगा माझ्या वर्गातच असल्याने मी त्यांच्या घरी गेलो असता कुतुहलाने त्यांनी एकदा माझा हात बराच वेळ पाहिला होता. परंतु त्यांना काही या गोष्टींचा सुगावा लागला नव्हता. माझ्या हातावरच्या छुप्या रेषांनी त्यांना चकविले होते!

सत्तावन्न साली संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाने सारे रान पेटले होते. द्वैभाषिक राबविण्याचा श्रेष्ठींचा अट्टाहास चालू होता आणि त्याविरुद्ध संमेलनात आवाज उठविला जाणार याची शासनाला कुणकुण लागली होती. काणेकरांच्या भाषणाच्या प्रती आगाऊच स्थानिक स्वागतमंडळींच्या हाती पडल्यामुळे तिथले निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्ते (!) अस्वस्थ होते आणि श्रेष्ठींच्या आदेशानुसार द्वैभाषिकांची तरफदारी करण्यासाठी काका गाडगीळ औरंगाबादेस चालले होते. काका गाडगीळ हा सामान्य माणसांचा प्रतिनिधी होता आणि आपल्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने प्रखर विरोधातही हसतखेळत सगळ्यांशी कसा मिसळत होता, याचे आश्चर्यजनक चित्र प्रवासातच पाहावयास मिळाले. औरंगाबादला मुंबईहून जाणाऱ्या प्रतिनिधींच्या गाडीत काकाही सामील झालेले होते आणि संयुक्त महाराष्ट्राचे विरोधक म्हणून काकांचा उपहास करण्याची एकही संधी कुणी सोडत नव्हता. शाहीर अमर शेख यांच्या पहाडी आवाजाने संयुक्त महाराष्ट्राचा नारा घुमविला जात होता आणि त्यामुळ होणारा

टाळयांचा कडकडाट ओसरल्यानंतर सगळीकडून ' संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ' असा कानठळया बसवणारा आवाज घुमविण्यात येत होता, तो मुद्दाम काकांच्या कानाशी. त्या पाठोपाठ ' काकांच्या बैलाला हो ऽऽ ' ठरलेला होता. काका इतरांच्या बरोबर मिष्किलपणे हसत, या खेळात सहभागी होत होते. " अरे, १८५७ च्या शताब्दीचे हे वर्ष आहे. त्या हुतात्म्यांची आठवण ठेवा आणि त्यांना श्रद्धांजली वाहण्याच्या कार्यक्रमाचा थोडा तरी विचार करा. " असं ते जीव तोडून सांगत होते, परंतु ते ऐकण्याच्या मनःस्थितीत कोणी नव्हते. " काका, या संमेलनात एकदा द्वैभाषिक गाडून टाकू आणि त्याची पुण्यतिथी साजरी करायला पुढच्या वर्षी तुम्हालाच बोलवू. " श्री. शं. नवरे डोळे मिचकावीत म्हणत होते आणि काका हसून त्यांना खुशीटाळी देत होते! सगळाच देखावा अद्‌भुत होता. राज्यकर्त्यांचा प्रतिनिधी इतक्या खेळीमेळीने जनतेत मिसळण्याचा देखावा हा अशा प्रकारचा पहिलाच (आणि शेवटचादेखील). काकाच होते म्हणून पब्लिक शांत होते, दुसरा कोणी असता तर त्याचा ' घाशीराम ' करावयास पब्लिकने मागेपुढे पाहिले नसते !

संमेलन म्हटल्यानंतर, तिथली राहण्याजेवण्याची व्यवस्था, आजूबाजूंची प्रेक्षणीय स्थळे आणि काही साहित्यिकांच्या लक्षात राहण्यासारख्या हालचाली यांना प्राधान्य आणि त्याच्यापुढे प्रत्यक्ष संमेलनाचे कामकाज नेहमीच गौण असते.

संयुक्त महाराष्ट्राच्या ज्वलंत प्रश्नामुळे, काणेकरांनी आपल्या भाषणात लिहिलेला यासंबंधीचा मजकूर गाळावा यासाठी त्यांच्यावर सतत दडपण आणले जात होते. काणेकर शांतपणे सर्वांचे ऐकून घेत होते आणि ' ऐनवेळी मला वाटेल ते करीन ' असे आपल्या अभिजात सौजन्याने सांगत होते.

' मी नक्की सांगतो, ऐनवेळी तुझा काणेकर कच खाणार ! ' सगळीकडे कुजबूज चालू होती आणि या प्रश्नावर आपापसांत पैजाही लावल्या जात होत्या. काणेकरांनी ज्या ओळी गाळाव्या म्हणून स्थानिक कार्यकर्त्यांनी आग्रह चालविला होता त्याच ओळी नेमक्या अशा काही आवेशाने आणि आत्मप्रत्ययाने काणेकरांनी म्हटल्या की, त्या ऐकताना अंगावर रोमांच उभे राहिले. त्यावेळी झालेल्या टाळयांचा कडकडाट अजूनही कानात घुमतो. साहित्य-संमेलनामध्ये असा रोमांचकारी अनुभव त्यानंतर फक्त दोनतीनदा आला. मडगावच्या संमेलनात विरोधकांच्या आरोळयांनी विचलित न होता कुसुमाग्रजांनी गोमंतकाच्या विलीनीकरणाचा ठामपणे पुरस्कार केला तेव्हा आणि गेल्या वर्षी अकोल्याच्या संमेलनात आपली अध्यक्षीय सूत्रे सुपूर्द करताना गं. बा. सरदारांनी फक्त पाचच मिनिटांत साऱ्या सभागृहाला कवेत घेतले तेव्हा ! कऱ्हाडच्या संमेलनात निर्भयपणे सौ. इंदुमती केळकरांनी घोषणा दिल्या तेव्हाही वातावरण एकदम थरारून उठले होते !

औरंगाबादच्या संमेलनामध्ये काका गाडगीळांनी ' लोकप्रतिनिधींनी द्वैभाषिकाच्या बाजूने कौल दिला आहे, तो अंमलात आणणे आपले कर्तव्य आहे. ' या

अर्थाचे बहारीचे भाषण केले. त्यांच्या चिंध्या चिंध्या उडविणारे दत्तो वामन पोतदारांचे भाषण हा आणखी एक आल्हाददायक अनुभव होता 'लोकप्रतिनिधींना केवळ हात आहेत, मते कुठे आहेत.' असा टोला समेवर येऊन पोतदारांनी हाणल्यानंतर काणे-करांच्या भाषणाची धास्ती घेतलेले संमेलनाचे स्वागताध्यक्ष संमेलनाच्या मंडपातून जे एकदा पसार झाले ते नंतर कधी दिसलेच नाहीत. या संमेलनामुळे मुंबईच्या मंत्रि-मंडळातील आपले स्थान डळमळीत झाले आहे, याची त्यांना वेळीच कल्पना आली असावी. त्यानंतर मंत्रिमंडळातले आणि राजकारणातले त्यांचे स्थान गडगडले ते कायमचेच. असाच प्रसंग कऱ्हाडला यशवंतरावावर आला होता; त्यातून ते शाइस्ते-खानाच्या बाण्याने कसेबसे निसटले. तो प्रसंग पुढे येणारच आहे!

औरंगाबादच्या दोनतीन आठवणी आठवल्या की अजूनही हसू येते. प्रति-निधींच्या डब्यातून प्रवास करताना सगळ्यांनी मांसाहारी जेवण मागविले. बसण्याच्या बाकावर ठेवलेल्या ताटातील मटणाची वाटी उपडी झाली. साफ करण्यासाठी कोणी पुढे येत नाही हे पाहून श्री. शं. नवरे पुढे झाले आणि निर्विकार वृत्तीने त्यांनी सारे पुसून टाकले. मांसाहारी ताटे आल्याने नवऱ्यांना उपास पडणार हे दिसून आले. मी स्टेशनवरच्या भोजनगृहात जाऊन चौकशी केली आणि आलूची भाजी मिळते असे कळल्यावर त्यांना उत्साहाने 'आलूचे फदफदे' मिळणार म्हणून सांगितले. त्यांचा चेहरा खुलला. प्रत्यक्षात ती बटाट्याची पातळ भाजी निघाल्याची पाहून त्यांनी कपाळाला हात लावला. बटाट्याला इकडे आलू म्हणतात हे कोणा लेकाला माहीत होते!

औरंगाबादला त्यावेळी दारूबंदी नव्हती. काही पट्टीचे जाणकार लोक केवळ त्यासाठीच औरंगाबादला आले होते. अर्धेअधिक अजंठा-वेरूळ पाहावयास आले होते! मी आणि केशवराव कोठावळे पहिल्याच दिवशी फेरफटका मारीत असता हॉटेलात जाऊन बियर पिण्याचा बूट निघाला. दोघेही दबकत दबकत एका हॉटेलात गेलो. बियरची ऑर्डर देताना छाती धडधडत होती. वेटरने बियरची बाटली फोडून समोर ठेवली. त्यातील थोडी बियर ग्लासात ओतून पहिला घोट घेतला आणि दोघांची तोंडे बघण्यासारखी झाली. बाटलीचे झाकण बसवून दोघेही न बोलता बाहेर पडलो. प्रतिनिधींच्या निवासस्थानी कोठावळ्यांनी बाटली कशीबशी दोन दिवस लपवून ठेवली आणि उगीच झंझट नको म्हणून शेवटी ती अंधारात दूर कुठेतरी फेकून दिली आणि सुटकेचा निःश्वास टाकला. गेल्या वीस पंचवीस वर्षांत जग किती बदलले!

हैदराबादच्या संमेलनाच्या वेळी तर काही जणांची इससे भी ज्यादा फजिती झाली होती. हैदराबादला एका मद्यालयात दहाबारा मंडळी ऐटीत शिरली आणि तेथे काय काय मिळते याची विचारपूस करू लागली.

'साहेब, काहीही मिळते. व्हिस्की, रम, जीन, बियर, वाईन, शँपेन.'

' शँपेन ! वंडरफुल ! एक शँपेनची बाटली आण. ' कोणीतरी ओरडले. अमेरिकन कादंबऱ्यांतून फेसाळणाऱ्या शँपेनच्या पार्ट्यांची वर्णने वारंवार वाचली होती. त्याचा आस्वाद घेण्याची संधी आता प्राप्त झाली होती. शँपेनची एक बाटली दहा-बारा जणांत विभागली गेल्यानंतर त्याच्या पहिल्याच घोटाने तोंड आंबट होऊन गेली. बिल आल्यानंतर साऱ्यांची तोंडे आणखी बघण्यासाठी झाली. साऱ्यांचे खिसे झाडूनही बिलाची रक्कम पुरी होईना. गंमत पाहणाऱ्या मालकाने राहिलेले पैसे नंतर देण्याचे सांगून आपल्या औदार्याने सर्वांना लाजविले.

औरंगाबादला प्रतिनिधींच्या व्यवस्थेचा सगळा आनंदच होता. काणेकरांपुढे मिलिंद महाविद्यालयात संबंधितांची उतरण्याची सोय करण्यात आली होती. त्यानुसार मीही मिलिंदवरच राहावयास गेलो. तेथे उतरलेल्या सर्वांनी जेवणाचा खर्च जो येईल तो समान वाटून घ्यायचे ठरले आणि उत्तमपैकी मांसाहारी जेवण कँटीनमध्ये तयार करण्यात येऊन ते आमच्या हॉलमध्ये आणण्यात येऊ लागले. आमच्या बरोबरीच्या एका प्राध्यापकांनी, त्यांच्या पत्नीला मांसाहारी जेवण चालत नाही, या सबबीवर स्वतःचे एकट्याचेच जेवणाचे पैसे देऊ केले होते. प्रत्यक्षात मात्र ते दोन्ही दिवस ते तिला मांसाहारी भोजनाची आग्रहपूर्वक दीक्षा देत होते.

' अगं, तुला हे आता सगळे शिकावंच लागणार आहे. आयते मिळते आहे तर नीट खाऊन घे. ' ते हळुवारपणे तिला समजावीत होते आणि त्या माउलीला ते असह्य होत होते. मांसाहारी जेवण हे पुरोगामित्वाचे लक्षण होते ना !

औरंगाबादेनंतर मालवण, मिरज, ठाणे, ग्वाल्हेर, सातारा या ठिकाणी १९६२ पर्यंत साहित्य-संमेलने भरली. त्यांपैकी मिरज आणि सातारा या ठिकाणच्या साहित्य-संमेलनास उपस्थित राहिलो. मिरजेचे संमेलन दोन कारणांनी खूप गाजले म्हणण्यापेक्षा, लक्षात राहिले. त्यातील पहिले कारण म्हणजे अध्यक्षीय निवड. अर्थातच त्यावेळी अध्यक्षीय निवड इत्यादी प्रकारांशी निकटचा संबंध नसल्याने त्यातल्या अंतर्गत खाचाखोचा मला माहीत असण्याचे काही कारण नव्हते, परंतु मृत्यूपूर्वी काही दिवस अगोदर वि. स. खांडेकर यांच्याशी पुण्यात त्यांचे प्रकाशक देशमुखांकडे बोलत बसलो असता खांडेकरांनी काहीसे प्रक्षुब्ध होऊन मिरजेच्या साहित्य-संमेलनाचा विषय काढला. मिरजेला संमेलनाच्या वेळी अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी, खुद्द अध्यक्षांनी त्यामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात भाग घेतला की, अशी अनिष्ट प्रथा पडावयास नको होती, असे खांडेकरांचे म्हणणे होते. त्याउलट खांडेकरांबद्दल क्षीरसागरप्रेमी लोकांचे म्हणणे वेगळेच होते. मिरजेच्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष भाऊसाहेब खांडेकर होते. संमेलनाच्या पहिल्या दिवशी संमेलन सुरू होण्यापूर्वी मिरजेला प्रचंड वादळाचा तडाखा बसला आणि आता संमेलन कसचे होते, अशी परिस्थिती निर्माण झाली. अर्ध्या तासाने वादळ कमी झाले आणि त्यामुळे झालेला उशीर भरून काढण्यासाठी अध्यक्षांच्या गुणवर्णनपर भाषणांना फाटा मिळाला. त्यामुळे ही भाषणे करण्यासाठी सरसावून बसलेल्या वक्त्यांचे

चेहरे खाडकन उतरले. त्याचे उट्टे काढण्यासाठी म्हणून की काय, खांडेकरांनी आपले स्वागताध्यक्षांचे भाषण पावणेदोन तास ठोकले. क्षीरसागरांची व्यासपीठावरची चुळबुळ पाहण्यासारखी होती. त्यांच्या शेजारी बसलेले घाटे खट्याळपणे क्षीरसागरांना खांडेकरांचा कोट ओढण्यासाठी हावभाव करू लागले आणि सगळ्या प्रेक्षकांचे लक्ष घाट्यांच्या हालचालीकडे लागले. 'पण भाऊसाहेब, तुम्ही गिरीश निवडून आले नाहीत म्हणून मुद्दाम हा प्रकार केला असे क्षीरसागरांना वाटते. तुमचे कऱ्हाडेप्रेम यावेळी उसळून आले, अशी कुजबूज आहे.' मी अभावितपणे पण काहीशा थट्टेने बोलून गेलो आणि खांडेकरांना हा घाव वर्मी बसल्याचे माझ्या लक्षात आले. खांडेकरांनी तासभर या विषयासंबंधाने आपल्या भावना उघड केल्या. खांडेकरांसमोर हा विषय काढायला नको होता, असे मला राहून राहून वाटते !

सातारच्या संमेलनाला काकासाहेब गाडगीळ अध्यक्ष होते. सेवानिवृत्तीनंतर ते पुण्याच्या साहित्य परिषदेच्या कार्यात विशेष रस घेत होते. श्री. के. क्षीरसागर आणि पुण्याचे एक सेवानिवृत्त न्यायाधीश यांनी त्यांना अश्लीलताविरोधी मोहिमेचे नेतृत्व बहाल केले होते. या काळात पावसाळी छत्र्यांप्रमाणे उमटलेल्या अश्लील मासिकांना त्यामुळे दहशत बसली होती. परंतु गोडबोल्यांच्या उत्साहामुळे काही प्रथितयश साहित्यिकांवर खटले भरण्यात येऊन मोठी विलक्षण परिस्थिती निर्माण झाली होती. काकासाहेब तसे खूपच समजूतदार आणि साहित्यिकांना मनस्ताप होऊ नये, या मताचे होते; परंतु काही साहित्यिकांच्या तथाकथित अश्लील लेखनामुळे त्यांच्यावर भलताच प्रसंग ओढविला होता. अशा धास्तावलेल्या एका साहित्यिकाबरोबर जेवण्याचा एकदा या काळात प्रसंग आला. समोरच्या थाळीतील कोंबडीची तंगडी पाहून तो एकदम शहारला.

'काय रे बाबा, काय झाले,' मी घाबरून विचारले.

'कुठल्याही मांसल भागाचा आस्वाद तर सोडाच, परंतु त्याचे वर्णनदेखील करावयाचे नाही, अशी मी शपथ घेतली आहे. मोगलांच्या सैनिकांचे घोडे पाणी पीत नसत तेव्हा, तुला पाण्यात संताजी धनाजी दिसतात का ? म्हणून विचारीत. कुठल्याही सुंदर स्त्रीकडे किंवा भरलेल्या कोंबडी-बकरीकडे पाहिले की मला काका, श्री. के, गोडबोले दिसू लागतात.'

अशा या वातावरणात सातारचे सम्मेलन कसे पार पडले असेल याची कल्पना करण्याचे कार्य वाचकांच्या प्रतिभेवरच सोपवलेलं बरं !

साताऱ्यानंतर मडगाव, भोपाळ, वर्धा येथील संमेलनांना साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीचा सदस्य या नात्याने मी हजर राहिलो. भोपाळच्या संमेलनातील डॉ. कोलत्यांचे आटोपशीर भाषण हा 'अध्यक्षाने किती बोलावे' याचा नमुना म्हणून पुढे ठेवण्यासारखा आहे. वर्ध्याच्या संमेलनातील पु. शि. रेगे यांचे भाषणही तसेच आटोपशीर आणि मौलिक स्वरूपाचे आहे. तासाभरात करता येईल असे नेटके, मुद्दे-

सूद आणि मार्मिक असे अध्यक्षीय भाषण असले पाहिजे. अध्यक्षीय भाषण म्हणजे एक भला मोठा गंभीर प्रबंध, अशी समजूत काहींनी करून घेतलेली असते. अगोदरच्या उद्‌घाटकांचे लंबेचवडे भाषण, अध्यक्षांचा परिचय, कार्याध्यक्ष-स्वागताध्यक्ष यांची भाषणे, महामंडळाच्या अध्यक्षांचे आणि अन्य काहींची भाषणे यांमुळे नमनालाच घडाभर तेल वापरण्याचा प्रकार होऊन, अध्यक्षीय भाषणाचे अक्षरशः पानपत होते. मिरज हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण. बार्शीलाही सरदारांचे चांगले भाषण या प्रकारामुळेच निस्तेज वाटले.

१९६५ पासून मराठी साहित्य-संमेलनाचे 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' असे नामकरण झाले आणि संमेलने भरविण्याची जबाबदारी घटकसंस्थांच्या संघसंस्थेकडे, महामंडळाकडे आली. या महामंडळामुळे शुद्धलेखनाच्या प्रश्नामध्ये विदर्भवाल्यांची सरशी होऊन, त्यामध्ये एकसूत्रता आणण्याचे ( परंतु परंपराविच्छेदाचे ) कार्य झाले तरी त्यानंतर ही संस्था केवळ संमेलने भरविण्याची एक निष्क्रिय 'मंडळी' बनून गेली—सुरुवातीला महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या इच्छेनुसार अध्यक्ष निवडला जाण्याचा एक चांगला पायंडा पडला त्यामुळे भोपाळ, वर्धा, हैदराबाद येथे बऱ्याचशा एकमताने आणि सामोपचाराने अध्यक्ष निवडले गेले. भोपाळला के. नारायण काळे यांची निवड व्हावी असे प्रयत्न झाले, परंतु काळयांना पुढच्या वर्षी संधी द्यायची, असे ठरवून काळयांनी कोलत्यांसाठी माघार घेतली. तशी संधी काळयांना नंतर कधीच प्राप्त झाली नाही !

मी पाहिलेल्या संमेलनांमध्ये वाङ्मयीन चर्चेला प्राधान्य असलेले आणि नामांकित साहित्यिकांनी गजबजलेले संमेलन म्हणजे १९६८ सालचे वर्ध्याचे. होणार, होणार म्हणून हे संमेलन इतके रेंगाळले आणि अशा भलत्या वेळी भरले की, संमेलनाच्या दिवशी पहाटे तेथे पोचल्यानंतर तेथले एकंदर वातावरण पाहून इथे संमेलन आहे की नाही, अशी शंका मनात येऊ लागली. वऱ्हाडची मंडळी थंडीच्या दिवसात सूर्य चांगला वर आल्याखेरीज उठत नाहीत, आणि एकदा उठली की, मग कामाची घाई कशी सुरू होते, याचा प्रत्यय पहिल्याच दिवशी आला. वर्ध्याच्या संमेलनामध्ये भोजन प्रबंधाचे आणि पश्चिम महाराष्ट्रासंबंधीच्या आपल्या भावनांचे वऱ्हाडीयांचे प्रदर्शन त्यांच्या लौकिकाला साजेसे होते. संमेलनासाठी आलेल्या अधिकृत प्रतिनिधींची संख्या ५०-६० च्या आतबाहेर होती, परंतु प्रत्यक्ष जेवणाच्या पंगती मात्र दोन तीन हजारांच्या उठत होत्या. पहिलेच जेवण इतके भक्कम होते की, अकराला सुरू झालेल्या पंगती इकडे संमेलन सुरू होण्याची वेळ आली तरी चालूच होत्या. स्वागताध्यक्ष रामेश्वर बजाज मात्र त्यामुळे खुशीत होते. स्वागताध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले भाषण हे संमेलनाच्या साऱ्या स्वागताध्यक्षांच्या भाषणांत अतिशय छोटे आणि भावनेने थबथबलेले होते. संमेलनाची पंढरीशी त्यांनी मार्मिक तुलना केली आणि संमेलनातील सारे प्रतिनिधी निघून गेल्यानंतर सारे वातावरण कसे उदासतेने भरून येते या कल्पनने

आतापासून आपण कसे अस्वस्थ झालो आहोत, हे त्यांनी भावनावेगाने सांगितले. 'तीनचार दिवस साहित्यप्रेमी मंडळी एकत्रित येतात, भेटतात, बोलतात, फड रंगवितात. रात्री आकाश तारकांनी भरून यावे व दिवस उजाडताच काही दिसू नये असे काहीतरी संमेलनानंतर होऊन जाते.'

विदर्भसाहित्य संघाचे अध्यक्ष या नात्याने माडखोलकर अध्यक्षपदाच्या सूचनेसाठी उभे राहिले. वर्ध्यापासून नागपूर जवळ असल्याने संमेलनाला आपल्या लवाजम्यानिशी ते मुद्दाम खूप उशिरा आले होते. विदर्भवाल्यांची ही रीतच आहे म्हणे! माडखोलकरांच्या डोळ्यांवरची जेवणाची सुस्ती अजून उतरली नव्हती. त्यांनी सुरुवातच मुळी अशी केली :

'विदर्भाचे लोक आतिथ्यशील म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी जर दुपारी बारा वाजता जेवायला बोलावले तर ते सायंकाळपर्यंत मिळेल याची खात्री नाही. पण ते रात्री बारा वाजता नक्की मिळेल आणि ते इतके भरभक्कम की हाताला लागलेल्या लोणकढ्या तुपाचा वास पुढे आठवडाभर साबण लावूनही हटणार नाही!'

संमेलनाच्या समारोपाच्या भाषणात आभार मानताना डॉ मा. गो. देशमुखांनी आपल्या खारटतुरट शैलीत पुन्हा याच विषयाला हात घातला. ते म्हणाले, 'म्हशीपुढे आंबोण ठेवल्यानंतर म्हैस दूध भरपूर व चांगले देते हे लक्षात घेऊन कार्यकर्त्यांनी जेवणाची उत्तम व्यवस्था ठेवली होती संमेलन यशस्वी झाले ते त्यामुळेच!'

देशमुखांच्या या वक्तव्याने पुण्या-मुंबईचे काही प्रतिनिधी बिथरले आणि शेवटचे जेवण घेण्यास त्यांनी नकार दिला.

'त्यांनी काहीही म्हटले तरी संमेलन चांगले झाले ना, मग शेवटच्या क्षणी त्याला गालबोट लावू नका' बजाज अजीजीने विनवू लागले.

'आंबोण न घेताही आम्ही संमेलन चांगले झाले असेच म्हणू!' असे म्हणून ह्या प्रतिनिधींनी स्टेशनचा रस्ता धरला.

वर्ध्याच्या संमेलनाने कविसंमेलन, कथाकथन अशा करमणुकीच्या कार्यक्रमांना फाटा दिला होता आणि संमेलनाच्या निमित्ताने मागविलेल्या वाङ्मयीन लेखांचा संग्रह प्रसिद्ध करून तो प्रतिनिधींना विनामूल्य देण्याची व्यवस्था केली होती. 'माझ्या मते उत्कृष्ट कवितेचे गमक' या विषयावरचा परिसंवाद दोन दिवस चालला आणि त्यामध्ये तीस नामवंत वक्त्यांनी भाग घेतला. 'ऐतिहासिक कादंबरी' या विषयावरच्या परिसंवादाचे पाचही वक्ते कुलकर्णी आणि तेही प्राध्यापक होते. परिसंवादाचे अध्यक्ष दत्तो वामन पोतदार यांनीही आपले खरे आडनाव कुलकर्णीच असल्याचे जाहीर करून एक सौम्य धक्का दिला. त्यामागोमाग पु. शि. रेगे यांनीही आपण मूळचे कुलकर्णी असल्याचे सांगून त्यावर कळस चढविला. मराठी समीक्षा आणि प्राध्यापकी कुळकर्ण्यांनी बळकावल्याचा गमतीने कांगावा करणाऱ्या ठणठणपाळांनाही ते मूळचे कुळकर्णीच असल्याचा शोध, ते हजर राहिले असते तर वर्ध्याला निश्चितपणे लागला असता.

डॉ. वाळिंबे साहित्य संमेलनांना फारसे हजर राहात नाहीत. पुण्याच्या साहित्य परिषदेच्चे कार्याध्यक्ष असल्याने ते वर्ध्याला हजर राहिले होते. काव्याच्या परिसंवादातील त्यांचे भाषण इतके दणदणीत होते की, नागपुरच्या आकाशवाणीनं ते सारे जसेच्या तसे ऐकविले, आणि वाळिंब्यांचा आवाज साऱ्या महाराष्ट्रात त्यामुळे अक्षरशः घुमत राहिला. त्यांच्या भाषणाने अनेकांना अस्वस्थ केले.

वर्ध्याच्या संमेलनानंतर घटना अशा घडत गेल्या की, महामंडळाला यापुढे संमेलन भरविता येईल की नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली. वर्ध्याच्या संमेलनाच्या खर्चाचा मोठा भार एकट्या रामेश्वर बजाज यांजवर पडून त्यांना घरदार विकावे लागले, असे महामंडळाच्या बैठकीतून सांगण्यात येऊ लागले. संमेलन म्हटले की, कमीत कमी लाखाचा खर्च ( आता तो चारपाच लाखांवर गेला आहे ) होतो, हे ऐकून निमंत्रण देणाऱ्या संस्था दचकू लागल्या. वडोदा, कलकत्ता या ठिकाणी संमेलने भरण्याची शक्यता असता, खर्चाच्या अंदाजाने तिथली बोलणी फिसकटली आणि 'मुंबईने आता संमेलन घेतले पाहिजे' असे आम्ही पुण्याची मंडळी मुद्दाम म्हणू लागलो. महामंडळाची कचेरी मुंबईला, खजिनदार, कार्यवाह मुंबईचे आणि दत्तो वामन पोतदार हे अध्यक्ष म्हणून राहिले तेही मुंबईमुळे. अशा वेळी मुंबईने संमेलन घेतले पाहिजे म्हणून आम्ही त्यांना मुद्दाम खिजवीत होतो. महाबळेश्वर, कल्याण येथे महामंडळाची संमेलनें घेता येण्यासारखी परिस्थिती असताना आम्ही, मुद्दाम ही ठिकाणे पुण्याच्या कार्यकक्षेत येत असल्याने, तेथे विभागीय संमेलने भरविली आणि हिंमत असल्यास मुंबईने मुंबईत संमेलन घ्यावे, असे म्हणत राहिलो. मुंबईला मोठे संमेलन घेणे कठीण आहे, याची जाणीव असल्यान एक प्रकारचे मुद्दाम खिजविणे होते. मुंबईकर 'आम्ही संमेलन घेतोच' असे म्हणत आणि गप्प राहत. इचलकरंजीच्या संमेलनात मुंबईच्या साहित्य संघाच्या कार्याध्यक्षांनी, 'पुढच्या वर्षी मुंबईस संमेलनास या, आमचा पाहुणचार घ्या' असे जाहीरपणे सांगितले. गेल्या दहा वर्षांत मुंबईकरांना अद्याप आपला शब्द पुरा करता आला नाही. वर्ध्यानंतर ६ वर्षे संमेलनाविना गेली. मोठ्या विवंचनेने महामडळाला ग्रासले होते.

साहित्य-संमेलने भरवायची तर, ती जिथे भरवायची तिथल्या राजकीय कार्यकर्त्यांच्या जबाबदारीशिवाय आणि नेतृत्वाशिवाय भरविणे शक्य नाही, या कटू जाणिवेने महामंडळाच्या कार्यकर्त्यांना घेरले आणि त्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे पुतणे सुधाकरराव नाईक हे यवतमाळच्या जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते आणि त्यांच्या जबाबदारीवर यवतमाळला संमेलन भरविण्याचे ठरले, ते १९७३ साली. ज्यांनी संमेलन भरवायचे त्यांनी जर इतका खर्च करावयाचा तर निदान त्यांच्या पसंतीचा अध्यक्ष तरी निवडून देण्यासाठी महामंडळाने हातभार लावावा, असा विचार पुढे आला आणि त्यानुसार महामंडळाच्या घटनेत दुरुस्त्या करण्यात आल्या. त्यानुसार यवतमाळकरांना अध्यक्ष कोण हवा, त्याची चाचपणी

करण्यात आली. यवतमाळकरांना पु. ल. देशपांडे आणि ते मिळत नसल्यास ग. दि. माडगूळकर हे अध्यक्ष हवे होते. पु. ल. देशपांडे यांच्याकडे विचारणा केल्यावर 'आता नको, पुढे पाहू' म्हणून त्यांनी सफाईने टोलविले. यवतमाळचे ४९ वे संमेलन होते, पुढचे सुवर्णमहोत्सवी होते. रौप्यमहोत्सवी अधिवेशनाचे अध्यक्ष भाऊसाहेब खांडेकर होते. सुवर्णमहोत्सवी अधिवेशनाचे अध्यक्ष कोण होणार हे वर्षभर अगोदरच कळून चुकले.

महामंडळाच्या नव्या घटनेनुसार घटकसंस्थांकडून आलेल्या नावांतून महामंडळाच्या सदस्यांच्या मतदानाने तीन नावे निवडून संमेलन जिथे भरवावयाचे तिथल्या स्वागतमंडळाकडे ती पाठवावयाची आणि स्वागतमंडळाने त्यातून एकाची निवड जाहीर करावयाची होती. या पद्धतीने यवतमाळला ग. दि. माडगूळकर यांची निवड जाहीर झाली. या वर्षी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा कार्याध्यक्ष म्हणून मी चुरशीच्या निवडणुकीने निवडला गेलो होतो आणि महामंडळाचा पदसिद्ध सदस्य असल्याने यवतमाळच्या घडामोडी मला चांगल्याच माहीत होत्या. माडगूळकरांना अध्यक्ष करावयास वचनबद्ध असल्याने त्यांची निवड तर निश्चित होती, परंतु निवडणुकीचे नाटक तर करावयाचे होते. ते सारे यथासांग पार पाडले. तीन नावांसाठी जी निवडणूक पार पडली, त्यासाठी निर्वाचन अधिकारी वगैरे यंत्रणा नियमानुसार उभी करूनही त्या निवडणुकीचे कागदपत्र मुंबईच्या महामंडळाच्या कचेरीने गायब केले. त्यावरून काय झाले असेल, त्याची वाचकांना कल्पना करता येईल!

ग. दि. ऊर्फ अण्णा माडगूळकरांची निवड अपेक्षेप्रमाणे जाहीर झाली आणि हार-गुच्छ घेऊन त्यांच्या अभिनंदनार्थ मी सकाळी उठून त्यांच्या बंगल्यावर गेलो. अण्णांनी नेहमीप्रमाणे उत्साहाने स्वागत करण्याएवजी मला पाहून तोंड फिरविले.

'गड्या, मला काही हार घालू नकोस. मला साहित्य परिषदेचा हार नको आहे.' अण्णा घुश्श्यातच म्हणाले.

मी एकदम थिजून गेलो. मला अण्णांच्या रागाचे कारण काही कळेना.

'अण्णा, झाले काय?' मी विचारले.

'लेका, हा तुझा बाप इथे पुण्यातच राहतोय ना! अध्यक्षपदासाठी माझे नाव मुंबईने, मराठवाड्याने सुचविले. तू पुण्याचा कार्याध्यक्ष आणि तुम्ही लोकांनी माझे नाव सुचवू नये?'

काय झाले आहे हे माझ्या लक्षात आले. मी हसून शांतपणे त्यांना सारी परिस्थिती समजावून सांगितली. 'तुम्हीच अध्यक्ष आहात हे पहिल्यापासून ठाऊक कसे होते' याचा पाढा वाचला. त्याने त्यांचे काहीसे समाधान झाले असावे.

'हं, घाला आता तो हार. मुलानेच मांडीवर विधी केल्यावर मांडी थोडीच तोडता येते?'

अण्णांची निवड झाली तेव्हा संमेलन तर तीनचार आठवड्यांवर आले होते.

निरनिराळ्या साहित्यसंस्थांचे सत्कार घेणे आणि अध्यक्षीय भाषण लिहून, छापून घेणे या गोष्टी एवढ्या कालावधीतच पुऱ्या करावयाच्या होत्या. अण्णांनी झपाट्याने भाषण लिहून काढले. विषय मनात खदखदत होताच. तो कागदावर झपाट्याने आविष्कृत झाला. गीतकार म्हणून हिणविणाऱ्यांना उद्देशून अण्णांनी आपली कैफियत या भाषणात पोटतिडिकीने पेश केली होती.

यवतमाळला संमेलनाच्या तयारीत यत्किंचितही कसूर नव्हती. सारी सरकारी यंत्रणा संमेलनाच्या मागे उभी होती आणि यवतमाळमधील नामवंत व्यक्ती झडझडून कामाला लागल्या होत्या. परंतु संमेलनात हवा तसा रंग भरला नाही. संमेलनातील भोजनावळीसंबंधाने जांबुवंतराव धोटयांनी रान उठविले होते. त्यामुळे पहिल्या दिवशी सकाळी संमेलनाच्या मंडपाभोवती पोलिसांचे सशस्त्र कडे होते. जांबुवंतरावांना शासनाने उचलून गजाआड बंद केल्यामुळे पोलिसांचे कडे लवकरच दूर सारण्यात आले. परंतु, त्यामुळे जेवणाचा बेत अगदी साधा म्हणजे सामान्यच होता. परिसंवाद, काव्यगायन इत्यादी कार्यक्रमांमध्ये नियोजन काही ना काही कारणांमुळे शिथिल होत गेले. कसे का होईना, खूप वर्षांनी एकदा संमेलन तर भरले हे काही थोडे नव्हे, असे महामंडळाला त्यामुळे वाटू लागले.

साहित्यिकांच्या मद्यपानाबाबतीत खूप दिवस नुसते ऐकत होतो. त्याचे विश्वरूपदर्शन पहिल्यांदा यवतमाळला पाहावयास मिळाले. अध्यक्षीय भाषण संपल्यावर पहिल्या दिवशी संध्याकाळी सर्किट हाऊसवर साहित्यिकांना पार्टी होती. मद्याची रेलचेल होती. सोडा न घालता मद्य पिणाऱ्यांची स्पर्धा चालू होती. एका ज्येष्ठ साहित्यिकांना आडवे झाल्यानंतर उचलून पलंगावर ठेवण्यास मलाच हातभार लावावा लागला.

रात्री नऊ वाजता कथाकथनाचा कार्यक्रम होता आणि अण्णा त्याचे अध्यक्ष होते.

'गंपटराव, तुमचे भाषण बेश झाले. आता हाणा.' पु. भा. भावे शेजारी बसून त्यांना आग्रह करू लागले आणि अण्णांना आवरायचे कसे असा प्रश्न पडला.

'अण्णा, तुमच्यासाठी मी अख्खी बाटली घेऊन ठेवली आहे. पण आता नको.' मी अण्णांना म्हटले तसा त्यांना राग आला.

'गड्या, ओसाडगावचा असलो तरी तुझ्यासारखा वतनदार कुलकर्णी आहे. तू मला समजतोस तरी काय?' ते म्हणाले आणि उठून चालायला लागले. मी हातातली बाटली जोराने भिंतीवर आपटली आणि त्यांच्याबरोबर चालायला लागलो.

संमेलनाच्या मंडपाबाहेर ते मला म्हणाले,

'मी पायलट आहे, परंतु बोथट नाही.'

'म्हणजे काय अण्णा!'

'अरे, माझे पाय लटलटताहेत हे खरे आहे, परंतु डोके शाबूत आहे. ते बोथट

झाले नाही !'

ते खरेच होते. अण्णांनी घोडयाची गोष्ट इतक्या बहारीने सांगितली की, ती मी जन्मभर विसरणार नाही !

यवतमाळनंतर इचलकरंजी आणि कऱ्हाडची संमेलने कमालीची गाजली. अगोदर ही दोन्ही संमेलने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकक्षेत होती. परिषद आणि महामंडळ या दोन्ही संस्थांचे पदाधिकारी या नात्याने या संमेलनाच्या कार्यात आम्ही अनेकांनी कमालीचे कष्ट घेतले होते. प्रत्येक तपशील बारकाईने विचार करून आखला होता.

इचलकरंजीच्या सुवर्णमहोत्सवाचे अध्यक्ष पु. ल. देशपांडे होणार हे निश्चित होते. परंतु ऐनवेळी पुलंनी एक अट घातली.

' संमेलनाच्या व्यासपीठावर मंत्री येता कामा नये, ' अशी ती विलक्षण अट होती. अशी अट त्यांनी त्यावेळी का घालावी हे मोठेच गूढ होते. त्यामुळे आता कसे करावयाचे असा प्रश्न निर्माण झाला. इचलकरंजीच्या कार्यकर्त्यांपुढे हा प्रश्न टाकला, तेव्हा त्यांनी ही अट एकदम मान्य असल्याचे सांगून आणखी बुचकळ्यात पाडले. ' मी संमेलनाच्या व्यासपीठावर मुळीच येणार नाही. रसिक म्हणून मात्र मी संमेलनास जरूर उपस्थित राहीन ' या यशवंतराव चव्हाणांच्या खुलाशाने पुढे त्याचा उलगडा झाला.

इचलकरंजी हे यंत्रमागाच्या उद्योगामुळे आणि पंडितराव कुलकर्णी यांच्या कर्तबगारीमुळे स्वातंत्र्योत्तर काळात पुढे आलेले टुमदार गाव. यंत्रमागाच्या उद्योगाबरोबरच तिथल्या कार्यकर्त्यांमध्ये साहित्याबद्दल उदंड प्रेम. संमेलनासाठी हवा तेवढा पैसा उभा करण्याची त्यांची जिद्द आणि पुलंसारखा बहुरूपी अध्यक्ष, यांमुळे हे संमेलन गाजले नसते तरच नवल ! भरगच्च कार्यक्रम, अफाट गर्दी आणि पुलंचा तत्पर सहभाग यांमुळे नेत्राचे पारणे फिटावे असा सोहळा रंगत गेला. ' सुखद स्वप्नाप्रमाणे स्मृतीत तरंगत राहिलेला बहारदार सोहळा, ' ' ऐसे संमेलन पुन्हा होणे नाही ' अशा शीर्षकांनी या संमेलनाचे गुणगान वृत्तपत्रांनी गायिले. ' या संमेलनाचे पुलोत्सवात रूपांतर करण्याची आवश्यकता नव्हती ' अशी केसरीने कोपरखळी मारली. ' श्रीकृष्ण साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष झाला असता तर त्याने काय काय केले असते, हे पाहावयाचे असते तर रसिकांनी इचलकरंजीला येणे अवश्य होते ' ही एका वृत्तपत्रातील प्रतिक्रिया काहीजणांना आवडली नाही. अर्थातच ती मीच लिहिली होती !

इचलकरंजीच्या पंडितराव कुलकर्ण्यांनी बुजुर्गांच्या स्वागतासाठी पाच शँपेनच्या बाटल्या आणलेल्या दाखविल्या. त्या पाहून मला हैदराबादची आठवण झाली. संमेलनाच्या कार्यक्रमात पदाधिकारी म्हणून मी इतका गुंतलो होतो की, त्यातले पळीभर तीर्थ म्हणूनही मला चाखावयास मिळाले नाही !

इचलकरंजी संमेलनाच्या यशाचे नगारे वाजत असताना तिथे जमलेल्या काही

साहित्यिकांच्या हकीकती वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होऊ लागल्या. त्याने खूपच करमणूक केली. तिथल्या प्रख्यात हॉस्पिटलमध्ये उतरण्याची सोय काही साहित्यिकांची केली होती. एका साहित्यिकाने आपले फ्री चेकअप करून घेतले. दुसऱ्या कुणी धोतरजोडया, साडया नमुन्यादाखल मिळविल्या, आणखी कोणी दोन दिवसांत पाणीच प्यायले नाही वगैरे. अशा गोष्टींची चीड असणाऱ्या परिषदेच्या एका कार्यकर्त्याच्या सात्त्विक संतापाच्या उद्रेकातून ही ' करमणूक ' अवतरली होती !

इचलकरंजीच्या संमेलनातच कऱ्हाडकरांनी पुढच्या वर्षाचे निमंत्रण दिले. त्यांच्या लाडक्या नेत्यास व्यासपीठावर येऊ दिले नव्हते, त्याचे उट्ट काढण्याची संधी ते थोडीच सोडणार होते ?

१९७५ साल उजाडले आणि कऱ्हाडच्या संमेलनाची लगेच धावपळ सुरू झाली. वर्ष संपायच्या आत संमेलनाची धमाल उडवून द्यायची होती. परिणामी इचलकरजी-नंतर केवळ १० महिन्यांनी कऱ्हाडचे संमेलन भरले. दोन संमेलनांमध्ये किती कमी अंतर असावे याचे रेकॉर्ड कऱ्हाडने निर्माण केले. परंतु या दहा महिन्यांत काय विलक्षण महाभारत घडले !

१९७५ हे स्त्रीमुक्ति वर्ष होते, त्यामुळे कऱ्हाडकरांना कोण अध्यक्ष हवा, असे विचारले असता त्यांनी मालतीबाई बेडेकर किंवा दुर्गा भागवत यांच्याबद्दलचा आपला कल स्पष्ट केला. पहिल्यांदा मी त्यासाठी मालतीबाई बेडेकरांना विचारले. पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाच्या त्या त्यावेळी सदस्य होत्या. विद्यापीठात त्या निमित्ताने त्या आल्या असता त्यांना मी अध्यक्षपदासंबंधाने विचारले.

' या तुमच्या संमेलनांवर माझा विश्वास नाही; आणि या उरसात सहभागी होण्याची माझी इच्छा नाही. ' त्यांनी अगदी स्पष्ट शब्दांत आणि निग्रहपूर्वक आपला नकार कळविला. त्यांचे म्हणणे खरे असल्याने अधिक आग्रह करण्यात अर्थ नव्हता. परंतु अनिलांना मुदत संपल्यानंतर संमतिपत्र देऊन त्यांनी मला चकवा दिला !

त्याच सुमारास दुर्गाबाई पुण्यास त्यांचे प्रकाशक वरदा प्रकाशनचे भावे यांजकडे आल्या होत्या. मी आणि रा. ज. देशमुख यांनी त्यांची भेट घेतली.

' यंदाचे स्त्रीमुक्ती वर्ष आहे; म्हणून तुम्ही बाईला अध्यक्ष करायची खटपट करीत आहात. मला ते मुळीच मंजूर नाही. ' त्या म्हणाल्या.

तसे काही नसल्याचे स्पष्ट करूनही त्यांची संमती मिळेना.

' हे बघा बाई, तुम्ही संमती दिलीत तर यंदाच्या अध्यक्षा तुम्हीच आहात. विचार करून निर्णय द्या आणि संमती असेल तर पत्र टाका. ' आम्ही दोघांनी असे सांगून त्यांचा निरोप घेतला. दुसऱ्या दिवशी दुर्गाबाईंचे संमतिपत्र आले.

आदल्या वर्षी त्यांच्या ' पैस ' ला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले होते आणि ते वाचून यशवंतरावांनी त्यांचे सारे वाङ्मय मागवून वाचले होते. आणि दुर्गाबाईंच्या विद्वत्तेबद्दल त्यांच्या मनात आदर निर्माण झाला होता.

रीतीप्रमाणे अध्यक्षीय निवडणुकीचे नाटक तर करावयाचे होते. त्यानुसार विदर्भ, मराठवाडा, मुंबई, पुणे येथून बरीच नावे आली. शेवटी त्यातील पाच शिल्लक राहिली. निवड बिनविरोध व्हावी यासाठी आम्ही प्रयत्न करीत होतो. त्यासाठी औरंगाबादला मुद्दाम जाऊन शंकरराव खरातांना नाव मागे घेण्यासाठी सांगून पाहिले. तिघांनी नावे परत घेतली. परंतु चोरघड्यांनी नाव परत घेण्यास नकार दिला. शेवटी कऱ्हाडच्या स्वागतमंडळाकडे दुर्गाबाई आणि चोरघडे यांची नावे पाठविली. वर्तमान-पत्रांनी उलटसुलट काहूर उठवावयास सुरुवात केली. दुर्गाबाई तर अस्वस्थ झाल्याच, परंतु या वार्ता वाचून आम्हीही कमालीचे अस्वस्थ झालो. मी कऱ्हाडला त्यासाठी जाऊन आलो. करंबेळकरांना भेटलो. ते म्हणाले, 'आमचा शब्द पक्का आहे. दुर्गाबाईच अध्यक्ष राहतील. निर्धास्त रहा.' आणि त्यांनी शब्द पाळला.

परंतु या निवडणुकीपूर्वीच देशात आणीबाणी जाहीर झाली होती आणि साहित्यिकांच्या जगात त्यासंबंधाने एकप्रकारचे भीतीचे आणि साशंकतेचे वातावरण निर्माण झाले होते. महामंडळाने आणीबाणीविरुद्ध केलेला ठराव माझ्या सहीने मी राष्ट्रपतींकडे पाठविला होता. तो त्यांनी महाराष्ट्र शासनाकडे पाठविला. त्यामुळे शासनाने आमच्या हालचालीवर पाळत ठेवण्यास सुरूवात केली. दुर्गाबाई आणीबाणी-विरूद्ध उघडपणे बोलू लागल्या. शासकीय समित्यांवर काम करणाऱ्यांविरुद्ध आग पाखडू लागल्या. त्यांनी राजीनामा द्यावा असे बजावू लागल्या. साहित्य संस्कृती मंडळासाठी त्यांनी अनुवाद केलेल्या एका पुस्तकातील मजकुरावरून पुलंनी त्यांना डिवचले आणि त्यातून एक कटू वाद निर्माण झाला. साधनेतून ग. प्र. प्रधान यांनी, 'राजीनामा देण्याची परिस्थिती निर्माण करणाऱ्या शासनातील एक ज्येष्ठ मंत्री स्वागताध्यक्ष असताना त्या संमेलनात दुर्गाबाईंची भूमिका काय राहील?' असा सवाल केला. त्याला उत्तर देताना दुर्गाबाईंनी अनेकांच्या साधनशुचितेवर प्रहार केला. वातावरण तापू लागले. आणीबाणी जाहीर केल्यानंतर इंदिराबाईंनी यशवंतराव आणि जगजीवनराम यांना अटक केल्याची बीबीसीने बातमी दिलीच होती.

वातावरण तापत होते आणि संमेलनाचा दिवस जवळ येत होता. संमेलनात मांडण्यासाठी आणीबाणीविरुद्धचा ठराव नियमानुसार वेळेवर आला होता आणि तो मी दप्तरी दाखल करून घेतला होता. संमेलनाच्या आदल्या दिवशी महामंडळाचा पत्रव्यवहार घेऊन जाणाऱ्या परिषदेच्या सेवकाची पुण्याच्या गुप्तचर विभागाने मुद्दाम आरक्षित गाडी चुकविण्याची व्यवस्था केली आणि त्याला नकळत आणीबाणीबद्दलचा ठराव फाइलीतून काढून घेतला. ही गोष्ट लक्षात आली तेव्हा गहजब झाला. गुप्तचर विभागाचे अधिकारी माझे स्नेही होते, त्यांनी तासाभरात ठरावाचा मसुदा आणून दिला, परंतु मूळ ठराव परत देण्यास नकार दिला. परिषदेत गेल्या आठवडाभर काय चालले आहे, याची त्यांनी दिलेली बित्तंबातमी ऐकून मी चाट पडलो.

'ठराव परिषदेचे कुलूप फोडूनही आम्ही काढून घेऊन शकलो असतो, परंतु

तेवढे करण्याची गरज नव्हती. ' ते म्हणाले.

दुसऱ्या दिवशी महामंडळाच्या बैठकीत नवा ठराव आणला तर तो वेळेवर दिला नाही म्हणून कायदेशीर हरकत घेणारे महाभाग निघालेच. खूप कडोविकडीच्या चर्चेनंतर निर्धाराने महामंडळाच्या बैठकीत शेवटी तो मान्य झाला. आता तो विषयनियामक समितीत मांडला जावयाचा होता.

संमेलनाच्या काळात कऱ्हाडमध्ये काही वावगे घडू नये, यासाठी यशवंतराव प्रयत्नशील होते. परंतु परिस्थिती विलक्षण होती. दुर्गाबाई अगदी इरेला पेटल्या होत्या, हे त्यांच्या लिहिलेल्या भाषणावरूनच लक्षात आले. एवढ्या रामायणानंतर पुलं कऱ्हाडला येणार की नाहीत, याची चर्चा चालू होती. परंतु ते स्वतःच्या अँबॅसॅडर गाडीतून सपत्नीक वेळेवर हजर झाले आणि हायसे वाटले.

संमेलनात काय घडणार याबद्दल उत्सुकता होती आणि काहीतरी विलक्षण घडणार असे सर्वांना वाटत होते. त्यामुळे कऱ्हाडला अतोनात गर्दी झाली होती. स्थानिक कार्यकर्त्यांनी जीवापाड मेहनत करून उभी केलेली भोजननिवासाची व्यवस्था त्यामुळे कोलमडली होती. संमेलनाचा मंडप गच्च भरला होता. स्वागतगीत होऊन कार्यक्रमाला सुरुवात होणार तो आणीबाणीविरुद्ध तीव्र घोषणा देत श्रीमती केळकर गर्जू लागल्या आणि एस. आर. पी.च्या स्त्री-पोलिसांनी त्यांना उचलेपर्यंत त्यांच्या घोषणांनी सारे वातावरण भारून गेले.

या अकल्पित प्रकाराने यशवंतरावांचे स्वागताध्यक्षीय भाषण त्या दडपणाखाली कसेबसे पार पडले. अध्यक्षीय सूत्रे सुपूर्द करण्यासाठी पुल उभे राहिले. त्यांच्या भाषणाने जनसंमर्द हेलावू लागला, परंतु मागचा कटू प्रसंग विसरायला दुर्गाबाई तयार नव्हत्या, हे लक्षात आले. पुल ज्या बाजूने बोलावयास उभे होते त्या बाजूकडे पाठ करूनच त्या बसल्या होत्या. पुलंप्रमाणेच, तर्कतीर्थांचे भाषण प्रभावी होते. दुर्गाबाईंचे भाषण काहीशा गोंधळातच पार पडले. त्यातून त्यांची चीड आणि अस्वस्थता पदोपदी जाणवत होती.

पहिल्या दिवशी रात्री यशवंतरावांनी साहित्यिकांसाठी जेवणाची व्यवस्था केली होती. त्यांना वाहनात बसवून भोजनस्थानी बसविण्याची धावपळ चालू असता घाईघाईने अंघृटकर माझ्याकडे आले आणि म्हणाले,

' भीमराव, पां. वा. गाडगीळ गेल्याची बातमी नुकतीच आली आहे.' ते ऐकून काही साहित्यिक यशवंतरावांकडच्या जेवणाचा कार्यक्रम रद्द करण्यासाठी भांडू लागले.

यशवंतरावांकडे दुर्गाबाईंच्याजवळ जाऊन पु. लं. नी म्हटले, ' बाई, तुमचे भाषण चांगले झाले.' बाई नुसत्या हूं म्हणावयास तयार नव्हत्या. शहामत पु. लं.ची की तशाही अवस्थेत मानापमानाचा विचार न करता आणीबाणीविरुद्धच्या भावना प्रकट करण्यासाठी एकही प्रयत्न करण्याचे त्यांनी बाकी ठेवले नाही. ' आणीबाणी-

3249
24569

विरुद्ध प्रयत्न करणाऱ्यांबद्दल माझ्या कोणत्या भावना असल्या तरी त्या दूर सारून सर्वांनी संघटितपणे लढले पाहिजे ' असे म्हणून दुर्गाबाईंनी दुसऱ्या दिवशी त्यांच्याशी दिलजमाई केल्याचे पाहून अतिशय आनंद झाला.

कऱ्हाडच्या संमेलनाला प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे आपण येणार नाही, असे भाऊसाहेब खांडेकरांनी कळविले होते. संमेलनाच्या दिवशी सकाळी मी आणि यशवंतराव संमेलनाच्या पुस्तकप्रदर्शनातून फेरफटका मारीत होतो. इतक्यात प्रकाशक रा. ज. देशमुख समोरून येताना दिसले.

' काय देशमुखसाहेब, आम्ही भाऊसाहेबांनी यावे म्हणून इतके प्रयत्न केले आणि भाऊसाहेब येत नाहीत म्हणजे काय ! '

' तुम्हाला भाऊसाहेब यायला हवेत ना, ते माझ्याकडे लागले. ' देशमुख म्हणाले. हे बोलणे सकाळी १० वाजता झाले आणि देशमुखांच्या फोनप्रमाणे भाऊसाहेब चार वाजण्याच्या आत येऊन हजर राहिले !

इकडे वाईला दत्तो वामन पोतदारांना नेण्यासाठी कार्यकर्त्यांनी गाडी पाठविण्याचे मान्य केले होते. पोतदार बाडबिस्तरा बांधून तयार होऊन, वाट पाहत राहिले. कसली गाडी येते नि कसले काय ?

संमेलन संपल्यानंतर पोतदार भेटले. त्यावेळी ते अतिशय प्रक्षुब्ध दिसले. पोतदारांना इतके रागावलेले मी कधीच पाहिले नव्हते !

कऱ्हाडच्या संमेलनात दुसऱ्या दिवशी माजी अध्यक्षांच्या सत्काराचा कार्यक्रम होता. सत्काराला उत्तर रा. श्री. जोगांनी द्यावयाचे होते. जोगांनी मला जवळ बोलावून दुसऱ्या कोणाला तरी हे काम सांगण्याची विनंती केली. मी ऐनवेळी मखलाशी केली आणि म्हणालो, ' पु. लं. हे जोगांचे आवडते विद्यार्थी. जोगांचा शब्द त्यांनी कधी खाली टाकला नाही. पु.लं. नी सत्काराला उत्तर द्यावे, अशी त्यांची इच्छा आहे. '

पुलं मोठ्या उत्साहानं उठले आणि त्यांनी व्यासपीठावरच्या अध्यक्षांबद्दल आपल्या अभिजात शैलीने परिणामकारक भाषण केले. माडगूळकरांबद्दल बोलताना ते म्हणाले :

' मराठीत माडगूळकरांइतका सिद्धहस्त कवी मी पाहिला नाही. एकदा एका उर्दू कवीशी त्यांची शीघ्र कवित्वाबद्दल स्पर्धा लागली.

एक बात कहूँ राजा, किसको न कहियो जी
रातभर रहियो, सवेरे चले जायियो

या कवितेचे त्यांनी उभ्याउभ्याच मराठीत असे भाषांतर केले की तो कवी थक्क होऊन गेला. माडगूळकर म्हणाले,

एक अर्ज तुम्हा दिलवरा, मनीचा मनी ठेवावा जी
रातभर न्हावा, झुंझुरका तुम्ही जावा जी



[library stamp]

पुलंनी दोन्ही रचना गावयाला सुरुवात केली आणि श्रोतृवर्ग नागाप्रमाणे डोलू लागला. एवढयात प्रेक्षकांनी जोराने टाळ्या वाजविल्या. टाळ्या मध्येच कशा म्हणून पुलं संभ्रमित होऊन मागे पाहू लागले. यशवंतराव व्यासपीठावर मागून चढत होते. यशवंतराव सांगलीला वसंतदादांच्या कार्यक्रमासाठी गेले होते आणि तो आटोपून बाराच्या सुमारास व्यासपीठावर आले आणि पुलंना म्हणाले,

' परत म्हणा, परत म्हणा. ' आणि समोर ठेवलेल्या लोडावर ऐटीत बसले. पुलंनी पुन्हा चालीवर त्या रचना गाऊन दाखविल्या.

कार्यक्रम संपण्यापूर्वी दुर्गाबाईंनी एकदम जयप्रकाशांची आणीबाणीत काय अवस्था करण्यात आली आहे ते सांगून त्यांच्या प्रकृतीस स्वास्थ्य मिळावे म्हणून आणि त्यांना अभिवादन करण्यासाठी सर्वांना उभे राहण्यास सांगितले.

सर्व मंडप भारावून उभा राहिला. यशवंतराव पाचच मिनिटांपूर्वी व्यासपीठावर आले होते. दैवाची लीला किती विलक्षण ! ससा भाणवसात आयता सापडावा त्याप्रमाणे ते नेमके या कार्यक्रमात सापडले. सगळी जनता उभी असलेली पाहून नाखुषीने लोडावर भार देऊन यशवंतराव लडखडत उभे राहिले.

या कार्यक्रमामुळे सबंध मंडपाच्या परिसरात भडका उडाला. कऱ्हाडच्या कार्यक्रमावर नजर ठेवण्यासाठी खास गुप्तचर विभाग कऱ्हाडला आला होता. आदल्या दिवसांच्या भाषणांना कात्री लावण्यात आली होती आणि यशवंतरावांसह सारी भाषणे सेन्सॉर केली गेली होती. यशवंतरावांच्या हातात काहीही राहिले नव्हते, हे त्यावरूनच स्पष्ट झाले होते.

लोक या अकल्पित घटनेने संभ्रमित आणि पुलकित झाले होते.

' गेली, गेली ! यशवंतरावांची खुर्ची गेली !! ' लोक म्हणू लागले.

कार्यक्रमनंतर भोजनासाठी यशवंतरावांशेजारी दुर्गाबाईंचे ताट मांडले होते. यशवंतराव कमालीचे संतापले होते. कार्यकर्त्यांत धुसफूस चालू होती. दुर्गाबाईंना जेवायला चला असेही कोणी म्हणण्याच्या मनःस्थितीत नव्हते. दुर्गाबाई कोपऱ्यात बसून जेवल्या आणि निघून गेल्या.

दुर्गाबाईंनी मोठीच बाजी मारली होती. दुपारच्या कार्यक्रमात भाऊसाहेब खांडेकरांचे भाषण ठरविण्यात आले होते. आता खांडेकर काय बोलणार, याबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती.

खांडेकरांनी दुपारच्या भाषणात आणीबाणीविरुद्ध बोलावे आणि त्याच्या निषेधार्थ ' पद्मविभूषण ' या पदवीचा त्याग केल्याचे जाहीर करावे, अशी कल्पना पुढे आली. मी स्वतः त्यांच्याकडे त्यासाठी गेलो.

' मी यशवंतरावांचा पाहुणा आहे आणि स्नेहीही आहे. अशा वेळी मी असे करणे म्हणजे त्यांच्या पाठीत खंजीर खुपसल्यासारखे होईल ! ' ते म्हणाले. मी निराश होऊन परत निघताना ते म्हणाले,

'तुम्ही याबाबतीत अमक्या अमक्याला का विचारीत नाही? त्याने अशी घोषणा केली की, त्याचा परिणाम मोठा होईल. त्यांच्यानंतर जरूर वाटल्यास खाजगीत मीही तसे जाहीर करीन. पण इथे मात्र व्यासपीठावर नको.'

मी नाद सोडून दिला, परंतु इतरांच्या बाबतीत अशा प्रकारच्या केलेल्या प्रयत्नांना असेच अपयश आले.

त्याला रवींद्रनाथ टागोरांचा बाणा लागतो!

यशवंतरावांवर दुर्गाबाईंनी हा मोठाच आघात केला होता. त्यामुळे यशवंतरावांची व्यासपीठावर येऊन आपली भूमिका स्पष्ट करण्याची धडपड सुरू झाली. कोणत्या अधिकाराने त्यांना हे करता येईल, अशी चर्चा सुरू केली. स्वागताध्यक्ष म्हणून त्यांना सगळयात शेवटी आभाराच्या भाषणाच्या वेळी बोलता येईल, असे स्पष्टपणे त्यांच्या अनुयायांना सांगण्यात आले. त्यामुळें त्यांच्या अनुयायांमध्ये संतप्त वातावरण निर्माण झाले. यशवंतरावांचे स्वीय चिटणीस डोंगरे, यशवंतरावांना श्रोत्यांशी बोलायचे आहे, म्हणून दर तासाला भेटून आग्रह करू लागले. माझी अवस्था मोठी विचित्र झाली.

दुसऱ्या दिवशी बारा वाजता, यशवंतरावांना तातडीने दिल्लीस जायचे आहे, त्यांना प्रतिनिधींचा निरोप घ्यावयाचा आहे, या सबबीवर त्यांनी बोलण्याची संधी घेतली. आपल्या केवळ पाच मिनिटांच्या भाषणात त्यांनी जयप्रकाशनिंदा करून, साऱ्या राष्ट्राच्या इंदिराजी या एकच नेत्या आहेत आणि आमच्या निष्ठा त्यांच्याशी निगडित आहेत, असे जाहीर केले.

'यशवंतरावांनी खुर्ची टिकविली! पुन्हा चिकटले!!' लोक बोलू लागले.

आणीबाणीचा ठराव आल्यास बहुमताने तो हाणून पाडू, मंडप जाळू, अशी भाषा सुरू झाली. दुर्गाबाई, 'तसेच होऊ द्या, फार बरे होईल.' म्हणून हटून बसल्या. शेवटी सर्वांनी त्यांची दिवसभर समजूत घातली. 'जे साधावयाचे ते साधले गेल्याने ठराव मागे घ्यावा' असे सगळयांच्या मताने ठरविण्यात आले. त्यामुळे शेवटी संमेलनाचे सूप शांततेने वाजले.

कऱ्हाडनंतरच्या पुणे, चंद्रपूर, बार्शी आणि अकोले या संमेलनांच्या हकिगती म्हणजे एक मोठे रामायण आहे.

'रामायण' म्हणायचे कारण की, या संमेलनांतून सीता पळविण्याचा जो घाट घालण्यात आला त्याची यशस्वी सांगता अकोल्याच्या संमेलनाने झाली.

त्यासाठी 'संमेलनांचे रामायण' स्वतंत्रपणे सांगितले पाहिजे.

# साहित्य संमेलने म्हणजे महाराष्ट्र-धर्म !

'महाराष्ट्र धर्म म्हणजे काय हो ?'

असे मला विचारल्यास मी 'मराठी परिषद आणि मराठी साहित्य संमेलने' असे चटकन सांगून टाकतो. संकटाने स्फुरण येणे, संघटनात्मक कार्य करण्याची खुमखुमी असतानाही कटकटी, कलागती, झोंबाझोंबी, कायद्याचा, घटनेचा कीस काढून, तावून-सुलावून निघाल्यानंतर संमेलनाच्या धुमधडाक्यात स्वतःला झोकून देणे आणि तेथेही वेगवेगळ्या अंगाने आपल्यावरील गुणांचे प्रदर्शन करून झाल्यानंतर मग संमेलनाच्या यशस्वितेची चर्चा करून पुन्हा वाद उकरून काढणे....ही सारी साहित्य संमेलनांची वैशिष्ट्ये....म्हणजेच महाराष्ट्र धर्म.

कोणी संमेलन भरवायला निघाले नाही तोपर्यन्त सारे चिडीचिप, साहित्यसंस्था ठप्प. परंतु कुणाला तरी चैन पडत नाही. संमेलने भरली पाहिजेत असे वाटून कोणी तरी कामाला लागतो आणि मोहोळ उठावे त्याप्रमाणे कार्यकर्ते जागे होतात. दंड ठोकतात, वर्तमानपत्रे त्यात उतरतात. १९३२ साली ना. गो. चाफेकरांनी मुंबईकरांच्या हातून भरपूर भांडणं करून परिषद पुण्याला नेली, त्यावेळी मोठ्या उद्वेगाने लिहिले :

**"सन १९३२ साली आमच्या राशीला पापग्रह वर्षभर होते. मुंबईच्या पाध्ये-आळतेकरांच्या मान्यातून आम्ही आपली मोठ्या शिकस्तीने सुटका करून घेतली. तोच दुसऱ्या मान्यात आम्ही सापडलो...सारांश, भांडण परिषदेला पुरून उरले होते. चमत्कार असा की, परिषद निष्क्रिय होती तेव्हा वादविहीन होती. परिषदेची हालचाल सुरू होताच एकेक प्रकरण हमरीतुमरीवर येऊ लागले. पण चमत्कार कसला ? महाराष्ट्रातील सक्रियतेचा स्वभावच आहे हा !"**

तेव्हा म. सा. परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ आणि या सर्वांचे सांघिक प्रतिनिधित्व करणारी मराठी साहित्य महामंडळ या संस्था जोपर्यंत निष्क्रिय आहेत तोपर्यंत सारे काही आलबेल, परंतु काही तरी घडते आणि महाराष्ट्र धर्म जागा होतो. चळवळीच्या सामर्थ्याची रग नसल्याने वळवळ्यांचे फावते. यातून मोठमोठे साहित्यिक काही काळ दूर राहतात. परंतु त्यांनाही

महाराष्ट्र धर्माची खुमखुमी येते आणि तेही आपल्यावर प्रसंग येईल, त्यावेळी या रणधुमाळीत उतरतात आणि साम, दंड, भेद या मार्गाने राजकारण या संकल्पनेचा पाठपुरावा करतात. समर्थांचा 'राजकारण' हा शब्द साहित्यिकांच्या सभा-संमेलनांतून समजावून घ्यावा लागतो साहित्य संमेलने आणि साहित्य परिषदा यांच्या निमित्ताने झालेल्या रणधुमाळीचा इतिहास लिहावयाचे म्हटले तर ते एक महाभारतच होईल. लोकांना माहीत आहे. वृत्तपत्रांनी चव्हाट्यावर मांडले आहे, त्यापेक्षा पडद्यामागे रंगलेल्या नाटकात खरेखुरे नाट्य दडलेले असते. ते सारे एकाच वेळी उलगडणे शक्य नसले तरी त्याची थोडीशी झलक पाहण्यास हरकत नाही.

१८७८ साली न्या. रानडे यांनी लोकहितवादी यांच्या साहाय्याने पहिले मराठी ग्रंथकार संमेलन भरविले. एलफिन्स्टन-माल्कम प्रभृती देशी भाषेच्या पुरस्कर्त्यांनी मराठी ग्रंथनिर्मितीस प्रोत्साहन देण्याचे धोरण ठेवल्याने शासकीय प्रोत्साहनाने १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात ग्रंथनिर्मितीला चांगल्या प्रकारे आलेली गती मेकॉलेच्या मिनिटमुळे सर्वत्र इंग्रजीची सक्ती होऊन एकाएकी संपुष्टात आली. अशा वेळी प्रबोधनाच्या व वाङ्मयीन प्रेरणेने जागे झालेल्या ग्रंथकारास जागे करून स्वयंप्रेरणेने त्यांस ग्रंथनिर्मिती करण्यास प्रेरित करावे हा या संमेलनामागचा हेतू होता. संस्था स्थापाव्यात, त्यांनी ग्रंथकारांस उत्तेजन व स्वस्त दराने ग्रंथ प्रसिद्ध करावे ही भूमिका 'ज्ञानप्रकाश'च्या ७-२-१८७८ च्या पत्रकामध्ये न्यायमूर्तींनी स्पष्ट केली आहे. पाचपन्नास ग्रंथकार मे महिन्यात पुणे येथे त्यासाठी जमले व त्यांनी रानड्यांनाच अध्यक्ष केले. त्याप्रमाणे कार्य काही झाले नाही म्हणून रानड्यांनीच १८८५ मध्ये दुसरे संमेलन पुण्यासच भरविले. वेदशास्त्रसंपन्न कृष्णशास्त्री राजवाडे यांची अध्यक्ष स्थानी योजना केली तेव्हा लगेच महात्मा फुले यांचं त्यांना पत्र आलं. फुल्यांच्या आयुष्यात शेवटच्या दिवसांत जी कटुता आली होती, त्याचे प्रत्यंतर त्यांच्या पत्रातून येते. तुमचे मध्यमवर्गीयांचे, शुद्रातिशुद्रांवर वर्षानुवर्षे अन्याय करणाऱ्या लोकांचे संमेलन. त्यात आमचा काय संबंध? असा त्याचा एकूण मतितार्थ आहे. पहिल्या संमेलनाप्रमाणे याही संमेलनाचे सूत्रधार रानडेच. परंतु या काळापर्यंत सुधारक–सनातनी हा वाद रंगात आला होता. त्यामुळे रानड्यांनी दूरदर्शित्वाचे धोरण ठेवून सनातनी राजवाड्यांना अध्यक्ष केले. याच संमेलनास दादोबा पांडुरंगाची कन्या अहिल्या तर्खडकर ही उपस्थित असलेली पाहून आगरकरांना प्रेमाचे भरते आले होते आणि सनातनी आतून बिथरले होते! ग्रंथकारांच्या संमेलनाचा अध्यक्ष होण्याचा न्यायमूर्तींना अधिकार काय? त्यांनी कुठे ग्रंथनिर्मिती केली आहे? असे प्रश्न विचारणारे त्यावेळी नव्हते असे कुणी मानण्याचे कारण नाही.

१८८५ ते १९०५ हा काळ म्हणजे जहाल–मवाळ यांच्यातील घनघोर संग्रामाचा. या काळात रानडेप्रणीत मंडळींचे संमेलन घेण्याचे धैर्य कसले होते? पुण्याची सार्वजनिक सभा टिळकांनी मवाळांच्या हातून हिसकावून घेतलीच होती. संमेलना-

चीही त्यांनी तीच गत केली असती यात काय संशय ?

तेव्हा २० वर्षांच्या काळात संमेलनकर्त्यांनी डोके वर काढले नाही. राजकीय सत्तासंघर्ष, महायुद्धे आणि शासकीय दंडेली यांच्या काळात संमेलनाचा जोर ओसरतो आणि चुकून या काळात एखादे संमेलन भरलेच तर त्याचा भर वाङ्मयकारणापेक्षा राजकारणावरच अधिक राहतो. राजकीय प्रश्नोपप्रश्नांनी संमेलन गाजत राहते. काही मान्यवर साहित्यिक सरकारी नोकर असल्याने त्यांच्या केविलवाण्या लटपटींमुळे राजकारण्यांना आणखी चेव येतो आणि शेवटी शासनकर्त्यांची री ओढणाऱ्या साहित्यिकांची भंबेरी उडते. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर १९५७ साली औरंगाबादला काणेकरांनी केलेली फजिती, १९६४ ला मडगावला कुसुमाग्रजांनी गोमंतकवाद्यांची केलेली फजिती, कराडला आणीबाणीच्या काळात दुर्गाबाईंनी केलेली फजिती आणि अकोल्याला अष्टीकरांनी आणि गो. नी. दांडेकरांनी स्वतःची करून घेतलेली फजिती ही याची ज्वलंत उदाहरणे आहेत. जप्त केलेल्या पुस्तकांबद्दल सरकारच्या निषेधाचा ठराव आला म्हणून जळगाव संमेलनाचे अध्यक्षच ( माधवराव पटवर्धन ) घाईघाईने व्यासपीठावरून जणू काही या गावचे आपण नाहीतच हे सांगण्यासाठी खास उतरले. त्यांच्या मागोमाग विठ्ठलराव घाटयांची तशीच घाई ! अशी घाई घाटयांना तर वर्षानुवर्षे करावी लागली ! आंबेजोगाईला शासनपक्षाने कुरघोडी केल्यामुळे शासकीय सेवकांची कातडी बचावली.

१९०५ साली संमेलन पहिल्यांदा पुण्याबाहेर गेले ते साताराचे वकील रघुनाथ पांडुरंग करंदीकर यांच्या खटपटीमुळे. गंमत अशी की, या संमेलनाचे करंदीकरच अध्यक्ष झाले ! आता करंदीकरांचा साहित्याशी संबंध काय ? प्रसिद्ध इतिहासकार पारसनीस अध्यक्ष व्हावेत असा सूर निघाला, पण ऐकतो कोण ? पारसनीस आज-उद्या होतील असे आश्वासन देण्यात आले आणि बिचाऱ्या पारसनिसांनी संमेलनाची देखभाल निष्ठेने केली; परंतु ते कुठले होतात नंतर अध्यक्ष ? संस्थेच्या कार्यकर्त्यांनी धडपड करून अध्यक्षपदाची माळ स्वतःच्याच गळयात घालून घेण्याचे प्रसंग त्यानंतर खूप घडले. हीही एक परंपराच ! १९३४ साली बडोद्याच्या सहविचारणी सभेने संमेलनाचे आमंत्रण दिले. त्यावेळी अध्यक्षपदासाठी नावे यजमान संस्थेच्या कार्यकारिणीने परिषदे-कडे सुचवावयाची व परिषदेने ती मान्य करायची अशी पद्धत होती. यजमान संस्थेला न. चिं. केळकर हे अध्यक्ष व्हावेत असे वाटत होते. १९२१ साली बडोद्याला झालेल्या संमेलनाचे अध्यक्ष केळकरच होते. परंतु केळकर दोन वेळा अध्यक्ष झाले म्हणून बिघडले काय ? असा त्यांचा सवाल होता. पुण्याच्या साहित्य-परिषदेच्या कार्य-कारिणीची सभा कार्याध्यक्ष चापेकरांच्या अध्यक्षतेखाली होऊन त्यामध्ये १ ) ना. गो. चापेकर, २ ) दत्तोपंत आपटे, ३ ) रियासतकार सरदेसाई, ४ ) ना. के. बेहेरे व ५ ) दत्तो वामन पोतदार अशी नावे सुचविली गेली व अनुक्रमाने यातील नावांचा विचार करावा असं पत्र लिहिले. ( बोरिवलीच्या उपनगर साहित्य संमेलनाच्या बाबतीत

असेच घडले ना ? )

बडोद्याच्या सहविचार सभेच्या कार्यकारिणीची खडाजंगी बैठक झाली. त्यात काही जागरूक सभासदांनी केळकरांच्याच नावाचा आग्रह धरला. त्यामुळे केळकर-चापेकर अशी दोनच नावे मताला टाकण्यात आली. दोघांना समसमान मते पडली. आता चिठ्ठ्या टाकल्या आणि त्यात केळकरांचेच नाव आले तर ? तर पुण्याचे परिषदेचे कार्यकर्ते बिथरतील आणि ते परिषद वेळेवर होऊ देणार नाहीत या विचाराने काही शहाण्यांनी मध्यस्थी केली. केळकर एकदा अध्यक्ष आणि तेही बडोद्याला झाले आहेत, तेव्हा चापेकरांना होऊ द्या, अशी त्यांनी तडजोड केली आणि चापेकरांचेच नाव मताला टाकून त्यांना निवडून टाकले.

बडोदेकरांनी माघार घेतली, त्याला एक महत्त्वाचे कारण होते. १९२१ साली परिषद आणि यजमान संस्था यांच्यामध्ये अशीच एक धुमश्चक्री झाली होती. त्यावेळी यजमान संस्थेने अध्यक्ष निवडून संमतीसाठी परिषदेकडे पाठवावयाचा अशी पद्धत होती. त्यावेळी परिषद मुंबईस होती आणि रावबहादूर दा. ग. पाध्ये हे तिचे कार्याध्यक्ष आणि रावसाहेब मोरमकर हे तिचे कार्यवाह होते. पाध्यांना परिषदेसाठी स्थिर निधी जमविण्याचे वेड होते आणि त्यांनी संस्थानिकांकडून कित्येक हजार रुपये जमवून व्यवस्थित ठेविले होते. आपले कार्याध्यक्षपद जाऊन पुणेकरांच्या हातात पैसा पडला तर ते उधळतील अशी त्यांना भीती ! १९१२ मध्ये अकोला येथे संमेलनात संमत झालेल्या घटनेनुसार मुंबईत साहित्य परिषदेचे कार्यालय स्थापन झाले होते आणि त्यानंतर झालेल्या पहिल्याच संमेलनात त्यांनी मिरजेचे अधिपती सर गंगाधरराव पटवर्धन यांना अध्यक्ष केले होते. पुण्याच्या कंपूने गंगाधरराव कोणत्या गावचे साहित्यिक ? घटनेनुसार ते अध्यक्ष कसे होतात म्हणून रान उठविलं. घटनेत अध्यक्ष साहित्यिक असावा असं एक कलम होतं. पाध्यांनी ते बदलून तो साहित्यप्रेमी असावा अशी दुरुस्ती करून आपलं काम साधून घेतलं. त्यानंतर पाध्यांनी इंदूर येथे संमेलन भरवून इंदूराधिपती तुकोजीराव होळकर यांजकडून दहा हजाराची देणगी मिळविली व इंदूरच्या साहित्यसंमेलनाला अध्यक्ष कोण असावा, यासंबंधी आपल्या मताच्या साहित्यिकांना पत्रे पाठवून आपल्या पक्षाच्या रावबहादूर गणेश जनार्दन आगाशे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात यश मिळविले होते. १९२१ मध्ये त्यांचे लक्ष होते इचलकरंजीचे अधिपती आबासाहेब घोरपडे हे ! त्यांनी त्यांच्याशी बोलणी करून त्यांना शब्दही दिला होता ! या काळात 'केसरी'ची संपूर्ण सूत्रे केळकरांच्या हातात होती आणि केळकर गांधींबद्दल काहीशा अगत्यानं लिहीत होते. ( गांधींकडे झुकणे ही केसरीची त्यावेळेपासूनची खोड. ग. वि. केतकर पुणे-प्रांतिकचे कार्यवाह झाल्याने केसरीत मोठा समरप्रसंग निर्माण झाला होता ! ) पाध्यांनी केळकर लवकरच गांधीवादी होणार अशी हुल उठविली आणि सरकारच्या विरोधी चळवळ करणाऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्याला सरकारनिष्ठ संस्थानात अध्यक्ष करण्यातले धोके स्पष्ट करणारे पत्र

बडोद्याचे अधिपती सयाजीराव व त्यांचे बंधु संपतराव गायकवाड यांना पाठविले !

पुण्याची 'केसरी' आणि 'ज्ञान-प्रकाश' ही वृत्तपत्रे एका बाजूला तर मुंबईची 'इंदूप्रकाश' व 'विविधवृत्त' ही दुसऱ्या बाजूला असा सामना सुरू झाला. परिषद श्रेष्ठ की संमेलन श्रेष्ठ असा हा वाद कमालीचा रंगला. 'केळकर कसे अध्यक्ष होतात हे मी पाहतो' ही पाध्यांची प्रतिज्ञा तर 'संमेलन झाले तर केळकरांच्याच अध्यक्षतेखाली होईल, नाहीतर परिषदेशिवाय संमेलन करू' ही बडोदेकरांची प्रतिज्ञा. 'स्वतंत्रपणे संमेलन करा, परिषद नको.' असा पुण्याहून बडोद्याला पत्रांचा सूर लागला आणि पाध्यांनी नमते घेतल्यामुळे शेवटी केळकरांच्या अध्यक्षतेखाली संमेलन पार पडले. परंतु परिषदेची गंगाजळी वाढविण्यासाठी पाध्यांनी पाच वर्षांनंतर मुंबईस संमेलन भरविले आणि इंदूरचे सरदार माधवराव किबे यांना संमेलनाध्यक्ष नेमून बडोद्याचे उट्टे काढले.

साहित्यिक-असाहित्यिक असा वाद उकरून काढणाऱ्या पुणेकरांनी साहित्य परिषद जिद्दीने व पराक्रमाने मुंबईहून पुण्यास नेल्यानंतर ( १९३२ ) परिषदेला आर्थिक प्राप्ती होण्याच्या दृष्टीनं १९३२ साली कोल्हापुरच्या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून सयाजीराव गायकवाड यांची निवड केली व स्वतःच्या कार्याध्यक्षपदाच्या कारकीर्दीत स्वतःनंतर इंदूरला औंधांच्या अधिपतींची अध्यक्षस्थानी योजना केली. चापेकर औंधाचे न्यायाधीश होते ! सयाजीराव कोल्हापुरच्या संमेलनाला जातीने हजर राहिले नाहीत. त्यांच्या माने नावाच्या खासगी कारभाऱ्यांनी त्यांचे भाषण ( मुळात चिं. वि. जोशी यांनी लिहिलेले ) वाचून दाखविले. चापेकरांनी देणग्यांच्या आशेने वारंवार बडोद्याच्या वाऱ्या केल्या. परंतु सयाजीरावांनी ताकास तूर लागू दिली नाही! दत्तो वामन पोतदारांनी लिहिले आहे :

'अनेक पक्षोपपक्ष देशात नांदत असताही 'मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांचे ऐक्य' साधण्याच्या उच्च व सर्वमान्य हेतूसाठी अवतरलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मात्र वाट्याला दुर्दशा यावी याचा दोष काही अंशी तरी परिषदेच्या तत्कालीन काही कार्यकर्त्यांच्या दुबळेपणाला किंवा अदूरदृष्टीला किंवा हट्टालाच कोणीही निःपक्षपाती इतिहासकार दिल्याशिवाय रहाणार नाही. बडोद्याच्या विद्याभिलाषी श्री. सयाजीरावांचा वरदहस्त परिषदेस का लाभला नाही हे मंठे गूढ वाटते ! कोल्हापुरास १९३२ साली तर त्यास संमेलनाचे अध्यक्षपदही अर्पण करण्यात आले होते त्यांच्या आकांक्षा व योजना मोठ्या होत्या, पण कोठेतरी काहीतरी बिघडले असले पाहिजे हेच खरे !'

सयाजीरावांच्या बाबतीत काहीतरी बिघडले असले तरी औंधच्या पंतप्रतिनिधींनी दिलेल्या जागेवर टिळक रोडवर परिषदेची वास्तू उभी करून चापेकरांनी पाध्यांची पुणेकरांबद्दलची भीती व्यर्थ ठरविली.

परिषद-संमेलन यांच्याबद्दलचा वाद आणखी एका प्रसंगी विलक्षण रंगला.

१९३९ साली अहमदनगरच्या कार्यकारिणीने संमेलनाध्यक्ष म्हणून रियासतकार सरदेसाई यांची एकमताने निवड केली. परंतु वृद्धपण आणि प्रकृतीच्या अस्वास्थ्यास्तव त्यांनी अध्यक्ष होण्यास ठाम नकार दिला. वास्तविक वरील दोन्ही कारणे ही केवळ निमित्तमात्र होती. यापूर्वीच्या संमेलनाच्या वेळी त्यांचे नाव सुचविण्यात आल्यानंतर त्यांच्या इतिहासलेखनासंबंधाने अनुदार उद्‌गार पुणेकरांनी काढले होते, त्याचा त्यांना राग होता. नगरहून त्यांची समजूत घालण्यास आलेल्या शिष्टमंडळासही त्यांनी हात हलवीत परत पाठविले. मग आता ऐन वेळी अध्यक्ष कोण ? इतिहासकारांच्या जागी इतिहासकार म्हणून ऐन वेळी दत्तो वामन पोतदारांची निवड झाली व संमेलन यशस्वीरीत्या पार पडले, परंतु संमेलन-परिषद-वादामध्ये परिषदेचा जय होऊन परिषदेचा अध्यक्ष तोच संमेलनाचा अध्यक्ष अशी दुरुस्ती १९४५ मध्ये करण्यात आली. त्यानंतर १९४६ साली बेळगाव येथे भरलेल्या संमेलनाचे अध्यक्ष या नियमानुसार आपणच आहोत असा पोतदारांनी आग्रह धरला. एकदा अध्यक्ष झाल्यानंतर परत कशाला ? या प्रश्नाला नगरला सेवा म्हणून अध्यक्ष होतो, आता सन्मान म्हणून अध्यक्ष होतो; केळकरांना जे जमले नाही ते मला जमते की नाही ते पहा असे ते म्हणू लागले. याच संमेलनासाठी वाङ्‌मयविभागाचे अध्यक्ष म्हणून माडखोलकरांची निवड झाली होती. पण यावेळी नियतीने डाव साधला. पोतदार ज्या गाडीने बेळगावला गेले ती गाडी बेळगावला उशिरा पोचल्याने लोकांनी माडखोलकरांनाच अध्यक्ष व्हा, म्हणून आग्रह धरला. पोतदार हाश्यहुश्य करीत बेळगावला पोचले खरे, परंतु माडखोलकरांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या जोरदार पुरस्कारामुळे हे संमेलन तडजोडीने माडखोलकरांच्या अध्यक्षतेखालचे म्हणून मानले गेले आणि पोतदारांची दोनदा अध्यक्ष होण्याची संधी ( आगगाडीमुळे ) हुकली.

बेळगावच्या संमेलनामुळे संमेलन विरुद्ध परिषद ही भांडणे संपुष्टात आली आणि संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडीसाठी पुन्हा नव्याने घटना-दुरुस्ती करावी लागली. दर खेपेला नव्याने बदललेल्या घटनेमुळे संमेलनाध्यक्षांच्या निवडीत चुरस व गुंतागुंत निर्माण होणे हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

संमेलनासाठी ज्यांची नावे सुचवावयाची त्यांची संमतिपत्रके घेऊन ही नावे परिषदेच्या साधारण सभासदांपुढे ठेवावयाची, त्यांनी त्यांच्या मताधिक्याने क्रमवारीने तीन नावे निवडावयाची आणि ती यजमानसंस्थेच्या स्वागतमंडळापुढे पाठवावयाची आणि स्वागत मंडळाने निवडणुकीने त्यांतून अध्यक्षांची निवड करावयाची अशी एक पद्धत मध्यंतरीच्या काळात रूढ झाली होती. या पद्धतीमुळे अनेक साहित्यिकांची नावे अध्यक्षपदासाठी सुचविली जायची, परिषदेच्या निवडणुकीत तरी किंवा स्वागत मंडळाच्या निवडणुकीत दोन-चार वेळा आपटी खाल्ल्यानंतर मग अध्यक्षपदाची माळ गळयात पडावयाची, असा एक शिरस्ताच पडून गेला आहे. अध्यक्षवधूला निवडीसाठी असा अनुभव असणे आवश्यक होऊन बसले. सावरकरांसारख्या एखाद्याच्याच वाट्याला

अपवाद आला, परंतु त्यांनाही निवडणूक लढवावीच लागली.

बिनविरोध निवडून आलो तरच अध्यक्ष होणार, नाहीतर कुवार रहाणार म्हणणाऱ्याच्या वाट्याला अक्षय कुवारपणच आले. परंतु वारंवार आपटी खाऊनही काहींच्या गळ्यात माळ काही पडली नाही. त्या सर्वांत चिं. वि. जोशी यांची झालेली उपेक्षा ही अत्यंत दुःखद होय, यात शंका नाही. वास्तविक अहमदाबादला तेच अध्यक्ष व्हायचे. मुळात अहमदाबादेसाठी घाटे यांचे नाव सुचविण्यात आहे. त्याचवेळी दादासाहेब मावळंकरांनी काकासाहेब कालेलकरांचे नाव सुचविले. त्याला विरोध झाला असे म्हणून ते मागे पडले आणि लढत झाली ती घाटे आणि जोशीद्वयांमध्ये (चि. वि. व वा. वि.) ९९, ८९ आणि ७५ अशी मते पडली. दोन जोश्यांमध्ये मते विभागली गेली आणि त्यानंतर वर्षानुवर्षे चिं. वि. निवडणुकीला उभे राहिले, परंतु त्यांची निवड झाली नाही. 'काही म्हातारे व एक म्हातारी' असे चिमुकले एखादेच पुस्तक ( त्या वेळेपर्यंत ) निघालेल्या घाट्यांची निवड व्हावी का हा मात्र अत्र्यांच्या नवयुगने मोठा वादाचा विषय बनविला.

## कोकणी शिव्यांचा अहेर

या वरील पद्धतीच्या निवडीमुळे गाजलेले अध्यक्षपद म्हणजे प्रा. श्री. के. क्षीरसागरांचं. अर्थातच त्यापूर्वीच्या काही निवडणुकांतील आणि संमेलनातील गमती काही कमी नव्हत्या ! उदा- १९४० साली रत्नागिरीला ना. सी. फडके हे अध्यक्ष झाले. त्यांनी गदारोळ उठविला तो आपल्या भाषणामुळे. वृत्तपत्रांच्या धंदेवाईकपणावर या भाषणात फडक्यांनी झोड उठविली आणि सारे विवेचन प्राधान्याने अत्रे-तटणीस यांच्या वृत्तपत्रनीतीस अनुसरून केले ! संमेलनातच भडका उडाला. संबंधितांनी सभा तहकुबीचा ठराव मांडायला लावला. या संमेलनात शांता आपटेला नऊ वारी नेसून, पदर खोचून वाढायला उभं करण्यात आल्याबद्दल कौतुक झालं. परंतु फडक्यांनी आपल्या दुसऱ्या पत्नीच्या बाबतीत जी रसिकता दाखविली त्याची वृत्तपत्रांनी कुचेष्टेने जाहीर वाच्यता करण्यात अहमहमिका दाखविली. फडक्यांनी साबण, अत्तर, वेण्या, पावडर यांच्यासाठी जो खर्च केला त्याचं ३२ रु. ६ आण्यांचे बिल त्यांना अत्रे पक्षाने द्यायला लावले आणि या विषयावर राजीवड्यावर उभे राहून कार्यकर्त्यांनी ज्या अस्सल कोकणी शिव्यांचा भडीमार केला तो सारा वर्तमानपत्रांनी साक्षेपाने जनतेसमोर मांडला.

सोलापुरला खांडेकरांची निवड व्हावयाची हे पक्के ठरले असताना मामा वरेरकरांनी तेथे भाषण करून कार्यकर्त्यांना काही काळ अस्वस्थ करून सोडले तर मामा वरेरकरांची निवड केल्यास निश्चितपणे प्रतिनिधींच्या पाठीवर वासेबांबू पडतील अशी अत्र्यांच्या नवयुगने वरेरकर द्वेषापोटी प्रचाराची हद्द केली. मामा अध्यक्ष तर काहीतरी अशुभ घडणारच हा प्रचार तर सततच चाललेला. संमेलनाचा समारोप

करताना म्हणूनच धुळयाच्या ऋषीतुल्य शंकर श्रीकृष्ण देव यांनी प्रतिनिधींना डोळयात पाणी आणून ज्या वेळी विचारले की, पडला का कुणाच्या पाठीत बांबूचा तडाखा? वाशान्या मारानं फाटली का कुणाची कातडी? त्यावेळी प्रतिनिधींच्या डोळयांतून अश्रू तरळले. संमेलन-मंडपातून 'धूम्रपान करू नये,' अशा सर्वत्र पाटया लावून मिनिटाला सात लवंगी विडया ओढणाऱ्या मामांची तीन दिवस कुचंबणा केली, ती वेगळीच!

क्षीरसागरांच्या वेळी (मिरज, १९६०) आपले नाव सुचविणाऱ्यांना संमतिपत्र देण्यापूर्वी क्षीरसागरांनी आपली पत्रिका घेऊन ज्योतिषांचा सल्ला घेतला. नवाथे नावाच्या ज्योतिष्यांनी त्यांना सांगितले की, "तुम्ही निवडून आला नाहीत तर ईश्वर तुमच्या बाजूनं आहे असे समजा आणि निवडून आलात तर ईश्वर तुमच्यावर कोपला आहे असे समजा" तरीही क्षीरसागर निवडणुकीला उभे राहिले कारण मिरजेला निवडणुकीची यंत्रणा आपल्याला अनुकूल रीतीने राबविता येईल या खात्रीमुळे. त्यापूर्वीच्या मालवण-संमेलनासाठी परिषदेच्या मतदारांनी त्यांना प्रथम क्रमांकाची मते दिली होती, परंतु प्राथमिक निवडीत शेवटचा क्रमांक असणाऱ्या अनिलांना मालवणच्या स्वागत मंडळानं विचारलं. ही स्वागत मंडळीची निवड मालवण येथे न होता मुद्दाम मुंबईला घेण्यात आली आणि साहित्य-संघाच्या ठेकेदारांनी आपणाला पाडले अशी क्षीरसागरांची ठाम धारणा होती. मिरजेच्या वेळी क्षीरसागरांना कवी गिरीश व इतिहासकार शेजवलकर हे प्रतिस्पर्धी होते. स्वागत-मंडळाचे प्रतिनिधी होणाऱ्यांना मताचा अधिकार प्राप्त होतो आणि आपला माणूस निवडून यावा म्हणून संबंधितांना स्वागत मंडळाचे सदस्य शेवटच्या क्षणापर्यंत करण्याची धडपड उमेदवारच करतात. क्षीरसागराच्या बाजूनं मिरजेच्या टांगेवाल्यांनी मतदान केल्याचे वृत्तपत्रांनी निदर्शनास आणले! एकदा लोकशाही मार्गाचा स्वीकार केल्यानंतर ते क्षम्यच आहे. युद्ध आणि प्रेम यांत सारे काही क्षम्य आहे, या तत्त्वानुसार या युद्धात साहित्याच्या प्रेमाने पुरेपूर पडले पाहिजे, असं त्यांनी ठरविले आणि ते यशस्वी झाले. मिरजेचे स्वागताध्यक्ष म्हणून वि. स. खांडेकर यांची निवड झाली होती.

गंमत पुढेच झाली. प्रत्यक्ष संमेलनाच्या दिवशी मोठे वादळ होऊन संमेलन होणार की नाही असं वातावरण निर्माण झाले. ते शमल्यानंतर खांडेकरांनी दीड तास भाषण ठोकून सगळयांची दमछाक केली आणि त्यामुळे क्षीरसागरांना अध्यक्षीय भाषण केवळ ४० मिनिटांत आटोपते घ्यावे लागले.

स्वागतमंडळाच्या सदस्यांनी अध्यक्ष निवडावयाचा, या प्रकाराने कहर केला तो काही वर्षांपूर्वी झालेल्या पुण्याच्या संमेलनाने. स्वागत-समितीच्या सभासदांनी भरावयाचे वीस रुपये हीच या संमेलनातील सर्वांत मोठी उत्पन्नाची बाब ठरली.

संमेलनाच्या अध्यक्षाच्या निवडीसाठी प्रकाशकांनी केलेला सहभाग आणि त्यातूनच निर्माण झालेली कटुता, आपणाला हवा तोच अध्यक्ष मिळावा म्हणून

यजमानसंस्थांनी घातलेल्या अटी आणि आपणच अध्यक्ष निवडून यावे, यासाठी खुद्द उमेदवारांनीच केलेली खटपट आणि आपण 'किंग मेकर्स' आहोत या भूमिकेने काही कार्यकर्त्यांनी केलेल्या कारवाया, अशा असंख्य गोष्टी सांगता येण्यासारख्या आहेत.

कारवारला प्रियोळकरांना अध्यक्ष करण्यासाठी आदल्या दिवशी प्रियोळकरांना परिषदेचे सदस्य करण्यात आले. परिणामी अशी व्यक्ती कमीतकमी वर्षभर तरी एखाद्या साहित्यसंस्थेची सदस्य असली पाहिजे असा घटनेत बदल करण्यात आला.

बोरकर आणि खरात हे केवळ वर्षांपूर्वी साहित्य संस्थांचे सदस्य झाले होते हे किती जणांना माहीत आहे ?

# साहित्य संमेलनाचे रामायण

संमेलन उधळले गेले आहे. मंडप हळूहळू रिकामा होतो आहे. श्रोत्यांच्या मनामध्ये चिडीने ठाण मांडले आहे आणि आपापसात एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप चालले आहेत. सारा मंडप रिकामा झाल्यानंतर मी मंडपाच्या मध्यभागी उभा आहे...कसे उदास, भकास, निराश वाटते आहे...जिभेवर एक कडवट चव रेंगाळते आहे... मी आता लिहायला बसलो आहे, तेव्हा मनामध्ये हेच चित्र उमटून मी भिंगुळवाणा झालो आहे. लेखणी खाली ठेवली आहे....इतक्यात....

'दादा, अजागळ म्हणजे काय हो!'

धाकट्या चिरंजीवांच्या या प्रश्नाने मी भानावर आलो. त्याला धड्याच्या शेवटी लिहिलेल्या शब्दार्थाकडे बोट दाखविले.

'ह्याट्, काहीतरी लिहिले आहे!' तो म्हणाला.

मी त्याचे पुस्तक हातात घेऊन वाचायला लागलो. 'अजागळ म्हणजे निरुपद्रवी, निरुपयोगी. अज म्हणजे शेळी आणि गळ म्हणजे स्तन. शेळीच्या मानेखाली लोंबणाऱ्या तुकड्याला अजागळ म्हणतात. त्याचा ज्याप्रमाणे शेळीला काहीच उपयोग नसतो त्याप्रमाणे काहीच उपयोगी नसलेला माणूस म्हणजे अजागळ.'

आपल्या पाठ्यपुस्तकांतील शब्दार्थ देणाऱ्या या प्रकाराने मी हबकून गेलो होतो परंतु मुलासमोर त्याचे प्रदर्शन करण्यात काहीच अर्थ नव्हता. परंतु सातआठ वर्षांचे हे चिरंजीवच माझ्यापेक्षा अधिक प्रक्षुब्ध झाले होते.

'काय रे, तुला काय म्हणायचे आहे!' मी त्याला विचारले. त्याच्या हातात 'रघुवंशाची कथा' हे पुस्तक होते. इंदुमतीचे स्वयंवर चालले असता, तिची मैत्रीण प्रत्येक राजापुढे उभी राहून त्याचे गुणवर्णन करीत जाते. अज नावाचा राजा जवळ आल्यानंतर मैत्रिणीने त्याचे गुणवर्णन पुरे करण्यापूर्वीच अजाने गळा पुढे केला आणि इंदुमतीनेही नकळतच त्याच्या गळ्यात हार घातला, हे त्या पुस्तकातील वर्णन वाचून 'अजागळ' या शब्दाचा काही एक वेगळाच अर्थ चिरंजीवांनी केला होता, हे नंतर

माझ्या लक्षात आले. लग्नासाठी उतावळेपणाने गळा पुढे करणारा अज पाहून त्याला 'अजागळ' या शब्दाचे इंगित लक्षात आले असावे !

भोजराजाची स्वरूपसुंदर कन्या इंदुमती हिने आपल्याच गळयात माळ घातली म्हणून सुखावलेल्या अजाला कालांतराने आकाशातून अंगावर पडलेल्या माळेमुळे इंदुमतीला मृत्यू आलेला पाहून लहान मुलासारखा विलाप करावा लागला. त्याच्या नातवाचीही तीच गत झाली. रावणाची फजिती होऊन सीतेने आपल्याच गळयात माळ घातली म्हणून हर्षनिर्भर झालेल्या रामाला, त्याच रावणाने सीतेला पळविलेली पाहून आपल्या आजासारखा विलाप करावा लागला ! 'या अजावरून बापाच्या बापाला आजा म्हणतात का हो ?' असा काहीतरी अफलातून प्रश्न आता चिरंजीव विचारणार या भयाने मी त्याला 'फार शहाणा आहेस, पळ' म्हणून बाहेर पिटाळले ! 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्' हे तत्त्व काही आम्हा समस्त पालकांच्या अद्यापि कानी पडायला तयार नाही !

अगदी सहजगत्या घडलेल्या या प्रसंगामुळे सुरुवातीच्या मनात उद्भवलेल्या, उधळलेल्या साहित्य संमेलनाच्या दृश्याला एक वेगळेच परिमाण प्राप्त झाले. साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षाची निवडणूक सध्यातरी त्या जुन्या काळच्या स्वयंवरापेक्षाही कसोटीची झाली आहे. अटीतटीने निवडणूक लढवून यशाची माळ गळयात पडली तरी संमेलन उधळले जाण्याच्या भयाने अन्न गोड लागत नाही, झोप उडून जाते, रात्री-बेरात्री पडणाऱ्या स्वप्नामुळे दचकून जागे व्हायला होते, आणि अध्यक्षीय भाषण लिहिताना अगदी कश्शाकश्शात मन लागत नाही. शेवटी ते उधळले गेल्यानंतर, वशिष्ठशिष्य अजाचे सांत्वन करताना म्हणतात त्या 'मरणं प्रकृतिः शरीरिणां....'च्या धर्तीवर, 'अज, रामासारख्या सत्त्वनिष्ठ राजांनाही शेवटी विलाप काही चुकला नाही.' असे मनाचे समाधान करून घ्यावे लागते. यदाकदाचित उधळले न जाता ते पार पडले तर ते कसेबसे पार पडलेले असते आणि ते उधळले जाऊ नये म्हणून अध्यक्षांना इतक्या प्रकारच्या दिव्यातून जावे लागलेले असते की शेवटी त्यांची अवस्था अजाप्रमाणे होते. त्यानंतर उधळलेल्या कवित्वाने तर पत्नीच्या निधनामुळे विधुराला भासणाऱ्या जुनाट अरण्याप्रमाणे आयुष्याची अवस्था होते. सन्मानाने अध्यक्षपदाची माळ गळयात पडली पाहिजे, निवडणूक झाली नाय पायजे, अध्यक्षाला वर्षभर कसलेतरी अधिकार असले पाहिजेत हे तुणतुणे पुढच्या निवडणुकीच्या. गदारोळात कुठल्या कुठे बुडून जाते.

अध्यक्षपदाचा सन्मान आपण होऊन दारापर्यंत चालत आला, संमेलनाचा तीन-चार दिवसांचा उत्सव बहु थोर जाहला, अध्यक्षीय भाषण त्यांच्या इतमामास साजेसे झाले आणि अध्यक्षांच्या भाषणाने मराठीच्या साहित्यविचारात काही मौलिक भर पडली असे कौतुक होण्याचे दिवस आता संपले. तेहि नो दिवसाः गताः !

१९७७ च्या नोव्हेंबर महिन्यात पुणे येथे भरलेल्या संमेलनापासून अध्यक्षांच्या आणि कार्यकर्त्यांच्या मागे हा संमेलन उधळले जाण्याच्या धास्तीचा एक कायमचा

हृद्रोग लागला आहे. कराडच्या संमेलनाच्या वेळी कडक आणीबाणी होती. लेखकांचे सर्व तऱ्हेचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले होते. अनिलांच्या ‘आणीबाणी’ या कवितेचा संदर्भ माझ्या एका लेखात होता, तो छापण्यास पोलिसांनी बंदी केली होती. ‘नुसते हात हातात होते’ या ओळीत आक्षेपार्ह काय आहे असे विचारले असता, किती हात होते ते लिहा– आठापेक्षा अधिक छापता येणार नाही’ असे मख्ख उत्तर ऐकावे लागले होते– तर्कतीर्थांचा परिषदेतर्फे सत्कारसमारंभ योजिला होता, त्याला परवानगीसाठी स्टँप लावून पोलिसांकडे माझ्या सहीने अर्ज पाठविला होता ! कराडचे संमेलन म्हणजे एक रणांगण होते. शासनाच्या बाजूने बोलणारे लेखक – विचारवंतही अपराध्याच्या जाणिवेने ओशाळले होते. एखादा ज्वलंत राजकीय प्रश्न समोर असताना संमेलनाने आपला मोहरा त्याच प्रश्नाकडे वळवला पाहिजे. अशा प्रसंगी केवळ साहित्य चर्चा निष्प्रभ, अळणी होते हा अनुभव कराडने पुन्हा एकदा दिला होता.

आणीबाणी संपली आणि ‘जनता सरकार’ अधिकारारूढ झाले. ते सत्तेवर येईपर्यंतच्या अल्पकाळात चांगलेच महाभारत घडून आले होते. ‘परिषदेसाठी दहा वर्षे द्यायची’ या वचनाची पूर्तता झाल्याने मी परिषदेतून आपण होऊन मुक्त झालो होतो. आपल्या कार्याध्यक्षपदाच्या कारकीर्दीत लागोपाठ तिन्ही वर्षे संमेलने भरली आणि ती अतिशय गाजली, असा एक नसता सुप्त अहंकार मनात रेंगाळत होता. आता लवकर संमेलन होणार नाही असे वाटत होते, परंतु १९७७ च्या सुमारास थोडयाशा उशिराने का होईना, पुण्याच्या नगरवाचनमंदिर या संस्थेने पुण्यास संमेलन भरविण्यासाठी आमंत्रण दिले आणि पुन्हा एकदा संमेलनाचे वारे जोरात वाहू लागले.

‘नगर वाचन मंदिर’ ही नाणावलेली संस्था. आचार्य जावडेकरांच्या अध्यक्षतेखाली पुण्यास संमेलन भरले होते ते याच संस्थेच्या वतीने. मागची तिन्ही संमेलने सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बळावर भरली होती, त्यामुळे आर्थिक दृष्टीने कसलाच पेचप्रसंग त्यांच्यापुढे नव्हता. उलट संमेलनासाठी सढळ हाताने खर्च करूनही डोळ्यात भरेल अशी रक्कम शिल्लक ठेवण्यात त्यांना यश आले होते. नगर वाचन मंदिराला अशा प्रकारच्या शासकीय कार्यकर्त्यांचा आणि त्यामागून येणाऱ्या पैशाचा कसलाच आधार नव्हता. साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या सहाय्याने पुण्यात यशस्वी संमेलन भरवायचे असा चंग मंदिराच्या कार्यकर्त्यांनी बांधला आणि ते कामाला लागले.

संमेलने भरावीत म्हणून मध्यंतरीच्या काळात महामंडळाच्या घटनेत जे बदल करण्यात आले होते त्याचा दुसरा काही नसला तरी आर्थिक दृष्टीने कसा फायदा होऊ शकतो हे या प्रसंगी दिसून आले.

संमेलनाच्या स्वागत समितीचे सदस्य होण्यासाठी वीस रुपयांचे शुल्क ठेवण्यात आले आणि अध्यक्षपदासाठी प्रभाकर पाध्ये, गंगाधर गाडगीळ आणि पु. भा. भावे यांतील तीन नामांकित साहित्यिकांची नावे मुक्रर होऊन कामाला सुरुवात झाली. संमेलनाच्या कार्याचे हे पहिले पर्व होते.

संमेलन जोरात झाले पाहिजे, झोकात झाले पाहिजे आणि पुण्याच्या प्रतिष्ठेला साजेसे झाले पाहिजे, असे सारे जण म्हणत होते; पण पैशाच्या सोंगाला पुरे कसे पडावयाचे हा मोठाच प्रश्न होता. आणि अचानक स्वागतसमितीच्या सदस्यांच्या नोंदणीने अनपेक्षित वेग घेतला. एक भलतेच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अध्यक्षीय निवडणुकीच्या अंतिम काळात सगळेच वातावरण शिगेला पोचले. सदस्य करण्यासाठी आणि त्यांची मते आपणालाच मिळावी, यासाठी हालचाली सुरू झाल्या. सुरुवातीला या चुरशीत राजकीय कार्यकर्ते उतरले नव्हते, परंतु उमेदवारांच्या राजकीय मतप्रणालीने उचल खाल्ली आणि त्या दृष्टीनेही प्रचाराला रंग भरू लागला. सुरुवातीला काही समाजवादी स्नेह्यांनी पाध्यांसाठी पत्रक काढले. अस्वस्थ झालेले भावे हिंदुत्वनिष्ठ संघटनांना शरण गेले आणि त्यांच्या बाजूने तीही यंत्रणा हालू लागली. खरेखोटे आरोप एकमेकांवर करण्यात येऊ लागले. वावडया उठायला लागल्या. वर्तमानपत्रांना रोज नवे खाद्य मिळू लागले. कोण कुणाचे, कोण कुणाचे, याचे आडाखे बांधले जाऊ लागले. साम, दाम, दंड, भेदादी मार्गांचा अवलंब केला जात असल्याचे छाप्यांतून यायला लागले. या स्वागतसमितीच्या सदस्यत्वाच्या निमित्ताने नगर वाचन मंदिराकडे जमत असलेली पुंजी हा एक अभूतपूर्व विक्रम होता. आणि सर परशुरामभाऊ कॉलेजमध्ये झालेले मतदान हाही तसाच एक विलक्षण अनुभव होता.

आमच्या घरात दोन मते होती. 'तुमचे मत आम्हाला नक्कीच, परंतु सौभाग्यवतींचे कुणाला ?' प्रत्येक जण विचारी.

'आमच्या घरी विचारस्वातंत्र्य आणि मतस्वातंत्र्य आहे. तिच्यावर मी माझे मत लादणार नाही.' मी आगरकरांच्या बाण्याने प्रत्येकाला सांगत होतो. मतदानापूर्वी परिषदेतर्फे तिन्ही इच्छुक उमेदवारांची व्याख्याने ठेवली होती. त्यांतील उत्कृष्ट व्याख्यान ज्याचे होईल त्याला मत द्यायचे असे मतदारांनी ठरविले असते तर...

तर प्रत्यक्षात ज्याला सर्वांत कमी मते पडली तोच अध्यक्ष निवडला गेला असता ! पु. भा. भावे यांचे भाषण म्हणजे एक स्वैर कल्पनाविलास होता. त्यापूर्वी त्यांचे हेच भाषण निदान चार वेळेला तरी मी ऐकले होते. प्रत्यक्ष संमेलनाच्या अध्यक्षपदावरून ते यापेक्षा वेगळे काही बोलले नाहीत ! परंतु भावे यांच्या भाषणास सर्वांत जास्त गर्दी होती. त्या गर्दीवरूनच कोण निवडून येणार हे स्पष्ट लक्षात आले होते. भावे खुशीत होते. त्या खुशीतच त्यांनी मुंबईस झालेल्या सत्काराच्या भाषणात समाजवाद्यांवर नावनिशीवार तोंडसुख घेतले आणि अनिल अवचट यांना त्यांनी 'मनोहर' साठी एक बेछूट मुलाखत दिली. पुढे संमेलन उधळण्यात भावे यांची ही मुलाखत हे एक सोयीस्कर निमित्त झाले !

अध्यक्षीय निवडणुकीच्या दिवशी भावे आपल्या काही मुंबईच्या स्नेह्यांबरोबर कॉलेजच्या आवारात गप्पा मारीत उभे होते.

'भावेअण्णा, तुमचा भारतीय संस्कृतीवर विश्वास आहे ना ?' कोणीतरी

विचारले. सौ. कमल पाध्यांची धावपळ पाहून भाव्यांच्या गटातील एकाने टाकलेला हा कुत्सित बाण होता.

'अलबत !' भावे सिगरेटचा झुरका मारीत म्हणाले.

'दमयंतीची पतिनिष्ठा, सिंधूचे पातिव्रत्य ?'

'हे काय विचारणं झालं गड्या ! अरे या निष्ठांसाठी तर आम्ही आमच्या आयुष्याची धूळधाण करून टाकली.'

'मग त्या सिंधू-दमयंतीच्या निष्ठेनं एखादी पतिव्रता तुमच्यासमोर कार्य करीत असताना दिसली तर तुम्ही काय कराल ?'

'अध्यक्षपद सोडून देईन.' असे म्हणून भावे, 'कशी या त्यजू पदाला अध्यक्षपदाला' हे पद भसाड्या आवाजात हातातील सिगारेटची राख झटकीत म्हणू लागले आणि हास्याचा एकच कल्लोळ उडाला.

अध्यक्षपदी भाव्यांची निवड होणार हे आमच्या केव्हाच लक्षात आले होते. एकतर भाव्यांच्या मागे एका विशिष्ट दृष्टिकोनाची संघटित पक्षसंघटना होती आणि दुसरे म्हणजे ते एक लोकप्रिय कथालेखक होते. भावे निवडून येऊ नयेत यासाठी स्वतंत्रपणे वेगवेगळे घटक प्रचार करीत होते. त्यांनी दुखविलेले प्रकाशक, वितुष्ट आल्यामुळे त्यांच्यापासून दुरावलेले वृत्तपत्रांचे संपादक, भाव्यांनी वेळोवेळी फटकारलेल्या काही व्यक्ती या सर्वांना या निवडणुकीत भावे पडायला हवे होते. परंतु इतर दोघाही उमेदवारांच्या संयुक्त मतांहून अधिक मते पडून भावे निवडून आले आणि त्या विजयाच्या जल्लोषात कुणीतरी 'नथुराम गोडसेचा विजय असो' असा चिरका आवाज काढून त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना त्यांच्याविरुद्ध आणखी एक खाद्य पुरविले. हे पहिले पर्वच मुळात अतिशय गाजले. आणि निवडणुकीनंतर दुसऱ्या पर्वाला सुरुवात झाली. या पर्वात नगर वाचन मंदिराच्या कार्यकर्त्यांनी संमेलन यशस्वी करण्यासाठी सर्वतऱ्हेचे प्रयत्न करून चालविले. स्वागताध्यक्ष म्हणून पुण्याहून लोकसभेवर निवडून आलेल्या मोहन धारियांची एकमताने निवड करण्यात आली; आणि नेमकी हीच गोष्ट दुर्गाबाई भागवतांच्या नेमकी पथ्यावर पडली ! आणीबाणीत दुर्गाबाईंचे कर्तृत्व उजळून निघाले होते. या काळात बहुसंख्य साहित्यिकांनी भित्रेपणाचे आणि अंगचोरपणाचे जे प्रदर्शन केले होते त्याच्या पार्श्वभूमीवर दुर्गाबाईंना कारागृहात टाकून सूडबुद्धीने जो वागणूक मिळाली होती त्यामुळे त्यांच्याबद्दल सर्वत्र एक आदराची भावना निर्माण झाली होती. निवडणुकीत दुर्गाबाईंचा कल उघडउघड भाव्यांच्याच बाजूचा होता, हे भाव्यांबद्दलच्या एका सभेला उपस्थित राहून वडिलकीच्या नात्याने त्यांनी आशीर्वाद दिला होता त्यावरून स्पष्ट झाले होते.

पुण्याच्या नागरिकांनी निवडून दिलेला लोकनियुक्त प्रतिनिधी म्हणून धारियांची स्वागताध्यक्ष म्हणून झालेली निवड सर्वस्वी उचित होती. धारियांच्या निवडीमुळे सल्लागार समितीतील शासकीय अधिकाऱ्यांची आस्था दिसून येत होती. दुर्गाबाईंनी

मंत्र्याची निवड केल्याबद्दल तोफा डागल्या आणि त्याच्या आवाजापुढे गडबडून जाऊन धारियांनी हसतमुखाने माघार घेतली.

आता स्वागताध्यक्ष कुणाला करावयाचे? साहित्य परिषदेच्या काही चाणाक्ष कार्यकर्त्यांनी स्वागताध्यक्षपदासाठी ठोकळांचे नाव सुचविले आणि दुसरा कोणताही पर्याय नसल्याने नगर वाचन मंदिराच्या कार्यकर्त्यांनी त्याच्यापुढे मान तुकविली. ठोकळ हे मृदुप्रकृतीचे साहित्यिक. त्यांची निवड करण्यामागे त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वापेक्षा ते बहुजनसमाजाचे प्रतिनिधी असल्याने त्यांच्या नावाने नगरशासकीय आणि शासकीय यंत्रणेकडून आर्थिक सहाय्य होऊ शकेल अशी दृष्टी होती. शासकीय हस्तक्षेप नको म्हणणाऱ्या दुर्गाबाईंच्या विधानावर हा भलताच तोडगा होता, आणि तो व्यवहार्यही होता, परंतु नेहमीप्रमाणे त्याचा काही उपयोग व्हायचा नव्हता, याची फारशी जाणीव कार्यकर्त्यांना नव्हती. या तोडग्याचा परिणाम असा झाला की, संमेलनाच्या व्यासपीठावर आता उघडउघड राजकीय व्यक्तींना पाचारण करण्याचे डावपेच लढविले जाऊ लागले. उद्घाटक म्हणून गोव्याच्या मुख्यमंत्री शशिकला काकोडकर यांची निवड झाली. पुण्याच्या महापौरांना आणि चिंचवडच्या नगराध्यक्षांना संमेलनाच्या प्रत्यक्ष कार्यक्रमात स्थान देण्यात आले.

पुणे महानगरपालिकेने संमेलनास ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याचा ठराव पास केला होता. संमेलनात महापौरांचे भाषण झाल्यानंतर महापालिकेत भरलेल्या सभेत हे पन्नास हजारांचे अनुदान फेटाळण्यात आले आणि कार्यकर्त्यांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली. चिंचवडचाही अनुभव यापेक्षा वेगळा नव्हता. साहित्य परिषदेच्या हीरक महोत्सवाच्या वेळी परिषदेसाठी जागा देण्याचा ठराव झाला असता आणि समारंभाच्या दिवशी अध्यक्षांनी ( यशवंतराव चव्हाण ) साऱ्या तरतुदी पुऱ्या करून जागा परिषदेस देण्याचा आदेश दिला असता त्याच दिवशी महापालिकेत बैठक होऊन जागा देण्याचा ठराव फेटाळण्यात आला होता. त्याची पुन्हा एकदा पुनरावृत्ती झाली होती! राजकीय कार्यकर्त्यांचा अनुनय करण्याच्या आणि त्यामुळे फजित होण्याच्या या प्रकाराची चीड दुर्गाबाईंना आली नसती तरच नवल!

संमेलनाचा पहिला दिवस १८ नोव्हेंबरचा होता. संमेलनामध्ये माजी अध्यक्षांचा सत्कार योजिला होता. दुर्गाबाईंनी सत्कारास नकार दिला होता. संमेलनाच्या व्यास-पीठावरही त्या हजर नव्हत्या. त्यासंबंधाने स्वागताध्यक्षांनी 'लोकसत्ते'ला दिलेल्या मुलाखतीमुळे वातावरण चिघळले होते. दुर्गाबाई व्यासपीठावर नसल्या तरी ज्या गरवारे कॉलेजच्या आवारातील भव्य मंडपात संमेलन भरले होते, त्या कॉलेजच्या प्राचार्यांच्या घरी त्या येऊन बसल्या होत्या. पूर्वाध्यक्षांचा सत्कार संपून माजी अध्यक्षांनी नवनिर्वाचित अध्यक्षांच्या हाती सूत्रे द्यावयाच्या वेळेला म्हणजे बरोबर सात वाजून पाच मिनिटांनी त्या व्यासपीठावर आल्या. आपले भाषण त्यांनी छापून आणले होते. ते भयंकर स्फोटक होते.

दुर्गाबाईंनी स्वागताध्यक्षांच्या दुटप्पी वर्तनाची सुरुवातीला हजेरी घेतली आणि त्यांनी आणीबाणीत इंदिराबाईंशी जुळवून घेणाऱ्या काकोडकरबाईंची संमेलनाच्या उद्घाटनासाठी योजना करून एक भयंकर पातक केल्याचे सांगून एक जळजळीत वाग्बाण टाकला. वैयक्तिक मानपानासाठी आपण हपापलेले नसून केवळ कर्तव्यबुद्धीने इथे आलो आहोत हे स्पष्ट करून त्यांनी सरकारी कृपेने साहित्यिक कसे मिंधे झाले आहेत याचे उपरोधिक भाषेत वर्णन केले. 'आणीबाणी संपून नवे राज्यकर्ते आले याचे काही साहित्यिकांना दुःख होत असून 'नागडे नातवंड' सारख्या असभ्य कविता ते लिहू लागले आहेत' हा त्यांचा टोला भावे यांच्या शेजारी बसलेल्या कविवर्य ग. दि. ऊर्फ अण्णा माडगूळकर यांना होता. रुग्णावस्थेत असलेले माडगूळकर आपल्या मित्राची अध्यक्षपदी निवड झाली म्हणून मित्रप्रेमाने संमेलनास अगत्याने आले होते. एका भयकारी रोगाच्या विळख्यातून शस्त्रक्रिया होऊन ते नुकतेच बाहेर आले होते. अशा वेळी हा आघात त्यांच्यावर जबरदस्तच होता. 'हाय रे दैवा!', म्हणून त्यांनी कपाळाला हात लावला. तो लक्षावधी लोकांना दूरचित्रवाणीवरही दिसला. त्यानंतर महिन्याभराने त्यांचे दुःखद निधन झाले.

अध्यक्षपदाची सूत्रे नव्या अध्यक्षांच्या हाती सुपूर्द करताना दुर्गाबाईंनी भावनोत्कटतेने म्हटले :

'भावे, अध्यक्ष असताना व्यक्ती म्हणून मला जो अनुभव आला तो तुम्हाला यऊ नये. तुम्हाला जे सांगायचे असेल ते मुक्तपणे सांगण्याचे स्वातंत्र्य तुम्हाला मिळावे एवढीच माझी इच्छा आहे.'—

आणि एवढे बोलून दुर्गाबाई जशा आल्या तशाच निघून गेल्या. संमेलनातला त्यांनी प्राणच काढून घेतला. संमेलन जणू चैतन्यहीन होऊन गेले. भाव्यांच्या भाषणात नंतर मन लागणे शक्य नव्हते. आणि मन लागावे असे त्यात काही नव्हते!

दुर्गाबाईंच्या वक्तव्याने संमेलनाची झालेली शोचनीय स्थिती पाहून काही कार्यकर्ते अत्यंत अस्वस्थ झाले. विशेषतः महामंडळाचे अध्यक्ष कविवर्य अनिल अत्यंत प्रक्षुब्ध झाले. 'दुर्गाबाई एखाद्या रणरागिणीप्रमाणे व्यासपीठावर आल्या आणि त्यांनी संमेलनाची दाणादाण करून टाकली' अशा अर्थाच्या वृत्तपत्रातील प्रसिद्ध झालेल्या मजकुरास उद्देशून ते म्हणाले की, 'रणरागिणी कसली, गांधीलमाशी म्हणा. चिरचिरत व्यासपीठावर आली, चावा घेतला आणि शिष्टाचाराचे सर्व नियम धुडकावून लावून पळून गेली.' अनिलांच्या या विधानाने वातावरण तापू लागले. त्याचा प्रत्यय विषयनियामक समितीच्या बैठकीच्या वेळी आला. कवि अनिल आणि काही कार्यकर्ते दुर्गाबाईंच्या निषेधाचा ठराव करण्यासाठी अट्टाहासाने हटून बसले. साहित्यसंघाच्या एका कार्यकर्त्याने दुर्गाबाईंना उद्देशून बैठकीत अत्यंत असभ्य उद्गार काढले. भावे या बैठकीत हजर राहिले नाहीत. ते या वेळेपासून हरवल्यासारखे झाले होते आणि शेवटपर्यंत हरवलेलेच राहिले. इतरांनी संमेलनाची सूत्र हाती घेऊन त्यांची केविलवाणी

अवस्था केली. नियामक समितीच्या बैठकीतून वार्ताहरांना बाहेर काढण्यात आले, परंतु बैठकीनंतर अनिलच बैठकीचा वृत्तांत बाहेर येऊन तिखटमीठ लावून वार्ताहरांना सांगू लागले. बैठकीत दुर्गाबाईंच्या निषेधाचा ठराव पास झाला होता, परंतु तो खुल्या अधिवेशनात मांडायचा नाही असे ठरले होते.

‘ खुल्या अधिवेशनात ठराव मंजूर होणार नाही. तुमची छी: थू: होईल म्हणून तुम्ही ठराव मांडावयाचा नाही असे ठरविले काय ? ’ वार्ताहरांनी विचारले.

‘ कोण म्हणतो मंजूर होणार नाही ? ’ अनिल उसळले.

‘ अगदी तसेच. ठराव मंजूर होणार नाही म्हणून माघार घेतली, ’ परिषदेचे कार्यवाह मागून बोलून गेले आणि अनिलांची आणि त्यांची चांगलीच जुंपली.

विषयनियामक समितीत आठवले नावाच्या गृहस्थांनी दुर्गाबाईंबद्दल अनुदार उद्‌गार काढले तेव्हा ‘ शेम, शेम, माफी मागा ’ म्हणून काही जण ओरडले.

‘ मुळीच मागणार नाही. पुन्हा त्या शब्दांचा उच्चार करतो. हिंमत असेल तर फिर्याद करा. ’ ते उद्‌गारले.

सारे गप्प बसले !

स्वागताध्यक्षांचा दुर्गाबाईंनी अपमान केला अशी एक हाकाटी होती. ठोकळांनी संमेलन यशस्वी करण्यासाठी मानापमान विसरून कार्य करण्याची धडपड खूप केली, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. एकतर स्वागताध्यक्ष म्हणून त्यांचे भाषण अगदी सामान्य होते. साहित्यिकांनी शासकीय पारितोषिके आनंदाने स्वीकारावीत, इतकेच नव्हे तर प्रकाशकांनाही ती मिळायला हवीत, या त्यांच्या युक्तिवादाने असल्या वातावरणात हसे व्हायचे नाही तर काय व्हायचे ?

पहिल्या दिवशी अध्यक्षीय भाषणानंतर आभारप्रदर्शन होऊन सारे लोक पांगले. दत्तो वामन पोतदार मात्र एकटेच बराच वेळ बसून होते. लक्ष गेले तेव्हा त्यांच्याकडे धावलो.

‘ दादा, काय झाले ? बसून काय राहिलात ? ’

‘ काय झाले म्हणजे ? म्हातारपणी जे व्हायचे तेच झाले. झाले, संपले आता. आमचे हे शेवटचे संमेलन. झाले हे बरे झाले नाही. दुर्गाबाईंनी असा आततायीपणा करायला नको होता—द्या आता हात. ’ पोतदारांना तशा अवस्थेत शेजारच्या निवासस्थानात पोचविताना गलबलून आले.

पोतदारांची प्रतिक्रिया दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली. ‘ सरकारी पुरस्कार स्वीकारले जावेत. प्रकाशकांनाही पुरस्कार मिळावेत, ’ असे स्वागताध्यक्ष बोलून गेले होते. संमेलनातील भोजनव्यवस्थेबद्दल काही कुरबुरी झाल्या होत्या. दुर्गाबाई पुन्हा गरजल्या :

‘ पोतदार हे कम्युनिस्ट आहेत. त्यांच्या विचारांची मला पर्वा नाही. संमेलनातील मेजवान्या हे लक्षभोजनाच्या पापाहूनही खरोखर मोठे पाप आहे. साधे

झुणकाभाकरीचे जेवण घेऊन साहित्यिकांनी संमेलनाला हजर राहिले पाहिजे. साहित्याचा उत्कर्ष साधण्यासाठी ही संमेलनें निष्प्रभ आहेत आणि सरकारी पुरस्काराला हपापलेल्या मंडळींकडून साहित्याचे कसले कार्य होणार ! '

दुर्गाबाईंचा संमेलनातील भोजनव्यवस्थेबद्दल भलताच गैरसमज होता.

नामवंत साहित्यिकांना संमेलनातील भोजने अळणी वाटतात. ते त्याच्या वाटलाही जात नाहीत. जेवण्यापूर्वी त्यांना थोडे दुसरीकडे जायचे असते. (त्याला दलित साहित्यिकही अपवाद नाहीत). त्यानंतर झणझणीत पिठल्याचे जेवण मिळाले तर त्यांना हवेच असते.

दुर्गाबाई एका बाजूला तळपत होत्या, तर दुसऱ्या बाजूला कार्यकर्त्यांचा तळतळाट घेत होत्या. त्यांच्या वक्तव्याने बिकट आणि व्यथित झालेल्या अण्णांची अवस्था विचित्र झाली होती. माझा एक विद्यार्थी अण्णांच्यावर पीएच्. डी. करीत होता. त्याची त्यांच्याशी दुसऱ्याच दिवशी मुलाखत ठरली होती.

' ती मुलाखत गेली खड्डयात. तुला काही विचारायचे असेल तर स्वतः ये नाहीतर माझे नाव काढू नकोस. '

ते फोनवर त्राग्याने बोलले.

मी त्यांच्याकडे गेलो, तेव्हा त्यांच्याकडे पाहवत नव्हते इतके निराश झाले होते. त्यांच्या पुढयात ' हंस ' चा दिवाळी अंक होता.

' घे. वाच. ' अंक अंगावर फेकून ते म्हणाले.

दुर्गाबाईंनी ज्या कवितेवर हल्ला केला होता ती कविता त्यात होती. मी वाचायला लागलो.

**नागवे नातवंड**

कालचे बंडखोर
आज सत्ताधीश झाले आहेत.
कालचे सत्ताधीश
आज बंदिवान झाले आहेत.
कालचीच शोषसुरा
माणसं आज प्यायली आहेत.
सर्वांच्याच डोळ्यांवर
आत्मनिष्ठेची वऽसं आली आहेत.
संन्याश्यांच्या मस्तकातही
मदिरेची धुंदी चढत आहे.
आसपासच्या भूगोलावर
सिंहासनें उलथून पडत आहेत,

ज त्यांचे अनुयायी
क्षणाक्षणांनी वाढत आहेत.
प्रलय जवळ आला आहे
अनीतीचा कळस झाला आहे.
न्यायाचे नाव राहिले नाही
सावाला वाव राहिला नाही !

कविता वाचून पुरी होण्याच्या आतच अण्णा गरजले, 'बोल, यात कोणत्या राज्यकर्त्यांची तळी उचलली आहे आणि कसले दुःख व्यक्त झाले आहे ?' अण्णांच्या डोळ्यात अश्रू तळपत होते.

मी गप्प बसून राहिलो.

'अरे बोल ना, काय ते तुमचे स्पष्ट मत सांगा. तुम्ही मराठीतले समीक्षक ना !'

'अण्णा, असा मनाचा संताप करून घेऊ नका तुम्हाला काही खुलासा करायचा आहे का ? तुम्ही सांगा. मी लिहून घेतो.'

'कसला खुलासा आणि कसले गडधोंडे माती मसण ! अरे ज्या हाताने फुले वेचिली त्याच हातानें गोवऱ्या वेचण्याचे असले कसले रे वांझोटे दिवस आले ?'.

आणि अण्णा कपाळाला हात लावून बसून राहिले. अण्णाची ती श्रांत, क्लांत मूर्ती मी कधीच विसरू शकणार नाही !

दुर्गाबाईंनी बाजी मारली असली तरी आपले पत्रक छापण्यासाठी त्यांनी कार्यकर्त्यांकडून पैसे वसूल करण्याची चूक केली होती. वृत्तपत्रांतून ते सारे प्रसिद्ध झाल्यानंतर घाईघाईने घेतलेले पैसे परत करण्याची आणखी एक चूक त्यांनी केली होती.

दुर्गाबाईंचे वक्तव्य आणि विषयनियामक समितीतील झकाझकी यांमुळे संमेलनाच्या कार्यक्रमातील सारा रसच निघून गेल्यासारखें झाले होते. कार्यकर्त्यांनी संमेलनातील कार्यक्रमांची आखणी चांगल्या प्रकारे केली होती. कोशकारांचा सत्कार, 'पुण्याई' नावाची उत्कृष्ट स्मरणिका, ऐतिहासिक कादंबरी, मराठी विनोद इ. विषयावर परिसंवाद अशी योजकता भरपूर होती. झाले गेले विसरून गंगाधर गाडगीळ कार्यक्रमात भाग घेत होते. पाध्यांनी मात्र कार्यक्रमात कसलाच भाग घेतलेला दिसला नाही !

संमेलनासारख्या उत्सवी सोहळ्यात विद्वत्तापूर्ण व्याख्यानांपेक्षा नाट्यपूर्ण वक्तृत्वाचीच नेहमी सरशी होते. पु. ल. देशपांडे यांनी 'विनोदा'वरच्या परिसंवादात श्रोत्यांच्या आग्रहावरून ऐन वेळी बहारीचे भाषण केले आणि द. मा. मिरासदारांनी ढंगदार शैलीनें भाषणात रंग भरला. त्यांचे भाषण झाल्यानंतर प्रा. रमेश तेंडुलकर गमतीने म्हणाले,

'मिरासदार, तुमच्या भाषणाने मझा आला. मराठीत चार्ली चाप्लीन नावाचा एक श्रेष्ठ विनोदी लेखक आहे याची श्रोत्यांना पुरेपूर खात्री पटली !'

मिरासदारांनी चापटी मारण्यासाठी हात पुढे केला. तेंडुलकरांनी चपळाईने

पाठ चुकविली आणि मधल्यामध्ये मला त्याचा प्रसाद मिळाला.

अनिल इकडें वातावरण तापवीत होते. मराठवाड्याच्या नामांतराच्या प्रश्नावर संमेलनात ठराव यावा यासाठी प्रयत्न करणाऱ्या दलित कार्यकर्त्यांची हेटाळणी करीत होते. मराठवाड्याच्या प्रतिनिधींची त्याला मूक संमती होती. आणि संमेलनाविरुद्ध हवा तापविण्यासाठी ही घटना काही असंतुष्टांच्या नेमकी पथ्यावर पडली. पन्नास जणांच्या सल्ल्याने मागणी केल्यास हा ठराव अध्यक्षांच्या परवानगीने केव्हाही मांडला जाऊ शकत होता आणि अध्यक्षांशी दलित कार्यकर्त्यांनी केलेल्या वाटाघाटीतून अध्यक्षांनी हा ठराव मांडण्यास संमतीही दिली होती. परंतु संमेलनाच्या मांडवात मात्र वेगवेगळ्या गटांच्या वेगाने हालचाली चालल्या होत्या. दुर्गाबाईंचे प्रकाशक वरदा प्रकाशनचे भावे यांच्याकडे एक तळ पडला होता आणि तेथून प्रक्षोभक बातम्यांचे पेव फुटत होते. युक्रांदच्या कार्यकर्त्यांचे वेगळेच डावपेच चालले होते. दुपारच्या कविसंमेलनात दलितांनी नेलेल्या मोर्चामुळे थोडीशी गडबड झाली होती. ग्रंथालीच्या कार्यकर्त्यांनाही चेव आला होता. वेगवेगळ्या ठरावांचे मसुदे तयार केले जात होते आणि त्यात दुरुस्त्या सुचविल्या जात होत्या. पु. ल. देशपांडेही त्यामध्ये हिरिरीने भाग घेत होते असे सांगण्यात येंत होते. इकडें हिंदुत्वनिष्ठांच्या गोटात दलितांनी दंगल केल्यास ‘ जशास तसे ’ धोरणाचा अवलंब करावयाचा काय याचे मनसुबे रचले जात होते आणि तसं काही करू नये म्हणून कार्यकर्ते झटत होते. नागपूरच्या प्रतिनिधींनी मग अवश्य वाटल्यास संमेलन उधळल्यानंतर हात दाखवावा, असे अनिल आणि त्यांचे सहकारी सुचवीत होते. पोलिसबंदोबस्त आणावा या कल्पनेलाही मोडता घालण्यात आला होता. फक्त प्रतिनिधीनाच प्रवेश द्यावा, यासाठी स्वयंसेवकांनी दक्ष राहावे असे सुचविण्यात आले होते. मांडव भरू लागला तसे एक स्नेही माझ्याकडें आले आणि माझी प्रवेशपत्रिका मागू लागले. आत गेलेल्यांच्या प्रवेशपत्रिका गोळा करून त्या बाहेर नेऊन त्यांच्या बळावर बाहेरचे लोक संमेलनात आणले जात आहेत हे केव्हाच लक्षात आले.

काहीतरी वेगळे घडणार हे जाणवत होते.

खुले अधिवेशन सुरू झाले; आणि लेले नावाचे गृहस्थ हे संमेलन बेकायदेशीर आहे म्हणून व्यासपीठावर ठाण मांडून बसले. त्यांना उचलण्यास पाचदहा मिनिटांचा अवधी लागला. आपल्याला करावयाचे काय आणि हे काय भलतंच चालले आहे, अशी कुजबूज समोरच्या गर्दीतून ऐकू येत होती. त्यांना उचलल्यानंतर एकदोन तरुण दलित साहित्यिकांची, ‘ आजचे सारे साहित्य मध्यमवर्गीयांचे असल्याने टाऊक आहे. ’ अशा धर्तीची भाषणें झाली.

खुल्या अधिवेशनात विद्यापीठीय अभ्यासक्रमात मराठीचा पुरस्कार करणाऱ्या ठरावावर बोलण्यासाठी म्हणून मी व्यासपीठावर होतो. मराठवाडा विद्यापीठास बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे, या ठरावासाठी दिवसभर खलबते चालू होती.

अध्यक्षांनी तो ठराव मांडण्यास व बोलण्यास दलित नेत्यांस संमती दिली होती. प्रत्यक्षात प्रेक्षकांमध्ये मात्र अध्यक्षांच्या निषेधाचे फतवे फिरत होते. ' चातुर्वर्ण्याचा पाठपुरावा करणाऱ्यांचा धिक्कार असो. ' अशा पाट्या घेऊन तरूण प्रेक्षकातून फिरत होते. ॲड० बाजीराव कांबळे माईकवर बोलत असताना अचानक गडबड सुरू झाली. आंबेडकर फुटीर असल्याचे, आणि ' लोकशाहीच्या घोषणा करणाऱ्या या सभामंडपातील हरामखोरांचा निषेध असो ' असे कोणीतरी बोलल्याचा बोलबाला झाला. दलित वक्ते बिथरले. गोंधळ सुरू झाला. पु. ल. देशपांडे यांनी सभेला शांत करण्याचा प्रयत्न केला. विद्यापीठाचे कुलगुरू गळयाभोवती मफलर गुंडाळून विचारस्वातंत्र्याचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी व्होल्टेअरच्या प्रख्यात वचनाचा हवाला जोरजोरात देऊ लागले. पण त्यांचे भाषण ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत कोणी नव्हते. समोर निदर्शने उग्र झाली होती. कुलगुरूंच्या पत्नीच निदर्शकात होत्या. सारे काही अनावर झाले...

' पोलिसांना बोलवा ' कोणी ओरडू लागले. त्याला ठाम विरोध झाला आणि अध्यक्षांनी संमेलन बरखास्त केल्याचे जाहीर केले.

आपल्या मनात व्होल्टेअरचे दुसरेच वचन घोळत होते :

' The worst of worthy sort of people is that they are such cowards. A man groans over wrong, he shuts his lips, he takes his supper and forgets.

निराश, उद्ध्वस्त, उदास मनाने मंडपाकडे पहात बसावे लागले.

राहवले नाही म्हणून रात्री मंडपाकडे गेलो. रात्री साहित्य-रजनीच्या वेळी भाव्यांना बोलण्याचा आग्रह झाला.

दोन दिवस हरवल्यासारखे झालेले भावे यावेळी मात्र जागं झाल्यासारखं झाले होते. आपण निवडून आलो नव्हतो हे ज्यांना आवडले नव्हते त्यांनी बलप्रयोग करून आणि भयप्रयोग करून संमेलन बंद पाडले असे तावातावाने सांगितले. त्यांचा रोख समाजवाद्यांवर आणि शुभ्र कपडे घालणाऱ्या ' प्रिन्सिपॉल, पशुपाल आणि शिशुपालावर 'वर म्हणजे कुलगुरू दाभोळकरांवर होता. वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या छायाचित्रांमध्ये निदर्शने करणाऱ्यांमध्ये बहुसंख्य युक्रांदचे आणि ग्रंथालीचे कार्यकर्ते होते. ' माणूस 'चे माजगावकर, दाभोळकरांच्या पत्नी, अनंत भावे ही मंडळी त्यातून प्रामुख्याने दिसत होती.

पुढच्या वर्षी चंद्रपुरासही हाच प्रकार घडला. तेथे मात्र ते उधळण्यामध्ये दलितांनी उघड उघड पुढाकार घेतला. ' साहित्याला धर्म असू शकतो, जात नाही. मी दलित आणि दलितेतर हा फरक मानीत नाही ' या अध्यक्षीय भाषणातील महत्वाच्या विचाराला कोणी विचारले नाही. भावे, माडगूळकर आणि चोरघडे या तीन स्नेह्यांवर या संमेलनांनी अशा प्रकारे सूड उगविला.

पुण्याचे संमेलन कोणी उधळले ? दलितांनी ? अगदी नाही. ' समाजवादी

गारद्यांचे साहित्य संमेलन उधळण्याचे कपट कारस्थान' अशी जाहिरात करून पुण्याच्या 'रविवारच्या जत्रा'ने या सर्वांचे खापर केवळ समाजवाद्यांवर फोडले आणि हिंदुनिष्ठ पत्रांनी त्याचीच री ओढली. संमेलनातील भाव्यांचे वर्तन अत्यंत संयमाचे होते याची कबुली 'माणूस' नं नंतर दिली आणि नंतर लिहिलेल्या एका लेखातून आपणास या प्रकरणी उपरती झाल्याचे अनिल अवचटांनी सूचित केले. 'संमेलन उधळले गेले. लोकशाहीचा विजय झाला' या शब्दात शशी मेहता नावाच्या गृहस्थांनी घोषणा केली. त्यामागची भूमिका उघड होती.

भाव्यांच्या हिंदुनिष्ठ भूमिकेमुळे आणि वागण्याबोलण्यातील आक्रमक वृत्तीमुळे दुखावलेल्या अनेकांनी संमेलन उधळले, असा सार्वजनिक मतप्रवाह दिसून आला. एका संपादकांनी बाहेर उभे राहून 'संमेलनात चूड टाकून आलात का?' असे एका स्नेह्याला विचारले तेव्हाच संमेलन उधळण्याचे डावपेच झाले गेले होते हे लक्षात आले होते. 'आंबेडकरांना नावे ठेवली. अपशब्द उच्चारले गेले' अशी हूल उठविण्यात आली ती या डावपेचाचाच एक भाग होता हे लक्षात घेण्यासारखे आहे.

या सर्वांच्या प्रयत्नामुळे बिचारे दलित मात्र हकनाक बदनाम झाले. मला मात्र हे संमेलन उधळले गेले ते आपल्या वांझपणाने असे तीव्रतेने वाटते.

मराठवाडा विद्यापीठास बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे या रास्त मागणीस मराठवाड्यातील प्रस्थापितांच्या बहुमताने वाटाण्याच्या अक्षता लावल्या आणि शासन मुकाट्यानें गप्प बसले. पुरोगामी म्हणणाऱ्या मराठवाड्यातील विचारवंतानी शासनाची तळी उचलली.

शासनाच्या या निर्णयाविरुद्ध मनगटे चावीत आम्ही लोकांनी प्रतिक्रिया म्हणून निरुपद्रवी संमेलनें उधळण्यात पुरुषार्थ मानला!

संमेलन संपले. नगर वाचन मंदिराच्या कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे होते. उद्विग्नतेचे कडवट अश्रू!

'आम्ही फार तयारी केली होती हो!' ते म्हणत होते. अगदी खरे होते त्यांचे म्हणणे. दृष्ट लागावी अशी तयारी होती. स्मरणिका, मंडप, कार्यक्रमाचे संयोजन सारी व्यवस्था उत्तम होती. पण स्वयंवराचा पण जिंकता येत नाहीं म्हणून रावण सीता पळवील याची रामाला जशी जाणीव नव्हती, तसेच असा काही प्रकार होईल याची कार्यकर्त्यांना स्वप्नातही कल्पना आली नव्हती.

क्रौंच पक्ष्याच्या जोडप्यातील एकाचे निधन झाल्याचे पाहून झालेल्या शोकातून वाल्मीकींना रामायण सुचले अशी आख्यायिका आहे. शोक संपला, परंतु श्लोक मागे राहिला!

संमेलनाची तीच अवस्था झाली. पुढची संमेलने म्हणजे एका भीतीच्या वातावरणाचे भक्ष्य ठरली. त्यांचे वर्णन करण्यासाठी 'संमेलनाच्या वस्त्रहरणा'चे आणखी एक आख्यान लिहिले पाहिजे. ते पुढच्या वेळी!

# साहित्य संमेलनांच्या रंजक हकीकती

साहित्य संमेलनांना हजेरी कशासाठी लावायची ? वाङ्मयीन चर्चा वगैरे ठीक आहे. दोन–अडीच दिवसांत सखोल वगैरे वाङ्मयीन चर्चा ती काय व्हायची ? खरी गोष्ट ही की ही संमेलने म्हणजे एक मोठी गंमत असते. संमेलनातील वाद-विवाद, निरनिराळ्या साहित्यिकांचे निरनिराळे वागणे-बोलणे आणि मिष्किलपणाने कलागती लावून गमती पाहात उभे राहण्याचा काहींचा स्वभाव आणि एरवी आपा-पल्या बालेकिल्ल्यात बसून तोफा डागणारे साहित्यिक एकत्र असल्याने एकमेकांवर मात करण्याच्या महत्त्वाकांक्षेतून त्यांनी जाहीरपणाने केलेल्या वाटमाऱ्या, चर्चेपेक्षा जेवणावळीत आणि आजूबाजूची प्रेक्षणीय स्थळे पाहण्यात अधिक मन गुंतविणारे प्रतिनिधी आणि अलीकडे गेल्या काही वर्षांत संध्याकाळ होत आली की संमेलनाच्या मांडवातून पसार होऊन बैठका जमविण्यात गुंतलेले साहित्यिक आणि त्यांच्या बैठ-कीची तरतूद अगत्याने करणाऱ्या स्थानिक व्यक्ती, आणि या बैठकांतून दिसलेले साहित्यिकांचे असली रूप यांच्या हकीकती मोठ्या रंजक असतात. त्या सर्वच लिहून काढल्या तर मराठीतला एक मोठा रंजक ग्रंथ निर्माण होईल.

आता अगदी पहिल्या संमेलनाची हकीकत पाहा ना. माधव गोविंद रानडे नावाच्या ३८ वर्षांच्या तरुणाने १८७८ साली पुण्यास पहिली ग्रंथकार परिषद बोलावली. ही सभा म्हणजे साहित्य संमेलनांची गंगोत्री. ग्रंथकारास उत्तेजन द्यावे आणि स्वस्त दरात ग्रंथ प्रसिद्ध व्हावे म्हणून 'दरसाल पाच रुपयांचे ग्रंथ आम्ही घेऊ अशी हमी घेणाऱ्या निदान एक हजार सह्या मिळवाव्या' या हेतून ही परिषद न्या. रानड्यांनी भरविली. तशा अर्थाचे अगोदर ज्ञानप्रकाशात निवेदन प्रसिद्ध केले होते ( ७–२–७८ ). परंतु जमलेल्या ५०–६० ग्रंथकारांतून हजार सह्या कशा जम-णार ? नुसत्या निरुपद्रवी सह्या करण्यासदेखील मराठी माणूस तयार नसतो, परंतु त्यासाठी भांडायला तयार होतो हे अगदी पहिल्याच संमेलनात दिसले. जमलेल्यांनी अनेक प्रकारच्या शंकाकुशंका काढून रानड्यांना भंडावले. 'काय उपयोग अशा

सभांचा ? त्याने वाङ्मयाचे काय साधणार ? फारतर चारदोन वर्षे टिमकी वाजेल आणि वाजत नाही म्हणून गाजराची पुंगी मोडून खातील !' मराठी माणसाच्या या प्रवृत्तीचा उपयोग पुढे टिळकांनी फार चांगल्या रीतीने करून घेतला. 'मुलीचे लग्नाचे वय आठऐवजी सोळा करावे, त्यासाठी सरकारने कायदा करावा' असे सुधारक पक्ष म्हणू लागला. टिळक म्हणाले, 'आपल्या सामाजिक व्यवहारात परकी सरकारला शिरकाव करू देता कामा नये. म्हातारी मेली तरी चालेल, परंतु काळ सोकावता उपयोगी नाही. माझ्या मुलीचे लग्न अशा रीतीने करावयास मी तयार आहे अशा फक्त शंभर सह्या आणा. मी स्वतः कृती करण्यास तयार आहे.' त्यांना पक्के माहीत होते की, एवढयाही सह्या मिळणार नाहीत आणि झालेही तसेच !

ग्रंथकारांच्या पहिल्याच सभेनिमित्त रानडयांनी काढलेल्या पत्रकाचे टिळकांनी केलेले हे विडंबन होते !

सुरुवातीला अध्यक्षाची निवड जमलेल्या ग्रंथकारांतून ग्रंथकारांनीच केलेली असे. ( ही परंपरा जोपासावयास हरकत नाही. पण त्यामुळे निवडणुकीच्या गदारोळातील गंमत नाहीशी होईल. हीच तर आम्हाला पाहिजे असते ! ) पहिल्या ग्रंथकार संमेलनामध्ये अध्यक्षस्थान रानडयांनीच स्वीकारावे असे अनेकांनी सुचविले. तसे सुचविण्यात पुढाकार गोपाळराव जोश्यांचा होता. ज्येष्ठतेच्या आणि ग्रंथरचनेच्या दृष्टीने लोकहितवादींनी अध्यक्षस्थान स्वीकारावे असे रानडयांना वाटत होते. लोकांच्या आग्रहाला मान देण्याकरिता रानडयांनी नाईलाजाने हे अध्यक्षस्थान स्वीकारले. कारण त्यांनी मराठीत एकही ग्रंथ लिहिला नव्हता. दुसऱ्या दिवशी 'पुणे वैभव'मध्ये, रानडयांना मराठी ग्रंथकार सभेचा अध्यक्ष होण्याचा अधिकारच काय ? अशी सरबत्ती झाली. हा गोपाळराव जोश्यांचाच उपद्व्याप असला पाहिजे, याची सर्वांना जाणीव होती !

१९०६ साली पुण्याला भरलेल्या साहित्य संमेलनाला लो. टिळक उपस्थित राहिले. साहित्य संमेलनासारखे उपक्रम नेमस्तांनी करावयाचे असल्याने टिळकांच्या प्रकृतीला असले मिळमिळीत उपक्रम मानवणारे नव्हते. परंतु त्यांचे डावे-उजवे हात ( कृ. प्र. खाडिलकर व न. चिं. केळकर ) संमेलनामध्ये रस घेत होते. त्यांच्या आग्रहामुळेच टिळक उपस्थित राहिले.

संमेलनामध्ये एका विषयावर कडाक्याची चर्चा झाली. मॅट्रिकला त्या वर्षी मराठी हा विषय अनिवार्य केल्यामुळे विद्यापीठाच्या अभिनंदनाचा ठराव या प्रसंगी मांडण्यात आला. राजारामशास्त्री बोडस, प्रो. विजापूरकर, इतिहासाचार्य राजवाडे आणि खाडिलकर यांनी त्या ठरावाला कडाडून विरोध केला.

लॉर्ड कर्झनने विद्यापीठ भ्रष्ट केल्याने त्याच्या अभिनंदनाचा डाग संमेलनाला लागता कामा नये, असे खाडिलकर आवेशाने बोलले. केळकरांनी सभा ताब्यात घेऊन, 'युनिव्हर्सिटीला दोषही देऊ नये आणि त्याचे अभिनंदनही करू नये', अशी दुरुस्ती सुचविली आणि ती मान्य झाली. ते पाहून टिळक हसले आणि म्हणाले, 'ही गोष्ट

बाहेर जाऊ देऊ नका ! '

'का ? ' कोणीतरी विचारले.

'आत्तापर्यंत वाङ्मयाच्या अभिवृद्धीसाठी सरकारने मदत करावी असे ठराव तुम्ही संमत करीत आला. आता आजची गोष्ट सरकारच्या कानावर गेली म्हणजे....'

त्यांना अधिक खुलासा करावा लागला नाही.

कर्झनशाहीविरुद्ध टिळकांनी केसरीतून इतके प्रचंड रान उठविले असता संमेलनाने त्याचा वाराही स्वतःला लागू द्यायचा नाही असे धोरण ठेवले होते. त्या महापुरुषाला त्याचे हसू येणार नाही तर काय होणार ?

शासनाविरुद्ध खुल्या अधिवेशनात कसलाही ठराव आला की, सरकारी नोकरांची विलक्षण पंचाईत होत असे. ते सारे आपण त्यात सहभागी नाही आहोत, हे सांगण्यासाठी भराभर संमेलनाच्या मंडपाबाहेर जाऊन बसत. 'साधा जप्त पुस्तकावरील जप्ती उठवावी ' हा ठराव संमेलनात येऊ देण्यास ना. गो. चापेकरांसारखे अध्यक्ष तयार नसत. तशाच प्रकारचा ठराव जळगावच्या अधिवेशनात आला म्हणून लगबगीनें अध्यक्ष माधव जूलियन बाहेर पडले. त्यांच्या पाठोपाठ विठ्ठलराव घाटे आणि बाकीचे लटांबर बाहेर पडले.

१९८१ च्या फेब्रुवारीमध्ये अकोला येथे भरलेल्या साहित्य संमेलनात, शासनाने ग्रंथपारितोषिक समितीने पारितोषिकप्राप्त ठरविलेल्या काही पुस्तकांना पारितोषिक देण्याचे नाकारले. त्याविरुद्ध प्रचंड प्रक्षोभ निर्माण होऊन त्याच्या निषेधार्थ ठराव मांडण्यात आला. तो खुल्या अधिवेशनात मांडला जाऊ नये म्हणून विषयनियामक समितीचे सदस्य नसतानाही केंद्रीय मंत्री वसंत साठे बैठकीला येऊन बसले. त्यांना थोडा विरोध होऊन त्यांना बसण्यास संमती देण्यात आली. परिणामी ठराव गारद झाला. संमेलनामध्ये शासनाचा, मंत्र्यांचा हस्तक्षेप या विषयावर खूपच वादावादी झाली.

त्याच दिवशी पुण्याच्या साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी परिषदेच्या अमृतमहोत्सवास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहावे म्हणून त्यांना व्यासपीठावरच निमंत्रण दिले. मंत्र्यांनी साहित्याच्या व्यासपीठावर येऊ नये म्हणणारेच आपल्याला निमंत्रण देतात हे पाहून साठेही तसेच मिस्किलपणे हसले !

साहित्य परिषदेची स्थापना १९०७ साली पुण्यास झाली असली तरी १९१२ मध्ये अकोल्याला हरि नारायण आपटे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या साहित्य संमेलनात झालेल्या ठरावाप्रमाणे परिषदेची कचेरी रीतसर मुंबईस सुरू झाली. १९१२ ते १९३२ या वीस वर्षांच्या काळात ती मुंबईस होती. त्या काळात रावबहादूर दा. ग. पाध्ये हे परिषदेचे कार्याध्यक्ष होते. 'इंदुप्रकाश ' या दैनिकाच्या संपादकवर्गात ते होते आणि परिषद आर्थिकदृष्ट्या बळकट करण्यासाठी निरनिराळ्या संस्थानिकांना, रावबहादूर, रावसाहेबांना त्यांचे प्राधान्याने आवाहन असे. पुण्याच्या साहित्यिकांचा संमेलने भरविण्यासाठी त्यांच्यामागे सदैव ससेमिरा असे. इंदूर, ग्वाल्हेर, मिरज

इत्यादी अधिपतींकडून त्यांनी १९१४ पर्यंत २०-२५ हजार रुपये जमविले होते. संमेलन भरविण्यासाठी पुणेकरांच्या ज्या हालचाली असत, त्यांना तोंड देताना त्यांची दमछाक होई. पाध्ये हे साडेचार फूट उंचीचे, वाक्‌चतुर असे गृहस्थ होते. झिर-मिळयांची पगडी घातलेली आणि पगडीखाली मानेच्या बाजूस, वीतभर उंचीचे चित्रपटातील भगवान श्रीकृष्ण छाप पद्धतीचे केस लोंबत ठेवून त्यांना हेलकावे देत ते बोलत. बोलताना आवाजात चढ-उतार, क्षणात आर्जव, तर क्षणात दादागिरी, मध्येच उठून हातवारे करून तावातावाने बोलणे, तर दुसऱ्या क्षणी मान खाली घालून कष्टी झाल्याची बतावणी, तर क्षणाक्षणात रागाने सभागृह सोडून जाण्याचा आव ते आणीत. त्यांचे हे सारे आविर्भाव म्हणजे त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्यांना मोठे रंजक वाटत.

साहित्य परिषदेकडे निधी आहे तो कशासाठी ? पुजून ठेवण्यासाठी का ? असे एकदा पुणेकरांनी त्यांना विचारले तेव्हा ते रागाने वेडावीत म्हणाले,

'हो, हो. करा ना संमेलन ! आम्ही मिळविणार तुम्ही गिळणार.'

शेवटी हो-ना करता करता १९१५ मध्ये त्यांनी संमेलन भरविले. मुंबईच्या माधवबागेत हे संमेलन भरले. मिरजेचे अधिपती गंगाधरराव पटवर्धन हे अध्यक्ष आणि सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर नाईट हे स्वागताध्यक्ष म्हणून पाध्यांनीच निवडले. त्याचा जमाखर्च खालीलप्रमाणे झाला :

| | |
|---|---|
| **जमा** | |
| ५ व ५ रुपयांवरील वर्गण्या | १२३२ |
| प्रत्येकी रु. २ प्रमाणे प्रतिनिधी फी | ३३२ |
| तीन दिवसांची प्रवेश तिकिटे | ७७ |
| एका दिवसाची तिकिटे | २२.५० |
| देणग्या | ४९ |
| एकूण | १९१८.५० |

सुमारे साडेचारशे रुपये वाचवून पाध्यांनी पुणेकरांची चांगलीच जिरवली. १९३२ मध्ये परिषद पुणेकरांच्या हवाली करताना पाध्यांना अतोनात दुःख झाले. आपण मिळविलेला पैसा शेवटी पुणेकरांनी गिळला, हे ते दुःख होते.

अकोल्याच्या संमेलनाच्या सुमारास महामंडळाचे कार्याध्यक्ष मधुकर आष्टीकर यांनी मुख्यमंत्री अंतुले यांजकडून महामंडळाला विशेष अनुदान मिळविले आणि ते लगेच नागपूरच्या बँकांमधून मुदत ठेवींच्या रूपाने ठेवून दिले. त्यावेळच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या मिळविल्याखेरीज रक्कम महामंडळाच्या ताब्यात येत नाही, अशी आजही वस्तुस्थिती आहे आणि कोर्टकचेऱ्याच्या वादात औरंगाबादच्या महानोर-पूर्वीच्या अध्यक्षांनीही आपल्याकडील सारे कागदपत्र सादर केले नाहीत, अशी आजही अवस्था आहे.

मुंबईचे अप्पा पेंडसे आणि त्यांचा मित्रवर्ग म्हणजे साहित्य संमेलनामध्ये गमती उडवून देणारे एक खट्याळ टोळके. १९३४ च्या बडोद्याच्या साहित्य संमेलनात जप्त वाङ्मयावरील जप्ती उठविण्याच्या बाबतीत अध्यक्षांनी ठराव घेण्यास नाकारले म्हणून अध्यक्षांना चांगलेच जेरीस आणले. अश्लील वाङ्मयावरील ठरावावर बोलताना अनसूयाबाई काळे यांनी वारंवार 'आमची तरुण पिढी एकजात षंढ, नपुंसक होत आहे' म्हणून उद्घोष सुरू केल्यानंतर अप्पांनी उठून विचारले की,

'असा काय आपला अनुभव आहे!'

आणि बाईंचं आईस्क्रीम होऊन गेले.

---

| खर्च | |
|---|---|
| सभागृह ( भाडे, सामान | |
| रोषणाई ) | २९५ |
| पाहुणे मंडळींचा | |
| भोजनखर्च | २७१.५० |
| ग्रॅंड गार्डन पार्टी | २०५.५० |
| स्टे. छ. पो. | २१५.३८ |
| गाडीभाडे | २६.९४ |
| रिपोर्ट छापणावळ | ३७५ |
| किरकोळ | ६३.०६ |
| एकूण | १४३४.४४ |

---

असोद्याचे काळे म्हणून एक गृहस्थ होते. ते साहित्य संमेलनाला जोडून 'वेश्या परिषद भरवावी' म्हणून दरवर्षी ठराव आणीत. काँग्रेसच्या अधिवेशनाला जोडून सामाजिक परिषद भरविण्याचा प्रयत्न होतो तर साहित्य संमेलनामध्ये वेश्यांचे संमेलन का नको असा त्यांचा साधा युक्तिवाद होता. वेश्यांचा उद्धार साहित्यिकांनी करावयाचा नाही तरी कोणी ? काळयांच्या या उपद्व्यापाने कार्यकर्ते सतत हैराण होऊन जात. अप्पांनी जळगावच्या संमेलनात वेश्या काळे असे समीकरण करून त्यांची पंचाईत केली. त्यावेळेपासून त्यांचा ससेमिरा कमी झाला.

सोलापुरच्या संमेलनात कानात भीकबाळी घातलेले एक लिंगायत गृहस्थ पुढच्या रांगेत येऊन बसत. भावबंधनात मोरेश्वराचे काम करण्यास ते तयार आहेत अशी अध्यक्षांकडे चिठी पाठवून अप्पांनी धमाल उडवून दिली.

दत्तो वामन पोतदार म्हणजे संमेलनाच्या इतिहासातील एक मोठी चैतन्यमूर्ती. १९०८ मध्ये इतिहासाचार्य राजवाडयांचा हात धरून ते पहिल्यांदा संमेलनास उपस्थित राहिले. त्यानंतर १९७७ पर्यंत जवळजवळ साऱ्याच संमेलनास ते उपस्थित

राहिले. अपवाद फक्त पंढरपूर व कराडची संमेलने. पंढरपुरच्या संमेलनाच्या वेळी ते अखिल भारतीय इतिहास परिषदेचे अध्यक्ष होते आणि कराडच्या संमेलनाच्या वेळी त्यांच्यासाठी पाठवावयाची गाडी यशवंतरावांनी ऐनवेळी भाऊसाहेब खांडेकरांना आणण्यासाठी पुण्यास धाडली. सारे आटपून पोतदार वाईस (त्यावेळी ते वाईस राहावयास गेले होते) रात्री १० वाजेपर्यंत वाट पाहात राहिले. त्या काळात त्यांनी चार दिवसांच्या तपकिरीचा फन्ना उडविला.

१९६७ मध्ये भरलेल्या भोपाळच्या साहित्य संमेलनास मोठ्या प्रमाणात साहित्यिक उपस्थित होते. मुंबईच्या साहित्य संघाने त्यासाठी स्पेशल डबे आरक्षित केले होते. भोपाळच्या बाजारात घुंगरू लावून नाचत-गात एक गृहस्थ थंडाई विके. ते पाहून असली थंडाई चाखण्याची इच्छा साहित्यिकांना झाली. संमेलन संपल्यानंतर परतीच्या गाडीमध्ये भोपाळला वास्तव्य करीत असलेल्या चिंतामणरावांच्या चिरंजिवांनी थंडाईने भरलेल्या दोन बाटल्या आणून दिल्या. त्यातील एकात चांगली भांग घोटलेली होती आणि दुसरीत नुसती थंडाई होती.

दत्तोपंत पोतदार, श्री. शं. नवरे बसले होते त्या डब्यात दोन्ही बाटल्या आणल्या. पोतदारांनी एक बाटली ठेवून घेतली आणि दुसरी शेजारच्या डब्यात आम्ही बसलो होतो तेथे पाठवून दिली.

थंडाई घेतल्यानंतर पोतदार डोळे मिटून बसून राहिले. नवऱ्यांना मात्र विलक्षण वाचा फुटली.

'समोरचे झाड-फिरते आहे. दत्तोपंत, पाय वर डोके खाली असे किती वेळ बसणार ? पाय खाली करा.'

दत्तोपंत म्हणाले,

'पंत, आपण दोघांनी भांग घेतली आहे, तेव्हा डोळे मिटून त्याचा आनंद लुटा. डोळे उघडू नका !'

'हर हर महादेव !' नवरे जोरात म्हणू लागले.

'गप्प बसा म्हणतो ना ?' पोतदार खेसकले.

'आम्ही साधी गर्जनाही करायची नाही. हा आमच्यावर जुलूम आहे. मी गप्प बसेन ते एका अटीवर. पोटात भयंकर आग पडली आहे. तुमच्या पडशीतले लाडू काढा !'

'त्या अंधृटकराला सांगा. तो तुम्हाला सर्व काही देईल.'

अंधृटकरांनी मिठाई देऊन साहित्यिकांच्या पोटातील आग शमविली.

# साहित्य संमेलनातील ताणतणाव

वादप्रियता हा महाराष्ट्राचा सर्वांत मोठा विशेष आहे. कोणत्याही क्षेत्रात कशाही प्रकारचे कार्य एकदा उभे राहिले की ते कार्य उचलून धरण्यासाठी अनेक व्यक्ती पुढे धावतील, परंतु ते पुरे करण्यामध्ये नाना तऱ्हेच्या अडचणी आणतील आणि खेकटी निर्माण करतील. अनेक प्रकारच्या शंकाकुशंका निर्माण करून कार्यकर्त्यांना भंडावून सोडतील. अशा वेळी जणू त्यांच्यामध्ये चार्वाक संचारतो. चार्वाक हा मुळात महाराष्ट्रीय असला पाहिजे.

१९३२ मध्ये अनेक प्रकारच्या हिकमती लढवून पुण्याच्या कार्यकर्त्यांनी २० वर्षे मुंबईत राज्य करीत असलेल्या साहित्य परिषदेला दुःशासनाने द्रौपदीला भर दरबारात खेचून आणावे, तशा बाण्याने पुण्याला आणली. मुंबई महानगरपालिकेत ज्याप्रमाणे विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात फिरोजशाह मेथांचे किंवा उत्तरार्धात स. का. पाटलांचे अनभिषिक्त राज्य होते त्याप्रमाणे साहित्य परिषदेत रावबहादूर दा. ग. पाध्ये नावाच्या साडेचार फूट उंचीच्या गृहस्थांचे अनभिषिक्त राज्य होते. गृहस्थ मोठा हिकमती, नाटकी. इंदुप्रकाशासारख्या नेमस्त पत्राचे संपादन आणि मुंबईतल्या एका मोठया हायस्कूलचे प्रिन्सिपॉल म्हणून ते मिरवीत होते. सरकारदरबारी ते वजन राखून होते आणि रावसाहेब, रावबहादूर, सर इत्यादी इंग्रज सरकारने विभूषित केलेल्या पदवीधरांमध्ये त्यांचा सतत वावर असे. साहजिकच नाना प्रकारच्या संस्थानिकांशी ते संधान बांधून असायचे. फेरोजशाह मेथा यांचे राजकारणात ते उजवा हात होते.

त्यांच्याच प्रयत्नाने सुरुवातीला संस्थानिकांकडून परिषदेला देणग्या मिळाल्या. परंतु त्या मिळविण्यासाठी त्यांनी साहित्याशी संबंध नसलेल्या संस्थानिकांना सरदार–दरकदारांना संमेलनाचे अध्यक्ष करण्याचा पायंडा पाडला.

साहित्य परिषद ही साहित्य परिषदांची चालकशक्ती; परंतु तिला डावलून १९२१ ते १९३२ या काळात पुणेकर मंडळींनी साहित्य संमेलने स्वतंत्रपणे भरवण्याचा

चंग बांधला. त्याला फारसे यश आले नाही. साहित्य संस्थांना सोडून स्वतंत्रपणे संमेलने भरवण्याच्या प्रयत्नात केवळ आरंभशूरत्व दिसते. पाध्यांनी पुणेकरांचे हे सारे प्रयत्न हाणून पाडले. या साऱ्या प्रयत्नांत कसे विलक्षण वादविवाद झाले, उखाळ्या-पाखाळ्या निघाल्या, हेतूबद्दल संशय घेतले गेले आणि परस्परांबद्दल आरोप-प्रत्यारोप झाले त्याचा इतिहास लिहिणे, म्हणजे कोळशाचे केवळ उगाळणे होय. या साऱ्यांना वैतागून त्या वेळचे परिषदेचे कार्यवाह कृ. पां. कुलकर्णी साहित्य परिषदेचे दप्तर घेऊन समुद्रात फेकावयास निघाले होते !

साहित्य संमेलन कुणाच्या तरी प्रयत्नाने कुठेतरी भरणार म्हटल्यावर अचानक वाद निष्पन्न होतात. संमेलनाची कसली वार्ता नसते तेव्हा मोठमोठ्या संस्था, व्यक्ती निष्क्रिय असतात; परंतु परिषदेची हालचाल सुरू झाली की वादविवाद हमरीतुमरीवर येऊ लागतात, वाद रंगू लागतात आणि जितके वाद पराकोटीला जातात तितके संमेलन गाजण्याची, यशस्वी होण्याची खात्री असते.

वादाशिवाय संमेलन म्हणजे सगळा अळणी रक्तदाबवाल्यांचा कारभार. संमेलनाने अनेकांचे रक्तदाब सुरू झाले नाहीत, वाढले नाहीत; तर संमेलन कसले ?

संमेलन भरविणाऱ्यांची झोप फारशी उडत नाही. कारण त्यांच्याजवळ संमेलनासाठी अर्थबळ उभे करण्याची ताकद असते. नसली तरी संमेलन भरणार म्हटल्यावर या ना त्या प्रकाराने अर्थबळ उभे राहते; परंतु घरचे खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजणाऱ्या साहित्यसंस्थांतील कार्यकर्त्यांना मात्र त्या निमित्ताने वादविवाद करण्याचा विलक्षण जोर असतो.

आता अगदी पहिल्या संमेलनाचेच उदाहरण पाहा ना ! न्या. रानडे आणि लोकहितवादी यांच्या संयुक्त प्रयत्नाने १८७८ मध्ये पुण्यात पहिले संमेलन भरले. ज्यांच्या नावावर पाचपन्नास ग्रंथ आहेत आणि वयाने ज्येष्ठ आहेत त्या लोकहितवादींना ( वय वर्षे ५५ ) अध्यक्ष करायचे की नाही ? पण नाही. जमलेल्या लोकांनी आग्रह करून न्या. रानडे यांना ( वय वर्षे ३८ ) अध्यक्ष केले आणि त्याच लोकांनी संमेलन झाल्यावर एकही ग्रंथ न लिहिणाऱ्या रानड्यांना संमेलनाचा अध्यक्ष होण्याचा अधिकार काय, अशी हाकाटीही सुरू केली. धुळवडीनंतरचे काव्य अधिक रंगतदार असते, तसेच संमेलन संपल्यानंतर होणारी धुळवड संमेलनासंबंधी मनात एक प्रकारची कडवट चव निर्माण करते. परंतु कडवट चवीच्या पेयाची आवड निर्माण होऊन रसिकवर त्यातच स्वतःला जसे बुडवून घेतात तसे मराठी माणूस पुनःपुन्हा संमेलनात स्वतःला झोकून देतो. संमेलन म्हटले की काही जणांच्याच अक्षरशः अंगात येते.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी पत्रकार, साहित्यिक आणि राजकारण यांचे नाते घनिष्ठ होते. साहित्य संमेलनांतून त्यामुळे राजकीय ठराव करून विषयनियामक समितीत आणि खुल्या अधिवेशनात त्यावर राणा भीमदेवी थाटात भाषणे जरी करण्यात येत असली तरी साहित्यसंस्था आणि साहित्य संमेलने भरविणाऱ्यांची मूळची प्रकृती

नेमस्त वृत्तीचीच. न्या. रानडे यांच्यासारख्या प्रागतिक नेमस्ताने या संमेलनाची घटस्थापना केली असल्याने या संमेलनामध्ये जो रास–गरवा चालतो तो नेमस्तांचाच. दांडया घेऊन ते उभे राहिले तरी त्यातून शेवटी टिपऱ्याच खेळणार! या दांडया सरकारविरुद्ध क्वचितच उभ्या केल्या जाणार!

म्हणून लो. टिळक कधी या साहित्यसंमेलनांच्या वाटयास गेले नाहीत. फक्त एकदाच म्हणजे १९०६ मध्ये ते पुण्यास भरलेल्या संमेलनास कुतूहलाने उपस्थित राहिले. लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी करण्याचा घाट घालून जे दडपशाहीचे थैमान मांडले होते त्याची दखल साहित्यिक कशी घेतात हे त्यांना पाहावयाचे होते. परंतु साहित्याच्या अभिवृद्ध्यर्थ सरकारची मदत मिळण्याचा प्रयत्न करावा, अशा प्रकारचे ठराव पाहून त्यांना हसावे की रडावे हे कळेना! संमेलनात हमरीतुमरीवर आलेला ठराव म्हणजे, मुंबई विद्यापीठाने अभ्यासक्रमात 'मराठी' या विषयाचा समावेश केला म्हणून त्याचे अभिनंदन करावे की निषेध करावा हा! आता नेमस्त मंडळी सरकारच्या अभिनंदनाचा कोणताही प्रसंग संमेलनात आणल्याशिवाय राहणार नाहीत आणि जहालांच्या तालमीत तयार झालेली काही मंडळी त्याला विरोध करणार हे ठरलेलेच. म्हणून एकाने अभिनंदनाचा ठराव आणला की दुसरा दुसऱ्या टोकाला जाऊन निषेधाचे झेंडे उभे करणार!

मंडळी हमरीतुमरीवर आली असता त्यातून मध्यम मार्ग काढणारी न. चिं. केळकरांसारखी मंडळी असावयाचीच!

त्यांनी 'मुंबई विद्यापीठाचे अभिनंदन करू नका आणि दोषही देऊ नका' असा मध्यम मार्ग काढला आणि तो सर्वांनी मानला.

टिळक हसत हसत म्हणाले, 'ही गोष्ट बाहेर जाऊ देऊ नका.'

टिळकांसारख्या लढाऊ बाण्याच्या व्यक्तीला साहित्यसंमेलनापासून कायमचे दूर राहण्यासाठी एवढा प्रसंग पुरेसा होता!

महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना २७ मे १९०६ रोजी पुण्याला झाली. परंतु सुरुवातीपासूनच वादंगांना तोंड फुटले होते, त्यामुळे अकोला येथे भरलेल्या साहित्यसंमेलनात ही परिषद मुंबईस न्यावयाचे ठरले आणि त्याप्रमाणे ती मुंबईस गेलीसुद्धा. ती तेथे जवळजवळ वीस वर्षे होती. ती मुंबईस गल्यावर पुणेकर मंडळींना तिचा विरह जाणवू लागला.

अकोल्याच्या संमेलनात काय घडले त्यासंबंधी अकोल्याच्या संमेलनाचा अहवाल उपलब्ध आहे. त्यांत सामोपचाराच्या गोष्टीचे चित्रण आहे. परंतु खरी भांडणे संमेलने कुणी भरवावयाची या मुद्यावर होती. साहित्य परिषद स्थापन होण्यापूर्वीपासून ग्रंथकारांची संमेलने स्वेच्छेने भरविली जात. त्यासाठी स्थायी समिती आणि संस्था अशी काही नव्हती. मराठीत आघाडीचे लेखक पुण्यामध्ये असल्याने मे महिन्यात त्यांचा मेळावा भरविण्यात येई. तेव्हा यापुढची संमेलने अशीच स्वतंत्रपणे भरविण्यात यावी,

साहित्य परिषदेची ती जिम्मेदारी नाही, अशी भूमिका त्या काळच्या साहित्य परिषदेच्या विरुद्ध गटाने घेतली. साहित्यपरिषद स्थापन होऊनही तिला घटना नसल्याने हा वाद विकोपाला गेला. अकोल्याच्या संमेलनामध्ये साहित्य परिषदेची घटना संमत झाली आणि संमेलने भरविण्याची जबाबदारी तिचीच असल्याचे ठरविण्यात आले.

असे असेल तर आम्हाला परिषदही नको आणि संमेलनही नको. ज्यांना या दोन्ही गोष्टी एकत्र चालवायच्या असतील त्यांनी ती खुशाल चालवावी.

मुंबईकर मंडळींनी ही संधी साधून ही ६–७ वर्षांची बालिका अलगद उचलून मुंबईला नेली. ती गेल्यावर पुणेकर मंडळींना फार वाईट वाटले. ती घालवायला नको होती, असे काहींना वाटू लागले; परंतु आता त्यांचा इलाज नव्हता !

मुंबईच्या पाध्ये गटाने परिषद केवळ मुंबईला नेली असे नव्हे, तर आपल्या नतृत्वाखाली सुरुवातीची संमेलने धडाक्याने भरविली. परिषदेसाठी संस्थानिकांकडून निधी गोळा केला आणि कसल्याही विधिनिषेधाची पर्वा न करता संस्थानिकांना, सरदार–दरकदारांना खुशाल संमेलनाध्यक्षांच्या खुर्चीवर बसवून या पाच दिवसांच्या जल्लोषांत स्वतःचे प्रभुत्व निरपवादपणे मिरविले !

त्यामुळे पुणेकरांच्या पोटात दुखू लागले, तेव्हा पुण्याच्या काही मातब्बर साहित्यिकांची अध्यक्षपदी निवड करून या पोटदुखीवर ओवा देण्याचे मुंबईकरांना काही सुचले नाही. संमेलनाच्या स्वागत समितीने यंदा अध्यक्ष कुणाला करावयाचे हे महत्त्वाच्या साहित्यिकांना पत्रे लिहून विचारायचे आणि त्यांच्या सूचनेनुसार अध्यक्ष निवडायचा अशी पद्धत होती. मिरजेचे अधिपती सर गंगाधरराव पटवर्धन यांची मुंबईच्या १९१५ सालच्या संमेलनाध्यक्षपदी निवड करताना पाध्ये यांनी पुणेकर साहित्यिकांना विश्वासात न घेताच निर्णय घेतला. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर नाईट यांची स्वागताध्यक्षपदी निवड केल्यावर मग इतरांना काय विचारायचे, अशी त्यांची भूमिका होती. अध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष दोघेही 'सर' की भूषविणारे ! आणखी काय हवे ? पुणेकरांनी त्याबद्दल पाध्यांना जाब विचारला. परिणामी १९१७ मध्ये इंदूरला साहित्यसंमेलन भरविताना त्यांनी साहित्यिकांना जी पत्रे लिहिवली ती अशा रीतीने की, त्यामुळे रावबहादूर गणेश जनार्दन आगाशे यांचीच ( म्हणजे त्यांच्या पुढ्यातल्या नेमस्ताची ) निवड व्हावी. पुणेकर मंडळी त्यामुळे चांगलीच बिथरली. त्यातून जी भांडणे झाली त्यामुळे पुढची चार वर्षे कुठे संमेलन भरले नाही. १९२१ साली पुणेकर साहित्यिकांच्या प्रयत्नाने बडोद्याच्या मंडळींनी साहित्यसंमेलन द्यावयाचे ठरविले आणि रीतसर मुंबईच्या साहित्य परिषदेच्या संमतीने स्वागत समिती बनविली. स्वागत समिती बनताच पाध्ये यांच्या प्रयत्नांना सुरुवात झाली. इचलकरंजीचे अधिपती बाबासाहेब घोरपडे यांना संमेलनाध्यक्ष करण्यासाठी त्यांचा शब्द गेला होता. परंतु बडोद्याच्या स्वागतसमितीने ते नाव डावलून केसरीचे संपादक न. चिं. केळकर यांचे नाव पक्के करण्याचे ठरविले. पाध्ये वाघाच्या आवेशाने बडोद्याला गेले

आणि 'केळकर कसे अध्यक्ष होणार ते मी पाहतो' म्हणून डरकाळी फोडली.

प्रसिद्ध लेखक चिं. वि. जोशी त्यावेळी बडोद्याला होते. त्यांनी या प्रसंगाचे कसे वर्णन केले आहे ते पाहा :

"बडोद्याचे संमेलन पूर्णपणे आपल्या तंत्राने चालावे अशी पाध्यांची महत्त्वाकांक्षा होती; परंतु तिला आम्ही वेळोवेळी एकजुटीने धाब्यावर बसवीत होतो. इचलकरंजीचे राजे श्रीमंत बाबासाहेब यांना संमेलनाचे अध्यक्ष नेमण्याची पाध्यांची इच्छा होती. इतकेच नव्हे तर आपण तसे अभिवचन दिले आहे, असे त्यांचे म्हणणे होते. रा. ब. पाध्ये हे तत्कालीन नेमस्त ऊर्फ मवाळ पक्षात दुय्यम प्रतीचे पुढारी होते; फेरोजशाह मेथा यांचे ते राजकारणात उजवा हात होते. १९२१ मध्ये तात्यासाहेब केळकर गांधीवादी होण्याच्या बेतात होते आणि आम्ही जेव्हा केळकरांना अध्यक्ष नेमल्याचे जाहीर केले तेव्हा पाध्ये आणि तत्पक्षीय मुंबईकरांच्या अंगाचा तिळपापड उडाला. 'केळकर अध्यक्ष बडोदेकरांस कसे रुचतात आणि पचतात ते पाहू या' अशी उघड धमकी 'इंदुप्रकाशा' तून आणि 'विविधवृत्ता' तून देण्यात आली. महाराजबंधू संपतराव यांना समजावण्याचा यत्न करण्यात आला की सरकार-विरोधी पक्षाला मिळणारे केळकर तुम्ही अध्यक्ष केले तर संस्थानला त्रास पोचेल. संपतराव हे एक आग्रही गृहस्थ होते. त्यांच्या मनाने एक धोरण पत्करले तर त्यांना वळविणे सयाजीरावांनादेखील शक्य होत नसे. मग इतरांची काय कथा ! संपत-रावांच्या या स्वभाववैशिष्ट्यामुळे स्वागत-मंडळातला केळकरविरोधी सूरदेखील थंड पडला.

"बडोद्याच्या या साहित्य-संमेलनात परिषद विरुद्ध संमेलन हा झगडा सुरू झाला. परिषदेच्या बाजूने रावबहादूर प्रिन्सिपॉल पाध्ये आणि संमेलनाच्या बाजूने दाजी नागेश आपटे यांच्यातील वाग्युद्धे श्रवणीयच नव्हती तर प्रेक्षणीयही असत. पाध्ये ही मूर्ती वाक्चतुर, फक्त साडेचार फूट उंचीची, झिरमिळ्यांची पगडी घातलेली, पगडीखाली मानेच्या बाजूस वीतभर लांबीचे भगवान श्रीकृष्ण पद्धतीचे केस लोंबत असलेली फार आकर्षक होती. बोलताना आवाजात चढ उतार, क्षणात आर्जव, तर क्षणात दादागिरी, मध्येच उठून हातवारे करून तावातावाने बोलणे; तर दुसऱ्या क्षणी मान खाली घालून कष्टी झाल्याची बतावणी, रागारागाने सभास्थान सोडून जाण्याचा आव इत्यादी वक्तृत्वकलेच्या ढंगात ते फार निष्णात होते. दाजीसाहेबांना हे ढंग पसंत नव्हते, पण मुद्देसूद, सरळ व रोखठोक अशा वक्तृत्वाने त्या भीष्माचार्यांना हा तरुण अर्जुन बरोबरीने सामना देई."

पाध्यांना बडोदेकरांच्या इच्छेपुढे नव्हे तर पुणेकर मंडळींच्या पुरस्कर्त्यांच्या डावपेचामुळे शेवटी माघार घ्यावी लागली.

पाध्यांच्या धमकीला धाब्यावर बसवून केळकर १९२१ च्या बडोद्याच्या संमेल-नाचे अध्यक्ष झाले खरे, परंतु त्याचा परिणाम म्हणून पाध्ये त्यामुळे पाच वर्षे

संमेलन भरविण्याची भाषाच बोलेनात! मुंबईबाहेर कुठेही महत्त्वाच्या ठिकाणी संमेलन भरवायचे तर आपल्या इच्छेबाहेरच्या अध्यक्षांची निवड होणार, तेव्हा हवे कशाला ते संमेलन, अशी त्यांची भूमिका होती. पुणेकर मंडळींनी त्याविरुद्ध रान उठविले तेव्हा त्यांनी १९२६ मध्ये मुंबईला साहित्यसंमेलन घेतले. स्वागताध्यक्ष मुंबईचे रावबहादूर पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी आणि अध्यक्ष इंदूरचे रावबहादूर माधवराव विनायक किबे. दोघेही रावबहादूर! पाध्यांना अशा गोष्टींचा सोस फार होता.

पाध्यांच्या संकुचित धोरणामुळे मुंबईबाहेर संमेलन भरावयाचे तर पाध्यांच्या मनाविरुद्ध अध्यक्ष निवडला जाणार हे ठरल्यासारखे होते. १९२७ ला संमेलन पुण्याला भरले तेव्हा स्वागताध्यक्ष न. चिं. केळकर, तर अध्यक्ष श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, १९२८ ला ग्वाल्हेरला संमेलन भरले तेव्हा पुण्याचे चिंतामणराव वैद्य स्वागताध्यक्ष, तर काँग्रेसचे नेते लोकनायक अणे अध्यक्ष, १९२९ ला बेळगावला शिवराम महादेव परांजप्यांसारखा कट्टर काँग्रेसवाला अध्यक्ष, १९३० ला मडगावला पुन्हा पुण्याचे वामन मल्हार जोशी अध्यक्ष, १९३१ ला अध्यक्ष परत पुण्याचाच (डॉ. केतकर) म्हणजे कहर झाला! एवढे संस्थानिक आजूबाजूला असता निष्कांचन साहित्यिकांना संमेलनांचे अध्यक्ष बनवितात म्हणजे काय? पाध्यांचा किती तिळपापड झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी! अशी संमेलने भरल्याने पाध्यांनी जमविलेली परिषदेची पुंजी संपत आली; आणि पाध्ये-मोरमकर (कार्यवाह) यांचा उत्साहही ओसरत चालला. आणि नेमकी हीच संधी पुणेकरांनी साधली. त्यांनी अगोदर नीट बनाव रचून मुंबईच्या बैठकीला पुण्याहून एक कार्यकर्त्यांचा जथा नेला आणि ही आपलीच वयात आलेली, उफाड्याची, परंतु आबाळ झालेली कन्या उचलून परत पुण्याला नेली; आणि साहित्य परिषदेची टिळक रोडवरची इमारत उभी करून तिचे उद्घाटन पाध्यांच्याच हाती करविले. त्याप्रसंगी पाध्ये म्हणाले,

"परिषदेची स्थापना होऊन तिची कचेरी, तिचे माहेरघर मुंबईस नक्की झाले होते. ती प्रथम रावसाहेब मोरमकर यांच्या घरी व नंतर माझ्या स्वतःचे घरी वाढली, खेळली व तरुणपणाच्या स्थितीस आली. काही वर्षे तिची वाढ अवरुद्ध होण्यासारखे बनाव घडून आले, पण तरीही ती पुण्यास न्यावी या सूचनेला मी सहजच प्रतिकूल होतो हे मला कबूल केले पाहिजे. पण पुण्यास येऊन श्री. चापेकर, वाडेकर यांचा उत्साह व उद्योग पाहून माझे मत बदलले, तेव्हा बरे आहे हे स्थळ, द्यावी येथे कन्या उजवून असे चिंतून 'अर्थोहि कन्या परकीय एव' यातील तत्त्वाला अनुसरून परिषद पुण्यास कायम करण्याच्या योजनेस मी आपली संमती दिली."

या प्रसंगाला अनुसरून दत्तो वामन पोतदारांनी लिहिले,

'कन्या आणि त्यातून पाळलेली. तिला वेळेवर उजवूनच टाकावयास हवी होती. अतिवात्सल्यामुळे ती कायमची खुजी किंवा कुंवारी राहते की काय असे वाटत होते. पण पुण्याचा धारेपालट तिला मानवला आणि ती मूळच्या उफाड्याच्या मुली-

प्रमाणे भराभर वाढू लागली...'

ब्रह्मचाऱ्यांच्या या कल्पनाविलासाची गंमत वाटते !

साहित्यपरिषद पुण्याला आली खरी; पण पुणेकरांनी ज्या गोष्टींमुळे पाध्यांवर दुगाण्या झाडल्या त्यांचे विस्मरण झाले. ना. गो. चापेकर हे कुशल कार्यकर्ते खरे, परंतु ते औंधकरांच्या सेवेत होते. त्यामुळे संस्थानी पाणी त्यांच्या अंगी पुरेपूर मुरलेले होते. त्यांनी परिषद पुण्याला असून तिला चांगला खुराक मिळावा म्हणून त्याच वर्षी सोलापुरला साहित्य संमेलन घेतले व अध्यक्षपदी बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड यांची योजना केली. कारण उघड होते. आर्थिक साहाय्याचे प्रलोभन. सयाजीरावांनी अध्यक्षस्थान स्वीकारले, परंतु प्रत्यक्षात ते संमेलनाला आलेच नाहीत. त्यांनी आपले भाषण लिहून पाठविले. पैसे पाठविण्याचे नावसुद्धा काढले नाही !

कोल्हापूला जमलेल्या प्रतिनिधींचे इतके हाल झाले की विचारू नका. हॉटेलात राईसप्लेट घ्यावी तसे प्रतिनिधींना पैसे देऊन कुपने घेऊन जेवावे लागले. जादा दही-वाटी हवी, टाक पैसे ! पापड पाहिजे टाक पैसा !

विविधवृत्तामध्ये तटणिसांनी या संमेलनाची काय शोभा केली असेल ती कल्पनेनेच जाणलेली बरी !

कोल्हापुरच्या राजाराम कॉलेजात नोकरी करणारे प्रा. ना. सी. फडके या संमेलनाकडे फिरकलेसुद्धा नाहीत ! १९२१ मध्ये न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली बडोद्यास जे संमेलन भरले होते त्यावेळी यशाच्या धुंदीमध्ये पुणेकरांच्या पाठीराख्यांना बडोद्यातील प्रसिद्ध कवी चंद्रशेखर यांचे पूर्ण विस्मरण झाले होते. कोल्हापुरला त्याच्या उलट घडले. आत्रर्जून बोलावूनही फडके आले नाहीत !

सयाजीरावांनी ज्याप्रमाणे अपेक्षाभंग केला, त्याप्रमाणे पुण्याच्या कार्यकर्त्यांना बडोदेकरांनी मागे पाध्यांना दिला होता तसा एक चांगलाच धक्का दिला.

बडोद्याच्या सहविचार सभेने १९३४ मध्ये बडोद्यास पुन्हा साहित्यसंमेलन घ्यायचे ठरविले आणि साहित्य परिषदेला डावलून पुन्हा न. चिं. केळकरांनाच अध्यक्ष करण्याचे पक्के ठरवून तशा तयारीला सुरुवातही केली. त्या निमित्ताने पुन्हा वाद विकोपाला गेले. शेवटी बडोदेकर मंडळींनी माघार घेतली व साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष ना. गो. चापेकर यांच्या निवडीला नाईलाजाने संमती दिली.

साहित्यसंमेलनाचे दोन वेळा अध्यक्ष होण्याची संधी अशा रीतीने केळकरांची हुकली ! केळकरांना ती हवी होती.

चापेकरांनी पुढच्या वर्षी इंदूरला संमेलन घेऊन संमेलन म्हणजे संस्थानिकांची मिरासदारी असे चित्र उभे केले. अध्यक्षस्थानी औंधचे अधिपती श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांची योजना, इंदूरचे महाराज यशवंतराव होळकर उद्घाटक, तर स्वागताध्यक्ष देवासचे अधिपती विक्रमसिंह. या प्रसंगी स्पेशल गाडी करून औंधहून सुमारे दीडदोनशे लोकांचा ताफाच चापेकरांनी नेला होता.

मुंबईकर मंडळी अगदी दबा धरून बसली होती. आणि बडोद्याला अध्यक्ष होऊ न दिल्यामुळे दुखावलेले केळकर त्यांना सामील झाले होते. विषयनियामक समितीने व त्या साऱ्यांनी परिषदेच्या कार्यकर्त्यांना असे काही धारेवर धरले की, परिषदेचे पदाधिकारी बैठकीतून उठून उज्जैन बघायला निघून गेले. परिषदेविरुद्ध वातावरण इतके प्रक्षुब्ध होऊन गेले होते की पुढील वर्षी संमेलनास कोणी निमंत्रण देण्यास तयार होईना.

परिषदेच्या आणि पर्यायाने संमेलनाच्या पाचवीलाच ही भांडणे पुजलेली आहेत! त्यामुळे पूर्णपणाने निर्विघ्नतेने पार पडले असे एकही संमेलन नाही. अध्यक्षीय निवडीपासून भांडणाला सुरुवात होते. १९३६ च्या जळगावच्या निवडीत स्वागताध्यक्ष कवी तिवारी की आनंदीबाई शिर्के अशा भांडणाने कारभाराला सुरुवात केली. परिणामी तिवारी शेवटपर्यंत संमेलनाकडे फिरकले नाहीत!

१९३८ मध्ये स्वागताध्यक्ष म्हणून वरेरकर आणि बॅ. जयकर यांच्यामधला स्वागताध्यक्षपदाचा सामना रंगला. अध्यक्षपदासाठी स्वा. सावरकरांबरोबर पांगारकर, पोतदार, गो. स. सरदेसाई ही मंडळी होती. वरेरकरांना कमी मते पडली, परंतु त्यांच्यापैकी कोणीतरी जयकरांचे मत कलुषित करून दिले आणि जयकर स्वागताध्यक्ष होण्यास तयार होईनात. शेवटी खूप प्रयत्नांनंतर ते तयार झाले. रत्नागिरीला ना. सी. फडके यांनी अध्यक्षीय भाषणातून आचार्य अत्रे व तटणीस यांच्या पत्रनीतीवरून झोड उठवून वादळ निर्माण केले. आपल्या नूतन पत्नीच्या ( कमला फडके ) वेण्याफण्या, पावडर, अत्तर, स्नो व वेण्या यांचेही बिल संमेलनाच्या कार्यकर्त्यांकडे ते मागू लागले, तेव्हा अत्र्यांनी तिथल्या कार्यकर्त्यांना बिथरवून फडक्यांची पंचाईत करून टाकली. त्यातून अत्रे-फडके वादाची धुळवड अनेक वर्षे रंगत राहिली. ती थांबवावी म्हणून मुंबईच्या डॉ. भालेराव प्रभृती साहित्यसंघाच्या कार्यकर्त्यांनी समेट घडवून आणला, तर अत्र्यांनी ' फडक्यांना शेवटची शिवी ' म्हणून प्रक्षोभक लेख लिहून मग भांडण थांबवले. वस्तुतः पुढे ते कधीच थांबले नाही. म्हातारपणी दोघांनी तोंडदेखली तोंड-मिळवणी केली इतकेच काय ते!

अश्लीलताविरोधी ठराव म्हणजे वादंगाचा प्रचंड गदारोळ. पुण्याचे अश्लील-मार्तंड कृष्णराव मराठे १९३४ च्या बडोद्याच्या संमेलनापासून चिकाटीने तोच झेंडा घेऊन संमेलनाच्या कार्यकर्त्यांना आणि मोठमोठ्या साहित्यिकांना सळो की पळो करून सोडीत.

या ठरावाच्या बाजूने व विरुद्ध बाजूने जी कडाक्याची भाषणे होत, त्याला आखाड्याचे स्वरूप येई.

गंमत ही की, १९३०-५० मध्ये ज्यांच्यावर अश्लीलतेचे सतत आरोप होत, तेच १९५०-६० नंतर त्यानंतरच्या पिढीवर अश्लीलतेचा आरोप करण्यात अग्रेसर होते १९६१ ला ग्वाल्हेरला अश्लीलताविरोधी ठराव प्रचंड बहुमताने पास झाला.

विरोध फक्त अध्यक्षा कुसुमावती देशपांडे यांनी केला. त्याची कार्यवाही करण्यासाठी साताऱ्च्या संमेलनामध्ये कृती समिती नेमली. आणि मी मी म्हणणाऱ्या साहित्यिकांवर खटले भरण्याचे सत्र सुरू झाले. साहित्यिकांमध्ये एवढी घबराट यापूर्वी कधी झाली नव्हती.

संमेलनामध्ये राजकीय स्वरूपाचे ठराव आले की सरकारविरोधी आणि सरकारच्या बाजूचे अशी धुमश्चक्री तर नेहमीचीच. १९४५ च्या बेळगावच्या साहित्य-संमेलनामध्ये संयुक्त महाराष्ट्राचा ठराव प्रथम पास झाला आणि त्याला लढ्याचे स्वरूप जे प्राप्त झाले ते काही साहित्यिकांच्या संमेलनातील आक्रमक भाषणांमुळे ! सरकारने जप्त केलेल्या वाङ्मयावरील बंदी उठवावी असा ठराव आला की, सरकारी नोकरीत असलेल्या साहित्यिकांची धावपळच धावपळ उडते.

१९५७ मध्ये औरंगाबादच्या साहित्यसंमेलनामध्ये संयुक्त महाराष्ट्राचा ठराव पास होऊ नये म्हणून प्रचंड रामायण घडले आणि अध्यक्ष अनंत काणेकरांनी त्याला भीक घातली नाही. १९६४ मध्ये मडगावच्या साहित्यसंमेलनामध्ये गोमंतकातील मराठीच्या प्रश्नावर कुसुमाग्रजांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न झुंडशाहीने केला. कुसुमाग्रजांनी त्याला दाद दिली नाही. १९७५ च्या कराडच्या साहित्यसंमेलनामध्ये आणीबाणीविरुद्ध दुर्गाबाई भागवतांनी मोठया बाणेदारपणाने शर्थीची झुंज दिली, परंतु आणीबाणीविरुद्ध ठराव मात्र पास होऊ शकला नाही. १९८० च्या अकोल्याच्या साहित्यसंमेलनामध्ये शासकीय हस्तक्षेपाविरुद्ध प्रचंड वादळ उठले, परंतु राजकर्त्यांच्या पुरस्कर्त्यांनी ते वादळ जागच्या जागी शमविण्यात यश मिळविले. त्यातूनच पुण्याला १९८१ मध्ये स्वतंत्र साहित्य संमेलन भरले. व्यासपीठावर मंत्र्यांना आणावयाचे नाही, असा उद्‌घोष त्यामुळे जोरात वाजत-गाजत राहिला, परंतु गडकऱ्यांची जन्मशताब्दी वर्षभर साजरी करण्याच्या प्रलोभनापायी स्वतंत्र संमेलन साजरे करणाऱ्या साहित्यिकांना आपल्या भूमिकेचे विस्मरण झालेले दिसले.

दलितांच्या प्रश्नाकडे साहित्यसंमेलने उशिरा वळली. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावरून पुण्याचे १९७७ चे व पुढचे चंद्रपूरचे अशी दोन्ही संमेलने उधळली गेली. त्यामुळे दलितांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने सुजाणपणे जळगावच्या संमेलनाध्यक्षपदी शंकरराव खरातांची निवड होण्यास मदत झाली.

नामांतराचा प्रश्न साहित्यिकांचा नाही. राजकारण्यांच्या अंतर्गत धोरणाचा तो भाग आहे. त्याची झळ वर्षानुवर्षे संमेलनाला लागणे इष्ट नव्हे. परंतु चळवळी करणाऱ्यांना काहीतरी निमित्त हवे असते.

संमेलनाच्या निवडणुकीच्या राजकारणातून संमेलनांना कोर्टकचेऱ्यातून जावे लागते हा अलीकडे संमेलनांना लागलेला एक हृद्रोग आहे. परंतु नको त्या गोष्टीतून वादाची खुमखुमी भागवून घेण्याची साहित्यिकांची १०८ वर्षांची जी परंपरा आहे, त्याचेच ते फळ होय.

त्यामुळे नवीनवी वादंगे निर्माण होत राहाणे अपरिहार्य ठरते. साहित्यसंमेलनांचे विशुद्ध स्वरूप या वादंगामुळे ढवळले गेले, गढुळले गेले हे खरेच आहे.

परंतु मराठी माणसाची ती प्रकृतीच आहे !

ही वादंगे झाली नसती तर साहित्यसंमेलने अळणी झाली असती ! इतर भाषिक साहित्य संमेलने आणि मराठी साहित्य संमेलने यांत हाच फरक आहे.

म्हणून तर मराठी साहित्यसंमेलने वाजतात, गाजतात आणि धुरळा उडवून प्रतिनिधींचे रंजन करतात.

गेल्या १०० वर्षांतील महाराष्ट्रातील महत्त्वाच्या साऱ्या घडामोडींचे प्रतिबिंब संमेलनाइतके दुसरे कशातच पडलेले दिसणार नाही !

# संमेलनातील मानसन्मान आणि मानापमान

मराठी माणसाची ख्याती त्याच्या कलहप्रियतेबद्दलची आहे. त्याला अन्याय सहन होत नाही असेही सांगितले जाते ! त्याबद्दल शंका असली तरी, आयुष्य म्हणजे तडजोडीची घोंगडी हे जीवनाच्या यशाचे महान ब्रीद मात्र तो उराशी बाळगीत नाही, एवढे मात्र अगदी खरे आहे. काहीही करायला सांगितले तरी 'हां सांब, क्यों नहीं ?' असे गंगेचे पाणी प्राशन करूनही मचूळ बोलून झुलवीत ठेवण्यापेक्षा 'नाही, शक्य नाही' या निर्णायक उत्तराने प्रश्नाचे दोन तुकडे करून, आपल्या या निर्णयामुळे आपले सारे पितर नेहमीच स्वर्गात असल्याचा आनंद तो अनुभवतो. त्यामुळे भगीरथासारख्या दीर्घ तपश्चर्येने गंगा पृथ्वीवर आणण्याची त्याला कधी गरजच लागत नाही. गंगेला असे काय सोने लागले आहे, या भावनेनंच तो नेहमी या जगात वावरत असतो !

आणि एवंगुणविशिष्ट मराठी माणूस जर पुन्हा साहित्यिक असेल तर, आणि 'कलावंत' म्हणून परमेश्वराने आपणाला खास घडविले आहे अशी त्याची भावना असेल तर ?

शांतं पापम् ! इडा पिडा टळो आणि आपल्यावर असा भलता प्रसंग न गुजरो. या साहित्यिक म्हटल्या जाणाऱ्या प्राण्याला संमेलनासाठी बोलवायला गेलात तर आपण 'बिरुदाचे दादुले' आहोत हे तो तुम्हाला सुनविणार आणि त्याच्यासाठी खास पालख्या आणि नालख्या तुम्हाला तयार ठेवाव्या लागणार. एकाला पालखी आणि एकाला नालखी. (नालखी ही पालखीपेक्षा मोठी असते आणि त्याचा मानही मोठा. सम्राट, बादशहा व उच्चपदस्थ यांनाच त्याचा अधिकार असतो.) असा पंक्तिप्रपंच तुम्ही करायला गेलात तर तुमची काही धडगत नाही.

आपल्या साहित्यिकांचे मानापमानाचे भांडे अगदी नाजूक असते. त्याला केव्हा तडा जाईल याचा नेम नसतो. त्यामुळे कुणी मोठ्या उत्साहाने 'यंदा संमेलन आमच्या गावी भरवा' म्हणून पानसुपारी घेऊन संमेलनाच्या सूप वाजण्याच्या सुमारास पुढे आले की, त्या बिचाऱ्याच्या कुंडलीतले ग्रह लवकरच फिरणार आणि

त्याच्या जिभेवर मोठ्या आजारातून उठल्यासारखी दीर्घकाळ कडवट चव रेंगाळणार या कल्पनेनं मी अतिशय अस्वस्थ होतो. अर्थातच कडवट पेयाप्रमाणे या संमेलनाची एक प्रकारची झिंग असते. त्यामुळे हा कडवटपणा त्याला हवाहवासा वाटतो. 'शिमगा संपला तरी काव्य मागे राहाते' ही म्हण आता मागे पडून 'संमेलन संपल्यावर काव्याला ( काव्य का कावा ? दोन्हीही ! ) बहर येतो' अशी एक नवी म्हण पडली आहे. आतापर्यंतच्या साठ संमेलनांतील मानापमानाच्या सगळ्या घटनांची नोंद करावयाचे ठरविले तर त्याचेही एक स्वतंत्र महाभारत होईल. त्यामुळे त्यांतल्या काही मोजक्या अध्यायांची मांडणी करून शितांवरून भाताची परीक्षा केल्याचे समाधान मानता येईल.

सुरुवात चिं. वि. जोशी यांच्या एका लहानशा आठवणीने करू या. त्यांनी आपल्या लहानपणच्या आठवणी सांगताना लिहिले आहे —

'माझे लहानपण पन्नास वर्षांपूर्वी पुण्यास गेलें. एका वर्तमानपत्रकर्त्यांचा मुलगा. त्यामुळे वाङ्मय विषयाची गोडी फार लवकर लागली. त्यातून श्री. वासुदेव गोविंद आपटे हे वडिलांचे मित्र आणि माझे शिक्षक असल्यानं ग्रंथकर्त्यांच्या संमेलनाकडे माझे लहानपणीच लक्ष वेधले गेले. कोणत्या वर्षी ते नक्की आठवत नाही, पण १९०७ असेल. विष्णू मोरेश्वर महाजनी यांच्या अध्यक्षतेनं मळेकरांच्या वाड्याच्या दिवाणखान्यात ग्रंथकारांचे संमेलन भरले होते. सरासरी दोनशे श्रोत्यांचा समुदाय जमलेला होता. सौ. काशीताई कानिटकर आणि दोनतीन बायकांखेरीज सर्व पुरुष होते. विद्यार्थी फारच थोडे. जुन्या काळचे ग्रंथकार विनायक कोंडदेव ओक हे माझे ज्येष्ठ नातेवाईक असून ते या संमेलनासाठी मुद्दाम मुंबईहून आले होते आणि त्यांच्या तैनातीत मी होतो. महाजनी त्या वेळी वृद्ध झालेले होते आणि ऐकू येत नसल्याने तळहाताचा कर्णा करून दुसऱ्यांचे म्हणणे समजावून घेत होते. ओकांचा त्या वेळी काहीतरी पाणउतारा झाला असावा, कारण ते परत येताना मला म्हणाले, 'मोठे आले ग्रंथकार ! हे मराठी भाषेचे सर वॉल्टर स्कॉट अन् या मिसेस हेन्री वुड. अध्यक्ष मराठीचे वर्डस्वर्थ !' हे टोले हरिभाऊ आपटे, काशीताई कानिटकर आणि महाजनी यांना उद्देशून होते.

१९०६ साली साहित्यपरिषदेची पुण्यात स्थापना होऊन तिच्याकडे साहित्य संमेलने भरविण्याचे सहजासहजी आले नाही. परंतु साहित्य परिषदेला ते फार जड गेले. संमेलन भरविणारी एक वेगळीच यंत्रणा असावी असे प्रयत्न लगेच सुरू झाले. सुरुवातीपासूनच साहित्य परिषद नेमस्तांच्या हाती असल्याने संमेलनातही नेमस्तांचाच वरचष्मा होता. त्यातच राजद्रोहाच्या आरोपाखाली टिळकांना शिक्षा होऊन त्यांची मंडाल्यास रवानगी झाल्याने पुणेकरांना पुण्यात नेमस्तांचा संमेलनाच्या नावाने होणारा वार्षिक हंगामा सहन करणे शक्य नव्हते; त्यामुळे १९०९ ते १९२६ पर्यंतची सारी संमेलनं पुण्याबाहेर आणि संस्थानिक आणि रावसाहेब रावबहादुरांच्या आश्रयाने

आणि अध्यक्षपदानं भरली. त्यांतला एक उल्लेखनीय अपवाद न. चिं. केळकरांचा. १९२१ च्या बडोद्याच्या संमेलनाचे ते अध्यक्ष होते. परंतु केळकर केसरीचे संपादक असले तरी मुळात नेमस्त असल्याने त्यांच्या निवडीचे आश्चर्य वाटत नाही.

इंदूर, ग्वाल्हेर, बडोदा इत्यादी नरेशांच्या आश्रयानं भरलेल्या या संमेलनांतून पाचही दिवस पंचपक्वान्ने झोडण्याची सवय झाल्याने प्रतिनिधींना इतरत्र तशी व्यवस्था नसली की कसेसेच वाटू लागले. संमेलनाच्या यशस्वितेची सगळ्यात मोठी कसोटी म्हणजे निवास-भोजनाची उत्तम व्यवस्था. ती नसली की संमेलनाचे यश अर्धेअधिक डागळलेच म्हणून खुशाल समजावे !

बडोद्यावरून आठवण झाली. बडोद्याच्या संमेलनात कवी यशवंतांचे काव्य-गायन कमालीचे गाजले. इतर कवी त्यांच्यापुढं निष्प्रभ झाले. परिणाम असा की, राजवाड्यात राजस्त्रियांबरोबर निमंत्रित केलेल्या स्त्रियांसमोर यशवंतांचे खास असे स्वतंत्र काव्यगायन झाले. (त्यातूनच कालांतरानं त्यांना बडोद्याचे राजकवित्व प्राप्त झाले.) यशवंतांबद्दल त्यामुळे इतरांच्या मनात जी असूया निर्माण झाली त्याचे पडघम त्यानंतर अनेक वर्षे उमटत राहिले. कवी यशवंत त्यावेळी येरवड्याच्या बंदिशाळेत साधे कारकून होते. त्या एका घटनेवरून त्यांना हिणवण्याचे अनेक प्रकार झाले. आचार्य अत्र्यांनी झेंडूच्या फुलांत त्यांच्या नावाने अर्घ्य वाहिले ! श्रीपाद महादेव माटयांनी 'ज्ञानप्रकाश'मध्ये यशवंतांची कळ काढून त्यांना डिवचले. १९३६ मध्ये पु. य. देशपांड्यांनीही एका भाषणात यशवंतांबद्दल अशाच प्रकारचे उद्गार काढले. १९३६ मध्ये बडोद्याच्या वाङ्मय परिषदेमध्ये भाषण करताना यशवंतांनी खूप दिवस ऐकून घेतलेल्या वैयक्तिक निंदानालस्तीचे उट्टे काढले आणि सौम्य का होईना परंतु वैयक्तिक उखाळ्यापाखाळ्या काढून परतफेड केली. त्यातून आणखी वादाला तोंड फुटले. माडखोलकरांनी आपल्या स्वभावाप्रमाणे आगीत तेल ओतले. १९२१ पासून १९३६ पर्यंत म्हणजे १५ वर्षे यशवंतांना या असूयेने खूपच मनस्ताप दिला व परतफेड करण्याच्या प्रयत्नातून वाद वाढत जाऊन त्यांच्या मनस्तापात भरच पडली. साहित्य संमेलनातील सन्मान यशवंतांना चांगला भोवला. त्याचा आनंद मिळण्याऐवजी त्यांच्यावर छुपे वैयक्तिक हल्ले होऊन ते घायाळ झाले. साहित्य संमेलनातील मानसन्मान फारसे अंगी लागत नाहीत, अंगाशीच येतात असा नेहमीचा अनुभव आहे.

यशवंतांनी स्वतःला 'दऱ्याखोऱ्यातला शाहीर' म्हटले होते. १९२७ मध्ये पुणे येथे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या संमेलनात नागपूरचे विडंबनकार जयकृष्ण केशव उपाध्ये यांनी 'शाहीर' ही कविता म्हटली. त्याची सुरुवातच मुळी --

'या महाराष्ट्र देशात । उपजलो मीच शाहीर' अशी होती. ती कुणाला उद्देशून होती हे कुणालाही समजण्यासारखे होते. हे हिणवणे थोडेसे अंगाबाहेर गेले

ते खालील ओळींतून,

‘ कोणतेही मासिक उघडा । मम दिसे त्यात कवि–कर्म,
मम अखंड काव्यस्राव । नच केवळ मासिक-धर्म- ’

उपाध्यांनी या ओळींनी टाळ्या घेतल्या, परंतु कवि-संमेलन संपल्यानंतर बाळूताई खरे ( मालतीबाई बेडेकर ) उठल्या आणि त्यांनी संमेलनात अशा भलत्या ओळी म्हटल्या जाव्यात आणि त्या अध्यक्ष – स्वागताध्यक्षांनी मुकाट सहन कराव्या, याबद्दल आवाज उठविला. केळकरांना ते पटले म्हणून कोल्हटकरांनाही पटले आणि उपाध्यांना दोघांनी माफी मागण्यास फर्माविले ! भांबावलेल्या उपाध्यांनी मुकाट्याने माफी मागितली !

परंतु ते प्रकरण इथेच संपले नाही. १९३२ मध्ये बाळूताईंचा विभावरी शिरूरकर हे टोपण नाव घेऊन ‘ कळ्यांचे निःश्वास ’ नावाचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. टोपण नावाने लिहिल्याने ‘ विभावरी ’ कोण याबद्दल तर्कवितर्क सुरू झाले. संग्रहाला बाळूताई खरे यांनी भलावण करणाऱ्या काही ओळी लिहिल्या. बाळूताईंच्या भगिनी कृष्णाबाई यांचे पती हरिभाऊ मोटे यांनी हे पुस्तक प्रसिद्ध केले होते. ‘ मुंबईच्या विविधवृत्ताने ’ ही नेमकी संधी साधली. ‘ विभावरीचे अश्लील निःश्वास ’ या लेखाने विविधवृत्ताने, या कथासंग्रहावर ‘ निःस्पृह ’ या टोपण नावाने झोड उठवली. संग्रहामध्ये १० कुमारिकांच्या कथा होत्या. त्यांना ‘ दशकुमारी चरित ’ असे म्हणून, ‘ कोठे गेला आता कृष्णाभगिनी तुझा धर्म ? ’ असे म्हणून त्यांना हटकले. उपाध्ये न. र. फाटकांचे स्नेही होते आणि फाटक त्यावेळी विविधवृत्त गटात होते, त्यामुळे विविधवृत्ताने ही मोहीम का घेतली हे लक्षात येण्यासारखं आहे. आचार्य अत्र्यांना वाग्युद्धाला ही आयतीच संधी प्राप्त झाली. त्यांनी फर्ग्युसन कॉलेजच्या अँफी थिएटरमध्ये व मुंबईच्या ऑपेरा हाऊस मध्ये विभावरीच्या बाजूनं ( विभावरी कोण हे माहीत नसूनही ) आक्रमक वकिली केली. परिणामी विविधवृत्ताच्या मोरमकरांनी ‘ विविधवृत्त ’ व ‘ विहार ’ या नियतकालिकांमधून अत्र्यांच्या विरुद्ध मोहीम उघडली. ‘ मुंगी आणि मुंगळा ’ या त्यांच्या वर्मावर बोट ठेवणाऱ्या कवितेने अत्र्यांचे माथे खवळले आणि त्यातूनच कोर्टकचेऱ्या झाल्या.

कविसंमेलनातील निरुपद्रवी ओळींचा हा प्रताप !

संमेलनानंतरच्या काव्याची ही उदाहरणे झाली. आता संमेलनापूर्वी घडलेल्या मानापमानांच्या प्रसंगांतून संमेलनावर कसा परिणाम होतो, याचा एक अध्याय उलगडण्यासारखा आहे. हा अध्याय दोन ( किंवा तीन ) इतिहासकारांमधील साठमारीचा आहे.

रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी ‘ प्रतिभा ’ पाक्षिकाच्या १९३६ च्या सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध बंगाली इतिहासकार ‘ सर यदुनाथ सरकार ’ यांच्यावर तीन लेख लिहिले. सेवासदनकार देवधर पाटण्यास गेले असता तिथल्या महाविद्या-

ल्यामधील इतिहासाचे प्राध्यापक जदुनाथ सरकार यांची भेट होऊन त्यांनी आपल्याला एका मराठी जाणणाऱ्या इतिहासकाराची जोड मिळाल्यास हवी आहे असे उद्‌गार काढले. देवधर बडोद्यास सरदेसायांचा पाहुणचार घेऊनच पाटण्यास गेले होते. त्यांनी सरदेसायांची शिफारस केली. त्यातून सरकार–सरदेसाई यांचा घनिष्ठ संबंध जडला. जदुनाथांचे सरकारदरबारी मोठं वजन होतं. त्यांच्या शिफारशीमुळे पेशवे दप्तराच्या संपादनाचे काम सरदेसायांच्याकडे सोपविण्यात आले. वास्तविक ते काम पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाकडे सोपवावयास हवे होते. तसे न झाल्याने मंडळातील मातब्बर इतिहासकार अस्वस्थ झाले होते. त्यांनी सरदेसायांच्या विरुद्ध हाकाटी केली. सरकार–सरदेसाई यांना मंडळातील अस्सल कागदपत्रे कटाक्षाने दाखविली नाहीत. मंडळाची त्यासाठी ख्याती होती. सरदेसायांनी जदुनाथांबद्दल लिहिताना मंडळावर चांगलीच आगपाखड केली. दत्तो वामन पोतदारांनी १९३७ च्या जानेवारीमध्ये या लेखांना उत्तर देण्याच्या मिषाने सरकार–सरदेसायांची चांगलीच हजेरी घेतली. सरकारांच्या मराठी भाषेच्या वा वाङ्‌मयाच्या परिशीलनाच्या अभावामुळे आणि त्यांना शिवाजी व महाराष्ट्र द्वेषाची कावीळ झाल्यामुळे त्यांनी जे गरळ ओकले आहे, त्याचे स्वरूप कमालीच्या आक्रमक भाषेत स्पष्ट केले. सरदेसाई संशोधनपर इतिहास लिहीत नसून त्यांच्या रियासती म्हणजे दुसऱ्यांनी लिहिलेल्या मजकुरांचे तारतम्याच्या अभावाचे प्रदर्शन करणारे संकलन आहे, असा त्यांचा पाणउतारा केला. पोतदारांनी एवढा झणझणीत असा दुसरा लेख साऱ्या आयुष्यात लिहिला नाही!

सरदेसाई १९३८ मध्ये भरलेल्या मुंबईच्या संमेलनाध्यक्षाच्या अध्यक्षपदासाठी उभे राहिले व सावरकर निवडून आल्याने पडले. पुढच्या वर्षी नगरच्या संमेलनाध्यक्षांच्या निवडणुकीस उभे राहिले. यावेळी त्यांचे मुख्य प्रतिस्पर्धी दत्तो वामन पोतदार होते. निवडणुकीच्या निमित्ताने दोघांच्या समर्थकांनी एकमेकांच्या सडकून उखाळ्यापाखाळ्या काढल्या. सरदेसायांना चिकटपट्टी इतिहासकार ( Scissors and paste Historian) म्हणून हिणवण्यात आले व पोतदारांनी कोणती ग्रंथरचना करून कसले दिवे लावले आहेत, असे सरदेसायांच्या समर्थकांनी विचारले. त्यांवेळी पोतदारांचा ‘ मराठी गद्याचा इंग्रजी अवतार ’ हा एकच ग्रंथ प्रसिद्ध झाला होता ! सरदेसायांच्या पुरस्कर्त्यांनी पोतदारांच्या विद्वत्तेचा कसा गवगवा आहे, याचा उपहासाने उल्लेख करताना ‘ डोंगरे बालामृता ’ची त्याला उपमा दिली. गावोगावांत भिंतीभिंतींवर डोंगरे बालामृताची जाहिरात आढळते. परंतु हे बालामृत कुठल्याही दुकानात मिळत नाही, तशी पोतदारांची विद्वत्ता, हा त्यांचा कोटिक्रम. एस. पी. कॉलेजमधील मराठीचे प्राध्यापक डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे ही कोटी पुढे कित्येक वर्षे रंगवून सांगत.

सरदेसायांच्या रियासतीमुळे ते लोकप्रिय होते. त्यामुळे पहिल्या क्रमांकाची मते पडून ते निवडून आले. परंतु निवडणुकीच्या रणधुमाळीमुळे पोतदारांच्या समर्थकांनी, विशेषतः भा.इ.स. मंडळातील पोतदारांच्या सहकाऱ्यांनी सरदेसायांच्या रियासत लेखनाचा

जो उपमर्द केला, त्यामुळे सरदेसाई कमालीचे अस्वस्थ होते. नगरचे स्वागत मंडळ सत्कारास हार घेऊन कामशेतला त्यांच्या घरी गेले तेव्हा चक्क त्यांनी हार अव्हेरला, अध्यक्षपद नाकारले व त्यांना निरोप दिला. भांबावलेलं स्वागत मंडळ खाली मान घालून परतले. सरदेसायांचे मत वळविण्यासाठी मातबरांचे एक शिष्टमंडळ त्यांच्याकडे पाठविण्यात आले. वृत्तपत्रांनी अग्रलेख लिहिले. परंतु सरदेसाई बदलले नाहीत.

अध्यक्ष म्हणून बहुमताने निवडून येऊन निग्रहाने ते नाकारणारे सरदेसाई तेवढे एकटेच. त्यामुळे नगरला पोतदार अध्यक्ष झाले! परंतु तेवढयाने त्यांचे समाधान झाले नाही. ' तुमची नड भागविण्यासाठी मी नगरला अध्यक्ष झालो, आता मला माझ्या इच्छेप्रमाणे अध्यक्ष होऊ द्या. ' म्हणून घटनेत बदल करून घेऊन परिषदेचा अध्यक्ष तोच संमेलनाचा अध्यक्ष असे होऊन ते पुढच्या वर्षी बेळगाव संमेलनाचे अध्यक्ष झाले. परंतु आगगाडीने त्यांना दगा दिला व ते वेळेवर बेळगावास पोचू शकले नाहीत, म्हणून ललित विभागाचे अध्यक्ष म्हणून निवडून गेलेल्या माडखोलकरांच्या गळयात ऐनवेळी अध्यक्षपदाची माळ पडली. दुसऱ्यांदा अध्यक्ष होण्याचा पोतदारांचा मनोदय सफल झाला नाही !

कऱ्हाडे कऱ्हाडे शेवटी एक होतात असे सांगितले जाते. १९२१ च्या बडोदे संमेलनाच्या वेळी कवी यशवंतांचे राजवाडयावर राणीवंशात हंडयाझुंबराच्या झगमगाटांत जे काव्यगायन झाले ते रियासतकार सरदेसायांनी आयोजित केले होते; सरदेसाई त्यावेळी सयाजीरावांचे खाजगी चिटणीस होते. या जनानी मेळाव्यात फक्त तीन मर्द होते. यशवंत, सरदेसाई आणि द. वा. पोतदार ! ब्रह्मचारी असल्याने पोतदारांना बायकांत बसविण्यात सरदेसायांना कसलाच धोका वाटला नसावा. परंतु तीन कऱ्हाडे मिळाले असे त्यावेळी कुत्सितपणे म्हणण्यात आले. परंतु कऱ्हाडे एक होत नाहीत हे यावरून लक्षात आले. ' ज्योत्स्ना ' मासिकाचे संपादकमंडळ कऱ्हाडयांचेच होते. ( खांडेकर, माडखोलकर, वि. ह. कुलकर्णी, वा. रा. ढवळे ) हे खरे आहे. तेवढा एक अपवाद आणि गिरीश पडले म्हणून खांडेकरांनी मिरजेला स्वागताध्यक्ष म्हणून दीड-दोन तास भाषण करून अध्यक्ष क्षीरसागर यांना तंगवत ठेवले हा दुसरा अपवाद !

मग अपवादाने नियम सिद्ध होतो असे म्हणावयाचे का ? नाही. मराठी माणूस भांडायला लागला की जातपात, सगेसोयरे काही मानीत नाही.

ही भांडणे किती विकोपाला जाऊ शकतात हे पहावयाचे झाल्यास अत्रे-फडके वादाकडे वळले पाहिजे. हा वाद साहित्य संमेलनातूनच उद्भवला.

१९३२ साली कोल्हापुरला साहित्य संमेलन भरले होते. त्यावेळी प्रा. ना. सी. फडके हे कोल्हापुरच्या राजाराम कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. संमेलनाचे निमंत्रण असूनही ते संमेलनाकडे फिरकलेही नव्हते. काही ना काही कारणांमुळे गावात असून संमेलनाकडे न फिरकणाऱ्या अनेक साहित्यिकांची उदाहरणे आहेत. त्यांतील दुर्दैवी

उदाहरण म्हणजे कविराज चंद्रशेखरांचे. २१ साली बडोद्यात संमेलन भरले तेव्हा त्यांना कोणी निमंत्रण दिले नव्हते म्हणून ते तळमळत नोकरीच्या जागी औषधांच्या बाटल्या भरीत राहिले. १९३६ च्या जळगाव संमेलनात आपल्याला स्वागताध्यक्ष केले नाही म्हणून कवी तिवारी संमेलनाकडे फिरकले नाहीत. १९७३ मध्ये यवतमाळला भरलेल्या संमेलनाकडे तेथील शेरशायरीवाले पाटणकर यांनी अशीच पाठ फिरवली. ही यादी अशीच वाढविता येईल. अध्यक्ष होण्यासाठी अनक साहित्यिक संमेलनाकडे पाय वळवतील. एकदा अध्यक्षपदाची हळद लागली मी मग त्यांना संमेलनाची आठवणही होत नाही.

कोल्हापुरच्या ( १९३२ ) साहित्य संमेलनास केसरीचे संपादक वा. कृ. भावे, हे उपस्थित होते. जेवताना एक पंक्तीस बसविल्याने आपण बाटलो आणि कोल्हापुरकरांनी मुद्दाम हा प्रकार केला असे वाटून आपला अपमान झाला म्हणून अर्ध्या जेवणावरून उठले व पुण्यास येऊन त्यांनी सक्षौर प्रायश्चित्त घेतले. केसरीच्या विरोधातील सत्यशोधकी बाण्याच्या वृत्तपत्रांनी या प्रकरणाचा खूप गवगवा केला. आचार्य अत्र्यांनीही ' तुतारी ' मध्ये खरमरीत लेख लिहून भाव्यांची हजेरी घेतली. या प्रकरणाने अत्र्यांनी केसरीशी चांगलेच वैर ओढवून घेतले.

' संमेलनास उपस्थित राहीन तर अध्यक्ष म्हणून ' या प्रतिज्ञेने फडके रत्नागिरीला व्हावयाच्या ( १९४० ) संमेलनाध्यक्षाच्या निवडणुकीस उभे राहिले. अत्रे, फडके आणि माडखोलकर यांच्यातून निवड व्हावयाची होती, परंतु ' जबरदस्त वैयक्तिक दुःखाचा धक्का बसल्याचे ' कळवून फडक्यांनी नाव मागे घेतले. माडखोलकरांनीही नाव मागे घेतले. त्यामुळे अत्र्यांची निवड बिनविरोध झाल्याचे जाहीर न करता रत्नागिरीचे स्वागत मंडळ फडक्यांच्या घरी जाऊन बसले. फडक्यांनी ' पवित्र साहित्यसेवेपुढे आपले वैयक्तिक दुःख कःपदार्थ मानतो ' म्हणून आपले नकारपत्र मागे घेतले आणि साहित्य परिषदेला न विचारताच स्वागत-मंडळाने फडके निवडून आल्याचे जाहीर केले.

यावेळी फडक्यांचा लोकप्रियतेचा सूर्य ऐन मध्यावर तळपत होता म्हणून भांडण न करता अत्रे नुसतेच गप्प राहिले नाहीत, तर त्यांनी फडक्यांचा सत्कार केला. घरी मेजवानी दिली व आपल्या ' नवयुग ' साप्ताहिकाचा ' फडके-गौरव ' अंक मोठ्या अगत्याने प्रसिद्ध केला.

परंतु कृतज्ञता ही चीज फडक्यांच्या पोतडीत नव्हती. अत्र्यांनी ' नवयुग 'मध्ये व मोरमकरांनी ' विविधवृत्त 'मध्ये जी सनासनाटीची पत्रकारिता अवलंबिली होती तिच्यावर आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये त्यांनी कडाडून हल्ला चढविला. अत्रे खवळले आणि त्यांनी साऱ्या पत्रकारांना संघटित करून व्यासपीठावरच फडक्यांना नाक मुठीत धरून माफी मागावयास लावले. फडके यावेळी राजाराम महाविद्यालयातील कु. कमल दीक्षित नावाच्या विद्यार्थिनीला बरोबर घेऊन आले होते. तिला

व्यासपीठावर शेजारी बसवून तिचे कोडकौतुक करण्यात दंग होते. अत्र्यांनी नवयुगमध्ये ते सारे शृंगार-प्रकरण रंगवून फडक्यांचे चांगलेच उट्टे काढले.

अत्र्यांनी 'नवयुग' मधून फडक्यांवर चौफेर मारा सुरू केल्यानंतर फडक्यांनी तोडीस तोड म्हणून १९४१ मध्ये 'झंकार' साप्ताहिक सुरू केले. त्यामुळे अत्रे–फडके वादाची एक अत्यंत हीन पातळीवर गेलेली रणधुमाळी सुरू झाली. तेव्हा मुंबईच्या डॉ. भालेरावप्रभृती काही व्यक्तींनी पुढाकार घेऊन हा वाद संपविण्याची विनंती दोघांना केली.

दरम्यान सोलापुरला १९४१ मध्ये संमेलन भरवायचे ठरले. आता अत्रे नक्की अध्यक्ष होणार हे पाहून फडक्यांनी खांडेकरांना त्यांच्याविरुद्ध उभे केले व वामन मल्हार जोशी यांना भेटून त्यांना अत्रे यांच्याविरुद्ध पत्रक काढावयास लावले. परिणामी सोलापूरला खांडेकर अध्यक्ष झाले. या संमेलनात अत्र्यांचा पाणउतारा करता यावा म्हणून फडके मुद्दाम उपस्थित राहिले. आपण खांडेकरांचे पाठीराखे आहोत अशी त्यांनी भूमिका घेतली. व्यासपीठावर खांडेकरांच्या शेजारी बसून त्यांना ते शाबासकी देऊ लागले. गाण्याच्या मैफिलीप्रमाणे 'क्या बात है' म्हणून दाद देऊ लागले. फडक्यांनी किल्ली दिल्याप्रमाणे खांडेकरांनी या संमेलनात वागून आपला पाणउतारा केला असे अत्र्यांच्या मनाने घेतले आणि त्यामुळे फडक्यांचे दहन करण्यासाठी पेटवलेल्या नवयुगाच्या कुंडात खांडेकरांचीही अधून–मधून आहुती पडू लागली. हे सारे फार झाले म्हणून लोकांनी मध्यस्थी करून हा वाद थांबविला. परंतु तो थांबविण्यापूर्वी अत्र्यांनी 'गच्छ सूकर भद्रं ते' अशी शेवटची शिवी देऊन तो थांबविला.

वाद थांबविण्याच्या पत्रकावर सही केल्याने या शेवटच्या शिवीवर आणखी शिवी देण्याची खुमखुमी फडक्यांनी आवरती घेतली, कारण यावेळी संमेलनास बरोबर नेलेल्या कुमारिकेबरोबर दुसरा विवाह करण्याच्या कामगिरीमुळे त्यांना वेळेचा अभाव जाणवत असावा !

जुनी वृत्तपत्रे आणि नियतकालिके चाळत असताना लक्षात आलेल्या मानापमानाच्या काही ठळक प्रसंगांची मांडणी मी आतापर्यंत केली; परंतु १९६४ पासून पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यात पडल्यामुळे त्यापुढच्या संमेलनातील मान–सन्मानाच्या प्रसंगाला जोडून आलेल्या मानापमानांच्या अनेक प्रसंगांचे साक्षात दर्शन घडले. ते एक प्रकारचे विश्वरूप दर्शनच होते. परंतु डोळे उघडे ठेवून त्याकडे डोळझाक करण्याची सवय लवकरच जडली. सार्वजनिक संस्थांत काम करावयाचे तर सदैव डोळे उघडे ठेवून वावरून चालत नाही.

१९६४ मधला पहिला सांगण्यासारखा अनुभव म्हणजे त्यावर्षी गोमंतकातील मडगाव येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचा. कविवर्य कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. गोवा नुकताच स्वतंत्र झाल्याने मुक्तपणे तेथे विहार

करण्याचे स्वातंत्र्य, भव्य मंडप, भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था आणि कोकणी-मराठी वादाला आलेले अटीतटीचे स्वरूप यामुळे हे संमेलन चांगलेच लक्षात राहिले. शिरवाडकरांनी कोकणीवाद्यांच्या हुल्लडीला भीक न घालता जो बाणेदारपणा दाखविला, त्यामुळे 'गर्जा जयजयकार' म्हणून गर्जणारा तेजस्वी कवी साक्षात तेजोनारायणासारखा भासला. दत्तोपंत पोतदारांनी आभाराचे केलेले भाषण म्हणजे चैतन्याची एक सुखावून गेलेली बरसात. परंतु हे संमेलन भरून गेल्यानंतर एका भलत्याच वादाला तोंड फुटले. संमेलनासाठी माजी अध्यक्ष या नात्याने रसिकवर म्हणून प्रख्यात असलेले वि. द. घाटे मडगावला उशीरा आले. संमेलनाला सुरुवात झाली होती त्यावेळी स्टेशनवर ते उतरले. बरोबर त्यांच्या सूनबाई होत्या. स्टेशनवर त्यांचे स्वागत करण्यासाठी कोणी नाही हे पाहून त्यांना राग आला. त्यांनी व्यवस्थापक कक्षात जाऊन हा राग व्यक्त केला. त्यांची कशीबशी एका हॉटेलात सोय करण्यात आली. परंतु तेथे एकच खोली होती. तेथे सुनेची सोय करून ते बाहेर बाकावर बसून राहिले. संमेलनाचे कार्याध्यक्ष सुकेरकर भेटावयास आले नाहीत हा त्यांना अपमान वाटला. स्वागतमंडळीच्या एका सभासदाबरोबर मी त्यांना भेटावयास गेलो तेव्हा त्यांनी परतीची तयारी केली होती. कुणाच्याही विनवणीचा काही उपयोग झाला नाही. ते परतीच्या गाडीने पुण्यास निघून गेले.

संमेलन इतके चांगले झाले असता घाट्यांमुळे त्याला अपशकुन झाला असे ज्ञानेश्वर नाडकर्ण्यांना वाटले. त्यात काही प्रादेशिक अभिमान व अभिनिवेशही होता. पुण्यात आल्या आल्या त्यांनी त्या धुंदीत संमेलनासंबंधी भरभरून कौतुक करणारा लेख लिहिला. संमेलन ८-९-१० मेला झाले. नाडकर्ण्यांचा लेख 'साधने' च्या १३ मेच्या अंकात प्रसिद्ध झाला. या लेखातील खालील परिच्छेद स्फोटक ठरला. त्यांनी लिहिले होते-

'एक मातब्बर भूतपूर्व अध्यक्ष उद्‌घाटनाच्या दिवशीच दुपारी संमेलनास सुरुवात होण्यास तासभर असताना आपल्या गोतावळ्यासह मडगाव स्टेशनवर येऊन टपकले. त्यावेळी त्यांच्या स्वागताला कोणी हजर नव्हते, हा स्वागतसमितीचा केवढा मोठा गुन्हा! एरवी माणुसकीचे आणि दिलदारीचे पोवाडे गाणाऱ्या या गृहस्थाने तरातरा कार्यालयावर मोर्चा नेला आणि आपली आबाळ झाल्याचे सांगून छातीला लावण्यासाठी काही बिल्ल्यांची वगैरे मागणी केला. अध्यक्षीय भाषणाच्या वेळी कोकणीवादी मंडळी मंडपात घुसून काही गोंधळ माजवणार अशी स्वागत-समितीला पूर्ण खात्री असल्यामुळे त्या दिवशी दुपारी बिल्ले किंवा पास कोकणीवाद्यांचे हाती पडू नयेत म्हणून कार्यकर्त्यांनी ते काही काळ दाबून ठेवले होते. गेल्या कित्येक वर्षांत महाराष्ट्रीय आणि गोमंतकीय साहित्यिक यांच्यातील दुवाच तुटल्याने स्वयंसेवकांना ज्येष्ठांची व श्रेष्ठांची कितपत ओळख पटावी? साहजिकच या माजी अध्यक्षांची व्यवस्था होण्यास थोडा विलंब झाला. परंतु झाल्या प्रकाराचे स्वरूप नीट न ओळखता

हा गृहस्थ आपल्या सहिष्णुतेचे आणि असभ्यतेचे अतिशय घृणास्पद प्रदर्शन करून प्रवेशद्वारापासून मागे फिरला. ह्या भल्या माणसाने नंतर संमेलनात अथवा मडगावात कधीच आपले तोंड दाखवले नाही. ह्यापुढे मातब्बर साहित्यिक स्वागत समितीच्या नावाने सारखे खडे फोडीत बसणार आणि संमेलनाच्या अपयशाबद्दल चुकीचा प्रचार करणार म्हणून हे येथे लिहून टाकले.'

हा सारा मजकूर घाटे यांना अतिशय लागणे साहजिक आहे. त्यांनी लगेच साधनेला पत्र लिहून आपल्याला अतीव यातना व दुःख झाल्याचे व 'नाडकर्ण्यांनी बरेचसे खोटे, खोडसाळ, बेजबाबदार लिहिले आहे; हे सारे घृणास्पद, अर्वाच्य आणि असभ्यपणाचे आहे म्हणून सारी वस्तुस्थिती स्पष्ट केली. 'गोतावळा, टपकणे अशा अपमानास्पद शब्दांऐवजी शिष्टसंमत भाषेत लिहिता आले असते, परंतु नाडकर्ण्यांकडून तशी फारशी अपेक्षा करणे योग्य नाही, कारण अर्वाच्य शब्दांत कुजकट विनोद करताना जे लेखक शिष्टाचार व संयम पाळीत नाहीत आणि प्रसंगविशेषी विनोदाच्या पायावर अनेक वर्षांचे लागेबांधे सहजपणे तोडून टाकतात त्यांत नाडकर्ण्यांचीही गणना करावी लागेल. मी मडगावला डांगोरा पिटला नाही. पुण्यात आल्यावरही त्याची वाच्यता केली नाही.' हे स्पष्ट करून घाट्यांनी पुढे लिहिले,

'माधव जूलियनने म्हटले आहे की, मैत्रीचा मृत्यू हा एक दुःखद अनुभव आहे. 'नाडकर्णी' माझे मित्र नव्हते, तथापि गेली काही वर्षे ते माझ्याकडे उतरत असत. खात–पीत असत. प्रेमालाप करीत. उतरले नाहीत तर अगत्याने भेटीस येत असत. मडगावास जाण्यापूर्वी ते माझ्या भेटीस आले होते. आपणहून मला म्हणाले, 'मी तीन दिवस आधी जात आहे. तुम्हाला नीट दिसत नाही. परंतु तुम्ही काळजी करू नका. मी तुमची सर्व व्यवस्था करतो. स्टेशनवर येतो.' परंतु मडगावी गेल्यावर नाडकर्णी हे सारे विसरले. त्यांची मी आजवर माझ्या सुहृदांमध्ये गणना करीत होतो. आता करणार नाही.'

याच अंकामध्ये इरावती कर्वे यांचेही एक पत्र छापले आहे. मडगावास जाण्यासाठी काकासाहेब गाडगीळ पुण्याच्या स्टेशनवर प्रथमवर्गाच्या डब्यात बसले असता काही तरुणांनी 'गाडगीळ मुर्दाबाद' च्या घोषणा दिल्या. त्याला उद्देशून इरावतीबाईंनी लिहिले —

'म्हातारी माणसं आणि आपली ही वागणूक पाहून त्यावेळी 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' हा साक्षात्कार आम्हा म्हाताऱ्यांना घडविणारे धन्य ते पुण्याचे संपादक. एक म्हातारं माणूस म्हणून पुण्यात जन्म झालेला म्हणून हे लिहिले आहे.'

साधनेने तत्परतेने ही दोनच पत्रे छापून पत्रव्यवहार बंद केल्याचे जाहीर केले. मडगावच्या संमेलनासंबंधाने, 'असा अध्यक्ष, असे संमेलन पुन्हा होणे नाही' असे नाडकर्ण्यांनी लिहिले होते, ते अक्षरशः खरे होते. परंतु भावनेच्या भरात नाडकर्णी तीव्रतेने भलतेच लिहून गेले होते. त्याचा झटका त्यांना स्वतःला व साधनेलाही चांगलाच

बसला.

संमेलनाध्यक्षाने पुढच्या साहित्य संमेलनात उपस्थित राहावे व आगामी अध्यक्षाच्या हाती अध्यक्षपदाची सूत्रे अर्पण करावी असा संकेत आहे. १९६९ साली वर्धा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पु. शि. रेगे होते. त्यापुढचे संमेलन १९७३ साली यवतमाळला भरले. त्याला पु. शि. रेगे हजर राहिले नाहीत. त्यामुळे अध्यक्षपदाची सूत्रे माडगूळकरांच्या हाती आलीच नाहीत. १९७४ मध्ये इचलकरंजीला ग. दि. माडगूळकर हजर राहिले नाहीत. त्यांनी हजर राहावे म्हणून विनंती करण्यासाठी साहित्य परिषदेचा कार्याध्यक्ष या नात्याने मी त्यांच्या घरी गेलो होतो. अण्णा घुश्श्यात होते. संमेलनाच्या व्यासपीठावर मंत्र्याने यावयाचे नाही या अटीवर पु. ल. देशपांडे यांनी अध्यक्षपद स्वीकारले होते. अशी अट स्वीकारावी हे अण्णांना मंजूर नव्हते. इतर काही कारणे अण्णा सांगत असले तरी इचलकरंजीला न येण्याचे मुख्य कारण हे होते.

'आम्ही मंत्र्यांच्यामध्ये वावरतो, त्यांना व्यासपीठावर बसवतो म्हणजे आम्ही स्वाभिमानशून्य साहित्यिक असेच ना ?' त्यांनी विचारले तेव्हा मी गप्प राहिलो.

चंद्रपूरला पु. भा. भावे हजर राहिले नाहीत, कारण त्यांचे पुण्याचे संमेलन उधळले गेले होते. चंद्रपूरचे उधळले जाऊनही चोरघडे बार्शीला हजर राहिले. संमेलनाची सूत्रे सरदारांकडे देताना ते भरल्या आवाजात म्हणाले,

'मी वर्षभर संमेलनाध्यक्ष होतो म्हणजे काय होतो ते माझे मलाच कळले नाही. माझ्या हाती संमेलनाची सूत्रे कधी आलीच नाहीत तर देणार कुठून ? या मंडळींनी वर्षभर मला नुसता बसवून ठेवला. सरदार थोर आहेत, ज्ञानी आहेत. माझ्या हृदयात फुले उमललेली आहेत. हातात सूत्र आहेच. मी ही हृदय फुले आणि हे सूत्र सरदारांना अर्पण करतो.' आणि वामनरावांनी चक्क खाली वाकून सरदारांचे पाय धरले. इतका उत्कट प्रसंग, परंतु श्रोत्यांना त्याचे काय हो ! ते चक्क उपहासाने हसले.

संमेलन उधळल्याच्या अपमानापेक्षा हा अपमान जिव्हारी लागण्यासारखा होता.

बार्शीनंतर अकोल्याला संमेलन भरले. तेथे मानाचा कसला प्रश्नच नव्हता. अपमानांची ती एक अखंड साखळी होती. परिणामी एक रायपूरला व मुंबईला पर्यायी अशी एकाच वेळी दोन संमेलने लागोपाठ भरली.

रायपूर संमेलनाला या पर्यायी संमेलनाची चांगलीच झळ पोचली. नामांकित साहित्यिकांना स्वतंत्र संमेलनाचे वेध लागले होते. परस्पर विरुद्ध काहीही बोलले जात होते. रायपूरच्या संमेलनासाठी गंगाधर गाडगीळ व वसंत कानेटकर यांच्यात चुरस होती. त्यात गाडगीळ निवडून आले होते. या निवडणुकीच्या निमित्ताने बरीच वादावादी झाली होती. ती विसरून परप्रांतात मोठ्या प्रयत्नाने संमेलन भरवितो आहोत, त्याला साऱ्या मुलखातून साद मिळेल असे रायपूरकरांना वाटत होते, परंतु अनुभव

वेगळा आला आणि चांगलीच कटुता निर्माण झाली.

चंद्रपूरच्या स्वागत मंडळीचे एक सदस्य साहित्यिकांना निमंत्रण देण्यासाठी पुण्यास आले, त्या संबंधाने एका नियतकालिकानं छापलेला किस्सा खालीलप्रमाणे आहे.

रायपूर संमेलनाच्या स्वागत समितीचे अध्यक्ष त्र्यं. म. घाटे यांच्या बंधूंबाबत घडलेला. रायपूर संमेलनासाठी तमाम थोर साहित्यिक मंडळींना प्रत्यक्ष भेटून आमंत्रण देण्यासाठी धाकटे घाटे मुंबईत आले होते. गाडगीळांच्या सल्ल्यानं ते त्यांच्याबरोबरच पुण्यात गेले. पुण्यातील सर्वच साहित्यिक प्रख्यात. त्यात पु. ल. देशपांडे 'अधिक' प्रख्यात. त्यांना घाटेंनी फोन लावला–

'हॅलो, मी रायपूर साहित्य संमेलनाच्या स्वागत समितीकडून –'

'अहो, पण आम्ही येणार नाहीहोत–' बाईंचा, बहुधा सुनिताबाईंचा आवाज.

'पण जरा साहेबांशी बोलायचं होतं.'

'....' स्तब्धता. थोडया वेळानं, 'जरा दहा मिनिटांनी फोन कराल का—'

'बरं' घाटे म्हणाले. दहा मिनिटांनी पु. ल. अंघोळीला गेले असल्याने थोडया वेळाने फोन करण्यास सांगण्यात आले. घाटे बिचारे अडलेले. साहेबांची अंघोळ झाली असेल अशा बेताने त्यांनी अर्धा-पाऊण तासानी फोन केला तर साहेब चक्क झोपलेले.

'साहेब झोपलेत, उठणार कसे ! तुम्ही थोडया वेळाने पहा ना जरा.'

घाटे वैतागले. चिडले. एक तर परगावचे. त्यातून पुण्यात आलेले. फोन मिळण्याची मारामार. ह्याच्याकडून, त्याच्याकडून फोन करायचा. पाच फोन झाले तरी पु. लं. ना त्यांच्या 'टाईट शेडयूल' मधून बोलायला काही सवड होईना ! घाटे चिकट आणि तडक 'रूपाली' वर हजर झाले.

दरवाजावरची बेल वाजविताच एक त्रासिक चेहरा बाहेर डोकावला. 'मी अमुक-तमुक' घाटेंनी परिचय करून देण्यास सुरुवात करताच फाटकन उत्तर आले, 'अहो, तुम्हाला येणार नाही म्हणून सांगितले तरी....( काय त्रास देताय. शी: ! असा सूर ). घाटे म्हणाले, 'अहो, मला साहेबांना भेटू तर द्या.'

'बरं, बरं. थांबा.' दरवाजा बंद. दोन मिनिटं, तीन मिनिटं, पाच मिनिटं.... घाटे आपले दरवाजापुढे उभे. दरवाजा आपला बंद. पुंडलिका भेटी आलेले परब्रह्म जसे युगे अठ्ठावीस उभे आहे तशी आपली स्थिती होऊन रूपालीच्या पहिल्या मजल्यावर आपण कायमचे उभे ठाकणार बहुधा, असं घाटेंना वाटू लागलं. एवढयात दस्तुर खुद्द लाडकं व्यक्तिमत्त्व डगला अडकवीत दरवाजा उघडते. संवाद दरवाजातूनच सुरू होतो –

'हां हां नमस्कार. काय ?'

'नाही, आपल्याला आमंत्रण द्यायला आलो.'

'हो, हो. पण जिथे सिमेंटचा भ्रष्टाचार करून राजरोस मिरवणारे लोक येणार तिथे ?'

घाटेंचा आवाज तापला, ' म्हणजे तुम्ही मंत्र्याचे म्हणताय ? पण तुमच्या जनता राजवटीत काय कमी भ्रष्टाचार होता काय ? ' आता संवाद घरात सुरू आहे. घाटेंचा आवाज खणखणीत, त्यात तापलेला. त्यांनी, ' भ्रष्ट कोण नाही हो ' इथून सुरुवात करून ' आम्हालाही मंत्र्यांना नाचवायची हौस नाही.' असे म्हणत पु. ल. देशपांड्यांना एक आव्हान दिले –

' हे बघा देशपांडेसाहेब, मंत्र्यांच्या उपस्थितीला तुमचा विरोध आहे ना ? ठीक आहे. महाराष्ट्राचे थोर ज्येष्ठ साहित्यिक म्हणून तुम्ही उद्‌घाटन करा संमेलनाचे. मध्य प्रदेशच्या महादेवी वर्मा आणि महाराष्ट्राचे ज्येष्ठ आपण. तुम्हा दोघांना सूत्रे देऊ. येता तुम्ही ? चला, मंत्र्यांना काय सांगायचे– ते आम्ही बघून घेऊ. ते रागावले तर आम्ही सोसू. येता ? '

पु. लं.नी ते आव्हान स्वीकारले नाही. पण घाटेंचा चढाईखोर पवित्रा पाहून त्यांचा सूर बदलला. त्यांनी येण्याचे मात्र मान्य केले नाही. कदाचित महाराष्ट्र टाईम्सच्या ' विचारा ' ला विरोध करून रायपूरला कसं जायचं बुवा ! असा प्रश्न त्यांना पडला असावा. मठाधिपतींच्या आदेशाशिवाय हल्ली साहित्य प्रांती पाने हलत नाहीत !

पु. लंनी मग न येण्याचे त्यांचे नेहमीचे खास कारण पुढे केले. ' पाय दुखतोय हो – कसा मी येऊ ? ' घाटे ताडकन उद्‌गारले, ' छे, छे ! हे खोटं आहे – पाय दुखत असताना आपण चार-चारदा मुंबईस पळता, समारंभातून भाषणे ठोकता – आपणास येणे नाही हेच खरे ! ' त्यावर पु. लं. कडे उत्तर नव्हते !

या नियतकालिकात प्रसिद्ध झालेला किस्सा काल्पनिक असणार अशी आमची समजूत होती, परंतु संमेलनाचे सूप वाजताच स्वागत समितीच्या घाटे यांनी हीच हकीकत अगदी चढ्या सुरात व आवेशपूर्णतेने सांगून पुण्याचा उद्धार केला. भरीस भर म्हणून साहित्य परिषदेच्या एका कार्यकर्त्याने मध्येच उठून ' पु. ल. पुण्याचे नाहीत हो ' असा केविलवाणा सूर काढला. एका मोठ्या साहित्यिकाची त्यामुळे परिषदेपासून फारकत झाली.

अकोल्याचे जे घडले त्याच्या पार्श्वभूमीवर पु. ल. येणार नाहीत हे स्पष्ट होते, परंतु बाहेरगावच्या कार्यकर्त्यांना जुन्या साहित्यिकांची, म्हणजे दत्तो वामन पोतदार, न. र. फाटक, न. चिं. केळकर यांची याद असल्याने आजच्या साहित्यिकांनीही तसेच असावे अशी भलती समजूत असते. त्यामुळे असा भलता प्रकार घडला.

काळ बदलला आहे, जीवनमूल्ये बदलली आहेत. आता जुन्यांची उदाहरणे पुढे ठेवण्यात अर्थ नसतो, हे त्यांच्या लक्षात येत नाही.

आणि विनाकारण दुहेरी मनस्ताप होतो.

साठ संमेलने म्हणजे मानापमानांचे सतराशेसाठ प्रकार. परंतु साठा उत्तराची ही कहाणी पाचा उत्तरी सफळ संपूर्ण होईल या विश्वासाने इथेच थांबतो.

# चेटुक करून गेलेलें संमेलन

वर्ध्यांच्या साहित्य-संमेलनाचे सूप वाजवून आम्ही सर्व परत आलो आहोत आणि आमच्या नित्याच्या कामात रममाण होण्याचा प्रयत्न करीत आहोत. परंतु या खेपेस काय झाले आहे कुणास ठाऊक, मन काही केल्या त्या संमेलनाच्या मांडवांतून बाहेर पडावयास तयार नाही. अद्यापहि तिथेच मांडवात बसलो आहोत; समोर निरनिराळ्या व्याख्यात्यांच्या फैरी झडत आहेत. सारा मांडव तुडुंब भरलेला आहे. व्यासपीठावर महामहोपाध्याय पोतदार, प्राचार्य पु. शि. रेगे, विठ्ठलराव घाटे, कविवर्य अनिल, कविभूषण खापर्डे यांसारख्या व्यक्ती बसल्या आहेत. प्रेक्षकांमध्ये अगदी समोर डॉ. कोलते, डॉ. रा. शं. वाळिंबे, प्रा. अनंत काणेकर, डॉ. अ. ना. देशपांडे, प्रा. भवानीशंकर पंडित, प्रा. श्री. मा. कुलकर्णी, डॉ. कालेलकर, प्राचार्य या. मु. पाठक, प्राचार्य वामन चोरघडे, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, वा. रा. ढवळे, श्री. शं नवरे, डॉ. स. गं. मालशे यांसारखी दर्दी मंडळी बसली आहेत हे चित्र काही केल्या मनासमोरून दूर जाण्यास तयार नाही. बरीच साहित्य-संमेलने आजपर्यंत आम्ही पाहिली, परंतु हे साधेच परंतु मनाला चटका लावून गेलेले संमेलन मात्र आमच्या मनात काही एक 'चेटूक' करून गेले आणि आता आम्ही सारेच म्हणायला लागलो आहोत की, 'साहित्य संमेलने म्हणजे उरूस, हौसे-नवसे-गवश्यांची गर्दी, कशाला ती साहित्य-संमेलने' वगैरेंसारख्या व्यर्थ निदांष्टकांतून बाहेर पडून आता आम्ही अगदी ठामपणे सांगितले पाहिजे की, साहित्यिकांच्या, साहित्यभक्तांच्या मेळाव्याची साहित्य-संमेलन ही साक्षात पंढरीच आहे. ती महाराष्ट्रीयांची आता इतकी जिव्हाळ्याची झाली आहे की, पंढरीच्या भक्ताला पंढरीत प्रवेशिल्यानंतर जो आनंद होतो, तो आनंद देऊन मन उल्हसित करण्याचे फार मोठे सामर्थ्य या मेळाव्यात आहे.

साहित्य-संमेलनाबाबतीतल्या आमच्या कित्येक विपर्यस्त कल्पनांना या संमेलनाने खो दिला आहे व साहित्यसंमेलने ज्या पद्धतीने भरत आहेत, त्या पद्धतीनेच भरविण्याचे महत्त्व त्यामुळे लक्षात येऊ लागले आहे.

विशेषतः वर्धा येथे भरलेल्या या ४८ व्या साहित्य संमेलनाबाबतींत सारेच मोठे

साशंक होते. वर्धा आणि नागपूर असे तट पडले असून महामंडळ किंवा वर्ध्याचे स्वागतमंडळ साहित्य मंडळ भरवण्यास फारसे उत्सुक नाही; वर्ध्यातच पुन्हा दोन तट पडले असून तेथे स्थानिक विरोध आहे आणि त्यामुळे स्वागत मंडळाजवळ संमेलन भरविण्यास पुरेसा पैसा नसल्याने तेथे येणाऱ्या लोकांची मोठीच गैरसोय होणार आहे; वर्धा हे अतिशय सामान्य ठिकाण असून तेथे पाहण्यासारखेही काही नाही आणि या दिवसांत तेथे कडाक्याची थंडी असल्यामुळे शहाण्या माणसाने जाऊ नये इत्यादि, इत्यादि.

परंतु या साऱ्या शंका या केवळ शंकाच ठरल्या. आम्ही थंडीशी सामना करण्यासाठी सज्ज होऊन पुण्याहून तीन तारखेला निघालो आणि चार तारखेला भल्या पहाटे वर्ध्याला पोचलो तेव्हा थंडी या नावाची चीजही अस्तित्वांत नव्हती. तिथल्या स्वावलंबी महाविद्यालयाच्या भव्य परिसरांत मंडप उभारला जात होता आणि येणाऱ्या-जाणाऱ्यांचे आस्थेने स्वागत होत होते. प्रतिनिधींची राहण्याची उत्तम सोय होती आणि त्यांच्या सर्व सोयींकडे जातीने लक्ष पुरविण्यासाठी स्वयंसेवकांची फौज तत्परतेने काम करताना दिसत होती. सारी व्यवस्था पाहून आम्ही तृप्त मनाने गावांत फिरायला निघालो. तेव्हा अकराच्या सुमाराला अध्यक्ष व उद्‌घाटक यांचे आगमन होत असल्यामुळे त्यांचे स्वागत करण्यासाठी स्टेशनवर मोठीच गर्दी उसळली होती....अध्यक्षांच्या आगमनानंतर मिरवणुकीचा व त्यानंतर भोजनाचा कार्यक्रमही तितकाच जिव्हाळ्याचा झाला. संमेलन दुपारी तीन वाजता सुरू होणार होते. परंतु त्यापूर्वी दोन तास अगोदर दिले गेलेले जेवण इतके चांगले होते की, त्या पहिल्याच जेवणानंतर मंडळींना जागवरून उठता येईल आणि संमेलनाच्या मंडपात लगेच जाऊन बसता येईल, अशी काही परिस्थिती राहिली नाही. त्यामुळेच तीन वाजता सुरू करावयाचे संमेलन नाइलाजाने चार-साडेचारच्या सुमारास सुरू करण्याचा निर्णय करावा लागला. भोजनाबाबतीतले हे अगत्य वर्ध्याला तीनही दिवस फार चांगल्या रीतीने पाहायला मिळाले. भोजनापूर्वी 'अनारदाणा' नावाचे पाचक चूर्ण द्यावयाचे, नंतर उत्तमपैकी भोजन द्यावयाचे व शेवटी अगत्यपूर्वक विडेही द्यावयाचे आणि वर बापूसाहेब चोरघड्यांनी विचारावयाचे, 'आपली काही गैरसोय होत नाही ना?' म्हणजे अतिशय काळजीपूर्वक आणि आस्थेवाईकपणाने हे संमेलन भरविले होते, असेच म्हटले पाहिजे. हा मुद्दा सुरुवातीसच विस्ताराने लिहिला याचे कारण इतकेच की, मनात आणले तर स्थानिक मंडळी किती आस्थेवाईकपणाने हे कार्य करू शकतात, हे लक्षात यावे. व्यवस्था इतकी चांगली होती की, कोणालाही, कुठेही तक्रार करावयास जागा नव्हती. आतिथ्यशीलता, सेवाभाव हा वर्धावासीयांच्या रक्तातच भिनलेला आहे, याचा प्रत्यय सर्वांनाच आला. उद्धटपणा, बेपर्वाई, अनास्था यांचा कुठेही (संमेलनाच्या मांडवात आणि अन्यत्र गावातही) अनुभव आला नाही.

साडेचारच्या सुमारास प्रत्यक्ष संमेलनाला सुरुवात झाली तेव्हा संमेलनासाठी उभा केलेला मंडप पुरेपूर भरून गेला होता आणि मंडपाबाहेर विद्यार्थी मोठ्या संख्येने

उभे राहून शांतपणाने श्रवणभक्तीचा आस्वाद घेत होते. संमेलनाचे उद्घाटक म्हणून शिक्षणमंत्री श्रीयुत मधुकरराव चौधरी यांचे चांगले पन्नास मिनिटे भाषण झाले. मधुकरराव हे वर्ध्याचे विद्यार्थी. विनोबाजी व सानेगुरुजी यांच्या संस्कारांचा वारसा घेऊन आलेले. त्यामुळे त्यांच्या भाषणात राजकीय पुढाऱ्यांची उपदेशाची भूमिका आणि सर्वोदयवादी शब्दवेल्हाळपणा पुरेपूर होता. या राष्ट्रांत भौतिक पुनरुत्थान घडत असताना राष्ट्राचा घटक या नात्याने साहित्यिकाने सृजनशील वृत्ती ठेवली पाहिजे, त्याने विकासाचे प्रदर्शन करावयाचे का विचारदर्शन घडवायचे हे ठरविले पाहिजे, रुचिरंजन करण्याऐवजी अभिरुचिसंगोपन केले पाहिजे, सर्वस्पर्शी जीवनाच्या अंतापर्यंत जाण्याची तयारी ठेवली पाहिजे, उपेक्षितांचे अंतरंग घडवून आणले पाहिजे, क्लासेस् व मासेस् यांचे द्वंद्व आर्थिक नसून मानसिक आहे, त्याचे साहित्यात दर्शन घडविले पाहिजे, हे त्यांच्या भाषणाचे सुसंगतरीत्या काढलेले काही मुद्दे.

मंत्रिमहाशयांच्या नंतर नियोजित अध्यक्षांना हार समर्पण करण्याचा विधी झाला व त्यासाठी वर्धा येथील सर्व लहानमोठ्या संस्थांनी अध्यक्षांना हार समर्पण करण्याची योजकता दाखविली. त्यामुळे या संमेलनासाठी या छोट्या शहरातील साऱ्या संस्थांनी एकोप्याने काम करण्याचे ठरविले आहे, हे लक्षात येत होते.

येथपर्यंत सारे वैदर्भीय पद्धतीने चालले होते, परंतु अध्यक्षीय नांवाची सूचना, अनुमोदन व अध्यक्षीय अधिकार समर्पण करण्यासाठी प्रमुख नागपुरी मंडळी पुढे आली आणि त्यांनी आपल्या नागपुरी बाण्याने अशा काही खोचकबोचक शब्दांची फेकाफेक केली की, क्षणभर त्यामुळे मोठें नाट्यपूर्ण वातावरण निर्माण झाले. सुरुवातीस विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर उभे राहिले आणि म्हणाले की, 'ही वर्धा नगरी बजाज यांच्यासारख्या शेठमंडळींची कुबेरनगरी आहे. त्यांनी मनात आणले की या संमेलनावर ते सुवर्णवृष्टी करू शकतील. आतिथ्यशीलतेमध्ये आम्हा वऱ्हाडवासीयांचे वैशिष्ट्य हे की आम्ही भोजनाला आमंत्रण दिल्यानंतर बारा वाजता बोलाविले असेल तर त्याचवेळी भोजन मिळेल की नाही याची खात्री नाही, परंतु ते निश्चितपणे रात्री बाराच्या आत मिळेल आणि असे भरभक्कम, तुपाने ओसंडत असलेले, ( इतके की तीन दिवस हात धुवूनही हाताचे तूप जाणार नाही ) की, ते जेवल्यानंतर पुढे दोन दिवस चालता येऊ नये आणि भूक लागू नये.' ( माडखोलकरांचे हे शब्द ऐकून संमेलनाचे प्रतिनिधी म्हणू लागले की, पहिले जेवण खरेच चांगले होते. त्यामुळे पुढे राहिलेले दोन दिवस जेवण मिळणार नाही, हा माडखोलकरांचा आशय आपण लक्षात घ्यावा. )

बजाजस्तवन झाल्यानंतर माडखोलकर नियोजित अध्यक्षांबद्दल बोलताना एवढेच म्हणाले की, कवि यशवन्तानंतर १८ वर्षांनी पुन्हा एकदा संमेलनाध्यक्ष म्हणून रेग्यांच्या रूपाने कवी येतो आहे ( साऱ्या सभामंडपातून 'औं ऽऽ' असा एकच उद्गार बाहेर पडला ) याचा मला आनंद आहे.'

ह्या माडखोलकरांच्या सूचनेनंतर अनुमोदनासाठी डॉ. देशमुख उभे राहिले आणि ते म्हणाले की, 'यशवंतां नंतर, कुसुमाग्रज व नंतर रेगे हे कवि अध्यक्ष होत आहेत' त्यावेळी एक प्रतिनिधी म्हणाले, 'अहो, पूर्वाध्यक्ष म्हणून व्यासपीठावर तुमच्या शेजारी घाटे, काणेकर, अनिल हे बसले आहेत. थोडे पाहा.' पण देशमुखांपर्यंत हे शब्द पोचले नाहीत. देशमुखांनीही एक दोन वाक्यांतच अध्यक्षस्तवन केले. ते म्हणाले, 'मागचे अध्यक्ष हे संतवाङ्मयाचे उपासक होते आणि आताचे अध्यक्ष पसंत वाङ्मयाचे. अलीकडचे नववाङ्मय काही लोकांना पसंत असल्यामुळे त्यांच्या आवडीचे हे पसंत अध्यक्ष आहेत. अलीकडच्या वाङ्मयाचे ते अध्वर्यू आहेत म्हणूनच नव्या पिढीच्या रसिक-बंधूनी त्यांच्या गळयांत ही पसंतीची वरमाला टाकली आहे.' देशमुखांनंतर पूर्वाध्यक्ष डॉ. कोलते हे अध्यक्षपदाचे अधिकार सुपूर्द करण्यासाठी उभे राहिले आणि म्हणाले, 'इथे आल्यानंतर माझ्या लक्षात आले की, एक वर्ष, सात महिने व चौदा दिवसांपूर्वी मी भोपाळ येथे अध्यक्ष होतो आणि म्हणूनच इतक्या दिवसांनंतर माझ्याकडे नसलेले सारे अध्यक्षपदाचे अधिकार मी नव्या अधिकाऱ्यांना अर्पण करून ह्या ओझ्यांतून मोकळा होत आहे. मघाशी वर-वधूचा उल्लेख डॉ. देशमुखांनी केला; तोच दृष्टांत पुढे चालवून मी असे म्हणतो की, आतापर्यंतच्या निरनिराळया प्रकारच्या दिरंगाईमुळे अध्यक्षरूपी वधूची मोठी विचित्र अवस्था झाली आहे. इतकी की, ही संमेलनरूपी वरमाला गळयात पडणार की नाही, असे तिला वाटत होते. 'कधी करिशी लग्न माझे, तुज ठावें ईश्वरा' असे म्हणण्याची पाळी तिच्यावर आली होती. आता वेळ फार झाला आहे. अध्यक्षपदाची भूमिका करण्यासाठी तोंडाला रंग लावून नायिकेने उभे असावे आणि प्रास्ताविकाच्या दीर्घ उपचारामुळे तोंडाला लावलेला रंग तडतडायला लागावा, अशी अवस्था निर्माण केली आहे. तेव्हा नांदीमधली ही ईश्वरस्तुती पुरी करून मी त्यांना अध्यक्षपदाची सूत्रे हाती घ्यावीत आणि त्यापूर्वी अध्यक्ष म्हणून काही अधिकार महामंडळाकडून मागून घ्यावेत, अशी सूचना करतो.'

ह्या सर्व प्रकारानंतर प्राचार्य रेगे यांनी अतिशय संथपणे आपले चाळीस मिनिटांचे भाषण वाचून दाखविले. त्यातील काही भाग अत्यंत विचारप्रवर्तक आणि सर्वसामान्यांच्या आकलनाच्या पलीकडचा होता. परंतु तरीही शांतपणाने श्रोत्यांनी ऐकून घेतले. या भाषणाचे तीन भाग होते. प्रास्ताविकामध्ये रेगे यांनी इष्ट देवतास्तवन करून श्रोत्यांना चकित केले आणि सत्काराच्या निमित्ताने आपल्याला आलेल्या अनुभवांचे विश्लेषण करून काही सूचना केल्या आणि नंतर ते मुख्य विषयाकडे वळले. साहित्यासंबंधीच्या काही मूलभूत प्रश्नांचे त्यांनी मोठे मार्मिक विश्लेषण केले. त्यात नव्याजुन्याच्या तरफदारीचा कोणताही हेतू नसून त्यातल्या गुणदोषाचे, सामर्थ्यांचे आणि सांकेतिकपणाचे ते अंतर्मुख दृष्टीनी केलेले विवेचन होते. भाषणाच्या तिसऱ्या व शेवटच्या भागात शासकीय पारितोषिके आणि संस्कृत भाषेबद्दलची अनास्था याबद्दल आपली परखड मते मांडली व नवे शब्दलेखन आपणाला मान्य नसल्याचे ठणकावून

सांगितले. रेगे यांच्या भाषणात पहिल्यापासून शेवटपर्यंत एक प्रकारचा थंडपणा होता. आशयात अभिनिवेश व खाचाखोचा खूप होत्या, परंतु बोलणे कमालीचे एकसुरी व थंड होते.

साहित्य-संमेलनातील परिसंवाद फारसे रंगत नाहीत आणि श्रोत्यांची त्यांना विशेष साथ मिळत नाही. उलट काव्यगायन किंवा राजकीय स्वरूपाचे वादग्रस्त ठराव आणि त्यावरील राणा भीमदेवी भाषणे यांना अवास्तव महत्त्व राहते, परंतु वर्ध्याच्या संमेलनामध्ये कविसंमेलनाला मुळातूनच फाटा दिला होता आणि शेवटचे खुले अधिवेशन अतिशय थोडया वेळात उचित रीतीने भराभर काही साहित्यविषयक ठराव करूनच उरकण्यात आले. या संमेलनातील परिसंवाद मात्र चढत्या क्रमाने रंगत गेले आणि साऱ्या प्रतिनिधींनी आणि वर्धावासीयांनी या परिसंवादाला फार मोठी साथ दिली.

यातील पहिला परिसंवाद ' मराठीचे अध्यापन ' या विषयावर झाला. अध्यक्ष होते डॉ. ना. गो. कालेलकर. अध्यक्षांनी परिसंवादाचे संयोजन करताना आदल्या दिवशीच वक्त्यांची निवड करून, विषयाचे पोटभेद करून योजनाबद्ध रीतीने हा परिसंवाद पार पडावा, यासाठी योग्य ती दक्षता घेतली होती हे दिसून येत होते. त्याप्रमाणे प्राचार्य म. वि. फाटक ' ललितवाङ्मयाचे अध्यापन ' या विषयावर बोलले आणि त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात वाङ्मयीन अभिरुचि निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण केली. अलीकडच्या समीक्षेत जी दुर्बोधता आणि तोचतोपणा आला आहे, त्यामुळे ही अभिरुचि निर्माण होत नाही, असे त्यांनी सांगितले. डॉ. स. गं. मालशे यांनी ' संशोधनाचे अध्यापन ' या विषयावर बोलताना मराठीच्या साऱ्याच पी.एच्. डी. च्या प्रबंधांतून शास्त्रीय दृष्टिकोनाचा कसा अभाव असतो हे सांगितले. या दोन व्याख्यानांखेरीज बाकीची सारी व्याख्यान उत्स्फूर्त होती. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी विश्वात्मकता आणि मनाला उन्नत करणाऱ्या वाङ्मयाचा आध्यात्मिक दृष्टिकोन आवश्यक असल्याचे सांगितले, तर डॉ. मा. गो. देशमुखांनी ' काव्य हे वर्गातून शिकवायचे नसते तर समोर बसलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींकडून शिकायचे असते ' असे सांगून श्रोत्यांची चांगलीच करमणूक केली. श्री. सुनील सुभेदारांचे सारेच भाषण खोचक अशा गुरुनिंदेने आणि मराठीच्या अध्यापकांचे वाभाडे काढण्यासाठी केलेले होते, तर प्रा. जोगळेकरांनी आयत्या वेळी भाषण करण्यासाठी उभे राहून केवळ वर्गातून चालणाऱ्या अध्यापनास, वाङ्मयमंडळे, चर्चासत्रे, परिसंवाद यांची जोड दिल्याने मराठीचे अध्यापन परिपूर्ण होईल, हा मुद्दा फोडताना फर्ग्युसन महाविद्यालयाचे रा. श्री. जोग हे ' साहित्य सहकार ' मधल्या वाङ्मयीन कार्यक्रमातून किती मोठा परिणाम साधून जात हे सांगितले.

डॉ. कालेलकरांनी अध्यक्षीय समारोपातून केवळ तात्त्विक भूमिका घेतली. मराठीच्या अध्ययनाशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध नसल्याने त्यांचा समारोप परिणामकारक होऊ शकला नाही.

'वैदर्भीय प्रतिभा' नावाची एक विशेष चीज आहे. श्रीकृष्णाने रुक्मिणीला पळविले आणि त्यासाठी त्याला द्वारकेहून निघून पश्चिम महाराष्ट्राच्या मार्गे वऱ्हाडात जावे लागल्यामुळे, त्यांचा पश्चिम महाराष्ट्रावर विशेषतः मुंबई–पुण्यावर विशेष रोख असावा असे त्यांच्या बोलण्यावरून नेहमी दिसते. सहज साध्या भाषणातून एकदा तरी पुण्या–मुंबईची निंदा घडली नाही तर त्यांना जेवण गोड लागत नाही. त्याचा प्रत्यय आम्हाला सारखाच येत होता. 'तुम्ही पुण्या–मुंबईचे लोक स्वतःला विद्वान वगैरे समजता, परंतु हा तुमचा गैरसमज आहे. खरी विद्वत्ता इकडे आमच्या वऱ्हाड–नागपुरासच आहे' या त्यांच्या विधानास प्रतिवाद न करता मुकाट्याने मान हालविली तर त्यांची नांगी मोडल्याप्रमाणे अवस्था होते. संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्यापूर्वी एका रात्रीत सारी चक्रे आपल्या आग्रहास्तव फिरवून विदर्भ–नागपूरकडच्या साऱ्या अधिकाऱ्यांना, प्राध्यापकांना वरच्या श्रेणीत ठेवून बघता बघता साऱ्या पश्चिम महाराष्ट्राच्या मोक्याच्या जागेवर वैदर्भीय माणसांची प्रतिष्ठा कशी करण्यात आली, याचे किस्से खुद्द माडखोलकरांकडून मी प्रथमच वर्ध्याच्या मुक्कामात ऐकले तेव्हा मी चक्रावून गेलो. 'संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश कुणाच्या आग्रहामुळे महाराष्ट्रात आला?' त्यांनी मी समोर बसलेला बेसावध आहे हे हेरून मला विचारले.

'अर्थातच यशवंतरावांनी.' मी म्हटले. त्यावेळी अत्यंत करुणास्पद नजरेने माझ्याकडे त्यांनी पाहिले आणि 'वत्सा, तू अजून बच्चा आहेस' या आविर्भावाने माझी कींव करीत जे काही ऐकवले त्याने मला विश्वरूप दर्शन घडावे अशी त्यांनी अपेक्षा केली! माडखोलकर बेळगावच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असताना संयुक्त महाराष्ट्राचा ठराव संमेलनात मांडण्यात आला इथपर्यंत मला माहीत होते; परंतु संयुक्त महाराष्ट्रही त्यांच्यामुळे मिळाला, हा गौप्यस्फोट माझ्या समजुतीच्या आवाक्यापलीकडचा होता. आचार्य अत्रे या गुन्ह्याला जबाबदार आहेत अशी आमची समजूत होती. तसे मी एकदा मागे मामा वरेरकरांजवळ म्हणालो होतो, तेव्हा त्यांनी अशाच करुणार्द्र नजरेने माझ्याकडे पाहून 'तो आपल्यामुळे (मामांच्या) कसा मिळाला' हे सांगितले होते. काका गाडगीळांचीही तशीच ठाम समजूत होती आणि मुंबईचे अनभिषिक्त सम्राट स. का. पाटील यांनीही आपल्यामुळे 'संयुक्त महाराष्ट्र' झाल्याचे छातीवर हात ठेवून खाजगी बैठकीत सांगितले होते! यशवंतरावांनी भलते श्रेय कशासाठी घ्यावे आणि का घेतले कुणास ठाऊक!

वर्ध्याच्या संमेलनात स्त्रियांना चर्चासत्रामध्ये फारसे स्थान नव्हते, परंतु 'स्त्री-लेखिकांचा मेळावा' असा एक कार्यक्रम होता. मी म्हटले, 'नुसते लेखिका म्हणा, स्त्री-लेखिका नको.' तर मा. गो. देशमुख म्हणाले, 'आमच्याकडे अकोल्यास 'मुलींची कन्याशाळा' व नागपुरास 'मुलांचे बॉईज हायस्कूल' आहे. तेव्हा आहे हा प्रकारच योग्य होय.'

या स्त्री-लेखिका मेळाव्यात स्त्रियांनी काहीही करावे अशी मुभा होती. कुणी

गावे, कुणी कविता म्हणावी, जमल्यास नृत्य करावे आणि कुणी वाटल्यास कुठल्याही विषयावर हवे ते बोलावे, हवे तर कथा-वाचन, निबंध-वाचन, अहवाल-वाचन करावे.

'असे का?' म्हणून कुतुहलाने विचारले, तर कुणी वैदर्भीय प्राध्यापक म्हणाले,

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः'

मेळाव्यात भाग घेणाऱ्या स्त्रियांना पुरुषांच्या या औदार्याची जाण नसल्याचे दिसले!

दुपारी २ ते ४॥ पर्यंत रंगलेल्या लेखिका-मेळाव्यानंतर कविवर्य अनिल यांच्या अध्यक्षतेखाली 'माझ्या मते, उत्कृष्ट कवितेचे गमक' या विषयावर परिसंवादाला सुरुवात झाली. सुरुवातीचे भाषण डॉ. अ. ना. देशपांडे यांचे झाले. त्यांनी आध्यात्मिक भूमिकेवरून काव्याचे गमक सांगताना सकाळचेच भाषण पुन्हा एकदा केले. त्यावरून त्यांच्या साऱ्या वृत्ति-प्रवृत्ति आध्यात्मिकतेने भरून गेल्या आहेत, हे लक्षात आले. त्यांच्या या वृत्तीची थट्टाही नंतरच्या वक्त्यांनी आपल्या भाषणांतून केली. संमेलनाच्या निमित्ताने प्रसिद्ध झालेल्या 'साहित्य साधना' या टीकालेखसंग्रहात 'काही विचारकण' या नावाचा डॉ. देशपांडे यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्ये सारे मराठी वाङ्मय व संस्कृत-साहित्यशास्त्र हे ब्राह्मणांनी निर्माण केलेले असल्यामुळे ते टाकाऊ आहे असे विधान केले आहे. त्यांच्या या विधानाचा व अलीकडच्या चार-दोन इंग्रजी पुस्तके वाचून जुन्यांचा अधिक्षेप करण्याच्या परभृत वृत्तीचा समाचार घेण्यासाठी डॉ. रा. शं. वाळिंबे उभे राहिले आणि त्यांनी अर्धा तासपर्यंत असे काही आवेशपूर्ण भाषण केले की सारा मंडप आणि श्रोते हादरून गेले. संस्कृत साहित्यशास्त्री काव्यविषयक किती दूरगामी व सर्वंकष विचार केला आहे हे सांगताना व त्याच्या संदर्भात अलिकडे या विषयासंबंधी बोलणाऱ्या प्राध्यापकांची इंग्रजी वाङ्मयातील अर्धवट उसनवारी याबद्दल बोलताना त्यांच्या वाणीला प्रखर धार आली. अस्खलित अमोघ वक्तृत्व व कमालीचा आवेश यामुळे डॉ. वाळिंब्यांनी तुडुंब भरलेल्या श्रोत्यांची मने काबीज केली. हा परिसंवाद वेळेच्या अभावी दुसऱ्या दिवशी पुढे चालू ठेवण्याचे ठरले.

डॉ. वाळिंबे यांचे भाषण पुढे कित्येक दिवस कानामनावर आघात करीत होते. नागपूरच्या आकाशवाणीने त्यांचेच भाषण ध्वनिमुद्रित करून दुसऱ्या दिवशी ऐकविले तेव्हा मुंबईकडचे नववाङ्मयाचे समर्थक म्हणाले,

"अहो बंद करा ते भाषण. आवाजाने तुमचा ट्रान्झिस्टर फुटेल.'

नवसाहित्याबद्दलचा आपला सारा संताप डॉ. वाळिंबे यांनी आपल्या भाषणात आवेगाने ओतला होता. डॉ. वाळिंबे यावेळी पुण्याच्या साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष होते; म्हणून तर संमेलनात उपस्थित राहिले होते. एरवी सभासंमेलनास हजर रहाण्याची त्यांची प्रकृती नाही. त्यांच्या उपस्थितीमुळे संमेलनात सारा मांडव हादरवून टाकणारे भाषण कसे असते त्याचा अनुभव आला.

दुसऱ्या दिवशी सकाळी 'ऐतिहासिक कादंबरीचे निकष' या विषयावर परिसंवाद झाला. अध्यक्ष महामहोपाध्याय पोतदार होते. प्रा. श्री. मा. कुलकर्णी, प्रा. द. भि. कुलकर्णी, प्रा. व. दि. कुलकर्णी व प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी या परिसंवादात भाग घेतला. प्रा. श्री. मा. व द. भि. यांनी बोलताना कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे निकष ऐतिहासिक कादंबरीला लावले. ऐतिहासिक या विशेषणाचे महत्त्व त्यांच्या लक्षात आले नाही. प्रा. द. भि. कुलकर्णी यांनी तर भावानुभूतीची 'लयबद्ध संघटना' म्हणजे कादंबरी या वळणाचे भाषण केले. त्याचा फारसा प्रभाव पडू शकला नाही. प्रा. व. दि. कुलकर्णी यांनी हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्या व रणजित देसाई यांची 'स्वामी' ही कादंबरी यांच्या संदर्भात चर्चा केली व 'स्वामी'तील प्रणयप्रसंग कसे रसविघ्नकारक आहेत, हे सांगितले. प्रा. भीमराव कुलकर्णी यांनी आपल्याकडची ऐतिहासिक कादंबरी भूतकालीन मराठी संस्कृतीचे चित्रण करण्यास सर्वस्वी कशी व का असमर्थ आहे याचे विवेचन केले. आपल्याकडे बखरीतून इतिहास शोधण्याची धडपड आहे. आणि साध्या बखरी पौराणिक स्वरूपाच्या असल्याने ऐतिहासिक कादंबऱ्याही निव्वळ पौराणिक स्वरूपाच्या व भावरंजक आहेत. माधवराव-रमाबाई यांच्या संबंधाचे एक काल्पनिक भावरंजक चित्रण एवढेच स्वरूप 'स्वामीचे' कसे रहाते हे त्यांनी स्पष्ट करून सांगितले.

या परिसंवादाचा विशेष असा की, त्यामध्ये सारेच काही कुलकर्णी होते. श्री. मा., द. भि; व. दि; भीमराव या कुलकर्ण्यांची मालिका पाहून दत्तो वामनांनीही आपण मूळचे कुलकर्णीच असल्याचे सांगितले व पु. शि. रेग्यांनीही आपले मूळचे आडनाव 'कुलकर्णी'च होते ते कसे बदलले हे सांगून वर्तुळ पूर्ण केले. त्यांच्यातील उत्कटतेमुळे साऱ्यांची मने गलबलून गेली व सर्वांच्या डोळ्यात टचकन पाणी उभे राहिले. संमेलनातील हा सर्वांत हृद्य प्रसंग होय.

दुसऱ्या दिवशी दुपारी आदल्या दिवशीच्या कवितेचा परिसंवाद पुढे चालू झाला आणि त्यामध्ये अनेक वक्त्यांनी हिरीरीने भाग घेतला. शेवटी समारोप करताना अनिलांनी डॉ. वाळिंब्यांच्या मताचा तितक्याच हिरीरीने पाठपुरावा केला. या परिसंवादातील प्रा. पंडित, कविवर्य खापर्डे, डॉ. देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख यांची भाषणे अतिशय चांगली झाली.

खुले अधिवेशन अल्पावधीतच आटोपले आणि शेवटी समारोपाच्या आपल्या भाषणात प्राचार्य रेगे यांनी या संमेलनाने आपण भारावून गेलो असल्याचे सांगितले आणि अशा प्रकारच्या संमेलनाचे महत्त्व आपल्या चांगले लक्षात आल्यामुळे आपली पूर्वीची सारी विधाने परत घेतल्याचे जाहीर केले.

या संमेलनाच्या यशाचे महत्त्वाचे सारे श्रेय वर्ध्याच्या नागरिकांना व स्वागत मंडळाच्या अविरत धडपडीला आहे. परंतु स्वागताध्यक्ष श्री. रामेश्वर बजाज व प्राचार्य वामनराव चोरघडे यांनी यासाठी जे कष्ट घेतले, जी अतिथ्यशीलता, योजकता व

तत्परता दाखविली ती दीर्घकाळ प्रतिनिधींच्या लक्षात राहील. श्री. बजाज यांचे सारे कुटुंबीय व मित्रपरिवार यासाठी राबत होता. स्वागताध्यक्ष श्री. बजाज यांचे भाषण छोटे परंतु आदबशीर व अगत्यपूर्वक जिव्हाळ्याने भरलेले होते.

आजकालच्या दिवसांत इतके अगत्यपूर्वक भरविलेले संमेलन मोठे दुर्मिळ; म्हणूनच त्याचे कौतुकही विशेष.

# लांबवत नेलेले संमेलन

एखादे संमेलन काही कारणांमुळे लांबत गेले तर पुढे सारे संमेलन लांबवीत जाण्याचा एक विक्रम करणारे संमेलन म्हणून १९८४ सालच्या ५८ व्या जळगावच्या संमेलनाचा उल्लेख करावा लागेल.

जळगावच्या संमेलनाध्यक्षींच्या निवडणुकीत प्रसिद्ध दलित लेखक शंकरराव खरात व कविवर्य बा. भ. बोरकर यांची लढत होती. दलितांनी यापूर्वी उधळलेल्या साहित्य संमेलनाची पुण्याची बाजू पुढे असल्याने कार्यकर्त्यांनी धसका घेतला होता. त्यामुळ या खेपेस दलित साहित्यिकास संमेलनाध्यक्षाचा मान देऊन त्यांचे ताबूत थंडे करावेत, असे आमच्या मनाने घेतले होते. त्याच हेतूने शंकरराव खरातांचा प्रचार सोबतकार ग. वा. बेहेरे यांनी धुमधडाक्याने चालवला होता. वास्तविक, बा. भ. बोरकरांचे श्रेष्ठत्व निरपवाद होते. परंतु त्यांनी मराठीस 'मावशी' म्हटल्यामुळे आपण सारे हिणवले गेलो आहोत ही मराठी माणसाची समजूत होऊन बसली होती. त्यातच गोमंतकीय प्रतिनिधींच्या मताचा समावेश करण्यावरून महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनीच कोर्ट-कचेऱ्यांचा ध्यास घेतल्याने अध्यक्षीय निवडणूक खूपच लांबली होती. ती इतकी की त्यामुळे परवा संमेलन भरावयाचे तर आज अध्यक्षाची निवड जाहीर होऊन अध्यक्षांना रात्रीत अध्यक्षीय भाषण लिहून काढावे लागले ! कदाचित् दोघांनीही आपली भाषणे अगोदर लिहून ठेवली असल्यास ते कळण्यास मार्ग नाही.

परंतु सारे काही महाभारत होऊनही जळगावला एक अभूतपूर्व गर्दी नव्हती. साहित्यिक फार थोडे, गर्दी अफाट. श्रोते सन्मुख तर साहित्यिक विन्मुख अशी त्याची अवस्था. परंतु त्यामुळे ते अयशस्वी झाले नाही. मग या साहित्य संमेलनाचे फलित काय ? असा प्रश्न विचारी मनाला पडला तर ते साहजिकच मानावे लागेल. महामंडळ सदस्यांच्या कोर्टकचेऱ्यांमुळे संमेलनासाठी उभी केलेली जळगावकरांची यंत्रणा वाया जाते की काय अशी भीती निर्माण झालेली असताना ठरलेल्या वेळीच संमेलन पार पाडण्याचा संयोजकांनी दाखविलेला अट्टाहास अखेर प्रभावी ठरला आणि संमेलन सुरळीत पार पडले.

चढती–वाढती गर्दी आणि चढता-वाढता मंडप, त्याला साजेसं श्रोत्यांचे बेसुमार कुतूहल आणि कमालीचा संयम, त्याचबरोबर एकावेळी एका पंक्तीत केलेली दीड हजार लोकांची भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था इत्यादी जमेच्या लक्षणीय बाजूमुळे संमेलन यशस्वी झाले असे म्हणण्यास हरकत नाही. अध्यक्षीय भाषणाच्या आणि स्मरणिकेच्या प्रति मिळविण्यात संयोजकांना शेवटपर्यंत यश आले नाही. अर्थातच तो दोष त्यांचा नव्हता. एका चांगल्या प्रदर्शनाची योजना हे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्टय.

गर्दीचा उच्चांक आणि निधी जमविण्यातलाही उच्चांक या दोन गोष्टी तर केवळ लक्षात राहण्यासारख्या नव्हेत तर बरीच वर्षे अनुल्लंघ्य ठरतील अशाच आहेत. शिल्लक राहिलेल्या रकमेतून साहित्य आणि संस्कृतीविषयक एक स्वायत्त संस्था उभी करण्यात यावयाची आहे, अशा वार्ता होत्या. त्या प्रत्यक्षात येवोत ही सदिच्छा. संमेलनाच्या यशस्वितेसाठी आणखी काय हवे असते ?

जळगावात आम्ही एक दिवस अगोदर पोहोचलो, तर तिथला भव्य मंडप पाहून पुण्याचे एक साहित्यिक म्हणाले,

‘ एवढा मोठा मंडप कशासाठी मांडलाय ? याच्या निम्म्यानंही तो भरला, तर जळगावच्या लोकांत काही पाणी आहे म्हणूया ! ’

‘ शुभ बोल, रे, नाऱ्या ! ’ म्हणून डोक्यावर टपली मारून या पुणेकराला गप्प बसविले गेले.

त्याच दिवशी जळगावात काही पुणेकरांनी एकत्र येऊन प्रा. गं. बा. सरदारांच्या नेतृत्वाखाली ‘ मराठी अन्याय निर्मूलन परिषद ’ बोलाविली होती. या परिषदेत शुभ न बोलण्याचा मक्ता केवळ पुणेकरांनीच नव्हे, तर नागपुरकरांनीही घेतला होता, हे लक्षात आले. पुण्याच्या श्री. ज. जोश्यांनी आणि नागपुरच्या वामनराव चोरघड्यांनी सन्मानाने भाषणे करण्यास आवाहन करूनही, शिक्षणाच्या माध्यमाच्या बाबतीत विरोधी सूर लावून परिषदेच्या कार्यकर्त्यांची पंचाईत करून टाकली !

अर्थातच छत्तीस साली स्टेजवर धमाल उडवून देणारे भाऊसाहेब कोलते आज वयाची पंच्याहत्तरी ओलांडून माजी अध्यक्ष या नात्याने संमेलनास उपस्थित होते. त्यांचे व्यासपीठावरचे अस्तित्व ही एक सुखद पर्वणी होती. व्यंकटेश माडगूळकर, वामनराव चोरघडे, गं. बा. सरदार आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे पूर्वाध्यक्षही व्यासपीठावर बसले होते.

अर्थातच, संमेलनाच्या यशस्वितेसाठी आणखी बरेच काही हवे असते. आर्थिक पाठबळ बेताचेच असून, गर्दीही जेवढ्यास तेवढी असूनही संमेलनात संमेलनाचे म्हणून एक सळसळते चैतन्य असते. त्याचा साक्षात्कार जळगावला झाला का ? संमेलनातील वाङ्मयीन चर्चेने काही एक वैचारिक पातळी गाठली काय ? अध्यक्षीय भाषणाने साहित्य विचारात, समीक्षेत काही भर घातली काय ?

या व अशासारख्या प्रश्नांना शांत चित्ताने काहीसे सामोरे गेले पाहिजे.

संमेलनाचे सर्वांत मोठे यश म्हणजे उद्घाटक म्हणून हिन्दीतील ज्येष्ठ कवयित्री महादेवी वर्मा यांची उपस्थिती. दोन वर्षांपूर्वी रायपूरला हिन्दी मुलखात उद्घाटक म्हणून त्यांचे नाव प्रसिद्ध होऊनही त्यांना आणण्यात संयोजकांना यश आले नव्हते. पण विश्व हिन्दी साहित्य-संमेलनाच्या संयोजनाची पुण्याई मधुकररावांना या वेळी उपयोगी पडली. केवळ त्यांच्याचमुळे महादेवीजी उपस्थित राहिल्या, यात शंका नाही.

उद्घाटक म्हणून महादेवीजींनी केलेले उत्स्फूर्त आणि उत्कट भावनेने भरलेले भाषण ही संमेलनातील फार मोठी कमाई. कमालीचे औचित्य, कमालीचे सौहार्द आणि अंगावर रोमांच आणणाऱ्या सहजात काव्यमयतेने ते ओतप्रोत भरलेले होते.

महाराष्ट्राची बहीण म्हणून मराठी बांधवांना राखी बांधायला आपण आलो आहोत. का ? तर स्वतःला क्षत्रिय म्हणविणाऱ्या राजपुतांनी ज्यावेळी तलवार खाली ठेवली होती, त्याचवेळी मराठी शिवाजीने ती उचलली म्हणून सबंध भारतातल्या आयाबहिणींची लाज राहिली. त्यानंतर १००-१२५ वर्षे मराठा गडी आपले घरदार विसरून अटकेपार घोडदौड करीत राहिला– का ? कशासाठी ? त्याला त्याची काय गरज होती ? तुम्ही मराठ्यांनी भारताची शान राखली. तुम्ही मराठे मोठे जिद्दीचे. मोठे स्वाभिमानी. आमच्या भागातील लोक वर्षभर युरोपात राहिले तर नखशिखांत अंतर्बाह्य पश्चिमी बनून येतात आणि तसेच राहतात. मराठी माणूस २५–२५ वर्षे पश्चिमी राष्ट्रांत राहिला तरी तो आपले मराठीपण कधी सोडत नाही आणि कधी विसरतही नाही. पश्चिमी संस्कृती आणि वाङ्मय यांनी साऱ्या भारतात सर्वांत कमी वर्चस्व जर कुठे गाजविले असेल तर ते केवळ महाराष्ट्रात. त्यामुळे भारत ज्या-ज्यावेळी प्राण संकटात असेल त्यावेळी महाराष्ट्रच त्याला तारील अशी आमची श्रद्धा आहे. त्या दृष्टीनेच आम्ही महाराष्ट्राकडे पाहतो. आजच्या राजकारणाकडे पाहून भलत्या भ्रमात राहू नका. ते तात्पुरते चार दिवस चालणारे नकली नाणे आहे. तुमच्या लोकमान्यजींसारखा साऱ्या भारताला वंद्य ठरलेला दुसरा नेता कोण आहे ? आमच्या बापूमध्ये एका माणसात असंख्य व्यक्तिमत्त्वे दडलेली आहेत, हे महाराष्ट्रानेच ओळखले ना ? बापूंचे गुरु महाराष्ट्रीय होते हे कोण विसरेल ? साहित्याच्या क्षेत्रात मामा वरेरकरांनी अलीकडच्या काळात साऱ्या भारतीय साहित्यिकांना संघटित केले. मामासारखी संघटक माणसे कुठे आहेत ? आम्ही हिमालयाच्या प्रदेशात राहतो; परंतु आमचा भरवसा आहे, तुमच्या सह्याद्रीवर. आम्ही गंगायमुनेच्या पवित्र भूमीत राहतो, पण तेथे राहात असताना तेथेच सरस्वती गुप्त रूपाने राहते असे लोक समजतात. परंतु खरे सांगू ? माझी अशी श्रद्धा आहे की, ती गुप्त सरस्वती महाराष्ट्रात आहे. मग अशा महाराष्ट्राकडे राखी घेऊन यायचे नाही तर कुणीकडे ?

महादेवीजींचे सारे व्याख्यान मोठे अर्थपूर्ण आणि औचित्यपूर्ण होते. महाराष्ट्राकडे तिकडे उत्तरेत कोणत्या भावनेने पाहिले जाते याचे ते प्रत्यंतर होते. पण उद्घाटन

होण्यासाठी त्यांच्यासारख्या विकल, वृद्ध व्यक्तीला ३-३॥ तास ताटकळत राहावे लागले आणि शंकररावांचे भाषण सुरू झाल्यावर खूपच थकवा आल्यामुळे त्यांना व्यासपीठा. वरून उतरवावे लागले. उशीर होऊ देऊ नये. उशीर होतो आहे म्हटल्यावर काही अनावश्यक गोष्टींना फाटा दिला पाहिजे याचे संयोजकांनी भान ठेविले नाही. अध्यक्ष निवडा न निवडा, संमेलन ठरलेल्या तारखेस होणार हा जसा जळगावकरांचा आग्रह तसाच ठरविलेले सारे झालेच पाहिजे असा त्यांचा अट्टाहास दिसला. एकेका प्रदेशाचा एकेक गुण असतो. मागे आंबेजोगाईला भोजनगृहात भोजन न देता, दिवसभर लाऊडस्पीकरवरून सतत ऐकविण्याचा आणि लोकांबद्दल बेपर्वाईचा मराठवाड्याचा गुण दिसून आला. त्यामुळे दासोपंताला दिवसाला ढबू पैशाची शाई का लागत होती, हे सहजपणे लक्षात येऊन गेले. तसे, खानदेशचा एका बाजूला आतिथ्य तर दुसऱ्या बाजूला आपले म्हणून काही सोडायचे नाही, हा अट्टाहास चांगल्याप्रकारे दिसून आला. ' बच्चे लोग टाली बजाव ' च्या धर्तीवर, ' शांत रहा, टाळ्या वाजवा, टाळ्यांचा कडकडाट करा, तो चालू ठेवा ' या कर्कश घोषणांच्या पार्श्वभूमीवर भाष्य करीत एका-पेक्षा एक वरचढ आवाजात स्वागतगीतांचा अखंड सूर सुरू झाला त्याचवेळी उद्घाटन सोहळा आणि सूर्यनारायण यांच्या स्पर्धा होणार, हे लक्षात आले. सूर्याने चुकून पश्चिमे-कडे मान टाकली, परंतु व्यासपीठावरच्या वक्त्यांनी आणि तुडुंब भरलेल्या श्रोत्यांनी-सुद्धा ( अहो आश्चर्यम् ) थकल्याची खूण मुळीच दाखविली नाही. उदघाटकांचा परिचय आणि तोही उद्घाटनापेक्षा दीर्घकाळ, असा अपूर्व प्रकार होता ! अधूनमधून खुलाशाचा, निवेदनांचा अखंड मारा इ. प्रकारांमुळे हा सोहळा कमालीचा लांबला. वास्तविक वेळेचे भान ठेवून स्मरणिकेसंबंधीची, प्रदर्शनासंबंधीची भाषणे अशांसारखे प्रकार निग्रहाने कमी करणे आवश्यक होते. अनेक गोष्टींना सहजपणे फाटा देता आला असता !

थंडीचे दिवस असूनही जळगावात त्याचा मागमूसही नव्हता. जळगाव म्हणजे उन्हाळ्यामुळे जळजळणारे गाव, त्याचा जलाशी काही संबंध नाही, ही त्याची खरी व्युत्पत्ती. संतप्त चंडिकरणांमुळे मंडप कमालीचा तापला होता. परंतु माणसं कमालीची शांत आणि धीमेपणाने आपले ठरविलेले कार्य करीत होती.

अध्यक्ष शंकररावांचे भाषण सुरू झाले तेव्हा एक वाजला होता. श्रोत्यांच्या पोटाचे भान ठेवून आपण सारे भाषण न वाचता केवळ मुद्दे थोडक्यात मांडणार आहोत अशी त्यांनी सुरुवात केली त्यावेळी त्या उकाड्यातही थंडगार वाऱ्याची झुळूक आली असे वाटले. पण क्षणभरच. शंकररावांना आपल्या भाषणावर नियंत्रण ठेवता आले नाही. अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी त्यांनी घेतलेल्या भूमिकेशी ते पूर्णपणे विसंगत होते.

संमेलनाचा उद्घाटन–सोहळा भलताच लांबला आणि ' लांबी ' हे जळगावच्या संमेलनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले. अध्यक्षाच्या निवडीपासून लांबणे सुरू झाले. अध्यक्ष–स्वागताध्यक्षांपासून सगळ्यांची भाषणे लांबत गेली, व्यासपीठावरचे निवेदक

आणि निवेदने क्षणाक्षणाला लांबवीत होते आणि परिसंवादाच्या वक्त्यांच्या लांबीला तुलनाच नव्हती. काव्यसंमेलन लांबले, म्हणजे पहाटेपर्यंत लांबले आणि तरीही सारे कवि संपले नाहीत. पुस्तके-विक्रीसाठी जे स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात आले होते, त्यांना केवळ लांबीच होती. जेवणाच्या रांगाही तशाच लांबलचक होत्या. (या मात्र आवश्यकच होत्या, नाही तर एवढ्या लोकांच्या पंक्ती उठविता-उठविताच नाकी नऊ आले असते!)

शंकररावांचे भाषण तयार होते, परंतु फारच थोड्या प्रती ऐनवेळी जळगावला उपलब्ध करण्यात आल्याने असंख्य प्रतिनिधींना भाषण छापील स्वरूपात उपलब्ध झाले नाही. छापलेल्या भाषणापेक्षा केलेले भाषण सर्वस्वी निराळे वाटले आणि बरेचसे विस्कळीत वाटले. अनौपचारिक बोलण्याच्या भरात ते खूपच वाहवत गेले.

अर्थातच त्याला शंकरराव तरी काय करणार? दि. २४ जानेवारीला रात्री अध्यक्षांची निवड जाहीर झाली, आणि २६ ला जळगावला जायला निघायचे होते. केवळ एका दिवसात त्यांनी अध्यक्षीय भाषण लिहिले केव्हा आणि कसे, याचेच आश्चर्य वाटते!

संमेलनाचा उद्‌घाटन-सोहळा दि. २८ जानेवारी रोजी सकाळी दहा ते दुपारी अडीच पर्यंत चालला. सकाळी नऊ वाजल्यापासूनच मंडप भरू लागला होता आणि दहा वाजायच्या सुमारास तर सारा मंडप गच्च भरून गेला होता. जेवढे लोक आत होते, तेवढेच बाहेर होते. व्यासपीठही गच्च भरले होते आणि व्यासपीठावर जायचे-उतरायचे, तर फक्त समोरूनच, अशी व्यवस्था होती! मागून पळून जाण्याची राजरोस सोय नव्हती!! त्यामुळे व्यासपीठावरच्या लोकांची चांगलीच पंचाईत होत होती. समोरचा जिनाही असा होता, की तो उतरताना भलभलत्या कल्पना मनात तरळून जात. वृद्ध साहित्यिकांना हात देण्यास संधी उपलब्ध व्हावी, हा त्यामागचा हेतू असावा!

अध्यक्षीय भाषणांत शंकरराव दलित साहित्याबद्दल बोलले. दलित साहित्याबद्दलचा त्यांचा आग्रह स्थूल, ढोबळ व बाळबोध स्वरूपाचा होता, परंतु जळगावकरांनी केलेल्या भव्य स्वागतामुळे आपण आता ज्या गावाच्या शोधात होतो, ते गाव आपणाला सापडले, या त्यांच्या विधानाने त्यांच्या साऱ्या भूमिकेमागचे अंकगणित अगदीच स्पष्ट झाले. दलितांवरच्या अत्याचारामुळे त्यांना ही भूमी आपली वाटत नाही, या भूमिकेतला दाह आणि विखार इतक्या साध्या कारणांमुळे नाहीसा होत असेल तर बाबासाहेबांचे बलिदान व्यर्थच गेले असे म्हणावे लागेल. शंकररावांचे समारोपाचे भाषण तर अगदीच अनौपचारिक आणि निरंग होते. पथनाट्याच्या पोरांनी खेळकरपणाने केलेल्या टीकेने ते चांगलेच रागावले आहेत, हेही त्यावेळी लक्षात आले. सौजन्यमूर्ती शंकरराव ज्यासाठी प्रसिद्ध होते, त्यापासून ते ढळले आहेत, ते साहित्यिक नसून 'दलित साहित्यिकच' आहेत आणि शंकररावही टीकेमुळे

रागावतात हे या संमेलनाने दाखवून दिले.

उद्‌घाटनाच्या सोहळयातील महादेवी वर्मा यांच्या व्याख्यानाखेरीज आणखी दोन व्याख्याने चांगली झाली. स्वागताध्यक्ष मधुकरराव चौधरी यांचे भाषण आणि पूर्वाध्यक्ष व्यंकटराव माडगूळकर यांचे भाषण. माडगुळकरांनी खरातांचीच 'फ्याशनेबल टेलर' ही कथा सूचकतेने सांगून अध्यक्षपदाची सूत्रे शंकररावांच्या हवाली करताना आटोपशीरपणा आणि नाट्यमयता यांमुळे मरगळलेल्या वातावरणात काहीशी जान आणली. या भाषणाचे नीट आकलन शंकररावांना झालेले दिसले नाही !

अलीकडच्या काही अध्यक्षीय भाषणातून साहित्याचे यथार्थ आकलन आणि समीक्षण करण्याबाबतीत ललित लेखक अध्यक्ष या नात्याने असमर्थ ठरतात याचे प्रत्यंतर येते. शंकररावांचे भाषण याच परंपरेतले वाटले. अर्थातच अध्यक्षीय भाषणासाठी चिंतन-मनन करण्यास शंकररावांना एक दिवसाचाही अवधी मिळाला नव्हता, हेही लक्षात घेतले पाहिजे.

जळगावकरांनी परिसंवादांचा आवाका फार मोठा ठेवला होता व त्यासाठी वक्त्यांची बेसुमार गर्दी केलेली होती. हौशे-नवशे-गवशे असे आणि वशिल्याने घुसलेले, कसलाही वकूब नसलेले कवी आणि वक्ते यांची संमेलनासारख्या ठिकाणी एक अखंड पीडा होत असते. ती निग्रहानं दूर सारली पाहिजे. संमेलनासारख्या गर्दीच्या ठिकाणी केवळ व्यासंगही पुरेसा नाही, केवळ वक्तृत्वही अनावश्यक ठरते. व्यासंग आणि समीक्षण दृष्टीबरोबरच १५–२० हजारांचे उद्‌बोधन करू शकेल अशा पातळीवरचे वक्तृत्वही लागते. अशा वक्त्यांची योजना करणे, त्यांना अभ्यासाला प्रवृत्त करणे, आणि ते येतील हे पाहणे ही जबाबदारी फार मोठी असते. एका परिसंवादासाठी १५–२० वक्ते म्हणजे विषयावर, श्रोत्यांवर आणि चांगल्या वक्त्यांवर असा तिहेरी स्वरूपाचा अन्याय असतो. जळगावला काही परिसंवादात मुळी चार–चार विषय होते. दहा–पंधरा मिनिटांत विषय मांडायचा म्हणजे चांगल्या वक्त्याचा गळा धरणे आणि बाष्कळ वक्त्यांना रान मोकळे सोडणे असा प्रकार होतो. हे दुसऱ्या प्रकारचे वक्ते कितीही आवरले तरी आवरत कसे नाहीत, याचे प्रत्यंतर वारंवार दिसून आले. दलित साहित्य संमेलनात ठोकावयाची भाषणे साहित्य-संमेलनात कंठाळी आणि आक्रोशी स्वरूपाची वाटतातच. परंतु नाविन्याच्या आणि आत्मशोधनाच्या अभावामुळे ती शिळपट कशी वाटतात हे यशवंत मनोहर आणि रावसाहेब कसबे आणि लक्ष्मण माने यांच्या भाषणांनी दाखवून दिले आणि त्यातही जाणकारीने बोलणारा अभ्यासक असतो हे केशव मेश्रामांनी दाखविले. रावसाहेब कसबे यांच्या भाषणातील स्त्रीसत्ताक राज्यासंबंधी एका श्रोत्याने स्पष्टीकरण मागितले असता त्यांची उडालेली तिरपीट आणि त्यांच्या स्पष्टीकरणातील हास्यास्पदता सामान्य श्रोत्यांच्याही लक्षात आल्याखेरीज राहिली नाही. विशेष म्हणजे पहिल्या परिसंवादास एकही वक्ता हजर नाही; परंतु परिसंवादाचे दोन्ही अध्यक्ष मात्र उपस्थित होते. आता तर्कतीर्थ आणि

सरदार उपस्थित असल्यानंतर इतर वक्त्यांची गरजच काय ? तरीही मुख्य कुस्तीपूर्वी काही किरकोळ कुस्त्या व्हाव्या, तसे काही आयत्या वेळचे वक्ते बोलल्यानंतर दोघा अध्यक्षांची जुगलबंदी श्रवणीय तर झालीच, परंतु प्रक्षणीयही झाली. डोक्यावरची टोपी थोडी पुढे करून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हसत हसत आणि संस्कृत ग्रंथांतील वचने उद्धृत करीत गमतीने, परंतु मोठे मार्मिक बोलणार आणि सामाजिक प्रबोधन आणि बहुजन-समाजाच्या उद्धाराच्या तळमळीने प्रा. गं. बा. सरदार भावपूर्ण आणि गंभीरपणे बोलणार. त्यांच्या डोक्यावरची गांधी टोपी नीट जागेवरच राहणार ! तर्कतीर्थांनी साहित्याच्या स्वायत्ततेचा पुरस्कार अभिनव रीतीने केला, तर सरदारांनी बांधिलकीचा आग्रह धरून समाजात जे वेगाने घडायला हवे, ते घडत नाही, याबद्दल खंत व्यक्त केली आणि वाट पाहून थकल्याचेही बोलून दाखविले. या दोघांचीही भाषणे ऐकून श्रोते तृप्त झाले !

कथा-कविता-कादंबरी-नाटक या वाङ्मयप्रकारांतील अलीकडच्या काळातील वाङ्मयामागच्या ऊर्मी आणि प्रेरणा या विषयावरच्या परिसंवादात एकही भाषण लक्षणीय होऊ शकले नाही. अगोदर परिसंवादाचे नियंत्रक म. ना. अदवंत यांनी नमनालाच घडाभर तेल घातले. वक्त्यांमध्ये नाव घेण्यासारखा एकही वक्ता उपस्थित नसल्याने घुसखोऱ्या वक्त्यांनी पुरेपूर पिडून घेतले. ‘ सत्तान्तर ’ ही माकडांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या संघर्षाची कथा आहे आणि या कादंबरीला ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले आहे ’ अशासारख्या विधानांनी दत्ता जी. कुलकर्णी यांनी कहर केला. शेवटी यादीत नसलेल्या माधव मनोहरांना नाटकासंबंधी थोडक्यात नेटके विवेचन करावे लागले.

चरित्र-आत्मचरित्र-समीक्षा-वृत्तपत्रे यांतील ऊर्मी आणि प्रेरणा या परिसंवादाचे नियंत्रण प्रा. गंगाधर पाटील यांच्यासारख्या जाणकाराला दिले, हे पाहून बरे वाटले. परंतु भलावण करणाऱ्या काही वक्त्यांनी त्यांच्या प्रयत्नांना दाद न देता कार्यक्रम लांबवत ठेवला आणि माधव मनोहरांनी समारोप करताना नियंत्रणाचा अभाव आणि बोलणाऱ्या वक्त्यांची अनावर लालसा यासंबंधी काणेकरांचे खोचक वाक्य उच्चारून या एकंदर प्रकारावर चांगलाच कोरडा ओढला. त्यामुळे बिचाऱ्या पाटलांवर मात्र अकारण अन्याय झाला. केवळ चरित्रे-आत्मचरित्रे लिहिली म्हणून त्यांना परिसंवादात भाग घ्यायला लावणे चुकीचे आहे. परिसंवाद हा सर्वांगीण समीक्षणाचा विषय असतो. श्रीपाद जोशी, दत्ता भट यांच्या आवाक्याबाहेरचा विषय असतो, हे लक्षात घेतले पाहिजे. संमेलनाच्या संयोजकांनी याची जाणीव ठेवली पाहिजे.

साहित्य-संमेलन हा क्रिकेटच्या खेळासारखा प्रकार आहे. क्रिकेटमध्ये कोणाची दांडी उडेल आणि कोण शतक गाजवून जाईल याचा नेहमीच अंदाज करता येत नाही. संमेलनातही काही वक्ते, कवी, कथाकार फड मारून जातात आणि जुनेजाणते निष्प्रभ होतात; आणि आपल्या कारागिरीवर ते संमेलनात आपला ‘ खेळ ’

दाखवितात. कवि-संमेलनात हे नेहमी दिसून येते. परंतु चार मुक्तछंदातल्या ओळी लिहिल्या म्हणून कवि-संमेलनात सहभाग मिळाला पाहिजे, या गवताऐशा उदंड वाढलेल्या कवीमुळे रात्र संपली तरी कविता संपत नाही, असा प्रसंग निर्माण होतो. बापट-पाडगावकर-करंदीकर, शंकर वैद्य, महानोर हे नामांकित कवी या कवि संमेलनात होते हा जसा मोठा आनंद, तसाच आपणाला संधी दिली नाही म्हणून काही कवींनी संयोजक उत्तम कोळगावकर यांच्यावर हल्ला करावा, हा चिंताजनक प्रकार. दरवर्षी साहित्य-संमेलनात एखादी तरी नवी कविता म्हटली पाहिजे, असा संकेत नामांकितांनी घालून दिला पाहिजे, असे मात्र आवर्जून म्हणावेसे वाटते.

कथा-कथनाच्या कार्यक्रमात एकही नामांकित कथाकार उपस्थित नव्हता हे या कार्यक्रमाचे दुर्दैव. वामनराव चोरघडे, रा. रं. बोराडे, आनंद यादव, श्री. ज. जोशी यांसारख्या उपस्थित असलेल्या नामवंत कथाकारांचा उपयोग करून घेण्याचे संयोजकांना कसे सुचले नाही कोण जाणे !

'आपल्या आयुष्यातील कसोटीचा क्षण' या परिसंवादात खुमारी आणली ती श्री. ज. जोशी यांनी. आपल्या वेगळेपणाची झलक दाखविणारे आणि काहीसे बाष्कळपणाकडे झुकणारे त्यांचे भाषण छान जमून गेले. गंभीरपणाने, तळमळीने आपल्या कादंबरीलेखनातील कसोटीच्या क्षणांचे शिवाजीराव सावंतांनी केलेले निवेदनही श्रोत्यांची दाद घेऊन गेले. तशीच दाद मिळाली 'स्त्री लिहू, बोलू लागली' या परिसंवादातील मुमताज रहिमतपुरे व डॉ. अंजली सोमण यांच्या व्याख्यानांना. परिसंवादाचे अध्यक्ष म्हणून डॉ. वर्टी यांनी लावलेल्या उपहास-उपरोधाच्या सुरामुळे बायका गांगरून गेल्या आणि विस्कळित बोलून गेल्या. अंजली सोमण यांनी या प्रकारावर आणि स्त्रियांच्या वाङ्मयावर लिहिणाऱ्या लेखकांच्या मनोवृत्तीवर छान कोरडे ओढले !

राजभाषा म्हणून परिभाषेच्या दृष्टीने, मराठीचा वापर, विज्ञानविषयक मराठीतले लेखन, शिक्षणाचे माध्यम, भाषा-प्रमाणपत्र-पोटभाषा इत्यादी विषयांवर तिसऱ्या दिवशी सकाळी एकाच वेळी तीन ठिकाणी परिसंवाद योजिले होते. ते ऐनवेळी बदलून एकाच व्यासपीठावरून घेण्याचे ठरले. या अवघड विषयांवरच्या परिसंवादाचे नियंत्रण डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी फार चांगल्या रीतीने केले. विषयातील मुद्यांचे स्पष्टीकरण देत, टीकाटिप्पणी करीत त्यांनी अनेक वक्त्यांना चांगल्या रीतीने वेसण घातली. राजभाषा म्हणून मराठीचा वापर आणि शिक्षणाचे माध्यम हे आजचे ज्वलंत प्रश्न आहेत. बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राज्यकर्त्यांना मायबोली मराठी राज्यकारभारात आणि शिक्षणात उपयोगी नाही असे वाटते. या परिसंवादात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भाषातज्ज्ञ, डॉ. अशोक केळकरांचा निबंध त्यांच्या अनुपस्थितीत वाचण्यात आला. डॉ. अशोक केळकरांनी एका मुलाखतीत कॉन्व्हेन्टमध्ये आपण आपली मुले घातली नाहीत, घालणार नाही,' असे

स्वाभिमानाने सांगितले होते. याउलट संमेलनाच्या अध्यक्षांनी (खरात) आपली मुले कॉन्व्हेन्टमध्ये शिकत असल्याचे सांगूनही टाकले होते. अशा परिस्थितीत बहुजन समाजाचे नेतृत्व करणाऱ्या प्राचार्य माळी आणि प्राचार्य पी. बी. पाटील यांनी पदव्युत्तर परीक्षापर्यंत सर्व थरांवर शिक्षणाचे माध्यम मराठीच असावे, असा आग्रह धरून त्यासंबंधी आपली महत्त्वाची भूमिका मांडली. डॉ. वि. रा. करंदीकरांनी सर्व थरांवर मातृभाषेचा आग्रह धरण्यातले धोके स्पष्ट केले असता, वरील वक्त्यांनी आपली भूमिका सोडली नाही, हे इष्ट लक्षण होय.

डॉ. वि. भि. कोलते यांनी सरकारी इंग्रजी पत्रे, निवेदने, मुद्रिते यांची जाहीर होळी करावी अशी भूमिका मांडली. एकंदर परिसंवादामध्ये विचारपूर्वक मांडलेल्या मतांमुळे गंभीर स्वरूपाचा आणि महत्त्वाचा ठरावा असा हाच एकमेव परिसंवाद होय. मात्र याही ठिकाणी ३॥ टक्केवाल्या लक्ष्मण माने यांनी प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांच्यासंबंधाने पूर्वग्रहदूषित, कंठाळी, भाषण करण्याच्या आपल्या बाण्याचे प्रदर्शन केले. निदान हा तरी आपला विषय नव्हे हे त्यांना कळावयास हवे होते!

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर चांगल्या रीतीने जळगावचे संमेलन पार पडले, असेच म्हणावे लागेल. लोकांना संमेलने त्यातल्या साऱ्या गुणावगुणांसह हवी आहेत, असेही दाखवून दिले!

शंकररावांसारख्या सज्जन आणि प्रांजळ साहित्यिकाची अध्यक्षपदी झालेली निवड हे त्याचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य.

प्रचंड आणि न हटणारी गर्दी, सर्वसामान्य जनतेच्या मनात वाङ्‌मयाबद्दलचे वाढते कुतूहल हे त्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य.

पुस्तक-विक्रीच्या दुकानांवरची गर्दी हा तेथील एक दिलासा. (अशोक शहाणे यांनी प्रसिद्ध केलेली पुस्तके खुद्द शहाणे काऊन्टरवर बसले असताही चांगल्या रीतीने खपली, मग इतरांबद्दल कशाला सांगा!)

कार्यकर्त्यांनी सर्व बाजूंनी ठेवलेली उत्तम व्यवस्था तर फारच लक्षणीय. रेल्वे गाड्यांना जादा डबे जोडून आणि जादा एस्ट्या सोडायला लावून आलेल्या साऱ्या प्रतिनिधींची केलेली परतीची सोय इतकी चांगली होती, की त्याबद्दल साऱ्या प्रतिनिधींनी त्यांना मनोमन दुवा दिला.

फक्त निरोप देताना एखादी दशम्यांची पुरचुंडी तेवढी साहित्यिकांच्या बरोबर दिली असती, तर....

पुढच्या संमेलनांच्या संयोजकांना वेगळे म्हणून काही करण्यासाठी जळगावकरांनी व्यवस्थेच्या बाबतीत तेवढेच बाकी ठेविले!

# साहित्य-संमेलनाचे वस्त्रहरण

अकोल्याला शाप आहे तो, शासननिष्ठेचा.

परंतु साऱ्या विदर्भात जिद्दीने दोन वेळा साहित्य-संमेलने भरविली ती फक्त अकोल्याने. नागपूर एवढे प्रतिराजधानीचे शहर, परंतु तेथेही फक्त अद्यापपर्यंत एकदाच संमेलन भरले. अमरावती हे नागपूरखालोखाल विदर्भातले महत्त्वाचे शहर-परंतु तेथे अद्याप एकदाही साहित्य-संमेलन भरले नाही !

अकोल्याला पहिले संमेलन भरले ते १९१२ साली. १९०८ साली लोकमान्य टिळकांना राजद्रोहाची शिक्षा झाल्यामुळे नेमस्तप्रेरित साहित्य-संमेलने पुण्यास काही काळ होणे अशक्य होऊन बसले होते. साहित्य परिषदेची स्थापना १९०६ साली पुण्यास होऊनही त्याकाळची पुण्याची जहाल हवा तिला मानवण्यासारखी नव्हती. त्यामुळे १९०७ ते १९१२ या काळात पुण्यास राहून तिला विशेष कार्य करता आले नाही. १९१२ मध्ये अकोला येथे भरलेल्या साहित्य संमेलनात परिषदेच्या घटनेला मंजुरी देण्यात आली आणि तीनुसार परिषदेचे स्थलांतर मुंबईस झाले. १९३२ ला पुणेकरांनी प्रयत्नपूर्वक तिला पुन्हा खेचून पुण्यास आणली. १९१२ ते ३२ या काळात परिषद म्हणजे नेमस्तांच्या राजनिष्ठेचे प्रदर्शन करणारी आणि त्याला साजेशी संमेलने भरविणारी एक संघटना होती.

या राजनिष्ठेचे पहिले उघड प्रदर्शन बारा सालच्या अकोल्याच्या संमेलनात झाले. अकोल्याला आपण हे संमेलन का घेतले, याचे स्पष्टीकरण त्यावेळी अकोल्याचे ज्येष्ठ नेते व साहितियक विष्णु मोरेश्वर महाजनी यांनी केले आहे. आदल्या वर्षी जॉर्ज बादशहा भारतात आले असता, त्यांनी हिंदुस्थानवासीयांना सभा संमेलने भरविण्याचा आदेश दिला. त्या आदेशामुळे अकोल्यातल्या तरुणांमध्ये उत्साह संचारला, आणि-

आणि त्याचीच परिणती साहित्य संमेलनामध्ये झाली !

भारताचे सम्राट जॉर्ज बादशहांनी आदेश दिला नसता तर संमेलन भरविण्याची यातायात वृद्ध महाजनींनी केली नसती हे उघड आहे.

संमेलनाची प्रेरकशक्ती यावेळी उपेक्षून कसे चालेल ! व्यासपीठावर जॉर्ज

बादशहा व राणी मेरी यांच्या भव्य प्रतिमा उभ्या करण्यात आल्या. 'भो पंचम जॉर्ज भूप' च्या आळवणीने संमेलन 'संपन्न' झाले. हिंदीमधल्या 'संपन्न झाले' या वाक्प्रचाराचा अर्थ कळण्यासाठी अकोल्याच्या संमेलनाकडे पावले वळवावी लागतात! बार्शी, आंबेजोगाई इ. ठिकाणी फक्त संमेलने झाली. संपन्न झाली नाहीत!

१९८० साली बार्शीत संमेलन भरल्यानंतर वर्षभराच्या आतच अकोलेकरांनी संमेलन भरविण्याचा चंग बांधला तो पुन्हा एकदा आपल्या शासननिष्ठेचे प्रदर्शन करण्यासाठी व आपल्या संपन्नतेचा प्रत्यय देण्यासाठी. परंतु कुणी विजय अळशी नावाच्या गृहस्थांनी निवडणूक-मतमोजणीच्या दिवशी कोर्टाकडून स्थगनादेश आणल्या-मुळे संमेलनाच्या तारखा पुढे ढकलल्या गेल्या. प्रत्यक्षात संमेलन १९८१ च्या फेब्रुवारीत 'संपन्न' झाले!

१९१२ चे अकोल्याचे संमेलन राजनिष्ठांचे असले तरी त्याचे अध्यक्ष मराठी कादंबरीकारांचे अनभिषिक्त सम्राट हरी नारायण आपटे हे होते. ते होते म्हणूनच त्यांचे अभिनंदन करण्यासाठी नामदार गोपाळ कृष्ण गोखले हजर होते आणि नामदार गोखले हजर राहाणार म्हटल्यावर अमरावतीचे दादासाहेब खापर्डे यांना संमेलनास हजेरी लावावेसे वाटून गेले. त्यांचा एक अपवाद सोडला तर बाकी सर्व नेमस्तांचीच मांदियाळी होती!

हरी नारायण आपट्यांचे अध्यक्षीय भाषण हे संमेलनाच्या अध्यक्षाचे पहिले दखलपात्र अध्यक्षीय भाषण. संमेलनाच्या ६० भाषणांमध्ये 'अव्वल दर्जाचे' म्हणून त्याचा उल्लेख करण्यात येतो. हरी नारायण हे संमेलनांचे पहिले लक्षवेधी सर्जनशील कलावंत. त्यांच्या अध्यक्षतेने संमेलनाला अभिमान वाटला.

त्यानंतर ६९ वर्षांनी भरलेल्या अकोल्याच्या संमेलनात राजनिष्ठेची पुनरावृत्ती झाली, परंतु हरी नारायणांच्या तोडीच्या अध्यक्षीय भाषणाची होऊ शकली नाही. हरी नारायणांच्या जवळपासदेखील या संमेलनातील अध्यक्षीय भाषणाला येता आले नाही! साम्य एकच. हरी नारायणांप्रमाणेच लेखनोपजीवी आणि पदवी नसलेला कादं-बरीकार याही वेळेस अध्यक्ष लाभला होता.

राजकीय परिस्थितीचा आणि संमेलन गाजण्याचा संबंध नेहमीच असतो. औरंगाबादचे संमेलन संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर, मडगावचे १९६४ चे संमेलन कोंकणी प्रश्नावर, कराडचे आणीबाणीच्या प्रश्नावर-

अकोल्याला एक वेगळीच परिस्थिती निर्माण झाली होती. शासनाने नेमलेल्या ग्रंथपारितोषिक समितीने पारितोषिकासाठी ज्या ग्रंथांची शिफारस केली होती, त्यांपैकी तीन ग्रंथ असे—

१) **सिंहासन** – ले. अरुण साधू

२) **जनांचा प्रवाहो चालिला** – विनय हर्डीकर

३) **जयप्रकाश नारायण** – बा. न. राजहंस

या तीन पुस्तकांना शासनाने पारितोषिक द्यावयाचे नाकारले. त्यामुळे या समितीच्या स्वायत्ततेचा प्रश्न निर्माण झाला. शासनाने समितीच्या निर्णयात फेरबदल करता कामा नये. पण तसे झाल्याने शासनाचा निषेध करावा या भूमिकेतून रीतसर निषेधाचा ठराव महामंडळाच्या दप्तरी दाखल झाला. महामंडळाने आपल्या बैठकीत संमत करून विषयनियामक समितीकडे त्याची रवानगी केली. शासन याबावतीत पूर्वी कधीच हस्तक्षेप करीत नव्हते. परंतु या खेपेस शासनाने काही तज्ज्ञांचा सल्ला घेतला म्हणे ! हे तज्ज्ञ कोण हे नंतर जाहीर झाले. डॉ. मंगुडकर, इंद्रायणी सावकार आणि पूना कॉलेजचे प्राचार्य कोणी शेख नावाचे अज्ञात गृहस्थ ! साराच विनोद होता !

विषय नियामक समितीने निषेधाचा ठराव मंजूर केला असता तर तो सरळ खुल्या अधिवेशनात आला असता. 'अकोला' हे राजनिष्ठांचे शहर असल्याने सत्ताधाऱ्यांच्या हस्तकांनी मंडपात काय काय अनावस्था प्रसंग निर्माण केला असता हे सांगवत नाही. कारण संमेलन सत्ताधाऱ्यांच्या बळावरच भरले होते ! त्यामुळे विषय नियामक समितीत ठराव पसार होऊ नये यासाठी शासकीय चक्रे हालू लागली.

काळ विलक्षण होता. आणीबाणी संपून 'जनता सरकार' चे औट घटकेचे राज्य संपुष्टात आले होते. आपापसांतील भांडणामुळे त्यांचे पानिपत होऊन गेले होते. आणि पानिपतवर सव्वा लाख बांगडी फुटल्याप्रमाणे आणीबाणी आपल्यामुळेच मोडीत निघाली या धुंदीत मशगूल असलेल्या महिला हातात बांगड्या आणि गळ्यात मंगळसूत्र न घालता काँग्रेसी सरकार पुन्हा कोसळण्याची स्वप्ने पाहात होत्या.

"खुल्क खुदाका, मुल्क नेहरू घरानेका, अंमल मलिका मुअज्जमा इंदिरा सरकारका" अशी परिस्थिती निर्माण झाली होती. जनता सरकारच्या प्रतिकूल परिस्थितीतही "इंदिरामाताजीखेरीज दुसऱ्यांना मुजरा करणार नाही" अशा प्रतिज्ञेने वावरणाऱ्या स्वामिनिष्ठांना जहागिऱ्या, सुभेदाऱ्या देण्यात आल्या होत्या.

महाराष्ट्र राज्याची सुभेदारी जनाब अब्दुल रहिमान अंतुले यांच्याकडे सुपुर्द करून शिक्के-कट्यार व वस्त्रे त्यांच्या हवाली करण्यात आली होती. विदर्भातले खासदार वसंत साठे यांची दरबारच्या मानकऱ्यांत खुर्ची मांडण्यात आली होती.

जनाबेआली अब्दुलसाहेब फार्मात होते. वडवळनाक्याचा कलंक विसरून गेले होते शिवाजी महाराजांना व पेशव्यांना हयातभर झगडून ज्या टीचभर जंजिऱ्याच्या सिद्दीचा पाडाव करता आला नव्हता, त्या सिद्दीला इंग्रजांनी एकोणिसाव्या शतकात आल्याआल्याच रसातळाला गाडले होते.

परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समुद्रकिनाऱ्यावर तस्करांचे एक अप्रतिहत साम्राज्य सुरू झाले होते, खेडोपाडी-घराघरांत दूरध्वनी आले होते, नवेवाडेहुडे उभे राहात होते. पाण्याप्रमाणे पेट्रोल मिळायला लागल्यामुळे आखाती प्रदेशात नशीब काढायला जाणाऱ्यांना अंतुले म्हणजे समुद्रकाठचा आपला राजा गादीवर आल्यासारखे वाटत होते आणि सुभेदारांच्या इशाऱ्यानुसार या ज्वालाग्रही पाण्याचा पैसा मुंबईकडे वाहायला

सुरुवात झाली होती. गावोगावी हेलिपॅड बांधून घरोघर हेलिकॉप्टर बाळगण्याची स्वप्ने अनेकांना पडू लागली होती.

संमेलनात शासनाच्या निषेधाचा ठराव पास होणे म्हणजे या नव्या सुभेदारांना अपशकुन करणे. तो होऊ नये यासाठी 'शासननिष्ठांची मांदियाळी' निरनिराळ्या प्रलोभनांच्या आशेने मुंबईच्या मंत्रालयाभोवती घिरट्या घालीत होती.

बुद्धिवंतांना, प्रज्ञावंतांना काबूत ठेवण्यासाठी पुरातन काळापासून दानदक्षिणांचे प्रलोभन राज्यकर्त्यांनी दाखवून ठेवले आहे. आधुनिक काळातील त्याचे नवे नाव म्हणज 'अनुदान'. जनाबे अंतुल्यांच्या कारकीर्दीत एका बाजूने पैसा देणाऱ्यांना सिमेंटच्या परवान्याचे दालन खुले झाले आणि दुसऱ्या बाजूने अनुदानसंस्कृतीची थैली मोकळी ठेऊन मागेल त्याच्या तोंडावर उदारपणाने अनुदाने फेकण्याचा पायंडा सुरू झाला. इंदिराजी विमानतळावर गळ्यात पडलेले हार मार्गात उभ्या असलेल्या जनतेच्या तोंडावर फेकीत जात, तर त्यांचे महाराष्ट्राचे सुभेदार अंतुलेमहाशय त्याच प्रकारे अनुदाने फेकत गावोगाव हिंडत. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत् ब्राह्मण भटजी, भिकारी आणि तमासगीर यांना बाजीराव म्हणजे साक्षात् श्रीकृष्णाचा, इंद्रचंद्राचा अवतार वाटत असे. श्रीवर्धनच्या भट घराण्याच्या भूमीवर आता बाजीरावाने अंतुल्यांच्या रूपाने पुन्हा जन्म घेतला होता! त्यामुळे त्यांच्याभोवती,

**श्रीमंत ईश्वरी अंश, धन्य तो वंश परमपुरुषार्थी**
**बरोबरी तयांची कोण करील पहातार्थी ?**

असे तारसुरात ओरडणारे भाट गोळा झाले होते. या भाटांपैकी जे साहित्यिक होते, त्यांच्या अपेक्षा अगदी माफक होत्या. साहित्य-संस्कृती मंडळावर निवड, शासकीय ग्रंथपारितोषिक समितीवर निवड, साहित्य अकादमीच्या सदस्यत्वासाठी शिफारस, एखादी युरोप-अमेरिकेची, रशिया-इंग्लंडची वारी आणि जमल्यास ज्ञानेश्वरांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे 'शासकीय मान्यतेचे पुष्टगंडू' (व्हीआयपी) म्हणून राजपत्रात नाव झकळणे. बस्स्! एवढे झाले की, सारे पितर स्वर्गात गेले!

हे सारे पदरात पाडून घेतले विदर्भातल्या एका पठ्याने! मधुकर आष्टीकर हे त्यांचे नाव. हे गृहस्थ यावेळी मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष होते. शासकीय महाविद्यालयात बऱ्यापैकी संस्कृतभाषेची प्राध्यापकगिरी करणाऱ्या या गृहस्थाने काही नाटके लिहिली आहेत. कवित्रर्य अनिलांनी यांना विदर्भ साहित्य संघात आणले आणि आपली कारकीर्द संपल्यावर यांना आपल्या खुर्चीवर वारसदार म्हणून बसविले.

जनाबे अंतुल्यांनी शिवचरित्र लिहिण्याचे, लंडनहून भवानी तलवार आणण्याचे जाहीर केले. अंतुले थोडेच शिवचरित्र लिहिणार होते ? आणखी थोडे दिवस त्यांचे राज्य चालते तर, त्यांनी निदान संस्कृत वाङ्मयाचा इतिहास लिहिला असता!

प्रा. मधुकर आष्टीकर आणि अंतुले यांची गट्टी जमली आणि परिणामी

३२५९
२५५६७
२९।८।८८

आष्टीकर लंडनची वारी करून आले. तेलगुभाषिकांनी विश्व तेलगू साहित्य संमेलन भारताबाहेर भरविले होते. साहित्यिकांऐवजी राजकारण्यांनी त्याच्या मिषाने परदेश-वाऱ्या करून घेतल्या. आष्टीकरांना लंडनमध्ये साहित्य-संमेलन भरविण्याची स्वप्ने पडू लागली. आता इतक्या सगळ्या गोष्टी अनुकूल झाल्यानंतर त्यांना अकोल्याच्या साहित्य संमेलनाने अध्यक्षपद आपल्याच गळ्यात पडावेसे वाटू लागले. नागपुरात व अकोल्यात, त्यांची ज्या पक्षाशी निष्ठा होती असे लोक होतेच! त्यांनी अकोल्याच्या स्वागत-समितीच्या एका निकटच्या सदस्याला हाती धरून 'संमेलनाचे अध्यक्ष आष्टीकरच व्हावेत' असा महामंडळाकडे जेव्हा ठराव आणला तेव्हा त्यांच्या हाल-चालींचे गांभीर्य लक्षात आले. दरम्यान अकोला-संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी प्रसिद्ध कादंबरीकार गो. नी. दांडेकर, नामवंत कादंबरीकार व विचारवंत सौ. मालतीबाई बेडेकर आणि विदर्भातले प्रसिद्ध कवी आणि गझलकार सुरेश भट ही नावे सुचविण्यात आली. खूप चर्चा-चिकित्सेनंतर आष्टीकरांना आपले नाव मागे घेणे भाग पडले. परंतु संमेलनामध्ये त्यांच्या विरुद्ध निषेधाचा ठराव घेण्याचे घाटू लागले.

अध्यक्षपदासाठी खरी लढत दांडेकर व बेडेकर यांच्यामध्ये होती. दोघांच्याही पाठीमागे त्यांचे मातबर प्रकाशक अनुक्रमे केशवराव कोठावळे आणि राजेदेशमुख होते. क्षयाने घेरल्यामुळे देशमुखांना फारशी हालचाल करता आली नाही. परंतु कोठावळ्यांनी आपल्या लेखकाकरिता जे जे करणे शक्य होते ते सारे केले. महा-मंडळाच्या घटनेनुसार सुमारे २५० मतदारांनी अध्यक्षांची निवड करावयाची होती. प्रकाशकांच्या साहाय्याने त्यांतील बहुसंख्य मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेण्याचे दिव्य दांडेकरांनी केले. तसे करणे आवश्यकच होते; कारण एकदा अध्यक्षपदाच्या रिंगणातून एखादा साहित्यिक बाहेर फेकला गेला की, पुन्हा स्थिर पायांवर उभे राहणे कठीण होते.

अडचण होती विदर्भ साहित्य संघाच्या मतदारांची. दांडेकरांचे एक बरे होते! कोकणात जन्म, विदर्भात बालपण आणि तरुणपण, मुंबईत पुस्तके प्रसिद्ध झालेली, विदर्भ-मराठवाड्यात गाडगे-महाराजांबरोबर घालविलेला काळ, नर्मदा परिभ्रमणामुळे मध्यप्रांताशी संबंध आणि शिवाजीवर कादंबऱ्या लिहिण्याच्या निमित्ताने कर्नाटक-आंध्रमध्ये केलेला प्रवास अशा अनेक नात्याने 'मी तुमचाच' म्हणून हात जोड-ण्याची त्यांना सोय होती! विदर्भामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पुण्याई त्यांच्या उपयोगास येणार होती! म्हणून त्यांनी 'तरुण भारत'चे साक्षेपी संपादक मा. गो. वैद्य यांनाच गाठले. त्यांच्या मध्यस्थीमुळे त्यांचा मार्ग सुकर झाला, परंतु आष्टीकरां-विरुद्ध ठराव संमत होऊ नये, याची जपणूक करण्याची जबाबदारी त्यांना शिरावर घ्यावी लागली.

स्वतःला 'अकिंचन' म्हणविणाऱ्या दांडेकरांनी प्रत्येक मतदार हा एक किल्ला समजून या काळात अखंड भ्रमंती केली. त्यांच्यापूर्वी व त्यांच्यानंतर इतक्या मोठ्या प्रमाणात गडकोट काबीज करण्यासाठी कोणीच प्रयत्न केले नव्हते व नाहीत!

तुलनेने मालतीबाइचा प्रचार जवळ जवळ नव्हताच, परंतु त्यांच्या लेखन-सामर्थ्याची जाण असणाऱ्यांना त्यांची यावेळी निवड व्हावी असे वाटत होते; त्यामुळे दांडेकरांना अनेक किल्ले दुराराध्य आहेत हे लक्षात आले. कराडला नुसते 'होय' म्हटले असते तर अध्यक्षपदाची माळ त्यांच्या सहजपणे गळ्यात पडली असती. त्यावेळी त्यांनी नाही म्हटले म्हणून यावेळी त्यांना निवडणुकीच्या जंजाळात अनिच्छेने पडावे लागले. कराडला दुर्गाबाईंनी महिषासूर मर्दिनीचा साक्षात्कार घडविला होता. मालतीबाई स्वतंत्र विचाराच्या असल्याने कराडची पुनरावृत्ती म्हणून अकोलेकरांना 'दांडेकर बरे' असे वाटणे साहजिक होते.

त्यामुळे दांडेकर निवडून आले, परंतु फक्त आठ मतांनी! 'दांडेकर बरे' असे वाटण्याचे कारण संमेलनापूर्वी ग्रंथपारितोषिकांच्या बाबतीत शासनाने केलेला अडाणी हस्तक्षेप!

या हस्तक्षेपामुळे अकोल्याचे संमेलन गाजणार हे उघड होते.

संमेलनापूर्वी केशवराव कोठावळे यांनी दांडेकरांच्या सत्कारानिमित्त पुण्याला आपल्या निवासस्थानी भोजन-समारंभ आयोजित केला होता. त्याला मुंबईहून जयवंत दळवी मुद्दाम उपस्थित राहिले होते. त्यांच्या आग्रहामुळे अकोल्यात आपण कोणती भूमिका घेणार, असा दांडेकरांना प्रश्न विचारण्यात आला. दांडेकरांना शासनाच्या विरुद्ध काहीही करावयाचे नव्हते हे तेथेच स्पष्ट झाले! 'मी आता सध्या काही सांगत नाही. ऐनवेळी कळेल' असे त्यांनी गुळमुळीत उत्तर दिले! ठरावाला पाठिंबा दिला नाही तर चालेल, परंतु त्यांनी ठराव मांडणाऱ्यांचे पाय ओढू नयेत, एवढीच त्यांच्या बाबतीत अपेक्षा राहिली.

अपेक्षाभंग व्हायचा तो राहिला नाही.

दांडेकर-अष्टीकर युती आणि संमेलनापूर्वीच निर्माण झालेले शासननिष्ठेचे वातावरण यांमुळे अकोल्याला न जाण्याचा निर्णय अनेक नामवंतांनी घेतला. वास्तविक अशा वेळी साहित्यिकांनी संमेलनापासून दूर न राहाता संघटितपणे आपला आवाज उठवायला हवा होता, परंतु बैल गेला आणि झोपा केला' ही म्हण साहित्यिकांच्या बाबतीत नेहमीच खरी ठरत आलेली आहे.

दांडेकर-अष्टीकरांमुळे अकोल्याच्या संमेलनात असे तंग वातावरण निर्माण झाले.

संमेलनाची सुरुवात फार चांगली झाली. कार्याध्यक्ष मधुसुदन वैराळे यांनी वऱ्हाडी मायबोलीतून अकोल्याचे सांस्कृतिक माहात्म्य नेटकेपणाने सादर केले. मुंबईच्या साहित्यिक वर्तुळातून अनेक वर्षे वावरल्यामुळे राजकारणी व्यक्तींमध्ये अभावानेच जाणवणारी एक रसिकता त्यांच्यामध्ये आहे. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या छोट्या स्वागतपर भाषणातून आले. उद्‌घाटक म्हणून केंद्रिय मंत्री खासदार वसंत साठे यांनीही आपल्या राजकीय ढंगाच्या वक्तृत्वाची चांगली चुणूक दाखविली.

त्यानंतर महामंडळाचे अध्यक्ष या नात्याने आष्टीकरांनी नको ते ढंग, नको त्या घोषणा आणि नको ते राजनिष्ठेचे प्रदर्शन करावयास सुरुवात केली. माजी अध्यक्ष या नात्याने नियोजित अध्यक्षांकडे अध्यक्षपदाची सूत्रे सुपुर्द करण्यासाठी आलेल्या प्रा. गं. बा. सरदारांच्या ते चांगलेच पथ्यावर पडले.

माजी अध्यक्षाला अधिकार सुपूर्द करण्याच्या निमित्ताने प्रा. गं. बा. सरदार केवळ पाच-सातच मिनिटे बोलले आणि त्यांच्या भाषणाने सारे संमेलन थरारून गेले. उद्‌घाटक म्हणून मंत्री वसंत साठे यांचे भाषण आणि आष्टीकरांची संमेलन लंडनला भरविण्याची घोषणा या दोन मुद्द्यांना धरून सरदारांनी आजच्या वैचारिक दारिद्र्यावर अगदी नेमक्या शब्दांत प्रहार केला. मंत्रिमहोदयांनी धर्म आणि बुवाबाजी या विषयावर न पेलणारा घास घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आगरकर ज्या शाळेत शिकले त्या शाळेच्या प्रांगणात भरलेल्या संमेलनामध्ये सरदारांच्या भाषणात क्षणभर आगरकरच संचारले आणि त्यांनी राजकीय विचाराच्या माजलेल्या घातकी बुवाबाजीवर मर्मग्राही प्रहार केला. संमेलने लंडनला भरविण्याऐवजी तळागाळातल्या जनतेसाठी ती लहानशा खेड्यांत भरवावीत असे त्यांनी म्हटल्यावर लक्षलक्ष हातांनी सरदारांच्या विचाराला उत्स्फूर्त दाद दिली. अकोल्याच्या संमेलनात सन्मानाने ज्याचा उल्लेख करावा असे जर काही अत्यंत महत्त्वाचे घडले असेल तर ते सरदारांचे पाच मिनिटांचे रोमांचकारी भाषण ! या भाषणानंतर पुन्हा ' लंडन ' ऐवजी ब्रह्मपुरीला भरविण्याची आष्टीकरांची कोलांट उडी तयारच ! महामंडळाच्या बैठकीमध्ये सर्वानुमते संमत झाल्यानंतर जी गोष्ट जाहीर करावयाची ती दडपून कोणालाही न विचारता जाहीर करण्याचा आगाऊपणा आष्टीकरांपूर्वी दुसऱ्या कोणी केला नव्हता ! महामंडळाच्या सदस्यांनी जाब विचारल्यावर पुन्हा क्षणात माफी मागायलाही हे तयार !

सरदारांच्या भाषणाने संमेलनाचे कार्यकर्ते खूपच अस्वस्थ झाल्याचे तात्काळ लक्षात आले. केंद्रीय मंत्र्याच्या पंक्तीला ज्यांच्या शेजारी सरदारांनी भोजनास बसावयाचे असे ठरले होते, त्यांची मंत्र्यांनी वाट न पाहता आपल्या गोतावळ्याची पंक्तींसाठी निवड केली. कऱ्हाडला दुर्गाबाईंच्या जयप्रकाश—गौरवाने यशवंतराव अस्वस्थ होतेच. दुर्गाबाईंच्या शेजारी बसून जेवण्याचे त्यांनी टाळले. यशवंतराव त्यावेळी रागाने फसफसत होते !

सरदारांच्या उपस्थितीत विषयनियामक समितीची बैठक घेण्याची टाळाटाळ कार्यकर्ते करू लागले. त्यांना सरदारांचा आता धाक वाटू लागला होता. दोन तारखेला पाच वाजता सरदार परत जाणार याची खात्री पटल्यानंतर त्यांनी विषयनियामक समितीची बैठक जाहीर केली आणि तीत प्रा. त्र्यं. कृ. टोपे यांचे सरदारनिंदेचे पत्र आणवून ते चक्रमुद्रित करून बैठकीत वाटण्याची व्यवस्था केली ! टोपे यांनी मुंबईहून ३१ तारखेला पत्र लिहून टाकले आणि ते दोन तारखेला अकोल्याला आदल्या दिवशी पोचून त्याच्या प्रतीही निघाल्या आणि त्या तत्परतेने वाटल्या गेल्या ! यापाठीमागचा

सारा बनाव लक्षात येण्यासारखा होता. दुसरी लक्षात आलेली गोष्ट म्हणजे संमेलनास प्रा. मा. प. मंगुडकरांची उपस्थिती. तिन्ही पुस्तकांतील त्याना आक्षेपार्ह वाटणाऱ्या उताऱ्यांचे मंगुडकरांनी केलेले चक्रमुद्रित संकलन प्रकाशित करण्यात आले होते. खुल्या अधिवेशनात जरूर पडल्यास ठरावास विरोध करण्याची जय्यत तयारी ते करीत होते.

दांडेकरांचे अध्यक्षीय भाषणही फारसे सुखावून गेले नाही.

हरी नारायणांप्रमाणे कादंबरीकार म्हणून लोकप्रिय असलेल्या गो. नी. दांडेकरांकडून या अत्युच्च सन्मानप्रसंगी काही महत्त्वाचे वाङ्मयासंबंधीचे विचार ऐकायला मिळावेत, अशी अपेक्षा होती.

हरी नारायणांचा एक अत्यंत महत्त्वाचा विशेष असा की, ते स्वतःबद्दल आणि स्वतःच्या साहित्याबद्दल जवळजवळ काहीच बोलले नाहीत. आपल्या अवतीभवती घडणाऱ्या तात्कालिन घटनांपेक्षा वाङ्मयातील शाश्वत विचाराकडे त्यांचे लक्ष असे. त्यामुळे कादंबरीकार म्हणून सर्वश्रेष्ठत्वाचा मान जसा आजही त्यांच्याकडे जातो, तसाच वाङ्मयातील मूलभूत प्रश्नाची सखोल जाणीव देणारे साहित्यिक म्हणूनही काळाच्या संदर्भात हरी नारायण हे मराठीतले आद्य साहित्यचिंतनकार ठरतात. ( त्यांच्या बरोबरीने त्याकाळी साहित्यचिंतनकार म्हणून नाव घ्यायचे तर फक्त श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे घ्यावे लागते. )

हरी नारायणांशी दांडेकरांची साहित्यचिंतनकार म्हणून कोठे तुलनाच होऊ शकत नाही. दांडेकरांच्या लेखनाचा परीघ त्यांच्या स्वतःभोवती इतका मर्यादित आहे की, त्यामुळे त्यांचे सारे लेखन अत्यंत आत्मकेंद्री झाले आहे. आत्मसंतुष्टता आणि त्यातून निर्माण होणारी आत्मश्लाघा यात ते पूर्णपणे डुंबलेले किंवा बुडलेले आहेत !

दांडेकरांनी आपल्या भाषणाचा महत्त्वाचा भाग आपले आत्मचरित्र पुन्हा सांगण्यासाठी खर्ची घातला. आपल्या बालपणी झालेले कहाण्यादिकांचे, वयात येत असताना हरी नारायणादिकांचे आणि वयात आल्यानंतर अगोदर गाडगेबाबांचे आणि नंतर ज्ञानेश्वर-तुकारामांचे असे संस्कार आपल्यावर कसे झाले, याचे त्यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत वर्णन केले. त्यापूर्वी त्यांनी रीतीप्रमाणे वऱ्हाडमाहात्म्य गायिले आहे. त्यांमध्ये त्यांना चक्रधरांचा उल्लेख करता येऊ नये, हे जसे लक्षणीय आहे तसेच बाबा आमट्यांपूर्वी वऱ्हाडात कुष्ठरोग्यांसाठी आयुष्य घालविणाऱ्या शिवाजीराव पटवर्धनांचेही त्यांना विस्मरण व्हावे, ही गोष्ट खूपच बोलकी आहे.

आपल्या ' स्मरण गाथा ' या आत्मचरित्रात सांगितलेले सारे काही संक्षिप्त स्वरूपात पुन्हा सांगण्यात दांडेकरांचा हेतू काय असावा, असा प्रश्न त्यांचे भाषण वाचत असताना सतत मनात उभा राहिला. दांडेकरांना स्वतःखेरीज काही बोलता किंवा विचार करता येत नाही, असा त्याचा अर्थ आहे.

आपल्या लेखनामागे आपल्या आयुष्याचे खडतर भोगणे आहे, त्यामुळे ते आत्मप्रतीतीचे आहे, असा एक स्वाभिमानी अहंकार त्यामागे आहे. ऐतिहासिक

कादंबऱ्या लिहिण्यासाठी आपण घेतलेल्या परिश्रमांचा ज्यावेळी ते उच्चरवाने उल्लेख करतात, त्यावेळी ही गोष्ट एकदम लक्षात येते. आपण खूप हिंडलो, किल्लोकिल्ली भटकलो ( अनर्थ मांडिला ! ) त्यामुळे हे शिवधनुष्य उचलण्याचे सामर्थ्य आपणाला प्राप्त झाले, असे त्यांना म्हणावयाचे आहे. म्हणजे हस्तिदंती मनोऱ्यात बसून लेखन करणाऱ्या साहित्यिकांपेक्षा आपला ' अहंविशेष ' स्पष्ट करण्यासाठी दांडेकरांना आपले आत्मचरित्र पुन्हा सांगावे लागले आहे.

२५ वर्षांपूर्वी मुंबईच्या एका उपनगर साहित्य-संमेलनात खांडेकरांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे भाषण झाले होते. त्यावेळी ' शितू ' आणि ' कुण्या एकाची भ्रमणगाथा ' या त्यांच्या सुरुवातीच्या कादंबऱ्यांमुळे त्यांच्याबद्दल खूपच अपेक्षा निर्माण झाल्या होत्या. त्यावेळी बोलताना ते म्हणाले होते—

' मी एक खेडवळ, अडाणी माणूस आहे. माझ्या नर्मदेच्या परिक्रमेमध्ये माझ्या हातात चुकून हिंदीत भाषांतर झालेले शरश्चंद्र-वाङ्मय पडले. त्याखेरीज मी कसलेही वाङ्मय वाचलेले नाही. मराठी तर मुळीच नाही. माझ्यावर काही परिणाम असेल तर फक्त शरश्चंद्राचा ! '

या त्यांच्या भाषणाशी अकोल्याच्या भाषणाचा सुरुवातीचा भाग ताडून पाहिला तर काय दिसते ?

लोकांच्या विस्मरणातूनच आत्मचरित्रे निर्माण होतात, या सिद्धान्ताचे येथे स्मरण होते.

दांडेकरांच्या या अध्यक्षीय भाषणामुळे त्यांच्या आत्मकथेची विश्वासार्हता शंकास्पद वाटते.

हरी नारायणांचे सारे लेखन योजनाबद्ध असल्याचा त्यांच्या भाषणातील उल्लेख अनभिज्ञतेचा होता. हरी नारायणांनी ' करमणुकी 'तून घाईघाईने जुळाऱ्याच्या काचामुळे क्रमशः कादंबऱ्या लिहिल्या, असा इतिहास आहे.

ज्ञानेश्वरांचे वाङ्मय ' सूत्रबद्ध ' असल्याचा त्यांचा उल्लेखही असाच बुचकळ्यात पाडणारा आहे. गीतेच्या ७०० श्लोकांवर ९००० ओव्यांचा उपमादृष्टांतांच्या साहाय्याने केलेला विस्तार हा सूत्रबद्ध कसा, हे काही कळत नाही.

प्रक्षोभ रसाचा उल्लेख १९५७ साली मालवणच्या संमेलनात अनिलांनी केला होता आणि त्यानंतर त्याचा त्यांनी सातत्याने पुरस्कार केला आहे. दांडेकरांना तो माहीत नसावा, याचेही आश्चर्य वाटते.

दांडेकरांच्या भाषणाचा उर्वरित भाग एखादा साहित्यविषयक प्रश्न, काही तात्कालीन प्रश्न, काही साहित्यिकांचे आणि ग्रंथांचे उल्लेख अशा प्रकारचा आहे.

आजच्या गुंतागुंतीच्या जीवनप्रवाहामध्ये मानवी मनाच्या जटिलतेचा वेध घेणाऱ्या आजच्या वाङ्मयाशी आपले काही नाते नाही, हे दांडेकरांनी प्रांजळपणे कबूल केले एवढे मात्र बरे झाले ! आपल्या वाङ्मयाचे नाते त्यांनी ' सौभद्र ' सारख्या

नाटकाशी जोडले आहे. दांडेकरांचे सारे भाषण म्हणजे वाङ्मयीन विचाराबद्दलच्या प्रचंड गोंधळाचे प्रदर्शन !

आजच्या ' हॉट ' नाटकावर तुटून पडताना त्यांनी ' आपण जे लिहितो ते तसे लिहिण्याचा आपणाला अधिकार नाही काय ? ' अशा आवेशात प्रश्न विचारला होता. हॉटवाले जे लिहितात त्यासाठी जर लोक रांगेत उभे राहून तिकिटासाठी गर्दी करीत असतील ( तसे दांडेकरच सांगतात ) तर त्यांनाही तसे लिहिण्याचा अधिकार प्राप्त होत नाही काय ? सगळाच विनोद !

दांडेकरांनी त्यांना केवळ माहीत असलेल्या चारदोन साहित्यिकांचा मराठीतील उल्लेखनीय साहित्यिक म्हणून उल्लेख केला. तर मराठीतील महत्त्वाचे ग्रंथ म्हणून ज्यांचा उल्लेख केला तो जवळजवळ अत्यंत बालिशपणाचा वाटला. ' पेशवेकालीन महाराष्ट्र ' आणि ' महाराष्ट्र संस्कृती ' हे मराठीतील अव्वल दर्जाचे ग्रंथ ? दांडेकरांनी मराठी वाङ्मयाची थट्टा करण्याचे तर मनात आणले नाही ना ? ' पंचधारा ' या नियतकालिकाचा उल्लेख केला, परंतु त्यासारख्या मराठीतील महत्त्वाच्या प्रयत्नांची दखल घ्यावयास नको काय ?

तत्कालीन प्रश्नांपैकी पुणे विद्यापीठातील वाणिज्य विभागातून मराठी काढल्याचा उल्लेख आणि दूरदर्शनवरच्या कार्यक्रमाचा उल्लेख यांचा उल्लेख पाहाता दांडेकरांचे सारे भाषण ते आणि त्यांचे अंतर्वर्तुळ यांच्यापुरते मर्यादित असल्याचे लक्षात येते. इतके आत्मकेंद्री भाषण आजपर्यंत साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावरून दुसऱ्या कोणी केले नव्हते.

शासनाने पारितोषिके देण्याची जबाबदारी स्वीकारू नये, असे एकदा म्हटल्यानंतर मग त्यासाठी त्यांनी सुचविलेला सगळा मार्गच अव्यवहार्य बनतो. या समितीवर संमेलनाच्या अध्यक्षांची व महामंडळाच्या अध्यक्षांची वर्णी लावण्याची सूचना तर त्यांनी स्वप्नातही करायला नको होती. त्याचयासारखी दुसरी हास्यास्पद गोष्ट नसेल !

त्यांच्या भाषणातील तत्कालीन प्रश्नांपैकी महत्त्वाचा प्रश्न साहित्यिकांच्या प्रतिष्ठेचा. शासनाने नाकारलेल्या पारितोषिकांच्या बाबतीत जी भूमिका घेतली, त्याचा त्यांना झडझडून निषेध करता येऊ नये याचे दुःख तर पराकाष्ठेचे.

वास्तविक केवळ साहित्यावर सन्मानाने जगणाऱ्या दांडेकरांसारख्या निःस्पृह माणसाला या निमित्ताने शासनाशी जो संबंध आला त्याची भीड पडून गुळमुळीत लिहावे लागते हे मोठेच दुर्दैव होय.

आयुष्यात काही एक विलक्षण योग येतात. त्यावेळी अंतःस्फूर्तीने त्या प्रसंगाचे आव्हान स्वीकारण्याची अंतःस्फूर्ती आपल्या अंगात असावी लागते. त्यालाच हटयोग म्हणतात.

' तो योग खरा हटयोग लाभला ज्याला
लाभते किर्तीही त्याला जगभरी '

असे त्याबद्दल म्हटले जाते. एका क्षणाच्या आव्हानाचे चिरंतन स्वाभिमानात रूपांतर होते. काणेकर, शिरवाडकर व दुर्गा भागवत यांनी असा स्वाभिमान यापूर्वी दाखविला होता.

दांडेकरांच्या ते पिंडातच नसल्यामुळे दांडेकर एका मोठ्या योगाला हुकले आणि त्याची भोगात परिणती झाली.

दांडेकरांच्या वैचारिक भूमिकेच्या मर्यादा त्यांच्या समारोपाच्या भाषणात प्रकर्षाने दिसून आल्या. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून वाङ्मयीनदृष्टया महत्त्वाचा काही एक विचार मांडावा, असे त्यांना वाटलेच नाही. त्यांनी जुजबी आभारावर वेळ मारून साऱ्यांची निराशा केली. शासकीय पारितोषिकासंबंधी निर्माण झालेल्या पेचप्रसंगासंबंधी मी संमेलनात काय म्हणतो ते पाहा, असे ते सत्काराच्या भाषणांतून सांगत होते. ' आपल्या भाषणात निषेधाचा शब्द वापरला तर विवेचनच खुंटते म्हणून शेवटपर्यंत वाट पाहा ', या त्यांच्या आश्वासनाप्रमाणे समारोपाच्या भाषणात ते काही ठाम भूमिका घेतील असे वाटले होते, परंतु त्यांनी कसलीच भूमिका घेतली नाही. आपले संमेलन उधळले जाणार नाही आणि अकोलेकर संयोजक नाराज होणार नाहीत इकडे त्यांचा कटाक्ष दिसला. संमेलनाच्या उधळण्याचे भूत विनाकारणच त्यांच्या मानगुटीवर बसलेले दिसले.

शासनविरोधी ठरावामुळे अकोल्याची विषयनियामक समितीची बैठक गाजणार हे ठरलेलेच होते. हा ठराव संमत होऊ नये यासाठी कार्यकर्त्यांनी हालचाली केल्या होत्या. वसंतराव साठे त्यासाठी दिल्लीहून आले होते. विषयनियामक समितीचे सदस्य नसतानाही ते बैठकीला उपस्थित राहिले. बैठकीची सुरुवात तर महामंडळाच्या अध्यक्षांनी मांडलेल्या शासनाच्या आणि अंतुल्यांच्या अभिनंदनाच्या ठरावाने झाली. गो. नी. दांडेकर, आष्टीकर म्हणतील त्याला ' मम ' म्हणत होते. शासनाचा निषेध करण्यासाठी जमलेल्या प्रतिनिधींना अभिनंदनाच्या ठरावात सहभागी व्हावे लागत होते.

यावेळी निषेधाचा ठराव आणण्यासाठी ' सोबत 'कार ग. वा. बेहेरे यांनी एकाकी लढत घेतली. अधिकार नसता या बैठकीत साठे उपस्थित कसे राहू शकतात, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी साठ्यांची अवस्था बघण्यासारखी झाली. त्यांनी बैठकीतून उठून जाण्याची तयारी दाखविली. चर्चेनंतर त्यांनी उठून जाऊ नये असे ठरले आणि त्यांना बोलू देण्यात आले. अत्यंत आर्जवीपणाने आणि नम्रपणाने ते म्हणाले, ' मी कसलाही दबाव आणण्यासाठी येथे आलेलो नाही. आम्हाला लोकांनी निवडून दिले आणि लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही सत्तेवर आलो. उद्या जर आमच्याच मतदारांनी आम्हाला असे विचारले की आमच्याच श्रेष्ठ नेत्यांचा अपमान करणाऱ्या पुस्तकांना तुम्ही सरकारी पारितोषिक का दिले तर आम्ही त्याला काय उत्तर देणार ?'

ते भाषण संपवून जात असताना बेहेऱ्यांनी ' आता आमचेही भाषण ऐकून मगच जावे ' असे सांगितले आणि ते खाली बसले. बेहेरे म्हणाले, " तुमचे म्हणणे तसे

बिनतोड वाटते. पण त्यात एक गफलत आहे. तुम्हाला लोकांनी निवडून दिलेले आहे. तुम्ही लोकप्रतिनिधी आहात ही तर वस्तुस्थितीच आहे. पण आम्ही येथे जमलेले लोकसुद्धा काही भडभुंजे नाही. आम्हालाही लोकांनी निवडून दिलेले आहे. आम्हीही लोकप्रतिनिधी आहोत आणि आमची नेमणूक लोकांनी केवळ पाच वर्षांच्या करारावर केलेली नाही. उद्या जर त्यांनी असे विचारले की तुमच्या श्रेष्ठ साहित्यिकांचा अपमान होतो तर मग तुम्ही साहित्य संमेलनाला जाताच कशाला ? किंवा साहित्य संस्था काढताच कशाला ? त्यांना काय उत्तर द्यायचे, ते आधी तुम्ही आम्हाला सांगावे म्हणजे तुमच्या मतदारांना तुम्ही काय उत्तर द्यायचे हे आम्ही तुम्हाला ताबडतोब सांगू शकतो."

साठे निरुत्तर झाले. परंतु शासननिष्ठांचे बैठकीत बहुमत होते. त्यामुळे तडजोडीवर भर द्यावा लागला. पन्नास सह्यांच्या साहाय्याने ऐनवेळी हा ठराव खुल्या अधिवेशनात मांडण्यासाठी आम्ही थोडीफार धडपड केली. बेहेऱ्यांनीही त्याला साथ द्यावयाचे कबूल केले.

संमेलनाच्या व्यासपीठावरून आपली भूमिका मांडण्याचा त्यांचा प्रयत्न एरवी यशस्वी झाला नसता, परंतु संयोजकांनी दलित साहित्यावरच्या परिसंवादाची सूत्रे आयती त्यांच्या हातात दिल्याने त्यांनी तेथे विषयनियामक समितीतील पडद्याआडच्या वादांचा गौप्यस्फोट करून धमाल उडविली ! पत्रकार परिषदांतील परस्परविरुद्ध निवेदनांनी त्यामुळे अकोला संमेलन चांगलेच गाजले. बेहेऱ्यांमधल्या जातिवंत पत्रकाराचे यावेळी चांगले दर्शन घडले.

बेहेऱ्यांच्या घणाघाती भाषणामुळे नंतर वेगळ्या ठरावाची गरज राहिली नाही. सरदारांनंतर अकोल्याच्या संमेलनावर बेहेऱ्यांचा प्रभाव दिसून आला !

अकोल्याच्या संमेलनात जो जनसागर लोटला होता तो साहित्यप्रेमिकांच्या डोळ्यांचे निःसंशय पारणे फेडणारा होता. कविवर्य कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली मडगाव ( गोवा ) येथे १९६४ साली भरलेल्या साहित्यसंमेलनात यापूर्वी अशीच अभूतपूर्व गर्दी जमली होती. मडगावच्या संमेलनाचा मंडपही अकोल्याप्रमाणेच भव्य, परंतु अकोल्याहूनही देखणा आणि कलापूर्ण होता. अकोल्याने मुद्दाम बार्शीहून मंडपासाठी कंत्राटदार बोलावला होता, तर गोव्याने पुण्याहून ! दत्तो वामन पोतदारांनी आभाराच्या भाषणात गोव्याच्या मंडपाची पांडवांच्या राजसूय यज्ञमंडपाशी तुलना केलेली होती आणि त्या प्रसंगी दत्तो वामनांच्या आभाराच्या भाषणाचे काय वर्णन करावे ! त्याची तुलनाच करता येणार नाही.

मडगाव, इचलकरंजी, कराड, पुणे आणि अकोला या ठिकाणच्या संमेलनामधून त्यांच्या भव्य मंडपाबरोबर त्यांमधून वावरणाऱ्या एकापेक्षा एक श्रेष्ठ साहित्यिकांच्या दर्शनाने तृप्त व्हावे, असे वातावरण होते. औरंगाबाद, मडगाव, कराड या संमेलनांतून आणीबाणीचे आणि अटीतटीचे प्रसंग उद्‌भवले होते. त्यांना जिद्दीने सामोरे जाण्याचे धैर्य त्या काळच्या संमेलनांच्या अध्यक्षांनी दाखविले होते.

अकोल्याच्या संमेलनाच्या वेळी सारी परिस्थिती पालटली होती. संमेलनाच्या ५५ माजी अध्यक्षांपैकी इचलकरंजीच्या वेळी सुमारे २० अध्यक्ष व्यासपीठावर उपस्थित होते, तर अकोल्यात इनमीन दोन. १९६८ साली वर्धा येथे भरलेल्या काव्य-विषयक परिसंवादात वीसावर वक्त्यांनी भाग घेतला होता. मा. गो. देशमुख, ग. त्र्यं. देशपांडे, रा. शं वाळिंबे, अ. ना. देशपांडे, कविभूषण खापर्डे, या. मु. पाठक, श्री. मा. कुलकर्णी, माडखोलकर, कोलते...ही त्यांतली श्रेष्ठ साहित्यिकांची नावं.... अकोल्याच्या संमेलनात अशा मातबर व्यक्ती एकत्रित आलेल्या दिसल्याच नाहीत!

अकोल्याचे संमेलन लक्षात राहिले ते अशा रीतीने अनेक नामवंत साहित्यिकांच्या अनुपस्थितीने. अकोल्याच्या परिसरातील अमरावती, नागपूरमधील अनेक महत्त्वाच्या साहित्यिकांनी, मराठीच्या प्राध्यापकांनी अनुपस्थित राहावे, ही मराठी संमेलनाच्या इतिहासातील एक अत्यंत दुर्दैवी घटना मानावी लागेल.

अकोल्यात साऱ्या कार्यक्रमांना अफाट गर्दी करणाऱ्या जनसमुदायाची त्यामुळे झालेल्या निराशेचे वर्णन करता येणे अशक्य आहे.

मोठमोठे साहित्यिक अकोल्याला उपस्थित राहिले नाहीत याचे कारण महा-मंडळाने, विशेषतः अष्टीकरांनी दिलेल्या सल्ल्यात आहे हे नंतर लक्षात आले. अकोल्याच्या स्वागतमंडळाने साहित्यिकांना लिहिलेल्या पत्रातून प्रत्येकाला फक्त रु. ७५ देण्यात येतील, असे 'सब घोडे बारा टक्के' धोरण स्वीकारले होते. संमेलनापूर्वी अकोल्यास अन्य कार्यक्रमासाठी द. मा. मिरासदार, मंगेश पाडगावकर व विजय तेंडुलकर येऊन गेले होते. त्यांना भेटून कोणी गळ घातली नाही! माधव मनोहर उपस्थित होते, परंतु त्यांनी संमेलनाच्या कोणत्याच कार्यक्रमात भाग घेतला नाही.

या संमेलनात दलित साहित्यिकांची आणि दलितांची अगदी तुरळक उपस्थिती होती. सत्ताधाऱ्यांनी भरविलेल्या संमेलनातून गडबड करण्याबाबतीत दलितांचा फारसा पराक्रम दिसून येत नाही! यवतमाळला जांबुवंतराव धोटे आणि तत्सम उपद्व्यापी लोकांना वसंतराव नाईकांनी अटकेत टाकले होते आणि संमेलनाच्या अवतीभवती पोलिसांचे कडे उभे केले होते. (त्या वेळी दलितांचा प्रश्न आजच्यासारखा तीव्र नव्हता!) इचलकरंजीला घोषणा देणाऱ्या दलितांच्या एका गटाला तिथल्या कार्य-कर्त्यांनी संमेलनाच्या मंडपापर्यंतही येऊ दिले नव्हते. कराडला तर दलितांसह अनेक विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांची धरपकड केली होती. फक्त पुणे आणि चंद्रपूर येथील संमेलने सत्ताधाऱ्यांच्या आश्रयाने उभी राहिली नव्हती. त्यामुळे ती उधळण्यात दलितांना यश आले. दलितांच्या पराक्रमाला असे गालबोट का लागावे? चंद्रपुरचे संमेलन उधळले जाण्यामध्ये संमेलनाच्या आणि महामंडळाच्या अध्यक्षांचा आडमुठेपणा कारणीभूत होता, हे खरे असले तरी पुण्याच्या संमेलनाचे अध्यक्ष प्रतिगामी असल्याच्या भूमिकेवरून ते संमेलन उधळले गेले होते. अकोल्याच्या अध्यक्षांबद्दल ते प्रतिगामी असल्याची जाणीव सर्वांनाच होती. आपल्या अध्यक्षीय भाषणातच अध्यक्षांनी

आपण एके काळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक असल्याबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. अशा अवस्थेत दलितांनी काहीच हालचाल न केल्याने ते सत्ताधाऱ्यांच्या बंदोबस्ताला घाबरतात अशी समजूत होऊन बसते. वास्तविक; विदर्भ म्हणजे दलितांचे व दलित साहित्यिकांचे मोहोळ. अशा वेळी त्यांचे पँथर्स इतके गप्प का बसले हे गूढ आहे. महामंडळाने मराठवाडा नामांतरप्रकरणाचा ठरावही मराठीच्या ठरावाप्रमाणे पद्धतशीरपणे गारद केला होता. विषयनियामक समितीच्या बैठकीत काही व्यक्तींच्या आग्रहासाठी त्याचा कसाबसा समावेश करण्यात आला आणि अध्यक्षांनीच तो वाचून चटावर श्राद्ध उरकावे अशी त्याची अवस्था केली. माधव मनोहरांप्रमाणे दलित कवी यशवंत मनोहर संमेलनास उपस्थित होते; पण त्यांनी कश्शाकश्शात भाग घेतला नाही त्याचे गूढ काही उकलले नाही.

या सर्वांचा परिणाम म्हणजे संमेलनाचा समारोपाचा कार्यक्रम अगदीच अळणी झाला. खुले अधिवेशन आणि समारोप हे संमेलनाचे दोन महत्त्वाचे घटक आहेत. अजाणतेपणाने आणि संमेलन उधळले जाईल या भीतीने अकोल्यास हे दोन्ही कार्यक्रम जवळजवळ झालेच नाहीत, असे म्हटले पाहिजे. शासनाबद्दलच्या निषेधाचा ठराव विषयनियामक समितीतच गारद न करता खुल्या अधिवेशनात मांडून त्याची चर्चा केली असती तर काय बहार झाली असती ! जमलेल्या प्रतिनिधींचा कौलही त्यावरून कळला असता. पारतंत्र्याच्या काळात स्वातंत्र्याबाबतीतले ठराव किंवा नंतरच्या काळात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे ठराव म्हणजे संमेलनांची मोठी चैतन्यपूर्ण अंगे असत. शासनाने त्यांच्यावर त्या काळी दबाव आणला नाही ! आजची शासने इतक्या किरकोळ ठरावाबाबतीत इतकी हळवी का होतात तेच कळत नाही. मराठीसंबंधीचा किंवा त्यासारखा एखादा महत्त्वाचा ठराव खुल्या अधिवेशनात चर्चिण्यास काही हरकत नव्हती. त्या निमित्ताने झडणाऱ्या वक्तृत्वाच्या फैरी आल्हाददायक वाटल्या असत्या. त्यांच्या अभावी संमेलन शेवटी निर्जीव व चैतन्यहीन झाले. आमच्यासारखी जी चारदोन साहित्यिक मंडळी उपस्थित होती त्या सर्वांच्या साक्षीने संमेलनाच्या वस्त्रहरणाचा कार्यक्रम पार पडला. आम्ही सगळे पांडवाप्रमाणे ते सारे खाली मान घालून पहात होतो.

इतके सारे होऊनही संमेलन यशस्वी झाले असेच मला वाटते; कारण हजारो श्रोत्यांनी संमेलनात घेतलेला रस. करमणुकीच्या कार्यक्रमांना फाटा देऊन कवि-संमेलन, परिसंवाद व कथाकथन व लेखक तुमच्या भेटीला या कार्यक्रमावर संयोजकांनी भर दिला. या सर्व कार्यक्रमांना हेवा वाटावा अशी गर्दी होती. ‘ स्वातंत्र्योत्तर काळातील विविध वाङ्मयप्रकारांची समीक्षा ’ असा जडजंबाळ विषय आणि त्यावरची निर्नायकी चर्चा, परंतु तीही श्रोत्यांनी शांतपणे ऐकून घेतली.

भोजनाची व्यवस्था तर अप्रतिम होती. मडगावनंतर (१९६४) इतकी चांगली व्यवस्था अकोल्यात होती. कविसंमेलनात आणि कथाकथनात सुमार कथाकारांना व

कवींना श्रोत्यांनी टाळया वाजवून खाली बसवले व चांगल्याचे भरपूर कौतुक केले.

संमेलने मोठया साहित्यिकांमुळे यशस्वी होतात असे नव्हे, हे अकोल्याने दाखविले.

निषेधाचा ठराव बारगळल्याने मराठी साहित्यिकांमधला लढावू बाणा जागा झाला. त्यांनी मुंबईला पर्यायी संमेलन भरविण्याचे ठरविले. आव्हान उभे राहिले तर मराठी माणूस संघटित होतो, जागा होतो आणि आपल्या अस्मितेची चुणूक कशी दाखवतो त्याचे हे प्रत्यंतर होते.

मुंबईचे हे स्वाभिमानी संमेलन अत्यंत योजकतेने व भव्य प्रमाणात साजरे झाले. अध्यक्ष मालतीबाई बेडेकर होत्या. या संमेलनास उपस्थित रहाण्यासाठी साहित्यिकांनी कसल्याही मानधनाची मागणी केली नाही. उलट प्रत्येकाने वर्गणी देऊन मोठा निधी निर्माण केला.

'आपल्याला चुकीचा सल्ला मिळाल्याने आपण तीन पुस्तकांची पारितोषिके थोपवून धरली, ही आपली चूक झाली,' असे या संमेलनात जाहीर करण्यास अंतुले उत्सुक होते; परंतु त्यामुळे संमेलनाची हवाच गेली असती. काही कार्यकर्त्यांची पंचाईत झाली असती. त्यांनी तसे करण्यास अंतुल्यांना संमती दिली नाही.

बक्षिसे न दिलेल्या साहित्यिकांना पारितोषिके देण्यासाठी 'सोबत' साप्ताहिकातर्फे जनतेने उत्स्फूर्त असा निधी गोळा केला. हा निधी नऊ हजार रुपयांचा होता. शासनाने बक्षीस नाकारलेले तीन लेखक व शासनाच्या निषेधार्थ १९८० साली ज्यांनी बक्षिसे नाकारली असे पेडणेकर, बापट, पाडगावकर, मतकरी, फडके व जोंधळे असे सहा लेखक. एकूण नऊ लेखकांना प्रत्येकी रु. १००० स्वाभिमान पारितोषिके देण्यात आली ( ११ मे १९८१ ). परंतु पारितोषिक घेण्यास 'सिंहासन' कर्ते अरुण साधू पुढ आले नाहीत, कारण जनाब अंतुल्यांनी नागपूर अधिवेशनानंतर साधूंना बोलावून त्यांचा सत्कार केला होता. ही गोष्ट फारच थोडयांना माहीत होती.

समांतर संमेलनाचे पुढे काय झाले !

आव्हान संपले आणि सारे थंड झाले.

हे संमेलन भरविणारे प्रमुख साहित्यिक पुन्हा शासकीय समित्यांवर काम करू लागले. काही मंत्र्यांची भाषणे लिहून देऊ लागले, काहींची मंत्र्यांच्या निवासस्थानी पूर्वीप्रमाणे वर्दळ सुरू झाली.

मध्यंतरी बंद झालेली शासकीय पारितोषिके पुन्हा सुरू झाली. त्यासाठी नामवंत साहित्यिक पुस्तके पाठवीत राहिले. पेडणेकर, बापट, य. दि. फडके यांनी नंतरच्या काळात शासकीय पारितोषिके स्वीकारली.

आणि अखिल भारतीय साहित्य संमेलने 'काहीच झाले नाही' या आविर्भावात नेहमीच्या गतीने चालू राहिली. त्यांना कसलीच बाधा पोचली नाही !

# गोमुखीतल्या विंचवाचा झटका

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय निवडणुकीनंतर निवडून आलेल्या अध्यक्षांची प्रतिक्रिया आनंदाची, उत्साहाची व कृतार्थतेची असली पाहिजे.

परंतु अलीकडे ती साधारणतः नेहमीच विषादाची, निराशेची आणि ' आपण कशाला या फंदात पडलो ' अशी प्रतिकूलतेची असते.

तिच्यातून त्यांच्या जिभेवर एक कडवटपणाची चव रेंगाळत असल्याचे जाणवते आणि त्यामुळे मी नेहमीच अस्वस्थ होतो. ' अध्यक्षीय निवडणुकीची प्रथा बदलावी, बदलली पाहिजे, ' असे निवडून आलेल्या अध्यक्षांनी म्हटले नाही, असे क्वचितच घडते.

बरे, गेल्या वीस वर्षांत अध्यक्षांच्या या प्रतिक्रियांनुसार आपल्या घटना किती वेळा बदलाव्या लागल्या याला काही सुमार! भारताची घटना आणि महामंडळाची घटना यांच्यामध्ये जणू काही स्पर्धा लागली आहे! मग लोकसभेच्या निवडणुका आणि संमेलनाध्यक्षांच्या निवडणुका यांच्यामध्ये तशाच प्रकारच्या स्पर्धा का बरे लागू नयेत! निवडणुकाच त्या! त्यामुळे निवडणुकांमध्ये जे जे काही करावे लागते ते ते सारे केल्यानंतर मग कुठे ' साहित्यिकांनी असे करावयास नको, त्यांना तसे करावयास लागू नये यासाठी सन्मानाचे मार्ग शोधले पाहिजेत ' अशी भाषा सुरू होते.

मी गेल्या २०-२५ वर्षांतील साहित्य संमेलनांच्या अध्यक्षीय निवडणुकींचे सारे रागरंग पाहिले आहेत. ते सारे अनुभव फार विलक्षण स्वरूपाचे आहेत. त्यांतील काही आठवणींनी अजून गलबलायला होते. आपल्या अगदी जवळच्या, अगदी आवडत्या, दैवतासारखे असलेल्या साहित्यिकाला मत देता येत नाही. कुणाच्या तरी आग्रहाला, भिडेला बळी पडून त्यांच्या हाती मतपत्रिका द्यावी लागते. मला आठवते ते चिं. वि. जोश्यांचे पत्र आणि त्यांच्या भेटी. त्यांच्या विनोदावर आम्ही इतके लट्टू होतो की, त्यांना अध्यक्ष न करण्याचा प्रमाद आमच्या हातून घडला, याबद्दल ओशाळून जातो. मोडीत पत्र लिहून ते घर शोधत भेटायला आले. ' काय यंदा तरी आम्हाला निवडून देणार काय ! ' म्हणून त्यांनी कटू स्वरात विचारले. ते येण्यापूर्वी थोडा वेळ त्यांचे

प्रतिस्पर्धी उमेदवारांचे प्रतिनिधी घरी येऊन मतपत्रिका घेऊन गेले होते! आपापल्या उमेदवारांच्या निवडीसाठी आताप्रमाणेच त्याही वेळी मातब्बर प्रकाशकांच्या भुलावण्या दाही दिशांनी मतदारांना खुणावत होत्या. मी ' हो हो ' म्हणालो आणि गप्प राहिलो. नंतर ऐकल्या त्यांच्या त्या बडोद्याच्या आठवणी. बडोदा त्यांना अल्पावधीतच विसरून गेले होते. मग महाराष्ट्र आपल्याला विसरला तर आश्चर्य कसले? आपण आपले प्रयत्न करीत राहिले पाहिजे असे म्हणत ते आपला वृद्ध, स्थूल देह सांभाळीत घराबाहेर पडले तेव्हा माझ्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. जाताना त्यांची पाठमोरी आकृती दिशा चुकलेल्या माणसासारखी वाटत होती.

आपल्या अगदी आवडत्या माणसाच्या बाबतीत या अध्यक्षीय निवडीच्या काळात काही ना काही आगळीक घडते, असा माझा नेहमीचा अनुभव आहे. अण्णा ( ग. दि. माडगूळकर ) हे माझ्या अगदी जवळचे. त्यांना मत दिले होते, परंतु त्यांचे नाव, मी पुण्याच्या साहित्य परिषदेचा कार्याध्यक्ष असतानाही, पुण्याहून सुचविता आले नव्हते. निवडीनंतर त्यांचे अभिनंदन करण्यासाठी हार घेऊन सकाळी सकाळीच त्यांच्याकड गेलो. तर ते म्हणाले,

' गड्या, मला साहित्य परिषदेचा हार स्वीकारायचा नाही! '

' का अण्णा? ' मी विचारले. तेव्हा माझ्या प्रेमापोटी उसळलेला सारा राग त्यानी माझ्या तोंडावर उधळून दिला. माझा चेहरा पडलेला पाहून ते थोड्या वेळाने मऊ आवाजात म्हणाले,

' हं. घाला आता तो आमच्या गळ्यात. पोरगं मांडीवर मुतलं म्हणून मांडी कापायची असते थोडीच? '

अर्थातच तुम्ही मत कुणाला दिलं आणि कुणाला दिलं नाही हे मुळीच गुप्त रहात नाही. एकंदरीत हे क्षेत्र एवढे मर्यादित असते की काही लपून रहात नाही! त्यातच महामंडळाच्या कार्यक्षमतेनं आणखी काही बरेच घडून जाते. गेल्या वर्षी मतपत्रिका कोणाच्या हातात देऊ नये म्हणून पोस्टात टाकल्या असता, महामंडळाने पाकिटे अशी छापली होती की, त्यामुळे पोस्टमनने ते चार दिवसांत परत आपल्याच घरात आणून टाकले होते. यंदा तर उगीच घोटाळा नको म्हणून पोस्ट खात्यानेच बऱ्याच मतपत्रिकांची विल्हेवाट लावलेली दिसते! नाही तर इतक्या अगत्याने पाठविलेल्या आपल्या मतपत्रिका महामंडळाला मिळू नयेत याचा अर्थ काय?

ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर संमेलनाच्या अध्यक्षीय निवडणुकीच्या फंदात आपण पडायचे नाही असे काही ज्येष्ठ साहित्यिकांना वाटले, तर त्यात आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही. आपल्या साहित्य सेवेचा गौरव व्हावा असे जरी वाटत असले तरी त्यासाठी तोंड कडू करून घेण्यात स्वारस्य काय?

हे तोंड किती कडू व्हावे? शंकर पाटलांसारख्या कुणाच्या अध्यात मध्यात न पडणाऱ्या गुणी साहित्यिकाने निवडीनंतर व्यक्त केलेली प्रतिक्रिया अतिशय बोलकी

आहे. ते म्हणतात,

'ज्येष्ठ साहित्यिकांनाही माणुसकी विसरायला लावणारी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीची पद्धत बदलली पाहिजे. ज्यांनी साहित्यात मानदंड निर्माण केले असे थोर साहित्यिक निवडणुकीच्या रिंगणात उतरतात आणि मग राजकीय निवडणुकीसारखी इरेला पडून स्पर्धा करतात हे दृश्य इष्ट नाही, ते बदलले पाहिजे. अशा निवडणुकांतून विजयी उमेदवारांचे अभिनंदन करण्याची खिलाडू वृत्तीही प्रतिस्पर्ध्यांकड उरत नाही, साध्या शिष्टाचारांनाही ही माणसं वंचित होतात, ही दुःखद गोष्ट आहे. साहित्य क्षेत्रात तरी अशी स्पर्धा असू नये असे वाटते.'

शंकरराव, तुमच्या मताशी कोणीही सहमत होईल यात शंका नाही. साहित्य सभांची किंवा विद्यापीठांसारख्या विद्वत्सभांची 'म्युनिसिपालिटी' होऊ नये असे आपणा सर्वांनाच वाटते. परंतु नित्य तसे घडताना दिसते. आता यापुढे हे सारे अपरिहार्य आहे. आमच्या मनात हजारो वर्षांची सरंजामशाही एकीकडं दडलेली आहे, तर दुसरीकडे जगाकडे पाहून आम्ही लोकशाही मूल्ये राबविण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे या दोन परस्परविरुद्ध मूल्यांचा संघर्ष टाळता येणे कठीण आहे.

आता हेच पहा, हे लोकशाहीचे मूल्य मानगुटीवर बसल्याने शंकर पाटलांनी अध्यक्षीय निवडणुकीची जी पद्धत सुचविली आहे, तिचे अवलोकन केल्यावर काय दिसते ? पाटील म्हणतात की,

'आपण लोकशाही मानत असल्याने निवडणूक पद्धत पूर्णतः रद्द करावी असे आपणास वाटत नाही. तिच्यामध्ये मतदारांमध्ये मराठी साहित्य संमेलनाचे सर्व हयात पूर्वाध्यक्ष, प्रत्येक घटक-संस्थेचे प्रत्येकी पाच प्रतिनिधी आणि जेथे साहित्य संमेलन व्हायचे असेल तेथील स्वागत समितीचे १० किंवा १५ प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या साहित्यिकांचा तो मतदारसंघ असावा. या सर्वांची एक बैठक घेतली जावी. या बैठकीत कोणाला अध्यक्ष करावे यावर विचारविनिमय व्हावा आणि शक्यतो एकमताने आणि ते शक्य न झाल्यास मतदान घेऊन अध्यक्ष निवडावा. त्याचे नाव भावी अध्यक्ष म्हणून जाहीर करावे. मात्र त्याच्या निवडीपूर्वी अध्यक्षीय उमेदवार जाहीर करू नयेत.

आता या पद्धतीने अध्यक्ष निवडावा असे ठरविले तरी व्हावयाचे ते व्हायचे रहात नाही. घटक-संस्थांचे पदाधिकारी आणि स्वागत मंडळाचे सदस्य यांनी ही निवडणूक घ्यायची असा त्याचा अर्थ होतो. त्यांतले बहुसंख्य कार्यकर्ते असल्याने असाहित्यिक असतात आणि त्यांनी कुणाची नावे विचारात घ्यायची, कुणाची सुचवायची, कोण निवडायचा याचे राजकारण काही चुकत नाही. बरे ही सारी यंत्रणा आताच्या यंत्रणेच्याच नमुन्याची आहे. हे सारे पदाधिकारी जमवायचे ते एके ठिकाणी. म्हणजे त्यांचे यजमानत्व, त्यांचा प्रवासखर्च.... जाऊ द्या कशाला त्या उठाठेवी !

मी म्हणतो, त्यापेक्षा साऱ्या साहित्य संस्थांच्या सदस्यांनी मतदान करून पूर्वी-

प्रमाणेच ही अध्यक्षाची निवड का करू नये ? निदान खऱ्याखुऱ्या लोकशाहीची बूज राखल्यासारखे तरी होईल. तिथे लेखकाच्या लोकप्रियतेची तरी कसोटी लागेल. उत्सवी स्वरूपाच्या या संमेलनांना उत्सवी अध्यक्षच बरा नाही काय ?

मग अशा निवडणुकीत हयातभर लेखनावर मिळविलेले द्रव्य सुद्धा किती कस्पटाइतके होते हे तरी निदान कळून येईल. आणि सार्वत्रिक निवडणुकीत पडलेल्यांच्या यातनांची लोकशाही जाणीव निर्माण होईल. राजकारण्यांसाठी आणि साहित्यिकांसाठी वेगवेगळ्या कसोट्या राबविण्याची ही लोकशाही रीत...

जाऊ द्या झाले! हे सारे असेच चालायचे! अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्याने आपल्या मनातले कढ बोलून दाखवायचे, पुन्हा पुढच्या वर्षी अध्यक्षीय निवडणुकीच्या रिंगणात भल्याभल्यांनी उतरायचेच. पोळूनही घ्यायचेच ! गोमुखीत हात घातल्यानंतर बसलेला विंचवाचा झटका विसरून ‘ गार गार वाटल्या ’चा बहाणा करावयाचा...

# आता प्रायोजित संमेलने

६० वे साहित्य संमेलन यंदा मुंबईत भरणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविण्यासाठी हल्ली लाखांच्या उलाढालीची तयारी ठवावी लागते. संमेलनाच्या भव्य मंडपासाठीच कमीतकमी एक लाखाची योजना करावी लागते. तितकीच रक्कम कार्यक्रमांच्या संयोजनाला लागते. स्मरणिकेचा व्यवहारही जवळजवळ लाखाच्या घरात जातो. दुर्दैव असे की, आजकाल मुंबईत मराठी मुद्रण करणारी मुद्रणालये दुर्मिळ झाली आहेत. 'मौजे'सारखे एखादे नामांकित मुद्रणालय आज ग्रंथमुद्रणाच्या अव्वल दर्जाच्या कार्यासाठी उपलब्ध आहे, परंतु त्या मुद्रणालयाला आपले काम करावयास सवड मिळणे आणि विशेषतः त्याचे दर परवडणे या दोन्ही गोष्टी कठीण होऊन बसल्या आहेत.

अशा परिस्थितीत मुंबईसारख्या शहरात साहित्य संमेलन भरविणे म्हणजे भरविणाऱ्या कार्यकर्त्यांची कसोटी असते. ग्रामीण विभागात संमेलन भरविणे तुलनेने सोपे असते. ग्रामीण भागातील राजकीय कार्यकर्त्यांनी एकदा संमेलन भरविण्याची जबाबदारी स्वीकारली म्हणजे मग कसली काळजी करण्याचे काही कारणच राहात नाही. ग्रामीण भागातील सहकारी संस्था, ऊस कारखाने, आर्थिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या जिल्हा-परिषदा यांच्याकडे आर्थिक बाजू सांभाळण्याची शक्ती मोठी असते. बघता, बघता ते आजूबाजूच्या संस्थांकडून जाहिराती, देणग्या आणि सर्व प्रकारचे साहाय्य मिळवितात. सारी शासकीय यंत्रणा संमेलनाच्या उभारणीसाठी सज्ज होते. कारण या शासकीय यंत्रणेवर पकड असलेल्या लोकप्रतिनिधींनीच या संमेलनाचा वसा घेतलेला असतो. खेडोपाडी अलीकडे फार मोठ्या आर्थिक उलाढाली करणाऱ्या हालचाली सिद्ध झाल्याने राजकीयदृष्ट्या मेळावे भरविल्याने पक्षबळाची मोठी जाहिरात करण्याचे एक साधन उपलब्ध होते, याची जाणीव राजकीय कार्यकर्त्यांना झाली आहे. या मेळाव्यांचे स्वरूप एकसुरी असते आणि त्यामुळे त्याचे आकर्षण कमी होत जाते. साहित्यसंमेलने त्या दृष्टीने मोठी वेधक असतात. प्रतिभावंतांचा तो एक अपूर्व असा मेळावा असतो. एरवी ज्यांचे लेखन वाचण्याचा आनंद आपण घरबसल्या लुटत असतो, त्या साहि-

त्यिकांचे प्रत्यक्ष दर्शन घडण्याची ही एक मोठी संधी असते. ग्रामीण भागातील जनतेला मोठमोठे साहित्यिक, कवी पाहण्याची एक अंतर्यामी ओढ असतेच. त्यामुळे ग्रामीण भागातील संमेलनांना गर्दी वाढत जाते. त्यामुळे गर्दीचे मानसशास्त्र लक्षात घेऊन साहित्य संमेलनाची आखणी केल्याखेरीज गत्यंतर राहात नाही.

मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणी संमेलन भरवायचे म्हणजे वरीलपैकी कोणत्याही गोष्टीची अनुकूलता नसते. संमेलनासाठी उद्घाटक म्हणून एखाद्या मंत्र्याला बोलावले की, इथली वृत्तपत्रे लगेच संमेलनाच्या कार्यकर्त्यांना धारेवर धरतात. त्यामुळ राजकीय कार्यकर्त्यांच्या हाती मुंबईतील संमेलनें जाणे शक्य नसते. ग्रामीण भागातील नेतृत्व विद्यमान काँग्रेस पक्षाकडेच असल्याने विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांची कुचंबणा होते. काही ठिकाणी विरोधी पक्ष संमेलनांना निमंत्रण देतात परंतु आर्थिक दुर्बळतेमुळे शेवटी ते संमेलन सत्ताधारी पक्षाकडेच जाते व विरोधी पक्षांचे कार्यकर्ते चरफडत राहतात. पुण्या-मुंबईतही विरोधी पक्षांची तीच अवस्था आहे.

मुंबईत सत्ताधाऱ्यांचे तर नावच काढता येणे शक्य नसते. विरोधी पक्षांकडे जाण्यात काही अर्थ नसतो. शेवटी सर्वसामान्य नागरिकांना आवाहन करूनच संमेलनाची सिद्धता करणे अपरिहार्य ठरते. जाहिरातींसाठी मोठमोठ्या उद्योगसमूहांना आवाहन केले असता, इथे मराठी उद्योगपती कितपत देणग्या देणार आहेत, असा प्रश्न हटकून विचारला जातो. मराठीतील काही नामवंत उद्योगपतींनी लाखालाखांत देणग्या का देऊ नयेत, असा प्रश्न विचारला असून कार्यकर्ते निरुत्तर होतात. मराठीतील प्रख्यात उद्योगपतींनी या बाबतीतल्या मुंबईकरांच्या भावना समजावून घेणे अगत्याचे आहे.

अशा परिस्थितीत मुंबईत साहित्यसंमेलन भरविताना काय करावे, असा प्रश्न साहित्यसंघाच्या कार्यकर्त्यांना पडला होता. १९५० नंतर ३६ वर्षांनी साहित्यसंमेलन भरते आहे. इतका अवधी त्याला का लागावा, असा जो प्रश्न विचारला जातो त्याला वरील कारणे आहेत, हे लक्षात घ्यावयास हवे.

१९७४ साला पासून मुंबईत हे साहित्य संमेलन भरविण्याचे मनसुबे रचले जात होते. १९७४ मध्ये इचलकरंजी साहित्य संमेलनामध्ये 'पुढच्या वर्षी संमेलन मुंबईत भरविणार. महाराष्ट्राच्या राजधानीत पुढच्या वर्षी जरूर या' असे निमंत्रण संघाच्या कार्यकर्त्यांनी जाहीरपणे दिले. परंतु ते वचन पुरे करण्यास बारा वर्षे जावी लागली. बारा वर्षे संमेलन भरविणे मुंबईकरांना शक्य झाले नाही. गेल्या वर्षी मुंबई मराठी साहित्य संघाचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. त्या निमित्ताने काही देणग्या मिळवून संघ आपल्या कर्जातून मुक्त झाला. कर्जमुक्त झालेल्या संघाने संमेलन भरवून पुन्हा कर्जबाजारी व्हायचे का असा प्रश्न होता. परंतु १२ वर्षांचे अभिवचन आता पुरे करण्याचा प्रयत्न झाला नाही तर संमेलन नजीकच्या काळात भरविले जाणार नाही हे लक्षात घेऊन संघाने या वर्षी काहीही करून मुंबईत संमेलन भरविण्याचे जिद्दीने ठरविले.

परंतु आर्थिक बळ कसे मिळवायचे ?

दुष्काळी परिस्थितीचे निमित्त देणग्या मिळविण्यामध्ये अडसरासारखे उभे होते. अशा वेळी संघाच्या कार्यकर्त्यांना एक नवा मार्ग मिळाला.

तो म्हणजे दूरदर्शनप्रमाणे सर्व कार्यक्रमांना प्रायोजक ( Sponsers ) मिळवावयाचे.

आता साहित्य संमेलनातील कार्यक्रमांचे वेगवेगळे प्रायोजक राहतील. २५ हजार रुपये देणाऱ्यांचे नाव त्यांच्या जाहिरातीच्या फलकासह परिसंवादाला द्यावयाचे. ५० हजार रुपये देणाऱ्यांचे नाव कविसंमेलनाला द्यायचे.

एखाद्या प्रायोजकाला असे वाटले की, आपण अध्यक्षीय भाषणासाठी काही रक्कम देऊन आपल्या नावाने तो कार्यक्रम करावयाचा ! काही हरकत नाही. तसेच करावयाचे.

यंदा ही सुरुवात आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यक्रमासाठी एक प्रायोजक मिळविण्याचे यंदा प्रयत्न राहतील. हळूहळू त्याचे लोण वाढत जाईल आणि त्यामध्ये स्पर्धा सुरू होईल. निरनिराळ्या साहित्यिकांच्या निवासस्थानांचे प्रायोजन सुरू होईल. उद्या कोणी येईल आणि म्हणेल की संमेलनाच्या अध्यक्षांच्या भोजनाचे प्रायोजन मी करीन; मग इतरांच्या भोजनाचीही तीच अवस्था होईल. भोजनाच्या प्रत्येक ताटावर 'हे भोजन तुम्हाला अमक्या तमक्याच्या देणगीतून दिले जात आहे' अशा चिठ्या असतील. मंडपात ठेवलेल्या प्रत्येक खुर्चीवर प्रायोजकांची निरनिराळी नावे लिहिली जातील.

कालांतराने त्यात चुरस सुरू झाली तर काय होईल ? एखाद्या परिसंवादात पाच वक्ते बोलणार असतील, तर त्यांच्या विषयाची मांडणी त्यांच्या प्रायोजकांच्या मर्जीनुसार राहील.

समजा, परिसंवादासाठी 'साहित्यातील गटबाजी : साहित्याला तारक की मारक ?' असा विषय असेल तर आनंद यादव शेतकरी-सोसायट्या, साखर-कारखाने, भूविकास बँका इत्यादी ग्रामीण भागातील संघटनांचे प्रायोजन मिळवतील आणि परिसंवादात ग्रामीण साहित्याचा डंका घेऊन उभे राहतील. भालचंद्र फडके दलितांना संघटित करून दलित साहित्याची तुतारी फुंकण्यास सज्ज होतील. डॉ. सदा कऱ्हाडे यांचे प्रायोजन मुंबईतील साम्यवादी संघटना करतील आणि मार्क्सवादी साहित्याच्या जयजयकाराचे नारे घुमतील. कलावादी भूमिका घेऊन साहित्याचे स्वायत्त्व सिद्ध करण्यासाठी स. शि. भावे प्राध्यापकांकडून वर्गणी गोळा करून संमेलनात आपली बाजू मांडण्याची व्यवस्था करतील तर रूपवादी भूमिकेचा हिरीरीने पुरस्कार करण्यासाठी इस्थेटिक सोसायटी आणि मौज प्रकाशन यांचे संयुक्त प्रायोजन मिळविण्याचा प्रयत्न रा. भा. पाटणकर करतील व दोघांच्याही आर्थिक तुटपुंजेपणामुळे परिसंवादात त्यांचा विषय मांडला जाणार नाही. ज्यांच्यामागे प्रायोजकाचे बळ अधिक त्यांचा

विषय प्रभावीपणाने अनेक मुखाने मांडला जाईल यात शंका कसली !

धार्मिक वाङ्मय : आवश्यक की अडगळ ? अशासारख्या विषयाच्या परिसंवादात फार मोठी चुरस निर्माण होईल ती प्रायोजकांच्या अहमहमिकेमुळे. वेदात सारे काही असल्याने विज्ञान हे थोतांड आहे असे म्हणणाऱ्या वक्त्यांच्या पाठीमागे अनेक प्रायोजक उभे राहतील. धर्म ही अफू आहे, म्हणणाऱ्यांचा आवाज मॉस्कोहून आयात केलेला असणार, आणि धार्मिक वाङ्मयाखेरीज अन्य सारे वाङ्मय नष्ट झाले पाहिजे असे बोलणाऱ्या वक्त्यांसाठी अनेक धार्मिक ग्रंथभांडारे थैल्या घेऊन रांगा लावतील. या परिसंवादात आगरकरांचा फोटो उलटा टांगला जाईल.

कवींच्याही बाबतीत असेच होईल. ग्रामीण कवी, दलित कवी, साम्यवादी कवी, चित्रपटकवी, शासकीय कवी, प्रतिशासकीय कवी, धार्मिक कवी, बुद्धिवादी कवी, यांच्या पाठीमागे कोण कोण प्रायोजक असतील हे थोड्याशा विचाराने लक्षात येऊ शकेल. त्याचाच विस्तार म्हणून दारूबंदी कवी, संततीनियमन कवी, सिगरेट कवी, पानपराग कवी इ. कवी सध्या प्रचलित असलेल्या लिज्जत पापड कवी (मंगेश पाडगावकर)च्या धर्तीवर आपापली कार्ये पार पाडू लागतील !

साहित्य संमेलने भरविण्याचा आज जो इतका बाऊ केला जातो तो तसा मुळीच राहणार नाही. सध्या ज्याप्रमाणे प्रायोजकांच्या जाहिरातीच फार आणि कार्यक्रमांना कसेबसे अंग चोरून उभे राहावे लागते तसेच उद्या प्रायोजकाचा आवाज मोठा, वक्त्याचा चुरगळलेला अशी अवस्था निश्चित होईल.

तो दिवस काही फार लांब नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0025561

## साहित्यसंमेलनांचे महाभारत



“अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांचा इतिहास, त्यातील अध्यक्षीय भाषणांची मीमांसा आणि संमेलनातील वाङ्मयीन घडामोडींचं मूल्यमापन आजवर अभ्यासकांनी केलेलं आहे. स्वतः भीमरावानीसुद्धा साहित्य संमेलनांतील अध्यक्षीय भाषणांच्या संहिता सुसूत्रपणे खंडशः संपादित केल्या आहेत. पण ‘साहित्य संमेलनांचं महाभारत’ या त्यांच्या प्रस्तुत ग्रंथाची खुमारी काही वेगळीच आहे. ललित गद्य या वाङ्मय–प्रकारातलं हे रससिद्ध लेखन आहे. किंबहुना, भीमरावांच्या व्यक्तित्वाची ही खरीखुरी वाङ्मयीन मूर्ती आहे. संमेलनांच्या संस्मरणात ते स्वतः रमले आहेत; व वाचकांनीही त्यात रंगून जावं, असं अद्‌भुत रसायन या ग्रंथात आहे!”